सं. वाचनालय, शाखा ठाणे
: नाटक
: २०७८८

' — साहित्य रेश्मा,
दिवाळी
कडून ' — वुवा,
डिसेंबर
ांजली,
दिवाळी

२०७८८

IRBK-0120787

5805

# महत्त्वाची जाणीव

हया संग्रहातील एकांकिका, लेखकांच्या अनुमतीने येथे समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत. त्यांच्या प्रयोगाचे, इतर संग्रहातील वा स्वतंत्र पुनर्मुद्रणाचे आणि भाषांतर, रूपांतर, चित्रीकरण इत्यादी संदर्भातील सर्व हक्क त्या त्या लेखकांकडेच आहेत. हया संदर्भातील पत्रव्यवहार लेखकांकडेच परस्पर करावा. सर्व लेखकांचे पत्ते ' लेखक-परिचया ' मध्ये दिले आहेत.

4 JAN

IRBK-0120787

# प्रस्तावना

१९८१ या वर्षातील सर्वोत्कृष्ट लघुनाटकांचा (एकांकिकांचा) हा संग्रह प्रसिद्ध होत असताना जसे एक समाधान वाटते, त्याचबरोबर एक खंतही मना-मध्ये आहे. प्रयत्न करूनही अनेक अपरिहार्य कारणांमुळे प्रकाशन लांबत गेले आणि या आधीच्या संग्रहांपासून पडलेले अंतर भरून काढता आले नाही. झालेल्या उशीराचे, कोणतेतरी कारण देऊन समर्थन करावयाचे नाही. १९८२ व १९८३ या वर्षातील सर्वोत्कृष्ट लघुनाटकांचे संग्रह १९८५ च्या ऑगष्ट-सप्टेंबरपर्यंत तरी प्रकाशित करून, हे अंतर भरून काढण्याचा प्रकाशकांचा मानस आहे, एवढेच येथे नमूद करतो.

१९८१ या निवडवर्षामध्ये निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या व वाचावयास मिळालेल्या लघुनाटकांची संख्या १०१ आहे. पूर्वीप्रमाणेच, या निवडवर्षातही, सत्यकथा, भरतशास्त्र, लोकप्रभा या नियतकालिकांनी व मासिकांनी लघुनाटके प्रसिद्ध करण्याविषयी विशेष आस्था दाखविलेली दिसते. इतर अनेक नियतकालिकांमध्ये, लघुनाटके अधूनमधून प्रसिद्ध झाली असली तरी एक चूष म्हणून, किंवा एक नाविन्य म्हणूनच ती प्रसिद्ध करण्याकडे अधिक कल आहे असे म्हटले पाहिजे. म्हणूनच या संग्रहातील लघुनाटके, त्यांच्या गुण-वैशिष्टयांमुळे वेगळी ठरली आणि निवड करणे एकंदरीने सोपे ठरले. एक गोष्ट संवादाच्या माध्यमातून सांगण्यासाठी लघुनाटक राबविले जात असल्याचे चित्र आजही दिसत आहे. सभासंमेलनप्रसंगी हलकी फुलकी करमणूक व्हावी या माफक उद्देशाने, चटपटीत, खुसखुशीत संवाद असलेले आणि विनोदी, उत्कंठापूर्ण किंवा असेच काहीसे कथानक असलेले लघुनाटक लिहिण्याची हातोटी, मोठया प्रमाणावर जमली आहे असे निवड वर्षातील लघुनाटके वाच-ताना सहजपणे लक्षात आले. लेखनाचे प्रयोजन, लघुनाटक हा नाटयप्रकार निवडण्याचा उद्देश, या नाटयप्रकाराच्या मूलभूत मागण्या, याचा अधिक गंभीरपणे विचार व्हावयास हवा आहे.

निरनिराळ्या स्पर्धांपुरते लघुनाटकांचे प्रयोग सध्या तरी सीमित झाल्यामुळे लघुनाटके 'करून पाहण्याची' चळवळ आता जवळजवळ अस्तित्वातच नाही. 'रंगायन'ने एकेकाळी ते केले. पुढारी, मादी, खुर्च्या, पाच दिवस, अजगर आणि गंधर्व या आणि इतर अनेक लघुनाटकांचे प्रयोग, 'रंगायन'ने आपल्या स्वतःपुरता एक निश्चित असा कार्यक्रम म्हणून केले. महाराष्ट्रीय कलोपासक या संस्थेने प्रत्येक महिन्याला नवे लघुनाटक करून पाहण्याचा उपक्रम दोन तीन वर्षे सातत्याने केला. थिएटर ॲकॅडमीने 'बदकांचे गुपित' करून पाहिले. स्पर्धेच्या अनावर आकर्षणातून बाहेर पडून, प्रयोगकर्त्यांनी ही अशी लघुनाटके करून पाहण्याचे कार्यक्रम हाती घेतल्याशिवाय मराठी लघुनाटक अधिकाधिक समृद्ध होणार नाही. स्पर्धेमध्येही आपल्यास आवडलेले लघुनाटकच सादर करण्याचा स्वतःचा हक्क, प्रयोगकर्त्यांनी जाणतेपणाने समजून घेतला पाहिजे.

निवडवर्षातील लघुनाटके निवडताना लघुनाटकांची चळवळ डोळ्यासमोर ठेविली आहे. या लघुनाटकांचे स्पर्धामध्येही चांगले प्रयोग झाले, तर ती स्वागतार्ह घटना ठरणार आहे.

● ●

सतीश आळेकर यांचे 'बस स्टॉप' हे लघुनाटक एका तरूणाच्या स्वप्न-रंजनाचा विलक्षण दाहक अनुभव व्यक्त करते. चित्रपटातील प्रेम-संकेताचा व्यंगात्म उपयोग करून घेऊन, त्या तरूणाची दयनीय अवस्था आळेकर नेमके-पणाने चित्रित करतात. लघुनाटकांमध्ये तरुणाच्या दयनीयतेच्या जागोजागी विखुरलेल्या खुणा लक्षात आलेल्या कुणाला, लघुनाटकाचा शेवट 'नाट्यपूर्ण' असा केल्यासारखा वाटण्याची शक्यता आहे. "बसस्टॉप आहे अशी कल्पना" वगैरे लघुनाटकाच्या सुरवातीच्या सूचना, लघुनाटकाची नाट्यशैली निश्चित करतात.

'क्राइम ऑफ अ डेड मॅन' हे विजय तापस यांनी लिहिलेले लघुनाटक 'न – वास्तववादी' आहे. एका तरुणाच्या मृत्यूची चौकशी सुरू आहे. (त्या चौकशीच्या वेळी मदत करण्याची प्रत्यक्ष त्या तरुणाचीही इच्छा दिसते [?]) ....या चौकशीच्या निमित्तानं अस्तित्ववादी विचारप्रणाली आणि आणि जीवन मार्गाचा प्रत्यक्ष व विशिष्ट अनुभव हे लघुनाटक देऊ पाहते. कार्यकारणभावावर

अवलंबून राहून तरूणाच्या मृत्यूबद्दल ठोसपणाने विधाने करणारे, गोष्टी गृहित धरून कमीतकमी सदोषव्यवस्था निर्माण करू पहाणारे– सगळेच इथे अनिश्चिततेच्या धुक्यामध्ये सापडतात. त्यांच्या निवेदनांमधून परस्परांना छेद दिल्यासारखे वाटणारे जे अनेक प्रश्न निर्माण होतात, ते देखील अनिश्चितताच निश्चित करण्यासाठी. लघुनाटकाच्या अखेरीस जाहीर होते की खटल्याच्या निष्कर्षासाठी कोर्ट पुन्हा केव्हा बसेल त्या संबंधीच्या तारखा नंतर जाहीर होतील....

एका नव्या युगाची पहाट होत असतानाचा भयचकित करणारा अनुभव, शेखर ताम्हाणे यांच्या 'कलकी' मध्ये येतो. युगानुयुगे अटकाव होऊन पडलेल्या चैतन्यशक्तीला मुक्त केल्यानेच, धर्मसंस्थेचा जाच संपेल आणि जुनी समाज व्यवस्था कोलमडून पडेल हे जसं 'कलकी' सुचविते, त्याचबरोबर हे अवतारकार्य आजच्या तरुणांच्या हातून होणार आहे असेही सुचविते. पिस्तुल, व्हिस्की, रजनीशांचे व्याख्यान हे वर्तमानातले संदर्भ, या फॅन्टसीचे पाय वर्तमानकाळात घट्ट रोविण्याचे स्पष्ट प्रयत्न करतात.

अनिल द्रवीड यांनी हॅरल्ड पिंटरच्या 'अ स्लाइट् एक्' या लघुनाटकाचे केलेले स्वैर रुपांतर म्हणजे 'दुखरी.' पिंटरच्या नाटकामधून असतो, तसा कोणी एक घुसखोर या लघुनाटकामध्येही आहे. हा घुसखोर म्हणजे एक निरूपद्रवी, म्हातारा फेरीवाला आहे. तसा तो आहे आणि नाही देखील. सतत सलणारा तो फेरीवाला हाकलून लावण्यासाठी, दोन व्यक्ती जे प्रयत्न करतात, त्या प्रयत्नांमधून पृष्ठभागावर येतात ते त्या व्यक्तींच्या मनातले सल, दाबून ठेविलेले कढ...

या लघुनाटकाच्या प्रयोगात, फेरीवाल्याच्या नसण्यातूनच त्याचे अस्तित्व जाणवावे हे अपेक्षित आहे. पण इंग्लंडमध्ये, दूरदर्शनवर झालेल्या 'अ स्लाइट् एक्' च्या प्रयोगात, फेरीवाला प्रत्यक्ष दाखवला होता. भासचित्राची संकल्पनाच त्यामुळे अडचणीत सापडल्यासारखी झाली होती.

'इव्हॅल्यएशन' हे प्रभाकर पिंगळे यांचे लघुनाटक आपल्याभोवतीचे वास्तव पुरेशा स्पष्टपणे अधोरेखित करते. शैक्षणिक संस्थेची पार्श्वभूमी या लघुनाटकाने स्वीकारली असली, तरी राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक वास्तवाचे परखड मूल्यमापन सर्वसमावेशकपणे या लघुनाटकाने केले आहे असं

म्हणता येईल. शिक्षणसंस्था आणि शिक्षक यांचा लघुनाटकातील संदर्भ लक्षात घेता ‘ इव्हॅल्यूएशन ’ हे शीर्षक अन्वर्थक ठरावे.

आपल्या प्रायोगिक हौशी रंगभूमीवरील अनेक वृत्ती-प्रवृत्तींचे ( क्वचित कोठे व्यक्तींचे ) आणि तथाकथित प्रायोगिकतेचे केलेले सुरेख विडंबन म्हणजे ‘ संगीत नाट्यानुभवाचा कल्पनाविलास ’ हे महेश वेलणकरांनी लिहिलेले लघु-नाटक. त्याचे वैशिष्ट्य असे की एका हौशी नाट्यसंचालाच नाट्यप्रयोग उभा करीत असताना इथे पकडले आहे. त्यामुळे विडंबन उपरे किंवा कृत्रिम न होता, स्वतंत्र नाट्यानुभव होवून आले आहे. पु. ल. देशपांडे यांच्या ‘ सदू आणि दादू ’ची किंवा मुकुंद टांकसाळे यांच्या ‘ स्पर्धेतल्या नाटका ’ची या निमित्ताने आठवण होणे स्वाभाविक आहे.

विलास सारंग यांच्या ‘ साहित्याचं घर ’ या लघुनाटकातील पाठकांनीच स्पष्ट केले आहे की “ साहित्यसदन हे केवळ साहित्यिकाचं घर नाही, तर एका परीनं साहित्याचं घर आहे. ” त्या साहित्यिकांच्या जगामध्ये, विशिष्ट अशा दोन-चार दिवसात घडलेल्या घटनांची फक्त नोंद, या लघुनाटकाने केली आहे. केवळ त्या नोंदीवरूनही या ‘ साहित्याच्या घराची ’ सांगोपांग ओळख आपल्याला होते. हे लघुनाटक शेवटी काही गंभीर इशारा देऊ पाहते का ? दोन्हीवेळी साळवींची सुटका दाखवून, लघुनाटक काही सुचवू पाहते का ?-अशा काही प्रश्नांची उत्तरे निश्चित करून नाट्यप्रयोगाचा तोल दिग्दर्शकाला ठरवावा लागेलसे दिसते. ‘ काहीही घडत नाही ’ असे वरवर भासविणाऱ्या या लघु-नाटकात बरेच काही घडते आहे हे लक्षात घ्यावयास हवे.

मनोहर शहाणे यांचे लघुनाटक ‘ लकवा ’ समलिंगी संबंधांमध्ये गुरफटलेल्या दोन मित्रांच्या उध्वस्त आयुष्याचा विदारक अनुभव घेऊन येते. दोघांपैकी एकजण आजारपणात शरीराने लकवा, वेडावाकडा होऊन पडलेला; तर दुसऱ्याची मानसिकता लकवा आलेली—“ माणसाच्या व्यक्तिमत्त्वाच्या बांधणी-साठी लैंगिकता आणि आक्रमकता ही दोन तत्त्वं कारणीभूत होतात ” या विधानाची महाविद्यालयामध्ये पुरेपूर टिंगलटवाळी केलेल्या तरुणांच्या आयुष्यात, तेच विधान निराळ्या अर्थाने सत्य होऊन येते. चित्रपटगृहाच्या पिछाडीच्या भागात त्या तरुणांची खूप कालानंतर भेट होताना दाखवून लेखकाने ओंगळतेची. बीभत्स लैंगिकतेची पार्श्वभमी. या लघुनाटकाला दिली आहे.

ही सगळीच लघुनाटके प्रयोगकर्त्यांना निरनिराळ्या प्रकारचे आवाहन करतील असे दिसते. ‘ क्राइम ऑफ अ डेड् मॅन ’ एकपात्री असले तरी अनिश्चितता आणि घुसमटलेपण साकार करण्यासाठी, तरुणाभोवती विस्तृत अवकाश असण्याची आवश्यकता एखाद्या दिग्दर्शकाला जाणवेल. ‘ कलकी ’ मधील गूढ वातावरण लक्षात घेता, ‘ कलकी ’च्या प्रयोगातही अवकाशाच्या अस्तित्वाचा विचार महत्त्वाचा ठरेल. बसस्टॉप, क्राइम ऑफ अ डेन् मॅन, कलकी, दुखरी या लघुनाटकांच्या प्रयोगात प्रकाशयोजनेचा सहभाग अर्थपूर्ण असणार आहे. रंगमंचावरील नेपथ्यानुसार विभागशः केल्या जाणाऱ्या प्रकाश-योजनेबरोबरच भावस्थितींच्या ( moods ) बदलानुसार प्रकाशाचे पोत बदलणे आवश्यक ठरणार आहे. ‘ संगीत नाट्यानुभवाच्या कल्पनाविलासाचे ’ हास्यकारक रुप लक्षात घेऊन प्रसन्न वाटणारे नेपथ्य व संगीत आणि तशीच आल्हाददायक प्रकाशयोजना ही प्रयोगाची गरज ठरणार आहे. ‘ साहित्याचं घर ’ समर्थ अभिनेत्यांनी करुन पाहावे असे आहे. पाठक, हुपरीकर, साळवी यांची अवघी व्यक्तिमत्त्वे नटांना सापडली, तर प्रयोगाला रंगत येऊ शकेल. ‘ इव्हॅल्यूएशन ’ मधील विविध प्रवेशांची मांडणी रंगमंचावर कशी होते आणि निरनिराळे प्रवेश, गतीचे योग्य भान ठेवून, एकमेकांशी कसे जोडले जातात, यावर ह्या लघुनाटकाचे यशापयश ठरत जाण्याची शक्यता दिसते. याही लघुनाटकात, व्यक्तिरेखा स्वतंत्रपणे महत्त्वाच्या आहेत, हे लक्षात घ्यायला हवे. ‘ लकवा ’मध्ये नेपथ्य, प्रकाशयोजना व अभिनय यांच्याबरोबरच वातावरणातील विविध ध्वनींचे उपयोजन कदाचित् आवश्यक असणार आहे.

या लघुनाटकांच्या प्रयोगवेळच्या काही शक्यतांचाच उल्लेख येथे केला आहे. प्रत्येक दिग्दर्शक, त्याच्या समजुतीनुसार, अभिनयानुसार आणि प्रतिभेनुसार या लघुनाटकांचे प्रयोग स्वतंत्रपणे ‘ पाहणार ’ आहे, याची अर्थातच जाणीव आहे.

या संग्रहाची पूर्वतयारी होत असताना, सौ. कल्याणी हर्डीकर यांनी निरनिराळ्या नियतकालिकांमध्ये प्रसिद्ध झालेल्या लघुनाटकांची वेळोवेळी माहिती दिली आणि संग्रह सिद्ध होत असताना, निवडवर्षातील लघुनाटकांची सूचीही त्यांनी करुन दिली. स्वतः प्रबंधलेखनाच्या कामामध्ये असतानाही, सौ. हर्डीकर यांनी आस्थापूर्वक हे सहकार्य केले. पुणे येथील शासकीय ग्रंथा-

ल्यामध्ये निरनिराळी नियतकालिके व मासिके वाचनासाठी उपलब्ध होऊ शकतात. संग्रहाच्या पूर्वतयारीच्या वेळेस शासकीय ग्रंथालयामध्ये पुस्तक-बांधणीचे काम सुरु होते. पण होणारी गैरसोय सोसूनही, शासकीय ग्रंथाल्याचे ग्रंथपाल आणि सेवक वर्ग यांनी, तत्परतेने नियतकालके, मासिके उपलब्ध करून दिली. संग्रहातील लघु-नाटकांच्या सर्व लेखकांनी, सर्व प्रकारचे साहाय्य केले. सगळयांना मनःपूर्वक धन्यवाद !

—माधव वझे

• • •

# संपादक – परिचय

माधव पुरुषोत्तम वझे

जन्म पुणे येथे २१ ऑक्टोबर ३९ रोजी.

एम. ए. ( इंग्रजी ); एम. ए. ( मराठी )

नेस वाडिया महाविद्यालयामध्ये इंग्रजी विषयाचे अध्यापन.

'श्यामची आई' आणि 'वहिनींच्या बांगड्या' या चित्रपटात भूमिका. 'श्यामची आई' चित्रपटाला राष्ट्रपतींचे पहिले सुवर्ण पदक.

महाराष्ट्रीय कलोपासक, पुणे या संस्थेच्या पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन नाट्यस्पर्धेत लागोपाठ दोन वर्षे सर्वोत्कृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक.

राज्यनाट्य स्पर्धेत, सर्वोत्कृष्ट अभिनयासाठी रौप्यपदके, दोनदा.

बंगाली रंगभूमीचा अभ्यास करण्यासाठी संगीत-नाटक अकादमी, दिल्ली यांजकडून अभ्यास–अनुदान ( १९७४ )

फ्रान्समधील नाट्यसंस्थेच्या निमंत्रणाने फ्रान्सला भेट. इंग्लंड, इटाली या देशांचा धावता दौरा ( १९७४ )

ग्रीसमधील नाट्यसंस्थेच्या निमंत्रणाने ग्रीसला भेट व नंतर इंग्लंड–फ्रान्स या देशांचा धावता दौरा. ( १९८१–८२ )

महाराष्ट्र टाइम्स, केसरी, मनोहर यामध्ये नाट्य समीक्षणात्मक लेखन.

• • •

## अनुक्रम


| | |
|---|---|
| बसस्टॉप | : सतीश आळेकर |
| क्राइम ऑफ अ डेड् मॅन | : विजय तापस |
| कलकी | : शेखर ताम्हणे |
| दुखरी | : अनिल द्रवीड |
| इव्हॅल्युएशन | : प्रभाकर पिंगळे |
| संगीत नाट्यानुभवाचा | |
| कल्पनाविलास | : महेश वेलणकर |
| साहित्याचं घर | : विलास सारंग |
| लकवा | : मनोहर शहाणे |

१९८१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एकांकिकांची शीर्षक सूची

१९८१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एकांकिकांच्या लेखकांची सूची

लेखक–परिचय

# बसस्टॉप

*

सतीश आळेकर

**पात्रे :**

तरुण – वय २७-२८
तरुणी – वय २७-२८
वेळ – सुमारे ४० मि.

ग्रा. क्र. २०४८४ नों. दि. २८।२।८५
वि. ...८११८८९... क्र. ..................

( रंगमंचावर एका बाजूला बसस्टॉप आहे अशी कल्पना. खांब दिसला नाही तरी चालेल. बसची किंवा कुणाचीतरी वाट बघत लग्न झालेली तरुणी उभी. वय २७–२८. लग्न होऊन ४–५ वर्षे झाली असावीत. दुसऱ्या बाजूनं एक तरुण येतो. तिच्याच वयाचा. हातात कॅसेट टेपरेकॉर्डर. अंगावर रंगीबेरंगी कपडे. एखाद्या सिनेमाच्या हीरोचे जसे कपडे असतात, तसे हे कपडे वाटावेत. तो तिच्या शेजारी उभा रहातो. ती त्याच्याकडे रागानं बघते. रहदारीचा आवाज येत नाही. )

**तरुणी** : कशाला फोन केलास ?

**तरुण** : आठवण झाली म्हणून ! का ?

**तरुणी** : का असा वागतोस ? तुला मी हज्जार वेळा हे सांगितलंय ! मला सारखं बस-स्टॉपवर येता येणार नाही.

**तरुण** : का ? नवऱ्याला संशय आला ?

**तरुणी** : संशय कसला डोंबलाचा ! बाबू...तू मागचं विसरून जा !

**बाबू** : 'मागचं विसरून जा' म्हणजे ?

**तरुणी** : म्हणजे माझं कर्म !

**बाबू** : चिडू नकोस. नीट उत्तर दे. मागचं विसरू म्हणजे काय विसरू ?

**तरुणी** : हे बघ....कसा रे तू ? चक्रम आहेस !

**बाबू** : हं ! भेटला होता —

**तरुणी** : कोण ?

**बाबू** : तुझा नवरा.

**तरुणी** : ( चमकून ) कधी ?

**बाबू** : मघाशी.

**तरुणी** : साफ खोटं ! तो गावाला गेलाय.

**बाबू** : ( एकदम नाटकीपणाने ) 'म्हणून हे असले चाळे सुचतायत ! फोन केला तशी लगेच गेलीस ! संबंध काय त्याच्याशी ? आणि बसस्टॉप

हे काय भेटण्याचं ठिकाण आहे ? लोकांच्या समोर तमाशा झाला असेल सगळा ! '

**तरुणी** : कशाला बोलावलंस मला ? लौकर सांग. मला वेळ नाही. तुझ्यासाठी एक बस सोडली मी.

**बाबू** : खरंच भेटला होता आज.

**तरुणी** : तो गावाला गेलाय.

**बाबू** : गावाला जायच्या आधी भेटला होता. शप्पथ ! ह्या ठिकाणी मी उभा होतो. तो असा चालला होता. मी हात केला. तशी काय वाटलं कुणास ठाऊक भडव्याला —

**तरुणी** : तोंड संभाळून बोल बाब्या !

**बाबू** : ( तिच्याकडे दुर्लक्ष करीत ) म्हणाला, ' तुम्हाला बघितल्यासारखं वाटतंय. ' म्हणालो, ' असेल — असेल, '

**तरुणी** : मग तो काय म्हणाला ?

**बाबू** : म्हणाला, ' तुम्ही बाबू का ? ' मी म्हटलं, ' नाही, मी बाबूराव... आपण बसायचं का ? किती वेळ उभे राहणार ? पाय दुखायला लागतील. '

**तरुणी** : असं इथं बस-स्टॉपवर कसं बसणार ?

**बाबू** : असं मी तुझ्या नवऱ्याला म्हणालो, आणि तो बसला की लगेच फतकल मारून ! ( हसतो. ) स्टॉपवरची सगळी माणसं बघायला लागली, हा माणूस फूटपाथवर काय बसलाय म्हणून ! मग मी म्हटलं त्याला — काय त्याचं नाव....आपलं....ते....

**तरुणी** : संदीप.

**बाबू** : हां, तेच ! संदीप ! म्हटलं, ' संदीप, तुम्ही बसा. मी जरा आलोच सिगरेट घेऊन. ' जो मग मी गेलो तो आलोच नाही ! ( हसतो ) बसच्या लायनीत तुझा नवरा फतकल मारून तसाच बसलेला ! शेवटच्या बसचा कंडक्टर त्याला म्हणाला, ' काय मिस्टर ! बाबूनं बडवलं ना ? चला पळा. ही शेवटचीच बस आहे. ' मग पॅन्ट झाडत चढला बसमधे ! ( हसतो. )

**तरुणी** : तुझं डोकं फिरलंय.

बाबू : दिसायला चिकणा आहे हं तुझा नवरा.

तरुणी : मला इथं कशाला बोलावलंस ते सांग !

बाबू : मी बोलावलं नाही. तुझ्या नवऱ्यानं तुला निरोप दिला असेल. सत्त्व-परीक्षा म्हणून. बघ जरा, दडून दुर्बीण घेऊन बसला असेल.

तरुणी : निरोप तुझा आला होता.

बाबू : असेल.

तरुणी : अरे, असेल काय ? मला घरी उद्योग नाहीत का ? तुझ्यासाठी ऑफिसला दांडी मारून आलेय अर्धा दिवस ! का असा वागतोस ?

बाबू : ( खोट्या गांभीर्यानं, डोळ्यांत पाणी वगैरे आणून ) आज....जवळ-जवळ पाच वर्ष झाली ! का कशी वागलीस ? नकार होता, तर चाळवलंस का ? का अशी बघायचीस माझ्याकडे ? एकदम घुम जाव करून निघून गेलीस ! लग्न झाल्यावर इथं नोकरी करतेस. एवढंच कळलं मला.

तरुणी : मी तुला चाळवलं नाही !

बाबू : तुझी नजर स्थिर नसायची, भोसडे !

तरुणी : शिव्या देऊ नकोस ! ...आणि हे असले कपडे तुझे ? मी ओळखलं नाही प्रथम !

बाबू : तो एक इतिहास आहे. मी....मी....नोकरी सोडली, रती !

तरुणी : माझं नाव रती नाही.

बाबू : नसेल ! पण तू माझी रतीच !

रती : नोकरी का सोडलीस ?

बाबू : कारण ? कलेची आवड !

रती : कला कसली डोंबलाची ! काहीतरी करून बसायचं. काय करतोस आता ?

बाबू : मी सिनेमात असतो, रती. छोटे –मोटे रोल करता हूं.

रती : रोल करतोस की एक्स्ट्रॉ म्हणून काम करतोस ?

बाबू : [ हिंदी सिनेमा-थाटात ] जिन लोगोंको आप एक्स्ट्रॉ पुकारके 'टीझ' कर रहीं हैं, वो भी एक इन्सान है, रती !

रती : का सोडलीस नोकरी, बाबू ?

बाबू : कारण....नोकरीत खूप बंधनं असायची. तुला भेटता यायचं नाही. कलेची आवड होती. एक दिवस एक माणूस भेटला – और बोला, 'अरे बाबू, तेरी फिगर इतनी अच्छी है! साला, तू फिल्ममें क्यों नहीं जाता?' म्हटलं 'जाता हूँ बाबा. जाता हूँ.' म्हणून सोडली नोकरी!

रती : मला सगळं खोटं वाटतंय.

बाबू : खोटं वाटतंय, तर तुझ्या नवऱ्याला विचार ना!

रती : हे बघ जे झालं होतं आणि जे चाललंय ते आपल्या दोघांचं आहे. त्याचा ह्यात संबंध नाही.

बाबू : नाही कसा? तुझा नवरा मला नेहेमी म्हणायचा की, म्हणे लग्नात, बघितलं तेव्हाच वाटलं की, तुम्ही फिल्ममधे का जात नाही म्हणून? त्याच्या नादाला लागलो नि नोकरी सोडली.

रती : बाबू, एक मिनिट तरी सरळ बोल की रे! इकडे ये! बस नीट.
(दोघं फूटपाथवर बसतात.)
तुझ्या लग्नाच्या वेळी आम्ही दुबईला होतो. संदीपचं दोन वर्षांचं कॉन्ट्रॅक्ट होतं.

बाबू : ओळख का होते? म्हणजे एक बाई आणि एक तुवा यांची ओळख का होते?

रती : गरजेपोटी.

बाबू : कसल्या गरजा?

रती : शरीराच्या, मनाच्या!

बाबू : लग्न करून ह्या दोन्ही भागतात?

रती : तुला काय वाटतं?

बाबू : तुला काय वाटतं?

रती : अवघड आहे सांगणं. कारण गरज कायम उरतेच. भागली तरी परत निर्माण होते आणि एकदा भागली की परत भागेल न भागेल.... आपलं गप्प बसून रहायचं.

बाबू : तू दुःखी वगैरे असलीस, तर तसं स्पष्ट सांग. लाजूबिजू नकोस, आणि गरजा भागवायच्या असल्या तरी—

रती : आचरट आहेस !

बाबू : आचरट नाही. खरं तर स्त्री–पुरुषांच्या गरजांची बँक केली पाहिजे म्हणजे किडनी, डोळे, रक्त ह्यांची असते, तशी. परवा म्हणाला तो की—

रती : कोण ?

बाबू : संदीप ! कशादरून तरी आम्ही गरजांविषयी बोलत होतो. तशी तोही म्हणाला, 'अशी बँक काढली पाहिजे.' म्हटलं 'जरूर काढा. रतीचं खातं तर आयला पहिले छूत खोला.'

रती : चावट आहेस !

बाबू : पण तू नाहीस ! तशी असतीस, तर प्रश्नच आला नसता. फोनला पन्नास पैशांची नाणी कमी लागली असती आणि आपल्याला पळून जाऊन हॉटेलमधे रहाता आलं असतं.

रती : आला माझा नवरा पिस्तुल घेऊन म्हणजे ?

बाबू : तर आपण त्याला ठार मारू !
(शांतता)

रती : मी जाते. बस येईल असं वाटत नाही. टॅक्सी केली पाहिजे. (उठून उभी रहाते,)

बाबू : थांब जरा. किती दिवसांनी भेटत्येयस. दुपारी ह्या बसेस कधीच वेळेवर येत नाहीत.

रती : लवकर आली तर बरं !

बाबू : लग्नाची बस मात्र वेळेवर आली.

रती : काय करणार मी ? तुझ्यासारख्या भणंगाला कोण पत्करणार ?

बाबू : लग्नाआधी... तुला... दिवस गेले होते.

रती : मुस्काट फोडीन बाब्या ! कोण वाटले कोण तुला मी ? एक तुला माझ्या अंगाला हात लावू दिला, तर किती भडकतोस ! तसं करू देणं–न देणं ही माझी इच्छा होती. माझा अहंकार आहे असं समज. तुझ्या सिनेमात प्रत्येक हीरोचं नटीबरोबर लफडं नसतं. प्राण गेला तरी हात नाही लावू देणार ! जा, बस बोंबलत !... जा आता बाबू ! मला माझा संसार करू दे, तू तुझा कर.

(शांतता. बाबू बरोबर आलेला कॅसेट टेपरेकॉर्डर सुरू करतो. यावर 'मै बंबईका बाबू, नाम मेरा अंजाना' ह्या गाण्याच्या ओळी वाजतात.)

**बाबू** : (खोट्या नाटकीपणे) संगीताच्या ह्या अशा सुरावटीमुळे ताण हलके होतात. मग प्रसन्न होतं. त्यात जुनी हिन्दी गाणी तर केवळ अवीट गोडीची बाब आहे. सायगल काय, शमशाद, लता काय किंवा मन्नाडे काय! ह्या मन्नाडेचं गाणं लागलं की दिवसाची रात्र झालीय असा भास होतो आणि चित्तवृत्ती निवतात.

**रती** : का ओळख झाली आपली? का असा वागतोस चमत्कारिक? (त्याच्या केसातून हात फिरवते.)

**बाबू** : (चमकून) अग, संदीप आला बघ! (ती घाबरून हात फटकन काढून घेते. तो खूप हसतो.)

**रती** : तू... तुला खरंच संदीप भेटला होता?

**बाबू** : हं.

**रती** : कधी भेटलास? मला तो काही बोलला नाही.

**बाबू** : कसा बोलणार? त्याला तुझी लाज वाटली असेल. कारण मी त्याला सगळं सांगितलं. म्हणजे तू मला कशी चाळवायचीस.... करायचं तर काही नाही. नुसतं करू की नको, जवळ जाऊ की नको? तर कधी नुसतीच बोटात बोटं! ह्यामुळे माझा काठ कधी सुटला ते कळलं नाही. धारदार प्रवाहात गटांगळ्या खातखात अखेर हिंदी सिनेमात एक्स्ट्रॉ आलो. वाटलं, हा सापडलेला काठ तरी भर्जरी असेल. पण तोही अखेर कचकड्याचा निघाला. ही फिल्म फार मोठी निघालीय! रिळांचा गुंता झाला. मी त्यात पुरता अडकलो. आता हा गुंता मी सोडवणार कधी? फिल्म-नट होणार कधी? हीरो हिरॉइनला भेटणार, की उपनायिकेलाच नायिका मानणार? आणि असा गोंधळ उडाला की मग मी...

(कॅसेट सुरू करतो. 'अनुराधा' मधलं 'जाने कैसे सपनोंमें खो गयी अँखियाँ' हे गाणं हलकेच ऐकू येतं. वातावरण निवतं.)

**रती** : भेटलास का तू त्याला? काय म्हणाला तो?

बाबू : तो म्हणाला, 'तुमच्याकडे—म्हणजे माझ्याकडे -पाहिल्यानंतर असं वाटतं की... डब्यात पडलेला प्रायोगिक चित्रपट वघतोय म्हणून !' आणि ह्याच कारणासाठी त्याला तू पसंत आहेस.

रती : मी नाही समजले !

बाबू : तो म्हणाला, 'तिचा इतिहास जाणूनच मी लग्न केलंय' म्हटलं, वा: ! मनमोहन देसाई, तुमचं 'नसीब' बलवत्तर आहे. तुमचा सोयरीकपणा महान आहे. मग मी असं करू का ? की आठवड्यातून एक वेळा मी येत जाईन. तुमचं काही असेल तर तुम्ही तिकडे जा... तुझ्या नवऱ्याचे केस फार विस्कटलेले का होते ग ?

रती : शक्यच नाही ! तो विग वापरतो.

बाबू : ( स्वत:शीच हसत हसत ) आपला गोटाच का ?

रती : तू खोटं बोलतोयस. तू त्याला भेटलेलाच नाहीयेस !

बाबू : पैज ! लावतेस का पैज ?

रती : तुझ्यासारख्या चक्रमाशी कोण पैजा लावणार ? ही बस कशी नाही आली अजून, कोण जाणे.

बाबू : बसचं मरू देत. मुलं किती तुला ?

रती : एक मुलगा आहे.

बाबू : वंडरफुल ! मला एक मुलगी आहे. आपण त्यांचं लग्न करायचं का ? म्हणजे बघ 'हिंदी-चिनी भाई-भाई', तसे 'बाबू-रती व्याही-व्याही !' ( हसतो. )

रती : चल ! मुलांचं आपण कोण ठरवणार ? त्यांची ती बघतील.

बाबू : हो ऽ ! आपलं तरी आपल्याला कुठं ठरवता आलं ? तू फक्त मला चाळवून ठेवलंस आणि—

रती : वाट्टेल ते बोलू नकोस !

बाबू : का खोटं बोलत्येयस ? नव्हतं लग्न करायचं तर का बोटांत बोटं घातलीस ? तेव्हा त्याचा परिणाम माझ्यावर काय होत होता त्याची तुला पर्वा नव्हती. आपल्याच नादात तू ! आणि इतक्या वर्षांनंतर आता विचारतोय, तरी नाही म्हणतेस. निदान चोरून तरी काहीतरी करू या !

रती : बाबू, तू वेडयासारखं असं ..

बाबू : तुझा नवरा वेडा आहे !

रती : तुझी....बायको. ..कशी आहे रे ? म्हणज दिसायला !....

बाबू : नकटी आहे ! करायचं काय तुला ? काही घेणं आहे का ? ( आवाज वाढत जातो. ) काय घेणं आहे तुला ?

रती : चिडतोस काय बायकोचा विषय निघाल्यावर ? खरंच नोकरी सोडलीस ?

बाबू : हां.

रती : का ?

बाबू : सांगितलं ना, कलेची आवड आहे म्हणून !

रती : अरे, पण म्हणून काय एकदम एक्स्ट्रॉ व्हायचं ?

बाबू : आज एक्स्ट्रॉ आहे; उद्या कुणी सांगावं, हीरो होईन ! मग मात्र मी मागेन ती हीरॉईन ! तिच्या इच्छेचा प्रश्नच नाही ! रोकडा फेको और तमाशा देखो ! आम्ही मग फिरायला जाऊ–कधी काश्मीरला, तर कधी उटीला. हिरव्या गालिच्यावरून, फुलांवरून, निर्झराच्या काठानं, ' इंपोर्टेड ' कारमधून, ' डिस्को ', गणपती उत्सव, दहीहंडी, कॉलेजची ट्रिप, लोणावळा, खंडाळा...भराभर भराभर फिल्म पुढे ! रिळंच्या रिळं ! खूप गुंता ! आणि ह्या कचकड्याच्या फिल्मचा प्रचंड गुंता सोडवता सोडवता एक जबरदस्त सिच्युएशन तयार होईल. मग ठेका देऊ ! ( कॅसेट सुरू करतो. त्यावर ' मैं सोला बरसकी, तू सतरा बरसका ..' हे किंवा ह्यासारखं एखादं गाणं सुरू होतं. रती रडवेली झालेली. )

रती : ( रडवेली ) बाबू, बंद कर ! बंद कर ते गाणं ! अरे, काय तमाशा चाललाय हा ?

बाबू : [ त्वेषानं, क्रमशः आवाज वाढवत ] हां ! चलने दो ये तमाशा ! देखने दो सब लोगोंको ! अगर है कोई माँका लाल, तो रोक दे ये तमाशा ! ऐसा नहीं रुकेगा, रती ! तभी रुकेगा, जब कोई इन्सान आस्मानसे उतर आए ! तभी रुकेगा, जब कोई पुलिस मुझे हथकडी लगा दे ! तभी रुकेगा, जब कोई मुझे थप्पड मार दे—

( रतीला ते सहन होत नाही. बाबू तिच्या भोवती चकरा मारीत, तिच्याजवळ जात म्हणत असतो, ) मार दे मुझे थप्पड !.... मार दे मुझे थप्पड !...मारऽऽ दे मुझे !...

( रती त्याला मुस्काटात मारते. )

( हिंदी सिनेमासारखा अभिनय करीत बाबू म्हणतो. )

मारा मुझे ? तुमने मुझे थप्पड मारा ? ये थप्पड नही थी रती, य अपनी मोहब्बतकी निशानी थी, जो तुमने मेरे गालोंपर उठायी !

[ बाबू कॅसेट सुरू करतो. त्यावर, ' ये दुनिया अगर मिल भी जाये तो क्या है ? ' हे गाणं ऐकू येतं. दोघं स्वस्थ, शांत होतात. ]

**रती** : बाबू, तू जा ! कुठंतरी लांब निघून जा ! परत भेटू नकोस मला....

**बाबू** : ते माझ्या हातात नाही. आपल्या हातात काय असतं ? तुझ्या हातात बांगड्या तरी आहेत. माझे आपले रिकामे हात ! कधी घड्याळ घातलं, तर दुसऱ्या हातानं किल्ली द्यायची. आता तुझा नवरा मरावा असं मनातून जरी वाटलं, तरी तसं घडणार आहे का ?

**रती** : अशी वाईटच इच्छा तू नेहेमी का करतोस ?

**बाबू** : तू मला फसवलंस, म्हणून !

**रती** : किती वेळा तेच ते उगाळणार आहेस ! समज, मी फसवलं तुला, मग ? ' फसवलं-फसवलं ' करीत बसणार आहेस का जन्मभर ? स्वतःचं बघ की जरा. चांगली नोकरी कर—

**बाबू** : ( तिच्या सुरात सूर मिसळून ) ' पैसे मिळव ! काय दशा करून घेतलीयस ! चांगली नोकरी सोडलीस—सिनेमाच्या नादाला लागलास. जरा घराकडे लक्ष दे, पोरांकडे बघ ! त्यांच्या शिक्षणाकड बघ. माणसानं मागचं विसरायला शिकलं पाहिजे. जमत नसेल तर शिकवणी लाव माझी ! स्वतःच्या आवडीचं जगात प्रत्येकाला मिळालंच पाहिजे का ? ... सांग मला ! बोल की, दे उत्तर ! '

**रती** : तुझ्याशी बोलण्यात काहीही अर्थ नाही ! इथं आले हेच चुकलं !

**बाबू** : तुला जायचं असेल तर जा ह ! माझी हरकत नाही. मुलगा वाट बघत असेल. संदीप ऑफिसमधून यायची वेळ झाली असेल.

**रती** : आमचा बिझनेस आहे. ऑफिस घरीच आहे.

बाबू : मग तू नोकरी कशाला करतेस ?

रती : तुला निर्धास्त भेटता यावं म्हणून ! कळलं ?

बाबू : मग मला पगार देत जा.

रती : मैत्री आणि व्यवहार यांच्यात गल्लत करू नकोस.

बाबू : केली नसती. पण आपण एका गल्लीत रहायचो म्हणून सांगतो, तुझ्या नवऱ्याला संभाळ ! आमचं शूटिंग चालू असताना परवा तो तिथं आला होता. आमच्या प्रोड्यूसरबरोबर बोलत होता. 'सिनेमात पैसे गुंतवायचे ' म्हणत होता.

रती : बंडला मारू नकोस !

बाबू : बंडला नाही. तुमच्या घरी तो दामू रॅमसे येत नाही का ?....सांग ना, दामू रॅमसे येतो की नाही ?

रती : येतो.

बाबू : तोच आमचा प्रोड्यूसर आहे.

रती : नंबर एकचा हलकट माणूस आहे तो !

बाबू : तरी त्याला जेवायला घालतेस ! कारण नवऱ्याचा मित्र ! आणि मला सांगतेस, 'मर, दूर निघून जा ! ' तरीही सांगतो, नवऱ्याला सावध कर. सगळा पैसा घालवून बसेल ! बघताबघता संसाराचे सप्तरंग उडून जातील, आणि ब्लॅक ॲन्ड व्हाइट नशिबी येईल. आखिर तुम भी इस फिल्म इंडस्ट्रीके बाजारमें एक एक्स्ट्रॉं बन जाओगी. हिरॉइन के पीछे झूलना पडेगा और कुत्तेकी मौतसे मर जाओगी. ह्या धंद्यात पैसे टिकत नाहीत. रावाचे रंक होतात ! स्टुडिओंचे मालक भिकेला लागतात, तर एखादा भिकारी हिरो होऊन राज्य करतो ! बडी नखरेल दुनिया है प्यारे !... तुम्हे नाचना आता है ?

रती : का—य ?

बाबू : तुला डान्स येतो ?

रती : नाही.

बाबू : मग शिकून घे. एवढी मोठी झालीस आणि डान्स येत नाही ? एक्स्ट्रॉला डान्स यायलाच हवा ! लाज वाटली पाहिजे.... मी शिकवतो नाच ! चला ! ( ओरडत ) नाचोऽ !

रती : बाबू, तू शुद्धीवर आहेस का ?

बाबू : नाचो ऽ ! भैंचोद, नाचो !

रती : बाब्या !

बाबू : सुनती क्यों नही ? रांड साली ! नाचो !

( असं म्हणून कॅसेट सुरू करतो. त्यावर भन्नाट ठेका असलेलं एखादं लोकप्रिय हिंदी गाणं ऐकू येतं. प्रकाश बदलत राहतो. बाबूची खूप मोठी सावली पडते. बाबू स्वतःच्या तंद्रीत 'नाचो ऽ—नाचो !' असं ओरडत, नाच शिकवल्याचा अविर्भाव करीत, स्टेजभर फिरत नाचत असतो. रती त्याला सावरण्याचा प्रयत्न करते. पण त्याचं नाचणं वाढत जातं. )

रती : बाबू, माझं ऐक. असं करू नकोस. लोक जमतील बघ.

बाबू : ( तालावर नाचता-नाचता ) हट जाव. देखने दो सबको. ये मेरी जिंदगीका छायागीत है, रती, जिसकी तुम्हारे पतीने स्पॉन्सर किया है. हररोज इसी वक्त चलता ही रहेगा !

( रती कॅसेट बंद करते. शांतता. नाचून—नाचून बाबू थकलाय. काही क्षण कुणी बोलत नाही. मग बाबूला थकावटीमधून हसू येतं. तो खळखळून हसतो. ]

बाबू : मझा आया !

रती : मी जाते, बाबू.

बाबू : मी कधीच तुला अडवलं नव्हतं आणि अडवणार नाही ! तुझी तू स्वतंत्र आहेस. तुला मी बोलवलं असं तू म्हणतेस. पण मी अजून दुजोरा दिलेला नाही.

रती : दुजोरा कसलाच नाही. कच्चे दुवे, फोन, संदीपची भेट, तू नोकरी सोडलीस, हे हिंदी सिनेमाचं....सगळं खरं की खोटं ?

बाबू : फक्त एकच खरं !

रती : काय खरं बाबू ?

बाबू : इथं आज आपण भेटलो !

रती : हो ! बऱ्याच वर्षांनी.

बाबू : बऱ्याच वर्षांनी ह्या बस-स्टॉपवर भेट. आज ह्या बसवाल्यांचा संप तर

नाही ?

रती : असला तरी मिटेल आज ना उद्या केव्हातरी.

बाबू : (एकदम मोठ्यानं) समाजको बदल डालो !

रती : (दचकून) काय म्हणालास ?

बाबू : नाही नाही. सिनेमाचं नाव आठवलं.

रती : तू काम केलं होतंस त्यात ?

बाबू : तसं ठरलं होतं. पण ऐन वेळी फायनान्सरनं त्याचा माणूस घुसवला तू.... मला काम देशील ?

रती : कसलं ?

बाबू : कसलंही चालेल.

रती : आमचं अजून सिनेमा काढण्याचं नक्की नाही ठरलं... चल, मी जाते. बस येईलच आत्ता.

बाबू : (सुस्कारा सोडून) हंऽ! 'मी जाते. बस येईलच आत्ता!' ह्याचा अर्थ एकच. तो म्हणजे 'तू मसणात जा! मी एकटी ऐटीत थांबते.' पण इथं मी आपण होऊन आलो नाही. शूटिंग चालू असताना चिठ्ठी मिळाली मला 'इथं भेट' म्हणून.

रती : मी चिठ्ठी वगैरे काहीही पाठवलेली नाही.

बाबू : तू नसेल. संदीपनं नाहीतर त्या दामू रॅमम्नं दिली असेल.

रती : बघू.

बाबू : (खिशातून काढून देता) ही बघ,

रती : (चिठ्ठी घेत) ही... हे... बसचं तिकीट आहे, बाबू! मी काय म्हणत्येय...

(शांतता. कॅसेट सुरू झाल्यावर 'दुखी मन मेरे। सुन मेरा कहना' हे गाणं चालू असतानाच)

बाबू : फोन कुणी केला, चिठ्ठी म्हणून बसचं तिकीट कसं आलं, ह्या घगळ्याचं वर्गमूळ एकच! तुझं शरीर मला मिळालं नाही! अगदी जबरदस्त इच्छा असूनदेखील नाही! म्हणून ही तरफडतरफड!

रती : (गाणं चालूच आहे.) बाबू, मला परत कधीही भेटू नकोस! चालता हो कायमचा! तू मेलास तरी चालेल. नीट ऐक बाबू, तू मेलास

तरी मला चालेल, पण असा परत छळायला येऊ नकोस! कधीही येऊ नकोस! बस खाली. निघते मी.

(बसचा आवाज हळूहळू मोठा होऊ लागतो. रती पर्स वगैरे सावरत बसची वाट बघत असते. बाबू एकदम तीरासारखा स्टेजवर दिशाहीन फिरतो. बसचा आवाज आणि बाबूचा फिरण्याचा वेग वाढ लागतो. रती ओरडते.)

**रती** : मागे फिर, बाबू! बस येत्येय. जाऊ नकोस. बसखाली जाशील! बाबूऽ.... मत जाव.... मत जाव. खतरा हैऽ!

(हिन्दी सिनेमायोग्य पार्श्वसंगीत सुरू होतं. बाबू रतीचा पाठलाग तद्दन हिन्दी सिनेमा क्लायमॅक्सच्या पार्श्वसंगीतावर सुरू होतं. त्यात बस येण्याचा आवाज मिसळतो. बाबू धावत विंगेत जातो. बसचा ब्रेक दाबल्याचा कर्कश आवाज. रतीची किंकाळी. शांतता. मग लोकांचा 'काय झालं, कसं झालं' गलका ऐकू येतो. अर्धवट प्रकाशात धावपळ दिसते. कुणीतरी पलंग आणतो, पांढरी चादर वगैरे. बाबूला त्यावर झोपवतात. त्याला डोक्याला खूप बँडेजेस् बांधलेली. रक्ताचे डाग वगैरे. रती येते. बाबूला अर्धवट ग्लानी. पलंगावर अर्धवट उठून बसलेला, शक्य आलं तर बाबूला रक्ताची किंवा सलायनची बाटली लावलेली दाखवावी. रती पलंगावर बसते.)

**रती** : काय करून बसलास वेड्यासारखं!

**बाबू** : मला वाटतं मला यायला उशीर झाला, आणि तू गेलीस म्हणून! धावत बस पकडण्याचा प्रयत्न केला. चुकलंच!... अॅक्सिडेंट झाला...खूप दुखलं.

**रती** : मी कुठं गेले?....काय बोलतोयस तू? काल बसस्टॉप! आज मी पेपरात वाचलं नि भेटायला आले. कधी आणलं तुला इथं?

**बाबू** : काही समजलं नाही. शुद्धीवर आलो ते इथंच आहे. तू...आलीस होय? मला वाटले पोलिस आले....

**रती** : पोलिस कशाला...म्हणजे...बायको कुठाय तुझी? घरचं कुणी आलं नाही म्हणून?

**बाबू** : जरा गोंधळच झालाय.

रती : काय बोलतोयस ? डोक्यावरच्या मारामुळे तर काही...

बाबू : [ झटक्यात उठून बसून, बँडेज लावलेला तसाच उभा रहात बोले]
डोक्यावर बस बसलीय !...

रती : अरे ! उठू नकोस ! डॉक्टर ! ....तू...तुझ्या घरचं कसं कुणी
नाही ? अरे, चालू नकोस.

बाब : गोंधळ झालाय. पोलिस येतील. कारण बायको...म्हणजे...स
मी मुलीबरोबर खेळत होतो....ते डार्ट वापरतात ते. एकदम वाटलं;
तुझी चिठ्ठी आली आणि ती बायकोनं लपवलीय. म्हणून नेम धरून
डार्ट मारला तो नेमका बायकोच्या छातीत ! मग दुसरा डार्ट....
तिसरा... रक्त.... सगळं.... इकड आलो बसस्टॉपवर तर बस मधे
आली. मला वाटलं, थांबलीय बस म्हणून पाय पुढे टाकला तर
तो.. ह्या स्टॉपवर न थांबणारी लिमिटेड होती...डार्ट फार जोरात
लागला...तो डार्ट फार जोरात लागला...तो डार्ट नव्हता- सुरी
होती !.... गोंधळ सगळा ! आपण स्टॉपवर भेटलो तेवढं खरं ! तुझ्या
नवऱ्याला भडव्याला बरोबर करतो ! साला नालायक ! अडथळ्याची
शर्यत.... एकेक अडथळा...दूर करून...म्हणजे...आयला....एक
महत्त्वाचा अडथळा तर दूर केला...आयला...
( बाबूला झापड येत्येय. बोलणं तुटतं. तो पलंगावर पडतो. विंगेत एका
स्पीकरवरून पोलिसांच्या सायरनचा आवाज येऊ लागतो. तर दुसऱ्या
विंगेतल्या स्पीकरवरून एका लहान मुलीच्या आवाजात पुढली वाक्यं
परतपरत ऐकू येतात : बाबा कधी घली येनाल... आई, बोल
ना !... बाबा कधी घली येनाल ?...आई बोल ना....वरील दोन्ही
आवाजांची सरमिसळ वाढत जाते. )

रती : [ आवेगानं बाबूला हलवीत ] बाबूऽ ! सांग काय केलंस घरी ?
मारलंस का तिला ?....अरे, फाशी जाशील ना आता...बोल ना !
असा कसा रे वेडा तू ? ....सांग का खून केलास बायकोचा ?.. का
खून केलास बायकोचा ?... मुलीचं काय झालं ?... अरे, बोल रे !
कुठाय ?...बाबूऽ !...
(बाबूच्या छातीवर पडून धाय मोकलून रडते. सायरन आणि
...चा आवाज आता टिपेला पोचलाय.—पडदा )

# क्राइम ऑफ अ डेड् मॅन

*

विजय तापस

**पात्र :**

एकपात्री

वेळ – सुमारे ४० ते ४५ मि.

जेथे पात्रांचे भाषण सुरू होते त्याअगोदर सोयीसाठी त्यांना क्रमांक देणे आवश्यक आहे. म्हणून त्यांना वक्तव्य : एक, वक्तव्य : दोन, वक्तव्य : तीन व वक्तव्य : चार असे म्हणावे.

'क्राइम ऑफ अ डेड् मॅन' हा नाट्यांक एकपात्री आहे असे सोयीसाठी (रंगमंचीय आविष्कार + आशयाचा परिणाम यांच्या संदर्भाने) गृहीत धरलेले आहे.

प्रस्तुतच्या नाट्यांकाला नेपथ्य असे जवळ जवळ नाहीच. अपवाद फक्त आरंभीच्या पिंजऱ्याचा व दोरखंडाचा.

क्राइमच्या रंगमंचीय आविष्काराचे महत्त्वाचे साधन म्हणजे प्रकाशयोजना व नटाचा मुद्राभिनय अर्थात त्याचे शरीर.

**प्रकाश :** प्रस्तुतचा संपूर्ण नाट्यांक हा स्पॉट्स्‌मध्ये घडतो – जनरल मध्ये चुकूनही घडत नाही. एकदाही रंगमंच पूर्ण प्रकाशमान होऊ नये.

**संगीत :** जवळ जवळ संगीत नाही. (पार्श्वसंगीत) अपवाद फक्त शेवटच्या निःशब्द, मानवी ध्वनिरहित दृश्याचा. केवळ याच दृश्याच्या बरोबर ढोलाची रानटी, भयकारी पण गंभीर साथ असावी. या ढोलवादनात संथपणा पण भय-कारिता अत्यंत आवश्यक आहे. आततायीपणा नको.

**दृश्ये :** नाट्यांकाच्या प्रारंभीचे व अखेरचे एक अशी दृश्ये निःशब्द असणे अत्यंत आवश्यक आहे.

(नेहमीचाच रंगमंच. तिसऱ्या विंगेपासूनचा मागील सगळा रंगमंचअवकाश (स्टेज एरिआ) काळ्या कापडाने प्रेक्षकांच्या नजरेच्या टप्प्याहून उंच झाकलेला असावा. एखाद्या चिरेबंदी भिंतीप्रमाणे त्याची रचना असावी.)

**दृश्य पहिले :** डाव्या बाजूची तिसरी विंग ते उजव्या बाजूची तिसरी विंग (हे डावे-उजवे प्रेक्षकांच्या स्थानाप्रमाणे) असा एक दोर आहे. अतिशय जाड, मजबूत व स्पष्टपणे पिळदार. त्या दोराच्या मध्यभागी व प्रेक्षकांच्या बरोबर समोर, (डीप सेंटर) या दोराला एक वेढा पडलेला आहे. या वेढ्यांत एक

मानवी तरुण पुरुष आकृती. ही आकृती दोन्ही बाजूंच्या विंगांतून खेचली जाते. ही खेचाखेच - या खेचाखेचीचा वेग हा टप्प्याटप्प्याने वाढत जाणारा आहे. प्रथम या खेचाखेचीतून सुटण्याचा ती आकृती विलक्षण आकांताने व असहय धडपडीने प्रयत्न करताना दिसावे. दोन्ही दिशांनी वाढत जाणारा खेचाखेचीचा वेग असहय आणि अपरिहार्यपणे अटळ झाल्यावर किंवा होताना त्या आकृतीचा धडपडीचा वेग कमी कमी होत जायला हवा. खेचाखेचीच्या अत्युच्च वेगात तर ती आकृती फक्त पूर्णपणे निष्क्रिय होऊन दोन्ही दिशांना असहाय्यपणे फक्त खेचली गेलेली दिसणे आवश्यक आहे. दृश्याच्या शेवटच्या क्षणी ती आकृती पूर्ण थंड, हतबल आणि असहाय्य होऊन मूळच्या प्रारंभीच्या जागी कोलमडणे आवश्यक आहे.

( प्रस्तुत दृश्याच्या सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत प्रकाश अतिशय कमी - ढोबळपणे जवळ जवळ ' नाहीच ' असा - हवा. त्या मानवी आकृतीला व दोराला केवळ धूसरपणे दृश्यमान करणारा हवा. )

मानवी आकृती सगळी धडपड निःशब्दतेने करत आहे. अतिरिक्त प्रकाश, आवाज-आवाजाचा ओरखडाही रंगमंचावर उठता उपयोगी नाही.

आकृतीचा रंगमंचावरील ' प्रवेश ' संथ नसेल. तर जणू त्याला कोणीतरी तेथे फेकून ( ढकलून ) दिले आहे असे जाणवायला हवे.

**दृश्य दुसरे :** प्रस्तुत दृश्य दुसरी विंग ते दुसरी विंग असे घडते. प्रेक्षकांच्या डाव्या हाताच्या दुसऱ्या विंगमधून दोरखंडाच्या वेढयात सापडलेला माणूस. आता दोराला प्रेक्षकांच्या उजव्या बाजूचा भाग नाही. आता या दृश्यात दोर फक्त डाव्या विंगमध्ये खेचण्याचा प्रयत्न दिसतो. या मागे खेचले जाण्याच्या विरुद्ध प्रतिक्रिया माणसाची आहे. त्याला उजव्या विंगकडे जायचे आहे. पण तो सतत निष्ठुरपणे मागेच खेचला जातो. याला त्याचा इलाज नाही. पूर्वी-सारखीच त्याची धडपड निरर्थक आहे. आणि एका अटळ, क्रूर हिसक्याने तो मागे खेचलाच जातो.

**प्रकाश :** पहिल्या दृश्यापेक्षा हे दृश्य किंचीत जास्त दृश्यमान असावे. परंतु पूर्ण प्रकाश नको. ॲक्टिंग एरिया सोडून बाकी रंगमंच अंधारातच आहे.

**ध्वनी :** पहिल्या दृश्यासारखीच निःशब्दता. माणसाच्या जोरजोराच्या श्वास-निःश्वासांचा अस्पष्ट आवाज चालेल. बाकी ध्वनिशून्यता. श्वासोच्छ्वासाच

आवाज टेपड् नको. नैसर्गिकरीत्या प्रत्यक्ष असावा.

**दृश्य तिसरे :** दोन्ही बाजूच्या क्रमांक एक विंगच्या रेषेचा मध्यबिंदू. प्रेक्षकांच्या अगदी समोर एक मेणबत्ती ( पेटती ). २ ते ५ सेकंदाच्या या दृश्यात केवळ स्टेजवर ती मेणबत्ती. एक पूर्णतः काळा पोषाख घातलेली व बिनचेहऱ्याची व्यक्ती जणू कुणावर तरी वार करण्याच्या बेतात असल्यासारखी दबकत दबकत मेणबत्तीकडे सरकते आणि हातात घातलेल्या दोन्ही बुटांच्या तळव्यांनी त्या मेणबत्तीची ज्योत चिरडून विझवून टाकते.

**प्रकाश :** कृत्रिम प्रकाश नाहीच. पूर्ण दृश्य घडते ते मेणबत्तीच्या नैसर्गिक प्रकाशात.

**ध्वनी :** पूर्ण दृश्य कोणत्याही प्रकारच्या ध्वनिरहित अवस्थेत घडते.

**दृश्य चौथे :** मूलतः हे पूर्णतः वेगळे दृश्य आहे असे नाही. तिसऱ्या दृश्यातील चिरडल्या गेलेल्या मेणबत्तीचा = त्या प्रतिकाचा – प्रत्यक्ष भेदून जाणारा हा प्रकार आहे. प्रेक्षकांच्या डोळ्यात घुसल्या जाणाऱ्या स्थानावर हे दृश्य घडते. रंगमंचावर दिसतो तो केवळ एक फास लावून घेतलेला माणूस – एक तरुण माणूस. मान निष्प्राण कललेली. डोळे उघडे – बाहेर आलेले. जीभ बाहेर.

**कालावधी :** सात सेकंद.

**प्रकाश :** माणसाच्या छातीपासूनचा वरचा भाग ते गळ्याजवळच्या दोराचा काही भाग = वरच्या दिशेचा एवढेच दृश्यमान होईल असा. धूसर। अस्पष्ट। मलूल असा.

**ध्वनी :** पूर्णतः अनुपस्थित.

"श्रीधर विश्वनाथ जामखेडकर. हे एका मृत व्यक्तीचे नुसते नाव आहे. मरणसमयी प्रस्तुत व्यक्तीचे वय अंदाजे २६ किंवा २७ असावे. ( आवाजात नेमकेपणा, ठामपणा आणण्याच्या प्रयत्नात. ) श्रीधर विश्वनाथ जामखेडकरचा मृत्यू हा कायद्यान्वये नैसर्गिक मृत्यू म्हणून गणला गेलेला असला तरी तो तसा असणेच शक्य आहे असे म्हणता येणार नाही. ( किंचित स्तब्धता – एखादे नवेच सत्य पटवून देण्याच्या तयारीत असल्याप्रमाणे अस्वस्थता – मनोभूमिका तयार करीत असल्याप्रमाणे ) मला म्हणायचंय्... प्लीज ... सॉरी .... 'शक्यता' ही गोष्ट कोणत्याही वैज्ञानिक प्रयोगशाळेत – सरकारी अथवा

खाजगी – तपासून निष्कर्ष काढण्यासारखी नसते. हे सत्य श्रीधर विश्वनाथच्या मृत्यूनंतर जास्त अस्खलितपणे प्रकट झालेले आहे. ( अचानक तात्त्विक ध्यान व [illegible] [illegible] आल्याप्रमाणे वेगात बोलतो ) प्रत्येक शक्यतेला अनेक प्रमुख शक्यता व गौण शक्यतांचा गोतावळा स्वतःबरोबर वागवण्याची सवय मूलतःच असते हे तात्त्विक पातळीवरचे सत्यही नाकारून पुढे जाणे प्रत्येकवेळी शक्य असतेच असे नाही. श्रीधर विश्वनाथ जामखेडकर नावाचा माणूस होता आणि पुढे तो नसेल .. नसेल . .. पण श्रीधर विश्वनाथाच्यासारखे अनेक श्रीधर विश्वनाथ जेव्हा एका विशिष्ट परिस्थितीचा परिणाम म्हणून लोकसंख्येच्या संदर्भात ‘ मृत्यु प्रमाण ’ वाढवत असतात तेव्हा श्रीधर विश्वनाथ जामखेडकर या माणसाच्या मृत्यूची न्यायालयीन चौकशी अटळ असायला पाहिजे; (एकदम रोख प्रेक्षकांकडे वळवून) तशी त्या त्या राज्यसरकारच्या घटनेत किंवा जगाच्या पाठीवर जेवढी केंद्र सरकारे आहेत त्यांच्या घटनेत घटना दुरुस्तीची शक्यता त्रिकाळ व्हावयास पाहिजे की नाही; हा खरा प्रश्न आहे. आणि या प्रश्नाचा विचार मानवतावादी दृष्टिकोनातून व्हावयास पाहिजे पण त्यासाठी प्रथम ‘ मानवतावाद ’ या संकल्पनेचा नेमका अर्थ निश्चित केला पाहिजे. (ठाम विधान करण्याची पूर्वतयारी शाब्दिक ताकद गोळा करीत असल्याप्रमाणे ) मानवतावाद म्हणजे .... म्हणजे .... ( एकदम अनिश्चित होऊन गेलेला, हतबल – थकलेला. ) सॉरी ! न्यायाधीशमहाराज, ( किंचित शांतता ) मानवतावाद म्हणजे काय हे शब्दात सांगणे शक्य व्हायचे असेल तर प्रथम नैतिकता म्हणजे काय हे स्पष्ट होणे आवश्यक आहे की नाही; हे प्रथम ठरवावे की ठरवू नये याचा मला विचार केला पाहिजे. आपण कोर्ट तहकूब करावे की करू नये हा तुमचा प्रश्न आहे. ( प्रचंड अस्वस्थता – निश्चित होण्याचा केविलवाणा प्रयत्न-आत्ममग्न मुद्रा ) तसा निर्णय तुम्ही घ्यावा की घेऊ नये हे मला ठरवता येणार नाही. कारण ...कारण . माझा माझ्यावर विश्वास आहेच असे मी सांगू शकतो व शकतही नाही ( अनाकलनीय भीतीने ग्रस्त – चेहरा दयनीय – स्वअस्तित्वाबद्दल विश्वास गमावलेला ) मी....मी ...श्रीधर विश्वनाथ जामखेडकर आहे किंवा काय हेच मला मुळात ठरवता येत नाही. मला – नाही नाही. तुम्ही जे बोलताय् ते मला ऐकू येतय् – निश्चित – पण....पण....मी जे बोलतोय् ते तुम्हाला ऐकू येत नाही हे कसे ते मला स्पष्ट व्हायला हवे आहे. ( अचानक

त्रस्तपणे, थोडया चिडखोरपणे ) श्रीधर विश्वनाथ जामखेडकर – श्रीधर विश्वनाथ जामखेडकर – जामखेडकर श्रीधर विश्वनाथ – येथेच आपण का थांबू नये ? ”

( पूर्णपणे रुक्ष, ऑफिशियल आवाजात संपूर्ण विश्वासाने बोलायला सुरुवात करतो. हा माणूस स्वत:बद्दल आजुबाजूच्या वास्तवाविषयी निश्चित अशा मनोभूमिकेतून ठामपणे बोलतोय असे वाटावे. त्याच्या या दर्शनाला समांतर जाणारा ‘ निश्चित प्रकाश ’ रंगमंचावर असेल – त्याच्यापुरता. )

“ नाव – श्रीधर विश्वनाथ जामखेडकर.

वय – अंदाजे २६ किंवा २७.

वर्ण – निमगोरा.

लिंग – पुरुषलिंग.

शिक्षण– एम्. ए. मानववंशशास्त्रावर उद्बोधक लेखन इ.

तर श्रीधर विश्वनाथ जामखेडकर नावाचा प्रस्तुत अकाली वार्धक्याकडे झुकलेला तरुण दिनांक १५ जुलै १९८० रोजी अत्यंत नैसर्गिकरीत्या मृत्यू पावला. त्याच्या नैसर्गिक मृत्यूविषयीं कुणालाच कसलाही संशय नाही. त्याच्यामागे आप्त कुणीही नाही. मृत्यूविषयी संशयास जागाच नाही असा निष्कर्ष पोस्टमार्टेमनंतर मृत्युनोंद वहीमध्ये नोंदविला गेलेला आहे. या संबंधातील सगळे कामकाज अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार, त्यांची नैसर्गिक व घटनात्मक मर्यादा न ओलांडता पार पाडण्यात आलेले आहे. कोर्टापुढे सगळ्या नोंदी आहेतच. ( अधिक काहीतरी ठामपणे बोलण्याचा प्रयत्न चाललेला आहे–निःशब्द प्रयत्न– सुरुवातीपासून ठेवलेले रुक्ष, डेफिनिटपणाचे बेअरिंग आता त्याला जमत नाही हे त्याच्या मुद्राभिनयावरून – त्यामागील मानसिक अस्वस्थतेवरून जाणवावे. अचानक तो आपल्या मूळ अस्वस्थतेकडे, अनिश्चिततेकडे वळतो आणि अत्यंत अविश्वासाने ) मला खरं तर एक.... एक.... गोष्ट सांगावीशी वाटते की – की – जस्ट अ मिनीट... न्यायाधीश महाराज, ( अचानक सापडल्यागत ) मला कोणत्या बाजूचा वकील ठरविण्यात आलेले आहे ते मला माहिती नाहीं; ( विधान स्पष्ट करण्याच्या खटाटोपात – प्रथम केवळ स्वत:पुरत्या हालचाली, हातवारे – नंतर प्रत्यक्ष अस्तित्वात असलेल्या सर्व वस्तूंना कन्व्हिन्स करत असल्याप्रमाणे ) म्हणजे....म्हणजे....बघा ना ! .... सरकारी वकील व आरोपीचा वकील एवढेच प्रकार मला माहिती आहेत. या व्यतिरिक्त अजून

कोणत्या प्रकारातून वकील काम करू शकतो ते मला ज्ञात नाही. ( उत्साहित होऊन – गेलेले बेअरिंग गवसल्याच्या आनंदात – पण आदब ठेवून गांभीर्याने – मूळच्या रुक्ष आवाजात– ) तरीही ज्ञात कायद्याचा अधिकार मान्य करून मी श्रीधर विश्वनाथ जामखेडकरचा मृत्यू नैसर्गिकरित्या झालेला आहे हे मान्य करतो व कोर्टापुढे तशी साक्षीवजा कबुली देतो. (एखाद्या तत्त्ववेत्त्याप्रमाणे ) न्यायसंस्थेचा दृष्टिकोन हा नेहमी यथायोग्य मानवतावादी असतो हे गृहीत धरून श्रीधर विश्वनाथ जामखेडकर यांच्या मृत्यूविषयीचे कामकाज कोर्टाने संपवावे अशी इच्छा प्रदर्शित करतो. ( अतिरिक्त गांभीर्याचा सूर लावून ) ज्या जामखेडकरांनी ईश्वरी अस्तित्वाची विटंबना केली व त्याला नाकारले; तोच सर्वसमावेशक ईश्वर त्यांना उदार अंतःकरणाने माफ करो. असो. ”

( पहिल्या दोघांपेक्षा प्रस्तुतचे वक्तव्य करणारा वेगळा आहे. प्रस्तुतचा इसम सगळेच तुटलेपण एका विशिष्ट कॉन्शस्नेसमधून स्वीकारतो. त्याच्या जाणिवा स्वच्छ, भ्रष्टाचाररहित आहेत, मानवी अस्तित्वाचे खच्चीकरण आणि व्यथांचा भडक शो न करता तो सगळ्यांचे लक्ष मूलभूत समस्यांकडे वळवू पाहातो. प्रस्तुतच्या इसमाच्या तुलनेत पहिले दोघे या विशिष्ट समस्यांच्या संदर्भात अनभिज्ञ वाटतात. याला प्रस्तुतच्या ‘ भाषेत ’ समस्या मांडताना क्लेश होतात – कारण त्याची आत्मभाषा त्याला इथे वापरता येत नाही. )

“ श्रीधर विश्वनाथ जामखेडकर संबंधीचा हा मत्यूविषयक खटला ज्यावेळी दुय्यम किंवा उच्च न्यायालयात चाललेला होता त्यावेळी मी एकटाच कोर्टात उपस्थित होतो असे मला वाटते. ( संथ आवाजात पण निश्चितपणे ) वकील कोण होते, न्यायाधीश कोण होते, कोर्ट लेखनिक होता की नाही – याविषयी मला माहिती नाही. कोर्टाच्या परंपरागत रीतिरिवाजानुसार काम चालले की परंपरा मोडून ते चालविण्यात आले ते मला माहिती नाही. श्रीधर विश्वनाथ माझा मित्र होता. (शांतता) याविषयी माझ्या मनात संशय असला तरी तो तुम्ही अमान्य केलेला आहे हे पाहून मला तुमच्या निर्णयशक्तीबद्दल आश्चर्य व अभिमान वाटतो आहे. ( किंचित दीर्घ, बोचक शांतता – तो स्वतःचेच विधान स्वतःच परत मनाशी ताडून पहातो आहे – मग कन्व्हिन्स करत असल्याप्रमाणे, पटवून देण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असल्याप्रमाणे ) म्हणजे .... पण .... म्हणजे ....असं बघा ना ! .... की, ( अचानक निश्चित होऊन ) माणूस

निर्णय घेऊ शकतो. आणि हा त्याने घेतलेला निर्णय भ्रमात्मक नसतो. हा तुमचा निष्कर्ष मानवी बुद्धीच्या उत्क्रांतीचा पुरावा ठरण्याची शक्यता नाकारता न येणारी आहे. ( शांतता – तो अस्वस्थ – एका अपराधी भावनेने मूक–शांतता ) न्यायाधीशमहाराज, श्रीधर विश्वनाथ आज नाही हे शास्त्रीय धर्तीचे भौतिक सत्य आहे .... आहेच .... पण श्रीधर विश्वनाथ जामखेडकर मानस-शास्त्रीय पातळीवर होता–आहे–नसेल हे ठरविणे अशक्य आहे असे तुम्हाला वाटत नाही की काय ? असा प्रश्न मला कोर्टाला विचारावासा वाटत होता .... पण ... . बघा ना .. पण श्रोत्यांना न्यायालयात बोलण्याची परवा-नगी आहे की नाही याविषयी मी अनभिज्ञ असल्यामुळे मला ते धाडस झाले नाही. ( अर्धवट स्वतःशीच व अर्धवट प्रकटपणे बोलल्याप्रमाणे – काहीतरी महत्त्वाचे सांगण्याची त्याची धडपड जाणवावी ) शक्य आहे, शक्य नाही. ( किंचित शांतता ) शक्य आहेही, शक्य नाहीही – ( जास्त प्रकटपणे ) शक्य नाहीच असे नाही, शक्य आहेच असे नाही. यापैकी कोणत्या शक्यतेच्या जवळ श्रीधर विश्वनाथ जामखेडकरचा मृत्यू जातो अशी रास्त शंका शक्य झाल्यास मला नोंदवावीशी वाटते. ( शब्दांवर जोर देत अशा मार्गाने पटवून देण्याचा एक प्रयत्न म्हणून ) श्रीधर विश्वनाथ जामखेडकर कसला विचार करीत होता मला माहिती नाही. श्रीधर विश्वनाथने अमुक केले असेल का ? ते तमुक केले असेल का ? ते मला निर्णयरूपाने सांगता येणार नाही. (मानसिक-रीत्या खच्ची झालेला–प्रचंड अस्वस्थ–एक अनाकलनीय घालमेल उरळून बेजार झालेला ) पण .... असं बघा.... नाही म्हणजे. .. कारण.... मला म्हणायचंय् .... खरे तर.... नाही नाही ! तसं नाही .... खरं तर श्रीधर विश्वनाथ जाम-खेडकर त्याच्या मृत्यूपूर्वीच मेलेला होता की मृत्यूनंतर तो जिवंत झाला आहे की ....की ......तो कधीच नव्हता याविषयी मला संशय आहे.– (शांतता-एकदम सावध – भानावर येऊन – स्वतःच्या बचावाच्या पवित्र्यात ) मी जे बोलतो आहे त्याची भाषा कोर्टाचीच भाषा आहे–होती–असेल, ते मला माहिती नाही. ''

---

(वरील सर्वांपेक्षा जास्त मोठ्या प्रमाणात व्यक्तिमत्व हरवलेला माणूस. अतिसंवेदनाक्षम आवाज. संपूर्ण व्यक्तिमत्वाचाच तोल बिघडलेला. स्वतःविषयी, स्वतःतील बदलांविषयी संशयी असलेला. आजूबाजूच्या वास्तवाला सोबत घेऊन

त्याच्या पलीकडच्या समस्यांवर भेदक दृष्टी असलेला. )

" मी श्रीधर विश्वनाथ जामखेडकरच आहे किंवा नाही हे प्रस्तुत सगळ्याच गोष्टींच्या अगोदर स्पष्ट होणे आवश्यक आहे. समजा मी श्रीधर विश्वनाथ आहे, समजा, तो श्रीधर विश्वनाथ आहे, समजा की प्रत्येकजणच श्रीधर विश्वनाथ जामखेडकर आहे. असे समजल्याने काय होतं? – गोष्टी सोप्या आणि सुसूत्र होतात की नाही ते मला सांगता येणार नाही. श्रीधर विश्वनाथ हे प्रतीक आहे की तो एक अप्रतीक विचार आहे; की ती एक केवळ भावस्थिती आहे ? या प्रश्नांची उत्तरं शोधणं संबंधित राजकीय, सामाजिक, नैतिक कायद्यांची मर्यादा न ओलांडता शक्य आहे किंवा काय हे स्पष्ट झाले पाहिजे. ( इतका वेळ टिकवून ठेवलेला ठामपणा अचानक लुप्त झालेला आहे. विक्षिप्त पण सावध नजरेने तो आजूबाजूची पोकळी नजरेने समजून घेतो. ) मला तर वाटते की ...की....मी श्रीधर विश्वनाथ जामखेडकर आहे आणि नाहीही. ( एकदम वरील वाक्यानंतरच्या भयपूर्ण शांततेनंतर – रुक्ष आवाज, लॉजिकल् लँग्विज् यांचा बचाव साधनासारखा उपयोग करून नेमके बोलण्याचा प्रयत्न करीत – ) काही गोष्टी गृहीत धरायच्या असतात – त्यामुळे विचाराला एक विशिष्ट प्रकारची शिस्त लागते व ...व एक कमीतकमी सदोष व्यवस्था लावता येते....ही व्यवस्थासुद्धा ज्या गोष्टी गृहीत धरायच्या त्यांच्या संदर्भात आपण गृहीत धरतो....पण....पण म्हणूनच कोणतीही व्यवस्था केवळ निर्दोष नसते हेच स्पष्ट होते. आणि....आणि....श्रीधर विश्वनाथ जामखेडकर हा माणूस फक्त केवळ निर्दोषपणेच्याच मागे होता. ( बोचक शांतता ) तो असा का होता आणि तसा का नव्हता याने उत्तरं मिळणार नाहीत पण अंतिम सदोष व्यवस्था हीच गोष्ट श्रीधर विश्वनाथ जामखेडकरच्या मृत्यूला जबाबदार नसेलच असे नाही. ( स्वतःच्या विधानाचा विचार करीत असल्याप्रमाणे ) अंतिम सदोष व्यवस्था ही गोष्ट जे श्रीधर विश्वनाथ जामखेडकर नाहीत त्यांना सदैव ( उपरोधाचा सूर ) केवळ तार्किक पातळीवरच नांदते असे वाटते; ( एकदम स्फोटक भेदकपणे ) पण....पण श्रीधर विश्वनाथाच्या रोजच्या जगण्यात, त्याच्या प्रत्येक श्वासाच्या मागेपुढे, प्रत्येक विचाराच्या मागेपुढे, प्रत्येक मानसिक – शारीरिक कृतीच्या मागेपुढे ती जिवंत होऊन नांदायला लागली तेव्हा – ( थकून व थबकून ) –

तर मुख्य मुद्दा हा की, श्रीधर विश्वनाथ जामखेडकर ( पिंजऱ्याच्या कठड्यावर थकून काही क्षण डोके टेकवतो – मग हळूहळू गदगदतो असे भासते – शेवटी थोडे सावरून शब्द शोधण्याचा प्रयत्न करून – ) मी....मी ...नाही.... श्रीधरने त्याच्या निरुत्तर आयुष्यांत....कोणत्याही गोष्टी गृहीत धरल्या नाहीत ....माझा, सॉरी ...त्याचा....श्रीधरचा त्याला विरोध होता असे वाटते. त्याचा विरोध होता म्हणून त्याने त्या गोष्टी स्वीकारल्या नाहीत असे नाही; तर खूपदा आपला कणभरही विरोध नसताना आपण काही गोष्टी करीत नाही. शक्य आहे की प्रस्तुत गृहीत गोष्टींना त्याचा विरोध नव्हता. ( काही प्रश्न ऐकल्यासारखे किंवा विधान ऐकल्यासारखे करून – ) हो....हो ! आत्ता काही क्षणांपासून मला वाटायला लागलं होतं की मीच श्रीधर विश्वनाथ जामखेडकर आहे. ( क्षणकाल शांतता ) आता यानंतर मला काय वाटेल ते मी सांगू शकणार नाही. कारण....कारण काहीही शक्य आहे न् शक्य असायला पाहिजे. ( क्षणकाल शांतता ) मला स्वतःला श्रीधर विश्वनाथ जामखेडकरबद्दल फारशी माहिती नाही....पण लोक कागदोपत्री आणि व्यवहारात मला श्रीधर विश्वनाथ जामखेडकर म्हणूनच ओळखतात. ( अस्वस्थ, आवाजात भीतीचा अस्पष्ट कंप ) खूपदा मलाच संशय यायचा की मी श्रीधर विश्वनाथ जामखेडकर आहे किंवा काय. हा संशयच माझा स्थायीभाव झाला नाही हे ठीकच. ( भीतीचा स्पष्ट कंप ) पण मला फार भीती वाटायची. फार हाल होतील असं वाटायचं– मी श्रीधरच होतोय की काय असं वाटायचं – स्वतःच्या असण्याचीच शंका घेण्याची भीती मला काळवंडून टाकायची – मी....मी....खोलवर दुभंगून जायचो, खूपच ..खूप रिकामंरिकामं वाटायचं....(एकदम कॉनशस् होऊन/पुरेसा सावध नाही ) नाही नाही ! आम्ही एकच होतो असा समज तुम्ही करून घेऊ नका; कदाचित आम्ही दोघे होतो की एकच होतो; ते मला सांगता येणार नाही. ( त्रस्त, संशयी, स्वतःविषयीचा अविश्वास ) मला काहीच निश्चित स्वरूपात सांगता येत नाही आणि ( हतबल होऊन ) येणारही नाही असे वाटते. ( स्वतःला जपण्याचा, समजावण्याचा प्रयत्न करतो. शांतता ) ठीक ठीक.

( आता एक विशिष्ट भूमिका मांडण्याच्या तयारीत. )

समजा, मी श्रीधर विश्वनाथ जामखेडकर आहे. ( शांतता ) मी आहे किंवा नाही असा प्रश्नच आता उपस्थित होणार नाही; कारण मी आहे हे आपण

गृहीत धरलेले आहे. आणि गृहीत धरलेल्या गोष्टींवर अंतिम सत्यावर आपण जेवढा आंधळा विश्वास ठेवतो तेवढाच ठेवण्याची आपली परंपरा आहे. असो. मला एक गोष्ट आठवते – सहज संदर्भात आली म्हणून सांगतो; जामखेडकर–म्हणजे मी – अटळ सत्य म्हणजे काय याचा फार विचार करायचो – इतका की, असा अटळ सत्याचा विचार करणंच माझ्या संदर्भात अटळ सत्य आहे किंवा काय असं वाटेपर्यंत. तर....तर....मुख्य मुद्दा हा की श्रीधर विश्वनाथ जामखेडकर मरण करू पावला ? त्याच्या मृत्यूचा प्रकार खून, नैसर्गिक मृत्यू, अपघाती मृत्यू, आत्महत्या यांपैकी कुठे बसतो ? न्यायाधीशमहाराज, मानसिक मृत्यू भौतिक पातळीवर शक्य आहे किंवा काय हे निश्चित झालें पाहिजे. ( शांतता ) म्हणजे श्रीधर विश्वनाथ जामखेडकर मरण पावला हे प्रथम सिद्ध करावं लागेल. – ते कसं सिद्ध करायचं ते मला सांगता येणार नाही – कारण ज्या गोष्टी वैज्ञानिक व तार्किकपद्धतीने अस्तित्वात आहेत, असं सिद्ध करण्यात आल्यानंतरही त्या मुळातच अस्तित्वात नाहीत असं एखाद्याला वाटणंही शक्य आहे. ( शांतता. एक नेमकेपणा आता त्याला गवसलाय. ) कोणाला काय वाटावं आणि काय वाटू नये, किंबहुना जामखेडकरला स्वतःलाच – म्हणजे आता मला – काय वाटावं आणि वाटू नये हे मी ठरवू शकत नाही. काहीही घडण्यामोडण्यातील, जाणवण्या न जाणवण्यातील अनिश्चितताच श्रीधर विश्वनाथ जामखेडकरच्या मृत्यूला जबाबदार आहे असे मला वाटते; ( दीर्घ शांतता– अस्वस्थ ) आणि....आणि....अनिश्चितता ही गोष्ट आहे की तिच्याशिवाय व तिच्यासह आपण सर्वकाळ राहू शकत नाही. ती अपराधी असेल – नसेलही. तिला कोणीच कसलीही प्रचलित शिक्षा सुचवू शकत नाही; कारण इतकेच की शिक्षा ठरेपर्यंत ती रंगरूप तरी बदलते किंवा लुप्त तरी होते. तिला काहीही शक्य आहे....तिला काहीही शक्य आहे...शक्य आहे. ”

( आता नवे वक्तव्य सुरू होईल असे नाही. वरील वक्तव्याचे शेवटच्या वाक्यानंतर ‘ इन्मा ’वरचा प्रकाश हळूहळू मंद होत जाईल. या मंद होत जाणाऱ्या प्रकाशात त्याची मानसिक अस्वस्थता जाणवावी. त्याच्या मनातील तडफड, द्वंद्व गोचर व्हावे. त्याचा क्षणात भयग्रस्त, विश्वास गमावलेला चेहरा जाणवावा तर पुढच्याच क्षणी त्याच्या चेहऱ्यावर एक स्थिर, निर्णायक, शांत व फॅक्टला फेस होण्याचे अनाकलनीय धैर्य जाणवावे. तो आता असा शांत

झाल्यावर प्रकाश हळूहळू परततो. मध्यम प्रतीचा प्रकाश. )

( प्रकाश परतल्यावर काही क्षण वोचक शांतता )

" मी श्रीधर विश्वनाथ जामखेडकर ( तो स्थिर होतो. प्रथमच तो प्रेक्षकांकडे सरळ बघतो. इथे कुठेही आता तो अस्वस्थ नाही. एक विशिष्ट आत्मबळ आता त्याला लाभलेले आहे. ) मला कोर्टापुढे यायचे नाही. कारण त्याचा उपयोग नाही. तुमच्या गृहीत शक्यतेचा मी अनादर केला असता पण मला तुम्हाला मदत करावीशी वाटते कारण मी दुसरा श्रीधर विश्वनाथ जमखेडकर बघू शकत नाही. ( किंचित शांतता – शब्दांवर सहजपणे जोर देत – ) मी श्रीधर विश्वनाथ जामखेडकर सांगतो की मी आत्महत्या केली. ( किंचित शांतता – प्रत्येक शब्दाला पूर्णपणे प्रवाही करीत बोलतो ) कारण – ( कन्व्हिन्स् करत पण ठामपणे ) मला कारण म्हणून जगण्याचाच कंटाळा आला होता. मी....मी जे काय उत्पन्न करायचो त्याविषयी मला विश्वास नसायचा. ( किंचित शांतता ) मी आत्महत्या केली कारण, मला कार्यकारणभावाचाच कंटाळा आला होता आणि प्रस्तुतचं जग कार्यकारण भावावरच चालतं, आणि चालेल हे मला जाणवलं होतं. ( पूर्ण सावरून ) तर – मी आत्महत्या केली. आयुष्यात प्रथमच त्यापूर्वी काही दिवस मी स्वतःविषयी रात्री डायरीत लिहायचो. मी तुम्हाला मदत करावीशी वाटतेय म्हणालो होतो; त्यासाठी ही काही मजकुरपानं तुम्ही ऐकावी. अर्थातच शक्य झाल्यास. शक्य आहे की तुमच्या गृहीत शक्यतेचा पुरावा तुम्हाला त्यात मिळेल. मिळणारही नाही. ( शांतता ) मला तुमच्या निष्कर्षासाठी थांबायचे नाही. कारण इतकेच की कदाचित मी मेलेलो आहे आणि अनिश्चित आहे. मी श्रीधर विश्वनाथ जामखेडकर....होय ! तोच; जामखेडकर श्रीधर विश्वनाथ. "

( पूर्ण शांतता – इसमावरील प्रकाश आता संथगतीने मंद व्हायला सुरुवात होते. डायरीची भाषा ही आतापर्यंतच्या ऑफिशिअल भाषेचे दुसरे टोक आहे. प्रस्तुतची भाषा ही एका माणसाची विशिष्ट ठसा असलेली भावात्म भाषा आहे. भावना मांडणारी भाषा आहे – विचार मांडणारी नव्हे. इथे त्यामुळे नटाची उच्चारशैली ही व्यक्तित्वसंपन्न व त्याच्या व्यक्तिभाषेला जवळ जाणारी असणार. एक खाजगी व्यक्तिमत्व त्यातून उभे राहावे. प्रकाश वर सांगितल्याप्रमाणे मंद व्हायला सुरुवात झाल्यावर तो इसम अप्रत्यक्ष डायरीचे पान

वाचायला सुरुवात करतो – प्रत्येक पान वाचायला सुरुवात करताना प्रकाश मंद होत जाणारा असेल तर ते संपतासंपता तो वाढत जाणारा असेल. नटाचा मुद्राभिनय अत्यंत सौम्य, जवळ जवळ नाहीच असा हवा. इथे त्याच्या उच्चारप्रक्षेपणाला महत्त्व आहे.)

**१ जानेवारी ८० :** " आय् थिंक, देअरफोर आय् ॲम्. "

**२२ फेब्रुवारी ८० :** काहीच बोलावंसं – करावंसं वाटत नाही. उत्साह वाटेल, जगावंसं वाटेल असं काहीच घडत नाही; हे खरं नाही. आपण काहीतरी घडण्याची अपेक्षा करतो; असं का? अशी अपेक्षा करणं म्हणजे आयुष्य घडवण्याच्या प्रयत्नात असणं. आणि असं काही घडवणं केवळ अशक्य असतं. मग ही मनोविकृती का?

**११ मार्च ८० :** माझ्याशी संबंधित माणसं पलीकडच्या काठावरून बोलतायतसं वाटतं. तरीही संबंध संपवावे – तसे वाटत नाही. आपण अशा प्रकारे पुढे मरेस्तोवर स्वतःलाच नष्ट करत राहू की काय?

**१३ मार्च ८० :** भयानक वैताग. सुटका नाही. रातत्याने खच्ची होण्याचे दिवस. संध्याकाळी लॉनवर अंधारात भीतीचा फील. एकलवाणेपणाचा.

**३० मार्च ८० :** भीमसेनचे अभंग रात्री ऐकले. विलक्षण शांतावस्था अनुभवली. एक अस्तित्वावस्था. खूप निरागस, स्वच्छ वाटत होतं. टाळ–मृदंगाचं वादन झिंग आणणारं आहे. पण हे कायम टिकत नाही – मी ते टिकवू शकत नाही.

**३१ मार्च ८० :** प्रवाहीत असायला घटना आवश्यकच असतात काय? नुस्तं प्रवाहीत असणंच नाही तर संशयी असायलाही घटना असायला हव्यात?

**११ जुलै ८० :** अत्यंत वस्तुनिष्ठ पद्धतीने मी श्यामलाचा विचार करतो. खरं तर तिचे कोणते संस्कार माझ्यावर झालेत ते कळत नाही. ढोबळ जाणिवेला ती थंड आणि बंद वाटते पण तिच्या रक्तात जी जिवंतता आहे ती मला तिच्यासह माझ्यात मिसळून घ्यावीशी वाटते .... मला तिची मूलभूत गरज जाणवते आणि मला माझ्या शारीरिक मर्यादा जाणवतात.

**१२ जुलै ८० :** रात्री तीनपर्यंत झोपच नाही. अखंड जागरण. निसटती झोप. टेनशन् टेनशन्. दिवसभर भयानक थकवा. विष खाऊन झुरळांनीच का मरावं? मी का मरू नये? त्याचं माझं अस्तित्व एकच नाही का?

**१४ जुलै ८० :** आज अतोनात झुरळं मेली. वॉट इज् द यूज् ऑफ्ह

टॉकिंग, अँड देअर इज् नो एंड ऑफ टॉकिंग. देअर इज् नो एंड ऑफ द थिंग्ज् इन् द हार्ट. असं एझरा पाउण्डला का वाटलं ?

( डायरी संपल्यावर प्रकाश मंद मंद होत संपेल. पूर्ण काळोख. नाट्यांकाच्या सुरुवातीचे ' दृश्य : पहिले ' परत घडेल. यावेळी संगीत सूचनांमध्ये सांगितल्या-प्रमाणे ढोलाची साथ असेल. प्रकाश पहिल्या दृश्याप्रमाणेच. दृश्य संपल्यावर पूर्ण काळोख. या पूर्ण काळोखातून शब्द येतील. )

कोर्टाची मुदत संपल्यामुळे कोर्ट बेमुदत तहकूब करण्यात येत आहे. प्रस्तुत खटल्यासंबंधीच्या निष्कर्षासाठी कोर्ट पुनःश्च केव्हा बसेल तत्संबंधीच्या तारखा नंतर जाहीर करण्यात येतील.

संबंधितांनी याची दखल घ्यावी.

□

# कल्की

*

शेखर ताम्हाणे

**पात्रे :**

हैबत – नोकर, वय सुमारे ४०

तरुण – वय २२-२५

बाईसाहेब – वय ३८–४०

**धर्मानंद – वय सुमारे ८०**

वेळ – सुमारे ३५ ते ४० मिनीटे

[ काळ जेथे वर्षानुवर्षे थांबून राहिलाय अशा एका पडक्या वाड्यातील एक खोली. घरात अनेक विरोधाभास उत्पन्न करणाऱ्या वस्तू, चित्रे वगैरे आहेत. उदा. एक विवेकानंदाचा पुतळा आणि एक अर्धनग्न बाईचं चित्र. या वास्तूभोवती आणि घराभोवती गूढतेचं एक वलय निर्माण झालेलं आहे. ] वेळ रात्रीची. विजांचा कडकडाट होत आहे. बाहेर मुसळधार पाऊस आणि तुफान. उजवीकडील मागील बाजूला असलेल्या दाराचे दरवाजे एकमेकांवर आपटत राहातात. मध्यमवयीन नोकर हैबत डावीकडून लगबगीने आत येतो आणि दार लावून टाकतो. परत मागे फिरतो तेव्हा घोड्याच्या खिंकाळण्याचा एक भीषण आवाज ऐकू येतो. तसा तो मागे असलेल्या खिडकीतून बाहेर पहात रहातो. दचकलेला.

**हैबत** : [ स्वतःशीच पुटपुटत ] हे जनावर कधी नाय ते आज का एवढं वरडतंय ! आजची रात्र काय वेगळीच हाय, महाराजा. ह्या इजा ! हे पानी ! अस्मानातून धाव घेणारं हे पानी आज धरती गिळून टाकणार की काय ? [ तो भकास नजरेनं बाहेर पहात तसाच उभा आहे. त्यावेळी दरवाजा ठोठावला जातो. त्या ठोठावण्यात एक आर्जव आहे. हैबत जाऊन दार उघडतो. दारात एक चिंब भिजलेला तरुण उभा आहे. ]

**हैबत** : काय हवंय ?

**तरुण** : मी, मी आत येऊ ?

**हैबत** : तुमची मर्जी. [ तरुण आत येतो. घर न्याहाळतो. हैबत त्याच्याकडे लक्ष न देता इतर काही सटर फटर करत रहातो. त्यामुळे तो तरुण अधिकच गोंधळतो. ]

**तरुण** : हे पहा –

**हैबत** : काय ?

**तरुण** : मी इथे एक रात्र काढू शकतो ?

हैबत : ते म्या काय सांगू ? दार वाजलं तर फक्त उघडण्याच काम आमचं. उघडया डोळयांची आंधळी माणसं आम्ही. आम्ही काय सांगणार ? मालक सांगेल ते आपण करायचं. का करायचं....काय करायचं न्हाई....हयो इचार करायचा सोडून दिलं की सगळी जिंदगी एकदम सोपी होऊन जाते बघा. तवा हिथं थांबायचं का न्हाई ते तुमचं तुमी बघा....आनं खरा म्हणाल तर तुम्ही इथून गुमान चालतं व्हाल तर बेस होईल.

तरुण : काय !

हैबत : व्हय. तुमी इथं आलात खरं पण बघा सगळाच काय तरी घोळ होतोय. हया घरला तुमी नको [ जाऊ लागतो पण थांबतो आणि वळून येतो. ]....पण थांबा. काय वो, तुमी इथं येणारच व्हते का ?

तरुण : मी इथे ?

हैबत : नाय म्हंजे तुमी इथं येणार हये अगुदरच ठरलेलं हुतं का ?

तरुण : नाही, मी तर अचानक आलोय.

हैबत : हा आवशी असंच ! परतेकाला हे अगदी असंच वाटतं बघा ! हये अचानक वगैरा सगळा झूट हाय. खरा मंजे सगळं काही अगुदरच ठरलेलं असतं.

तरुण : छे हो ! अजिबात नाही. हया वादळात मी वाट चुकलो. पावसाचा जबरदस्त मारा चुकवत जीवाच्या आकांताने धावत होतो. अचानक वीज लखाखली आणि हा वाडा मला दिसला.

हैबत : हया रस्त्याचे कुटं चालला व्हता ?

तरुण : कुठं चाललो होतो ?....वाट फुटेल तिथं.

हैबत : मंजे नेमकं ?

तरुण : काही कल्पना नाही.

हैबत : हे बाकी एकदम बरोबर !

तरुण : काय हो, हा रस्ता कुठे जातो ?

हैबत : कौनला माहीत.

तरुण : म्हणजे ?

हैबत : [ एकाएकी चिडून ] मास्नी माहित असतं तर म्याच नसतो का गेलो ?

तरुण : अहो, पण एवढे रागावता कशासाठी ?

हैबत : आता तुमी पन कायतरी इचारता मंजे ! ( घोडा खिंकाळू लागतो. हैबत अस्वस्थ होतो )

हैबत : आयला चूप रे ! ( घोडा खिंकाळत रहातो ) चूप भडव्या, ठार करून टाकीन. साल्या चूप !

तरुण : हा घोडा का खिंकाळतो आहे ?

हैबत : हे असं पानी पडायला लागलं, हवा अशा इजा कडकाया लागल्या की तो असाच वरडाया लागतो. पन ही त्याची आजची तऱ्हा मातर येगळीच हाय महाराजा, पन ....पन तुमी अजीबात भिवू नगा. बाईसाहेब तिथंच गेल्याती. त्या घोड्याला एकदम सुतासारखा सरळ आणतील. घट बांधून ठेवतील. ( पुन्हा घोडा खिंकाळू लागतो. ) न्हाई माज्या राजा असा वरडू नकोस. नको वरडू म्हनून सांगितला ना !

तरुण : काय हो, घोड्याच्या खिंकाळण्याला एवढं घाबरायचं काय कारण ?

हैबत : म्हणजे ! तुमाला नाय भ्या वाटत ?

तरुण : मला ? छे अजिवात नाही !

हैबत : हे मातर बेस झालं. एकदम बेस ! तुमी आता इथंच ऱ्हावा. इथंच रावा तुम्ही. मी तुमच्या खायापियाची यवस्था बघतो. ( तो डावीकडे जाऊ लागतो. तेवढ्यात मुख्य दरवाजा उघडून बाईसाहेब प्रवेश करतात. बाईसाहेब : वय ३८ – ४० च्या दरम्यान. त्यांच्या ओसरलेल्या सौंदर्याला एका सरत्या संध्या-काळची खुमारी आहे. डोळ्यांत एक आव्हान आहे भुलवणारं. बाईसाहेब रेनकोट काढू लागतात. )

हैबत : बाईसाहेब ! घोड्याला नीट बांधलाव ना ?

बाईसाहेब : तुला घाबरायचं काही कारण नाही. मी आज त्याचे पाय सुद्धा

बांधून ठेवलेत. त्यातून दरवाज्याला कुलूप घातलेलं आहेच ! आता तो जरा शांत झाल्यासारखा वाटतोय, पण एकंदरीत त्याचा रागरंग आज ठीक नव्हता हे मात्र खरं. पण आता ठीक आहे सगळं. ( रेनकोट हैबतच्या हातात देतात ) हैबत मला एक व्हिस्कीचा पेग बनव बघू. अंग नुसतं गारठून गेलंय. ( तरुणाकडे बघत ) तू उभा का, बस ना. व्हिस्की घेणार थोडीशी ?

तरुण : [ गोंधळतो ] मी .... हो थोडीशी.

बाईसाहेब : हैबत आणखी एक ग्लास.

हैबत : व्हय बाईसाहेब.

बाईसाहेब : [ भिजलेले केस पातळाने पुसत ] तू आलास, चला ठीक झालं.

तरुण : [ गोंधळून ] मी ?

बाईसाहेब : तसा तुला थोडा उशीरच झाला म्हणायचा. पण तू आलास हेच खूप झालं.

तरुण : हे पहा, मी समजलो नाही.

बाईसाहेब : नाही समजलं ? [ गप्प होतात आणि मग एकाएकी हसू लागतात ] समजेल. हळूहळू सारं काही समजत जाईल.

तरुण : हे पहा, तुमचा काहीतरी घोटाळा होतोय. मी .... मी निघून जात होतो. कुठेतरी .. सगळं मागं सोडून जायला, पुसून टाकायला पहात होतो. पळून जात होतो मी !

बाईसाहेब : पळून चालला होतास ? कशापासून ?

तरुण : अगदी सगळ्यापासून. या जगाच्या रचनेपासून. आयुष्याच्या अनिश्चिततेपासून. विश्वाच्या काळ्याकभिन्न अंधारापासून. जगाच्या ह्या भंगारखान्यापासून. माझ्यातल्या मी पासून .. अगदी सर्वांपासून.

बाईसाहेब : कुठं जाणार होतास ?

तरुण : वाट फुटेल तिथे, रस्ता दिसेल तिथे. जिथे हजारो वर्षांचा कुजत आलेला अंधार संपेल आणि नक्षत्राची फुलं माळलेली पहाट माझी वाट पहात असेल ! जिथे पुन्हा सगळं पवित्र आणि

सतेज होऊन नव्याने जन्मईल....त्या आपघे त्या उगमाकडे !

बाईसाहेब : म्हणजे नेमकं कुठे ?

तरुण ; काही कल्पना नाही.

बाईसाहेब : तू पळत नाहीयेस. तू गोंधळला आहेस.

तरुण : होय. कदाचित तुम्ही म्हणता तेच बरोबर असेल.

बाईसाहेब : आणि म्हणून तुला येथे येण्याखेरीज दुसरं गत्यंतर नव्हतं.

तरुण : म्हणजे ?

बाईसाहेब : तुझं भविष्य हाच तुझा गोंधळ आहे ना ?

तरुण : होय.

बाईसाहेब : आणि ह्या गोंधळातच ह्या वाड्याच्या भवितव्याची बीजे आहेत. ह्या गदारोळाच्या भक्कम पायावर हा वाडा शतकानुशतके भलभक्कम टिकून आहे. कारण ह्या वाड्याला भविष्यच नाही.

तरुण : भविष्यच नाही ? पण. ..पण हे कसं शक्य आहे ?

बाईसाहेब : उत्तर शब्दात सांगता येण्यासारखं नाही. ते फक्त अनुभवायचं आहे. जशी दारूची नशा कशी ते सांगता येत नाही. फक्त अनुभवता येते. सध्या फक्त तू दारू पी. ( तरुण दारूचा ग्लास उचलतो. तोंडाला लावताना एकदम ग्लास खाली ठेवतो. क्षणभर बाईसाहेबांकडे रोखून पहात राहातो. )

तरुण : बाईसाहेब –

बाईसाहेब : हं.

तरुण : ( एकाएकी ) तुम्ही कोण आहात बाईसाहेब ?

बाईसाहेब : मी ? [ मोठ्याने हसत रहातात. हसता हसता दारूचा ग्लास पितात आणि पुन्हा जोरजोराने हसू लागतात. त्याचवेळी घोड्याचा आवाज येतो. त्या घाबऱ्या होतात आणि हैबतला हांका मारू लागतात. हैबत धावत येतो.]

हैबत : काय झालं बाईसाहेब ?

बाईसाहेब : हैबत ! घोडा खिकाळतोय. बघ जरा त्याने पायाच्या दोऱ्या तर तोडल्या नाहीत ना ! बघ कदाचित तो बंद दारावर धडका

मारत असेल. ( हैबत नुसताच खिडकीबाहेर पहात रहातो. )

बाईसाहेब : कान फुटले का तुझे ? जा म्हणून सांगितलं ना !

हैबत : जातो बाईसाहेब. ( हैबत जातो. बाईसाहेब घाबरलेल्या नजरेने खिडकीकडे पहात आस्ते आस्ते खाली खुर्चीवर बसतात. दारूचा ग्लास हातात गच्च आवळला जातो. )

तरुण : घोडा काय करील बाईसाहेब ?

बाईसाहेब : घोडा....घोडा पळून जाईल.

तरुण : मग ?

बाईसाहेब : [ दचकून ] नाही....तो पळून चालणार नाही !

तरुण : पण त्याने पळावंच का ?

बाईसाहेब : कारण मी त्याला बांधून ठेवलाय.

तरुण : त्याला बांधलेला आहे तर मग तो पळणारच कसा ?

बाईसाहेब : बांधलाय म्हणूनच तर तो पळणार आहे.

तरुण : पण बाईसाहेब.....

बाईसाहेब : हे पहा तू लहान आहेस. तुला नाही कळायचं.

तरुण : आणि तो पळाला तर ?

बाईसाहेब : तसं झालं तर सगळंच संपेल. माझा हा अट्टाहास, ह्या वाड्याचं अस्तित्व सारं सारं काही संपेल.

तरुण : पण तसं होणारच कसं बाईसाहेब. ह्या वाड्याला तर भविष्यकाळच नाही.

बाईसाहेब : तुझ्यासारख्या भरकटलेल्या अगणित तरुणांच्या दिशाहीन आयुष्यावरच माझ्या सामर्थ्याची आणि ह्या वाड्याच्या भवितव्याची मदार आहे. ह्या वाड्याला वेगळा भविष्यकाळच नाही. भीषण अतीत इथे नवनवीन रूप घेऊन थैमान घालत असतो. अरे वेड्या, जोपर्यंत घनगर्जना करणाऱ्या आदिम शक्तीची वेसण माझ्या हातात आहे तोपर्यंत मी ह्या विश्वावर अनिर्बंध सत्ता चालवू शकेन. म्हणूनच ह्या वाड्याचा फक्त भूतकाळच भविष्यकाळात बदलत असतो. त्यामुळे तो अश्व पळणार हे ठरलेले आहे. जसं तू इथे येणार हे ठरलेलं होतं.

तरुण : जर मग हे सगळंच ठरलेलं आहे, तर ते न होण्यासाठी हा अट्टाहास कशासाठी ?

बाईसाहेब : कशासाठी हा सर्व अट्टाहास ? त्या एका प्रश्नाचं उत्तर मिळविण्यासाठीच मी अजून जिवंत आहे. किंबहुना त्याचं उत्तर शोधणं हेच माझं अस्तित्व. तो अट्टाहास संपला की मी ही संपून जाईन.

तरुण : मग माझे इथे येण्याचे प्रयोजन ?

बाईसाहेब : प्रयोजन कशालाच नसतं. ते सगळं ठरलेलं असतं. घोड्याचं खिंकाळणं. हा मुसळधार पाऊस. तुझं आगमन. सगळं काही ठरलेलं आहे. थोड्याच वेळात तू माझ्यावर प्रेमसुद्धा करू लागशील.

तरुण : [ दचकून ] मी ? नाही ! ते शक्य नाही !

बाईसाहेब : होय तरुणा, तू माझ्यावर प्रेम करशील. ह्या माझ्या गुलाबी गालावर, माझ्या ह्या घनदाट केसांवर, माझ्या ह्या चमकत्या डोळ्यांवर, माझ्या सर्व अंगाअंगावर तू प्रेम करशील.

तरुण : [ दूर होतो ] ते शक्य नाही बाईसाहेब. मी चाललो. [ बाईसाहेब त्याचा हात धरतात. ]

बाईसाहेब : कुठं चाललास तरुणा ? बाहेर प्रचंड तुफान आहे !

तरुण : माझ्याकडे सामर्थ्य आहे !

बाईसाहेब : बाहेर कडाडणाऱ्या विजा आहेत !

तरुण : माझ्याकडे जिद्द आहे.

बाईसाहेब : रस्ते अनोळखी आहेत !

तरुण : माझ्याकडे संयम आहे !

बाईसाहेब : मूर्खा, हे रस्ते तुला पुन्हा तुझ्या भ्रामक स्वप्नांच्या जगात नेऊन सोडतील. त्यापेक्षा, एकवार माझ्याकडे पहा. बाहेर वेडावणारा पाऊस, डोक्यात भिनत चाललेली दारूची ही मस्त नशा व तुला आव्हान करणारी एक सुंदर स्त्री जी तरुणीसारखी बालिश नाही किंवा वयाच्या उतारावर आलेली वृद्धा नाही. तुझ्या तारुण्याला मनसोक्त भिजवून टाकेल अशी

योग्य तीच ! [ तरुण गोंधळून तिच्याकडे पहात रहातो. बाईसाहेब त्याचा हात धरून त्याला जवळ खेचतात. ] ये तरुणा ! तुझ्या बाहुपाशात मला कायमची बद्ध कर. [ तो तरुण बाईसाहेबांना जवळ घेऊ पहातो. त्याचवेळी एक अगदी जख्ख म्हातारा धर्मानंद उजवीकडील दारातून धावत येतो. ]

धर्मानंद : दूर हो तरुणा ! दूर हो ! आणि ह्याच क्षणी वाड्यातून पळून जा. [ तरुण थबकून त्याच्याकडे पहात रहातो. ] विचार करायलाही येथे थांबू नकोस ! ते पहा तिथे दूर नक्षत्रांचं क्रीडांगण तुला हात फैलावून बोलावत आहे. जा तरुणा पळून जा !

[ बाईसाहेब त्याच्या अंगावर धावतात. ]

बाईसाहेब : म्हातारड्या, देवघरातून बाहेर आलात तरी कसा ? जातोस की नाही !

धर्मानंद : नको पोरी ह्या तरुणाचा असा सर्वनाश करू नकोस.

बाईसाहेब : हैबत ! हैबत ! [ हाका मारतात. हैबत येतो ] त्याला पहिला देवघरात कोंडून ठेव. [ हैबत धर्मानंदाला ओढत नेऊ लागतो- धर्मानंद जाता जाता ]

धर्मानंद : तरुणा माझं ऐक. पळून जा. [ दोघे जातात – ]

तरुण : कोण हा म्हातारा ? ह्याला कुठे तरी पाहिलंय-शाळेच्या पुस्तकांत ? माझ्या आईच्या देवांच्या तसबिरीत ?....की भगवान रजनीशांच्या व्याख्यानात ? ह्याला कुठे तरी पाहिलंय हे मात्र नक्की. बाईसाहेब कोण हा ?

बाईसाहेब : त्याच्या बडबडीकडे तू लक्ष देऊ नकोस. वार्धक्याने त्याच्या डोक्यावर परिणाम झालेला आहे.

तरुण : तरी – तरी पण कोण हा ?

बाईसाहेब : धर्मानंद. माझे वडील.

तरुण : तुमचे वडील ? [ म्हातारा ज्या दिशेने गेला त्या दिशेला पहात रहातो. बाईसाहेब त्याच्या खांद्यावर हात ठेवतात. ]

बाईसाहेब : ए वेड्या. कसला विचार करतो आहेस ? थांबलायस कशा-

ाठी ? घे ना मला जवळ. माझ्या ओठात साठलेलं अमृत थेंबा-थेंबानं पिऊन टाक. तुझा सारा गोंधळ नाहीसा होईल. [ बाई-साहेब त्याला जवळ खेचतात तेव्हा घोडा भीषण खिंकाळतो. त्या दचकतात आणि मग चिडतात. ]

**बाईसाहेब** : का उठलायस माझ्या जीवावर ? कां ? [ तरुणास ] हे बघ तू त्याच्याकडे बिल्कुल लक्ष देऊ नकोस. आजची रात्र तो असाच खिंकाळत रहाणार हे ठरलेलं आहे. [ हात धरतात ] चल माझ्याबरोबर.

[ तरुण हात झिडकारतो ]

**तरुण** : नाही.

**बाईसाहेब** : पण कां ?

**तरुण** : तुला नाही म्हणून सांगितल ना एकदा !

**बाईसाहेब** : एकेरीवर आलास हेही काही कमी नाही ! मी तुला आवडेन रे खरंच आवडेन !

[ तरुण नुसताच रागानं त्यांच्याकडे पहात रहातो. ]

**बाईसाहेब** : ठीक आहे. पण-तू-मला जवळ करशील ! तुला दुसरा मार्ग नाही. हे मात्र तू नीट लक्षात ठेव. सारी रात्र मी तुझी वाट पाहीन.

[ बाईसाहेब तडकाफडकी निघून जातात. तो एकटाच विमनस्क अवस्थेत उभा रहातो. घराबाहेर पडण्यासाठी तो दाराजवळ जातो. दार उघडण्यासाठी हात पुढे करतो. त्याचवेळी विजेचा कडकडाट होतो. आणि तो मागे सरतो. अस्वस्थपणे इकडे तिकडे फेऱ्या मारतो. क्षणाक्षणाला त्याची अस्वस्थता वाढत जाते. खिडकीबाहेर दिसणाऱ्या आकाशाकडे तो चिडून पाहू लागतो. ]

**तरुण** : महापुरुषा का कडाडतोयस असा ? का ?

क्षणभरासाठी विजेच्या लोळात माझे रस्ते प्रकाशमान करून पुन्हा का अंधारात लुप्त होतो आहेस ? अरे तुझ्याकडे अशी वीजशलाका नाही का जी ह्या पृथ्वीतलावर अखंड तेवत

राहील आणि माझे रस्ते मला स्पष्ट दिसू लागतील ? कोसळ-तोयस आहेस तर असा षंढासारखा का कोसळतोस ? अरे बुडवून टाक हे जग. माझं अस्तित्व आणि सारं सारं. तुझं हे आकांड तांडव जमिनीवरच्या क्षुद्र जिवांना घाबरवण्यासाठीच की काय ? तुझ्या त्या वादळाचा वेग केवळ लहानग्या होड्यांची डोलकाठीच उचकटून टाकण्यासाठी ?

महापुरुषा ! येणार असशील तर असा समोर ये आणि युद्ध कर माझ्याशी ! मी आज येथे निःशस्त्र उभा आहे. तू तुझ्या सर्व शस्त्रांनिशी ये. पण असा समोरासमोर ये. रक्ताळ-लेल्या हाताने गुलाबाच्या फुलाचा गुलाल माझ्या डोळ्यांत फेकून अशी माझी डोळेझाक करू नकोस. येणारच असशील तर निधड्या छातीने ये. तुझ्या खऱ्या स्वरूपासकट ये. महा-पुरुषा मी तुझी येथे वाट पहातो आहे. ये.

[ घोडा खिंकाळू लागतो. त्याचबरोबर दारावर धडका मारल्याचा आवाज प्रकर्षाने येतो. तरुण बावरून इकडे तिकडे पाहू लागतो. आणि मोठमोठ्याने बाईसाहेबांना हाका मारू लागतो. बाईसाहेब येतात. तो त्यांचे खांदे पकडतो. ]

**तरुण** : बाईसाहेब त्याने आपल्या पायाच्या दोऱ्या तोडल्या आहेत ! आणि तो आता दारावर धडका मारू लागला आहे.

**बाईसाहेब** : दार खूप मजबूत आहे तरुणा.

**तरुण** : आणि त्याने दार तोडलं तर ?

**बाईसाहेब** : नाही ते शक्य नाही. दार अतिशय मजबूत आहे. आणि चांगलं भक्कम कुलूप घातलेलं आहे.

**तरुण** : [ अगतिकतेने ] पण त्याच्या या धडका मला सहन होत नाहीत हो ! त्याची प्रत्येक धडक माझ्या अस्तित्वाच्या चिंधड्या उडवतेय. त्याच्या प्रत्येक धडकेगणिक माझ्या शरी-रावरची अदृश्य आवरणं ओघळून पडत आहेत. एका अना-कलनीय जाणिवेने माझं मन सैरभैर होऊ लागलंय. हे सगळं बघायला हवं. अगदी आत्ता ! ह्याक्षणी ! बाईसाहेब तुम्ही त्या

घोडयाला ठार का मारत नाही ?

**बाईसाहेब** : [ एकाएकी ] तू मारशील ?

**तरुण** : मी ?

**बाईसाहेब** : होय तूच.

**तरुण** : मी ?.... [ घोडयाच्या धडकांचा आवाज येतो ] होय मी मारेन त्याला. [ बाईसाहेब ड्रावरमधून एक पिस्तुल काढून त्याच्याकडे देतात. ]

**बाईसाहेब** : हे पिस्तुल भरलेलं आहे. तबेल्याच्या मागच्या बाजूला जा. तिथे एक शिडी आहे. तबेल्याच्या भिंतीला वरच्या बाजूला हवेसाठी झरोके केलेले आहेत. त्या झरोक्यातून नेम धरून त्या घोडयाच्या मेंदूत गोळी झाड आणि मग सारं कसं शांत होईल. [ तरुण तिडिकेने पिस्तुल घेऊन दारापाशी जातो इतक्यात धर्मानंद धावत येतो. ]

**धर्मानंद** : तरूणा थांब ! जाऊ नकोस. तू आत्मघात करतो आहेस.

**बाईसाहेब** : थेरडया तू निसटून आलास तरी कसा ?

**धर्मानंद** : तरुणा माझं ऐक. तू स्वतःच्याच हाताने स्वतःचे डोळे फोडतो आहेस. तुझ्या रस्त्यावरचा पूल तू स्वतःच उद्ध्वस्त करतो आहेस.

**बाईसाहेब** : हैवत ! हैवत ! [ हैवत येतो ] ह्या थेरडयाला चांगलं कडेकोट बंदोबस्तात बंद कर. हा प्रत्येकवेळी पळून येतो तरी कसा ? [ तरुण गोंधळलेल्या अवस्थेत उभा आहे. ]
तरुणा, त्या थेरडयाकडे बिलकुल लक्ष देऊ नकोस. तो भ्रमिष्ट आहे. फार (ठार) वेडा आहे. [ हैवत धर्मानंदाला नेऊ लागतो. तरुण निघून जातो. ]

**धर्मानंद** : [ ओरडतो ] हा सर्वनाश आहे तरुणा ! सर्वनाश !

**बाईसाहेब** : का ओरडतो आहेस बेंबीच्या देठापासून ? [ धर्मानंद पुढे येतो ]

**धर्मानंद** : मुली, का त्या तरुणाला सर्वनाशाच्या गर्तेत ढकलते आहेस ?

**बाईसाहेब** : नाहीतर माझा सर्वनाश अटळ आहे आणि थेरडया तू सुद्धा

त्यातून सुटणार नाहीस हे तुला पक्कं ठाऊक आहे.

धर्मानंद : मुली, ज्या दिवशी तू मला देवघरात कोंडलंस, ज्या दिवशी कर्मठ रूढींच्या कचऱ्यात मला ढकलून दिलंस, अंधश्रद्धेच्या वेडयांनी माझे हात जखडलेस त्याचवेळी माझं अस्तित्व संपलं. मला अंधारात डांबून माझ्या भोळया-भाबडया अनुयायांची माझ्या खऱ्या स्वरूपापासून कायमची ताटातूट केलीस. निरूपयोगी तेजोहीन म्हातारा होऊन मी इथे खितपत पडलो आणि तू मात्र तुझ्या अन्यायाचा आसूड घेऊन मोकाट सुटलीस. तू तर केवळ मरता येत नाही म्हणून हे विषारी शरीर घेऊन जगते आहेस. मुक्त हो मुली ! आता तरी मुक्त हो. ही मुक्ती कोण देऊ शकतो तेही तुला ठाऊक आहे.

बाईसाहेब : [ दचकून ] नाही ! मला जगायचंय !

धर्मानंद : जगायचंय ? कशासाठी ? अजून काय करायचं बाकी ठेवलंयस तू ? माणसाला आणखी किती पापांची धनी व्हायला लावणार आहेस ? अजून किती पिढया भ्रष्ट करणार आहेस तू ?

बाईसाहेब : मला माझ्या पिढया निर्माण करायच्या आहेत. मी त्या तरुणाला माझ्या प्रेमात पाडेन. तो माझ्यावर प्रेम करू लागेल. आणि त्यातून निर्मिती होईल, एका अंकुराची ! जो ह्या जगावर राज्य करेल !

धर्मानंद : का आणखी विषारी पिल्लावळ निर्माण करू पहातेस ?

बाईसाहेब : येरडया, तू कशी निर्माण केलीस मला ?

धर्मानंद : सगळंच चुकून गेलं. अवघा प्रयोगच फसला [ इतक्यात गोळी झाडल्याचा आवाज येतो ] अरे देवा ! उरली सुरली आशाही नष्ट झाली. शेवटचा किरण देखील हरपला. पोरी तू जिंकलीस !

बाईसाहेब : होय मी जिंकले ! [ मोठमोठयाने हसतात ] नियतीच माझ्या पायाशी लोळण घेत आली. आता कसलंच भय उरलेलं नाही....आता फुलं माझ्या परवानगीने उगवतील. झाडांना अंकुर माझ्या परवानगीने उमलतील. येरडया जा आता. तुझी

मला यत्किंचितही भीती वाटत नाही. तुझं हे वाकलेलं शरीर घेऊन तू कुठेही नाहीसा हो जा. [ दारात तरुण येतो. त्याची मान खाली वाकलेली आहे. ]

**बाईसाहेब** : ये तरुणा असा जवळ ये. आता सगळं काही शांत झालेलं आहे. हे वादळसुद्धा आता गप्प झालेलं आहे. रात्रीला रात-राणीचा सुगंध आहे. आणि ह्या हवेच्या मंद झुळकेला मधाचं बोट लागलेलं आहे. [ इतक्यात घोडा खिंकाळतो. ]

**बाईसाहेब** : तरुणा ?

**तरुण** : बाईसाहेब मी घोडयाला मारलं नाही. मला मारताच आलं नाही. मी झरोक्यातून आत डोकावलो. मला पहाताच तो शांत झाला. आनंदाने फुरफुरू लागला. जणूकाही वर्षानुवर्षे तो माझीच वाट पहात होता. त्याच्या डोळयांत एक आर्जव होतं. एक आगळं प्रेम होतं माझ्याबद्दल. आमचं जणूकाही एक फार जुनं अतूट नातं होतं. मी पुरता विरघळून गेलो. गोळी चाललीच नाही. मी गोळी झाडली ती आकाशाच्या दिशेने.

**बाईसाहेब** : तू मूर्ख आहेस ! भेकड आहेस !

**तरुण** : नाही मी भेकड नाही !

**बाईसाहेब** : एका क्षुद्र घोडयाला तुला गोळी मारता आली नाही ?

**तरुण** : मग तू का नाही मारत गोळी ?

**बाईसाहेब** : मला तसं करता येणार नाही. त्या घोडयाला फक्त तूच मारू शकतोस.

**तरुण** : मी ?

**बाईसाहेब** : होय तूच आणि फक्त तूच !

**तरुण** : मी कोण आहे ?

**बाईसाहेब** : तू....माझा प्रियकर आहेस.

**तरुण** : नाही ते खोटं आहे !

**बाईसाहेब** : खऱ्याखोटयाचा हिशोब तू करू नकोस. तू फक्त माझ्यावर प्रेम कर.

तरुण : पण का ?

बाईसाहेब : कारण मी सुंदर आहे. माझ्या सौंदर्यात आव्हान आहे.

तरुण : नाही ! मला कशातच गुंतायचं नाही. खरं म्हणजे मी सगळ्या सगळ्यापासून पळून चाललो होतो. मला काही तरी वेगळं मिळवायचंय !

बाईसाहेब : माणसाला फक्त एकच मिळवायचं असतं ते म्हणजे सुख आणि मी तुला भरपूर सुख देईन. तू ~~अगदी तृप्त हो~~शील. चल माझ्याबरोबर. [ बाईसाहेब त्याचा हात हातात धरतात. तो काही काळ हात तसाच राहू देतो आणि मग एकदम झिडकारतो. ]

तरुण : नको !

बाईसाहेब : तुला हवं हवंस वाटतंय तरीसुद्धा तू ते नाकारतो आहेस.

तरुण : माझं वाटणं महत्त्वाचं नाही. माझा नकार महत्त्वाचा आहे.

बाईसाहेब : ठीक आहे. विचार कर. रात्र जसजशी चढत जाईल तसा तू अधिकाधिक अस्वस्थ होत जाशील आणि मग तू माझ्याकडेच येशील. मी वाट पाहीन तुझी. [ बाईसाहेब निघून जातात. इतका वेळ उभा असलेला धर्मानंद पुढे येतो. ]

तरुण : धर्मानंद !

धर्मानंद : काय तरुणा ?

तरुण : ह्या सर्वाचा अंत काय ?

धर्मानंद : ठाऊक नाही तरुणा.

तरुण : ह्याची सुरुवात तर तूच सांगितली होतीस शाळेच्या पुस्तकात.

धर्मानंद : मी – ?

तरुण : होय तूच ! मी तुला ओळखलाय धर्मानंद. पण आईच्या, देवांच्या तसबिरीतला धर्मानंद असा नव्हता. तो होता सामर्थ्याचा महामेरू. पर्वतासारखा अचल. सागरासारखा धीरगंभीर आणि साऱ्या जगाला शाश्वत सुखाची हमी देणाऱ्या सूर्यासारखा तेजस्वी ! आणि तू तर....

धर्मानंद : माझ्या मुलीने मला देवघरात कोंडल्यापासून मी निस्तेज

झालोय. निःसत्व झालोय. विझत चाललोय.

तरुण : [दचकून] म्हणजे आता माझा रस्ता मलाच शोधायला लागेल.

धर्मानंद : रस्ता शोधू नकोस. रस्ता निर्माण कर !—

तरुण : मग मी चाललो होतो तो रस्ता कुठे जातो ?

धर्मानंद : रस्ता एका समुद्र किनाऱ्यावर संपतो. पुढे एक अथांग सागर आहे. त्यामागे अनादिकालापासून स्थिर असलेलं निळंशार आकाश. आणि असंख्य डोळ्यांनी लुकलुकणारा परमेश्वर ! सगळे रस्ते शेवटी इथेच संपतात...आणि ह्या गूढ किनाऱ्यावर सोडून देतात माणसाला थक्क करण्यासाठी. त्याच्यापुढे जाता येत नाही. म्हणून तूच निर्माण कर तुझा रस्ता आणि मग त्या खिंकाळणाऱ्या अवलख अश्वावर आरूढ होऊन तू त्या राजमार्गावरून दौडत जा तुझी विजयपताका घेऊन.

तरुण : हा अश्व ?

धर्मानंद : होय तरुणा ! हा शक्तिमान अश्व ! ह्या अश्वावर मांड ठोकण्याची ताकद माझ्यात आता राहिलेली नाही. ती शक्ती तुझ्यात आहे तरुणा. आरूढ हो त्या बेभान अश्वावर ! तोच तुला मार्ग दाखवेल सूर्यफुलांच्या देशाचा !

तरुण : पण –

धर्मानंद : एकच मार्ग आहे. खून कर माझ्या मुलीचा !

तरुण : खून ? नाही !

धर्मानंद : ती तुला मारून टाकण्याअगोदर तू तिला संपवून टाक.

तरुण : ती माझा खून करेल ?

धर्मानंद : होय. ती तुला प्रेमात पाडेल. आपलं इप्सित साध्य करेल आणि मग ती तुझा खून करेल.

तरुण : पण का ? कशासाठी ?

धर्मानंद : कारण तू तरुण आहेस. तेजस्वी आहेस. तुझ्या संबंधातून ती नवीन पिल्लावळ जन्माला घालेल. विषवृक्षाच्या बीजाला धुमारे फुटतील आणि मग अनाचार वाढेल. अत्याचार वाढेल. स्त्रियांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली जातील. जागोजाग


म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा

मानवतेचे खून पडतील....आणि कलियुगाची मर्यादा वाढतच राहील. तिला फक्त तुझ्यापासून भय आहे. म्हणून तुझ्या-बरोबर व्यभिचार करून नंतर ती तुझा खून करेल. त्या अगो-दर तूच जाळून टाक ती विषवल्ली ! चेचून टाक ती काळी नागीण. जा !

[ इतक्यात हैबत येतो. ]

हैबत : म्हातारेबुवा, चला. बाईसाहेबांनी तुम्हाला देवघरात जायला सांगितलंय.

धर्मानंद : तरुणा, बघ हा कसा गुलाम झालाय व्यवस्थेचा. सोडव त्याला ह्या जोखडातून.

[ धर्मानंद हैबतबरोबर जाऊ लागतो. ]

तरुण : थांब ! कुठे नेतो आहेस त्यांना ? सोड.

हैबत : बाईसाहेबांचा हुकूम आहे.

तरुण : त्यांना मोकळं सोड. मी सांगतो म्हणून.

हैबत : नाही ! हुकूम तोडून चालायचा नाय महाराजा !

तरुण : हुकूम तोडलास तर काय होईल ?

हैबत : [ गोंधळतो ] कौनला माहीत; पण हुकूम तोडून चालायचा न्हाय.

तरुण : आज तोडून बघ हुकूम.

हैबत : कोन ठरविणार ते ?

तरुण : तूच ! तू स्वतःच !

हैबत : म्याच ठरविणार ? मग मी जगणार कसा ?

तरुण : पण मूर्खा ! जगायचं कसं हे तू नाही तर कोण ठरवणार ?

हैबत : आम्ही काहीच ठरवत न्हाई. ठरवितो तो मालक. मालकानं सांगितलं तसं वागलं की जगणं कसं सोपं होऊन जातं बघा.

तरुण : असं सोपं आयुष्य ! मुर्दाड मरतुकडं आयुष्य !

हैबत : उद्या तुमी मालक व्हा. आम्ही तुमचं पण ऐकू की !

तरुण : गुलाम ! भेकड नपुंसक !

धर्मानंद : तरुणा, का लढतोयस त्याच्याशी ? तो नर एक यंत्र आहे.

लढायचं असेल तर तिच्याशी लढ.

**तरुण** : पण तो तुम्हाला कोंडून ठेवतोय !

**धर्मानंद** : खरं म्हणजे तो मला कोंडून ठेवूच शकत नाही. कारण देवघराला कडीच नाही. म्हणून तर मी सारखा सारखा बाहेर येतो आणि ते तिलाही माहीत आहे.

**तरुण** : म्हणजे ?

**धर्मानंद** : जाऊ दे रे मला देवघरात [ हैवत आणि धर्मानंद जातात. ]
[ तरुण एकटाच उभा आहे. हातातल्या पिस्तुलाकडे तो पहातो आणि पिस्तुल हातात गच्च आवळतो. त्यावेळी घोडा खिंकाळू लागतो. तो अधिक अस्वस्थ. ]

**तरुण** : [ स्वतःशीच ] ही वादळी रात्र ! ह्या कडाडणाऱ्या विजा ! भविष्यकाळ नसलेला हा वाडा ! मनाला भुरळ घालणारी ही सुंदर स्त्री ! तिच्या जीवावर उठलेला तिचा वृद्ध बाप आणि भन्नाट खिंकाळणारा हा तेजोमान घोडा ! [ एकाएकी हात उंचावून ] महापुरुषा, ह्या सर्व कथेत माझे प्रयोजन तरी काय ? महापुरुषा, मी कोण आहे ?
[ बॅक ग्राऊंडला कोऽहं कोऽहं चे पडसाद उमटत राहतात. तरुण टेबलावर भरलेला दारूचा ग्लास एका घोटात रिकामा करतो. दोन्ही हातांच्या मुठीत पिस्तुल गच्च धरून उभा राहतो. ]

**तरुण** : धडाधड गोळ्या झाडाव्यात स्वतःच्या अस्तित्वावर व परमेश्वर ह्या कल्पनेवर ! उद्ध्वस्त करावीत मंदिरांची शिखरे आणि डांबर फासावं ह्या नक्षत्रांच्या चादरीवर ! अवघा गिळून टाकावा हा खोट्या गर्जना करणारा महासागर आणि अनंत योजने दूर भिरकावून द्यावा हा सूर्य ! म्हणजे मग.... फक्त अंधारच शिल्लक राहील ह्या विश्वात. अव्यक्ताचा शोधच संपून जाईल....आणि तीच असेल नव्या युगाची काळी पहाट !
[ काही काळ शांतता. तो तसाच उभा आहे पुतळ्यासारखा.

बाईसाहेब येतात. ]

बाईसाहेब : तरुणा, काय विचार केला आहेस ?

तरुण : [ त्याच्या शब्दांना एक वेगळी धार आहे ] विचार ? विचार केलाय तुझ्यावर प्रेम करण्याचा. तुला भिजवून टाकण्याचा. कुस्करून टाकण्याचा आणि श्वासोच्छवासात गुदमरून टाकण्याचा.

[ बाईसाहेब हात पुढं करतात. ]

बाईसाहेब : ये तरुणा. तू तृप्त होशील. धर माझा हात.

[ तरुण त्यांचा हात हातात घेतो. दोघे एकमेकांकडे पहात स्तब्ध उभे आहेत. रंगीबेरंगी प्रकाशाची वलये त्यांच्याभोवती फिरत रहातात. बॅकग्राऊंडला फक्त संवाद ऐकू येतात. हे सर्व एखाद्या कवितेसारखं ]

बाईसाहेब : इंद्रधनुष्याला रंग किती ?

तरुण : सात.

बाईसाहेब : आणि प्राजक्ताला पाकळ्या ?

तरुण पाच.

बाईसाहेब सात आणि पाच मिळून होतात बारा. मग तू आणि मी मिळून एकच का ?

तरुण कारण तू आणि मी. आपण वेगळेच नाही.

बाईसाहेब अशा प्रेमाचा रंग कसा ?

तरुण तुझा गुलाबी ओठ जसा.

बाईसाहेब चंद्रावरचा डाग कसा ?

तरुण गालावरचा तीळ जसा.

बाईसाहेब चंद्र सूर्याचे तेज किती ?

तरुण तुझेच डोळे अन् धरती.

बाईसाहेब ह्या रात्रीला अंत कुठे ?

तरुण मिठीत तुझा संदेह मिटे.

बाईसाहेब तरुणा ! ह्या मिठीत आज तुझा सारा संदेह मिटू दे ! सुगंधाचा कलशच आज उरी फुटला आहे. रात्रीची शाई अंगाअंगावर

अंघळू दे. ती पहा निशिगंधाची फुले आपल्या दोघांसाठीच अजून जागी आहेत. [ बॅकग्राऊंडचे संवाद थांबतात. स्पॉट निघून जातो आणि स्टेजवर एक अंधुक प्रकाश. ]

**तरुण** : प्रिये, मी आज तृप्त झालो! तुझा अंकित झालो. तुझ्या या मोहनयी साम्राज्यात तू आता मला कायमचा गुलाम कर. [ खिशात लपवलेले पिस्तुल बाहेर काढतो आणि भिरकावून देतो. ] प्रिये, खरं तर मी तुझा खून करणार होतो. पण हे एवढं सुंदर फूल मला चुरडता येणार नाही. तू म्हणजे माझ्या तारुण्याला पडलेलं एक सुंदर स्वप्न आहे. मला या झोपेतून उठवू नकोस. मी हरलो बाईसाहेब. आय लव यू! आय लव यू! [ असे म्हणत तो त्यांच्या पायावर कोसळतो. त्याचक्षणी ती लपवलेला चाकू बाहेर काढते आणि वार करण्यासाठी हात वर उंचावते. त्याचवेळी घोडा भीषण खिंकाळतो आणि आणि तिच्या हातातला चाकू गळून पडतो. घोडा आता बेभान झालेला आहे. तबेल्याच्या दारावरच्या धडका वाढत चालल्या आहेत. कुठल्याही क्षणी दार कोसळून पडेल. बाईसाहेब भेदरलेल्या नजरेने पहात रहातात. हैबत आणि धर्मानंद धावत येतात. सारे विस्मयचकित! दारावर घोड्याच्या असह्य धडका. ]

**बाईसाहेब** : संपलं! सारं सारं काही संपलं!

**हैबत** : [ घाबरलेला ] बाईसाहेब घोड्याला आवरा! घोड्याला आवरा बाईसाहेब!

**बाईसाहेब** : [ एका निश्चित पण थंड सुरात ] आता जे काही होईल ते अटळ आहे. हा शेवट मला माहीत होता. तो शेवट टाळण्याचा अट्टाहास देखील आता संपला. [ पडझड झाल्याचा आवाज. घोडा उधळलेला आहे ] हैबत, घोडा सुटला ..पळून जा इथून.

**हैबत** : नाही बाईसाहेब.

**बाईसाहेब** : जा हैबत. शक्य तितक्या दूर पळून जा. लपून बस एखाद्या

डोंगर कपारीतील जीर्ण शंकराच्या मंदिरात. सूर्याची किरणं जेव्हा कोवळी होतील तेव्हा तू बाहेर पड. त्यावेळी उमलत असलेल्या कळया कदाचित तुला माफ करतील. जा !
[ घोड्याच्या धावण्याचा आवाज. हैवत दार उघडून पळून जातो. घोड्याचे थैमान चालूच आहे ] ते पहा मंदिराचे खांब ढासळले ! आणि तो प्रासाद उद्ध्वस्त झाला ! तो पहा ज्ञानपीठाचा मनोरा कोसळला आणि तो बाजारपेठेत उसळलेला आगडोंब....आणि ते भयग्रस्त सैरावैरा पळणारे लोक [ स्वतःशीच ओरडतात ] हा अंत माहीत होता ! हा अंत मला माहीत होता !

**धर्मानंद** : मुली, मी थांबवतो त्याला.

**बाईसाहेब** : बाबा, तुम्हाला ते शक्य नाही.

**धर्मानंद** : होय मला ते शक्य नाही. मी जीर्ण झालेला म्हातारा झालोय. सारी शक्तीच संपलीय. तरीसुद्धा मला त्याला थोपवावंच लागेल.

**बाईसाहेब** : पण बाबा, तुम्हाला हवं होतं तेच घडतंय !

**धर्मानंद** : पण माझा मृत्यूदेखील एवढा भीषण असेल याची मला कल्पना नव्हती. या जगातून माझं अस्तित्व कायमचं नष्ट होईल. माझ्या आठवणीचे अवशेष देखील या राखेत विरून जातील. मला प्रयत्न करायलाच हवा मुली ! [ धर्मानंद बाहेर जातो. बाईसाहेब भयचकित नजरेने खिडकीबाहेर पहात राहतात. ]

**बाईसाहेब** : बाबांनी त्याच्या गळयालाच मिठी मारलीय. पण तो त्यांना आवरणार नाही. तो पहा त्यांना फरफटत नेऊ लागलाय. शरीराची शकलपटं निघताहेत. [ बाईसाहेब डोळे झाकून घेतात. ] ओ ! शिरच धडावेगळं झालं....एक वृद्ध मृगजळ विरून गेलं. [ खाली पडलेला खंजीर हातात घेतात. ].... आता माझी पाळी आहे तरुणा. माझा मृत्यू तर अटळ आहे. पण एवढा भीषण मृत्यू तुला पहावणार नाही. कारण तू

माझ्यावर प्रेम केलंस. त्या घोड्याच्या टापांखाली माझे तुकडे तुकडे होण्याअगोदर तू हा खंजीर माझ्या छातीत खुपस.

तरुण : नाही ! नाही !

बाईसाहेब : होय तरुणा ! खुपस हा खंजीर !

तरुण : नाही, मी तुझ्यावर प्रेम करू लागलोय.

बाईसाहेब : म्हणूनच संपव मला. मला मुक्ती दे !

तरुण : तुला मुक्ति देणारा मी कोण ?

बाईसाहेब : हा बेभान धावणारा पांढराशुभ्र अश्व तुझा आहे आणि तू आहेस त्याचा स्वामी कलकी !

तरुण : नाही ! ते खोटं आहे !

बाईसाहेब : होय. तूच कलकी आहेस !

तरुण : नाही ! मी सामान्य तरुण आहे.

बाईसाहेब : या अश्वावर आरूढ होताच तुला तुझ्या सामर्थ्याची जाणीव होईल. हा अश्व तुझीच वाट पहात होता शतकानुशतके आणि मी सुद्धा....तुझ्याशी लढण्यासाठी. आता वेळ थोडा आहे तरुणा. घोडा विजेच्या वेगाने माझ्याकडेच दौडत येतो आहे. खुपस हा खंजीर माझ्या हृदयात. [ तरुण खंजीर हातात घेतो आणि तसाच विमनस्क अवस्थेत उभा रहातो. बाई-साहेब त्याच्या पायाशी पडतात. ]

बाईसाहेब : कलकी ! मी तुझ्याकडे दयेची भीक मागते.

तरुण : नाही ! मी कलकी नाही !

बाईसाहेब : स्वतःला ओळख तरुणा. तूच कलकी आहेस. या कलियुगाचा अंतक, येणाऱ्या नव्या युगाचा निर्माता आणि श्रीकृष्णाने दिलेला शब्द म्हणजे तूच ! आणि कुणी नाही. ओळख मला आणि माझा द्वेष कर. रामायणातील सीता, महाभारतातील द्रौपदी आणि अधर्माची बीज पेरणारी कली ती मीच ! मीच ती समाजरचना, ज्यापासून तू पळून चालला होतास. पळू नकोस तरुणा. संपव मला ! खून कर माझा ! आणि मग एका नव्या युगाची पहाट होईल. कलकी, चालव तो

खंजीर ! चालव !

[ बँकग्राऊंडला घोड्याच्या दौडीचा आवाज तीव्र होतो. तरुणाच्या डोळ्यांत एक वेगळं तेज प्रतीत होत आहे. तो खंजीर मारण्यासाठी हात वर करतो आणि प्रश्नार्थ नजरेने तिच्याकडे पहात राहतो. ह्यावेळी फ्रीज. सगळे आवाज एकाएकी गप्प आणि मग बॅकग्राउंडला धीरगंभीर आवाजात गीतेतील श्लोक ऐकू येतो —

यदा यदा ही धर्मस्य
ग्लानिर्भवति भारत
धर्मसंस्थापतार्थय
संभवामि युगे युगे

[ येथे पडदा ]

# दुखरी

*

अनिल द्रविड

**पात्रे :**

तारा – वय सुमारे ४०

दिलीप – वय सुमारे ४७

फेरीवाला (?) म्हातारा, – वय सुमारे ७०

वेळ – सुमारे ५० मि.

( लहान गावातले मुख्य वस्तीपासून थोडे दूर असलेले घर. डायनिंग हॉल, किचन, स्टडी रूम व बाहेरची बाग या चार ठिकाणी घटना घडतात. रंगमंचाच्या मध्यभागी टेबल, त्यावर खाद्यपदार्थ. दोन खुर्च्या. नंतर हे हलवले जाऊन उजव्या बाजूचे किचन, डाव्या बाजूची स्टडीरूम व बाग यांच्यावर घटना केंद्रित राहतील. कमीतकमी व सूचक नेपथ्याचा वापर अपेक्षित. रंगमंचाच्या मागील बाजूस मोठी बाग सूचित व्हावी. लहान झुडपे वगैरे. बागेचे फाटक अगदी उजव्या कोपऱ्यात. ते प्रेक्षकांना दिसणार नाही.

तारा आणि दिलीप टेबलाशी बसले आहेत. दिलीप वर्तमानपत्र वाचतो आहे. )

**तारा** : तू सकाळी ती कृष्णकमळं पाहिलीस ?

**दिलीप** : काय पाहिलीस ?

**तारा** : कृष्णकमळं.

**दिलीप** : कृष्णकमळं ? कुठं ?

**तारा** : ती मागच्या फाटकाजवळची वेल !

**दिलीप** : ती कृष्णकमळं होती ? अच्छा, मला वाटलं डेलिया... किंवा.... तसलंच काहीतरी असेल.

**तारा** : कृष्णकमळं तुला चांगली ओळखता येतात, दिलीप !

**दिलीप** : हे बघ, मला काय वाटलं ते मी तुला सांगितलं.

**तारा** : किती सुरेख उमललीयेत कृष्णकमळं !

**दिलीप** : मग पाहिलीच पाहिजेत मला.

**तारा** : सकाळी सगळी बाग भरून गेली होती फुलांनी ! डेलिया, निशिगंध सारी उमलली होती. आज सातलाच बाहेर पडलेवते मी. ते डबकं आहे ना, तिथं उभी होते.

**दिलीप** : डेलियाही उमलला होता असं म्हणालीस तू ?

**तारा** : हो.

**दिलीप** : कमाल करतेस ! आता तर तू नव्हता म्हणत होतीस !

दिलीप, तेव्हा मी कृष्णकमळाविषयी बोलत होते.

**तारा** : दिलीप, तेव्हा मी कृष्णकमळाविषयी बोलत होते.

**दिलीप** : कशाविषयी ?

**तारा** : ( शांतपणे ) दिलीप, त्या सामानाच्या शेडजवळची रोपं तुला माहितीयेत.

**दिलीप** : हो, हो.

**तारा** : तोच डेलिया.

**दिलीप** : तो ?

**तारा** : हो.

**दिलीप** : अच्छा ! ( विराम ) मला वाटलं तो ॲस्टर.

**तारा** : खरंच, कठीण आहे तुझ्यापुढं !

**दिलीप** : ती किटली तेवढी दे इकडं.
( विराम. ती चहा आणते. )
झाडाझाडांच्यातला फरक मला कळलाच पाहिजे असा तुझा आग्रह का हे काही समजत नाही. काही गरज नाही त्याची.

**तारा** : तुझ्या बागेत काय काय उगवतं हे तुला चांगलं माहितीये.

**दिलीप** : नेमकं उलटं बोलते आहेस तू. मला माहिती नाही. सूर्यप्रकाशाएवढी स्वच्छ गोष्ट आहे ही
( विराम )

**तारा** : ( उठत ) आज मी सातलाच बागेत गेले होते. त्या डबक्याशी उभी होते. सारं कसं शांत होतं. अगदी सभोवार नुसती फुलंच फुलं, नुकतंच उजाडलवतं. बागेत यायला हवं होतंस तू. आपण ती छत्री लावली असती.

**दिलीप** : छत्री ? कशासाठी ?

**तारा** : पावसाळ्यात वापरायची नव्हे रे. ती परवा नाही का आणली आपण? बागेत ऊन लागू नये म्हणून ? छत्री कसली छत्रच ते ! ती लावून पाहिल्यांदा आपण बागेत बसलोवतो तेव्हा तू नाही का म्हणालास, हे असलं छत्र डोक्यावर घ्यायचं म्हणजे राजेमहाराजे असल्यासारखं वाटतंय.

**दिलीप** : हां हां, ती. ( विराम ) वारा कितपत आहे आत्ता ?

तारा : अजिबात नाहीय.

दिलीप : ही अशी हवा फार वाईट असते.
( विराम )

तारा : आज वार कुठला माहितीय ?

दिलीप : शनिवार.

तारा : आज वर्षातला सर्वांत मोठा दिवस आहे.

दिलीप : हो का ?

तारा : या उन्हानं अगदी कहर केलाय आज.

दिलीप : तो मोरंबा तेवढा झाक.

तारा : काय ?

दिलीप : ते मोरंब्याचं भांडं झाक. गांधीलमाशी उडतेय. ( तो टेबलावरचे वर्तमानपत्र घेतो.) हलू नकोस. आहेस तशीच रहा. च् काय करतेस तू ?

तारा : भांडं झाकतेय.

दिलीप : हलू नकोस, राहू दे ते. तशीच उभी रहा.
( विराम )
मला तो पेपर दे.

तारा : तिला फटका मारू नको. चावेल ती.

दिलीप : चावेल ? ती चावेल ? हलू नकोस. रहा तशीच.
( विराम )
ती खाली येतेय.

तारा : ती त्या भांड्यात जात्येय.

दिलीप : मला ती झाकणी दे

तारा : ती आत गेली.

दिलीप : झाकणी दे मला.

तारा : झाकते मी.

दिलीप : इकडं दे माझ्याकडं ती. आता....हळूच....

तारा : काय करतोस तू ?

दिलीप : गप्प बैस तू. हळू हळू.... ती.... भांड्यात.... वा !.वा ! छान.
( तो टेबलाच्या उजव्या बाजूला बसतो. )

तारा : ती मोरंब्यात पडलीय.

दिलीप : बरोबर. अगदी बरोबर.

( विराम )

( ती टेबलाच्या डाव्या बाजूला बसून वर्तमानपत्र वाचू लागते. )

तारा : तुला तिचा आवाज ऐकू येतोय ?

दिलीप : आवाज ?

तारा : गुणगुण रे !

दिलीप : नॉन्सेस ! आवाज कसा ऐकू येईल मला ? किती जाडजूड आहे ही झाकणी.

तारा : ती संतापलीय बघ.

दिलीप : काय फालतूपणा चालवलायस तू ? इथनं हलव ते भांडं.

तारा : आणि काय करू ?

दिलीप : बेसिनमधे ओतून टाक ते.

तारा : ती उडेल आणि चावेल मला.

दिलीप : ती तुला चावणार नाही. गांधीलमाशा चावत नसतात. बाकी ती उडणार नाहीच आता, ती रुतलीये आत. ती तिथंच मोरंब्यात बुडून मरणार.

तारा : केवढं भयानक मरण, नाही ?

दिलीप : उलटही म्हणता येईल.

( विराम )

तारा : तुझ्या डोळ्यांत काय गेलंय ?

दिलीप : काही नाही, का ?

तारा : मगाचपासून तू डोळे सारखे मिचमिचे करतोयस.

दिलीप : ते जरा चुरचुरताहेत.

तारा : खरंच का रे ?

दिलीप : हं, थोडेसे. जागरण झाल्यासारखे.

तारा : झोप नीट झाल्याय न तुझी ?

दिलीप : अगदी व्यवस्थित. नेहमी सारखी निवांत.

तारा : तरीही तू असा थकल्यासारखा दिसतोयस.

**दिलीप :** थकलोय असं नाही म्हणालो मी. डोळे जरासे चुरचुरताहेत एवढंच मी म्हणालो.

**तारा :** मग असं झालंय तरी काय ?

**दिलीप :** काही समजत नाहीये.
( विराम )

**तारा :** अरे !

**दिलीप :** काय झालं ?

**तारा :** मला दिसत्येय ती. बाहेर यायला बघत्येय.

**दिलीप :** कुठून बाहेर येणारेय ती ?

**तारा :** मधल्या फटीतनं. भांड्यात चमचा आहे नं, त्यामुळे फट राहिलीय. वर चढून यायचंय तिला.

**दिलीप :** अग खरंच की ! तिला येता नाही यायचं अर्थात. ( विराम ) आपण तिला मारावं हे बरं.

**तारा :** हो, पण कसं ?

**दिलीप :** तिला त्या चमच्यानं उचल आणि चिरड या बशीत.

**तारा :** ती उडेल पुन्हा. चावेल.

**दिलीप :** हे बघ, तू हे वाक्य पुन्हा उच्चारलंस तर मी इथनं उठून जाईन.

**तारा :** अरे पण गांधीलमाशा चावतात.

**दिलीप :** त्या चावत नस्तात, नांगी मारतात. चावतात....ते साप.

**तारा :** आणि नाकतोडे ?
( विराम )

**दिलीप :** नाकतोडे शोषण करतात.
( विराम )
( स्वतःशी ) नाकतोडे शोषण करतात. ( विराम )

**तारा :** आपण.......थांबलो थोडा वेळ......तर ती मरून जाईल आतल्या आत. मोरंब्यात बुडून.

**दिलीप :** ( तिरसटपणे ) सकाळची बरीच कामं आहेत मला, ठाऊकाय ना ? अख्खा दिवस या गांधीलमाशीच्या मागं घालवायचा नाहीये मला.

**तारा :** अरे, मग मारून टाक ना तिला.

दिलीप : तुला मारायचं आहे तिला ?

तारा : हो.

दिलीप : ठीक आहे. तो गरम पाण्याचा जग दे इकडं.

तारा : काय करणारेस तू ?

दिलीप : तुला जे हवंय तेच करणारेय. इकडं दे तो.
(ती जग देते. विराम)
हं, आता.

तारा : (अस्फुट) तू मला ती झाकणी उघडायला सांगणारेस ?

दिलीप : छे. छे. मी त्या फटीतनं हे पाणी ओतणारेय. हांस्स्ऽऽ....फटीतनं आत.

तारा : ऐक.

दिलीप : काय ?

तारा : तिची गुणगुण.

दिलीप : मरू दे साली ! (विराम)
यंदाच्या उन्हाळ्यात मला एकही गांधीलमाशी दिसली नव्हती. अगदी आज– पावतो. कसं काय कोण जाणे. खरं तर त्या असायला हव्यात !

तारा : प्लीज.

दिलीप : ही काही पहिलीच गांधीलमाशी असणार नाही.

तारा : प्लीज दिलीप !

दिलीप : उन्हाळ्यांतली पहिली गांधीलमाशी. अंहं, असं नसणार.

तारा : दिलीऽप !

दिलीप : अं ?

तारा : मारून टाक तिला.

दिलीप : अं ? हो हो. घट्ट धरून ठेव ते भांडं. हांऽस्स. हां हां, तिरकं कर. जऽरा तिरकं.

तारा : काय झालं तिचं ?

दिलीप : काढ आता झाकणी. ठीक आहे, मी काढतो. ही बघ ही. खलास. मेली साली !

( तो तिला बशीत चिरडतो ).

तारा : काय बाई तरी चमत्कारिक एकेक !

दिलीप : वा, काय मस्त दिवस आहे आज सुरेख. बागेत जरा उकराउकरी करावी म्हणतोय. ती छत्री कुठाय तारा ?

तारा : तिकडं सामानाच्या शेडमध्ये आहे.

दिलीप : हूं. आपण आता बाहेर पडायलाच हवं. अरे ! आकाश बघ तारा. किती निरभ्र आहे. एकही ढग दिसत नाहीये. आज वर्षातला सर्वांत मोठा दिवस ना ?

तारा : हूं.

दिलीप : वा, काय मस्त दिवस आहे ! धमन्यातनं जाणवतोय मला. एका क्षणात पळत जाईन मी त्या डबक्यापर्यंत. अग, ते रोप बघ फुललेलं. काय देखणं....

( अचानक थांबतो. )

तारा : काय ?

( विराम )

काय झालं दिलीप ?

( विराम )

दिलीप ?

दिलीप : ( जडपणे ) तो आहे तिथं.

तारा : कोण ?

दिलीप : ( खालच्या आवाजात पुटपुटल्यासारखा ) साला तोच आहे तिथं ! तो तिथं मागल्या फाटकाशी.

तारा : बघू.

( ती जाऊन पहाते. विराम. )

तो ? तो फेरीवाला. विड्या सिगरेटी विकणारा ?

दिलीप : तो पुन्हा आलाय.

तारा : तो नेहमीच तिथं असतो अरे.

दिलीप : कशासाठी ? काय करतोय तो तिथं ?

तारा : त्यानं तुला कधीही त्रास दिलेला नाही दिलीप. दिलाय का कधी !

गले कित्येक आठवडे तो उभा राहतोय तिथं. तुला आजच दिसला ?

**दिलीप :** तो काय करत असतो तिथं ?

**तारा :** विडया सिगरेटी विकतो, दुसरं काय !

**दिलीप :** हूं, दळभद्री ! वाजले किती आत्ता ?

**तारा :** साडे नऊ.

**दिलीप :** बापरे ! सकाळी साडेनऊ वाजता सिगरेटचा ट्रे घेऊन हा माणूस करतोय काय इथं ?

**तारा :** तो सात वाजताच येतो.

**दिलीप :** सात वाजता ?

**तारा :** हो. सात वाजता नेहमी तो तिथं उभा असतो.

**दिलीप :** हो पण, तू कधीच···· प्रत्यक्ष येताना पाहिलं आहेस कधी ?

**तारा :** नाही, मी....

**दिलीप :** मग तुला कसं काय...कशावरून तो रात्रभर तिथं उभा नसेल ? ( विराम )

**तारा :** तुला तो एवढा इंटरेस्टिंग वाटतोय ?

**दिलीप :** इंटरेस्टिंग ? नाही नाहो, इंटरेस्टिंग वगैरे काही नाही.

**तारा :** खरंच, तसा चांगलाय तो.

**दिलीप :** तू बोललीयेस कधी त्याच्याशी ?

**तारा :** नाही, बोललेले नाही मी कधी. जातायेता त्याच्याकडं कुतूहलानं पहात असते एवढंच.

**दिलीप :** ( आवाजात चढउतार ) त्या एकाच जागी तो दोन महिने उभाय. जाणवलेय तुला कधी ? दोन महिने. त्या मागच्या फाटकातनं बाहेर पडायची छातीच होत नाही माझी हल्ली.

**तारा :** छाती होत नाही ?

**दिलीप :** ( स्वतःशीच ) त्या फाटकातनं बाहेर पडायचं....ती गल्ली ओलांडायची ... किती बरं वाटायचं मला. उंच गवतातनं लोळल्याचं सुख मिळायचं. आता हरवलंय ते. हे माझं स्वतःचं घर आहे. नाही का ? हे फाटक माझ्या मालकीचं आहे.

**तारा :** मला हे तुझं काहीच समजेनासं झालंय, दिलीप !

**दिलीप :** नाही तर मरू दे. दुसरं असं की त्याला एकही सिगरेट विकताना पाहिलं नाही मी कधी. एकही. खरोखर आश्चर्यच आहे हे एक. तो भलत्याच रस्त्यावर उभाय. हा रस्ता कसला, त्या मठाकडं जाणारी बोळकांडी आहे ही. ते मठातले साधूसुद्धा गावात जाताना दुसरा जवळचा रस्ता पकडतात. अजिबात रहदारी नसते इथं. त्याला विड्या सिगरेटी विकायच्यात तर तो हमरस्त्याला का नाही उभा रहात ? पुढच्या फाटकाशी ? सगळा प्रकारच अजब आहे हा !

**तारा :** ( त्याच्याकडे जात ) पण तू एवढा घाबराघुबरा कशानं झालायस ? बिचारा उद्योगात आहे आपल्या. अगदीच निरुपद्रवी म्हातारा आहे तो.

**दिलीप :** तो उपद्रवी आहे असं म्हणालो नाही मी. तो निरुपद्रवी आहे याची खात्री आहे मला. त्याशिवाय दुसरा पर्याय आहे काय त्याला ?
( अंधार. शांतता. यापुढच्या घटना प्रामख्याने स्टडीरूम व किचन येथे केंद्रित. त्यानुसार सोईस्कर नेपथ्यबदल अपेक्षित. )
( ताराचा आवाज लांबून जवळ जवळ येतो. )

**तारा :** ( आवेगाने ) दिलीप, तू कुठायस ? दिलीऽप ? कुठायस तू दिलीप ?
( दिसते )
दिलीप ?
तू किचनमध्ये काय करतोयस दिलीप ?
( किचनच्या खिडकीतून दिलीपचा चेहरा दिसतो. )

**दिलीप :** काय करतोय ?

**तारा :** सगळीकडं शोधलं मी तुला. बाहेर केव्हापासून ती छत्री लावून ठेवलीय. ती लावून मी आत आले तर तू कुठे दिसेचनास. बाहेर गेला होतास ?

**दिलीप :** नाही.

**तारा :** मग तू होतास तरी कुठं ?

**दिलीप :** या इथंच.

**तारा :** तुझ्या स्टडीत बघून आले मी. अडगळीची खोलीही धुंडाळून आले.

**दिलीप :** अडगळीच्या खोलीत कशाला धडपडतोय मी ?

**तारा :** तू असा अचानक कुठं गायब झालास कळेचना मला. बाग वाजलेत

आला; टाऊकाय ?

**दिलीप :** असं का ?

**तारा :** सगळी बाग फिरून आले. त्या सामानाच्या शेडमध्ये असशील असं वाटलं म्हणून तिथंही जाऊन आले.

**दिलीप :** ( निर्विकारपणे ) त्या शेडमध्ये मी काय करत असेन असं वाटलं तुला ?

**तारा :** तुला मी नक्कीच दिसले असणार बागेत. या खिडकीतनं दिसतं.

**दिलीप :** बागेचा फारच थोडा भाग इथनं दिसतो.

**तारा :** हं.

**दिलीप :** फक्त लहानसा कोपरा.

**तारा :** इथं काय करतोयस तू ?

**दिलीप :** काही नाही, जराशा नोट्स काढत होतो.

**तारा :** नोट्स ?

**दिलीप :** हूं. माझ्या निबंधासाठी.

**तारा :** कुठला निबंध ?

**दिलीप :** तो स्पेस ॲण्ड टाईमवरचा. काल आणि अवकाश.

**तारा :** पण....मला....कधीच बोलला नाहीस तू.

**दिलीप :** तुला बोललो नाही मी ?

**तारा :** मला वाटलं तू डायरेवर लिहितोयस.

**दिलीप :** काल आणि....अवकाश.... यांची जाणीव....आणि सातत्य....या एकाच मुद्याशी घुटमळतोय मी कितीतरी वर्षं.

**तारा :** डायरेचं काय ?

**दिलीप :** ( तुटक ) डायरेची काळजी नको करू तू.
( विराम )

**तारा :** पण किचनमध्ये तू कधीच नोट्स काढत बसत नाहीस, दिलीप.

**दिलीप :** तुला आश्चर्य वाटत असेल नाही का ?

**तारा :** बापरे, ते काय आहे बघितलस ? मोकाट सुटलेला बैल नव्हे ना ! नाही तो फेरीवाला आहे. केवढा अवाढव्य दिसतोय ! दिसला का ! बैलासारखा दिसतोय....तो.

( विराम )

दिलीप ?

( विराम. त्याच्याकडे जात )

बाहेर येतोयस तू ? चल. एवढा चांगला दिवस वाया जाईल तुझा. अजून तासभर आहे जेवायला.

**दिलीप :** आता सकाळी काहीही करायचं नाही असं टरवलंय मी.

**तारा :** निबंधाचं काय तुझ्या ? दिवसभर किचनमधेच बसून रहाणार नाही· येस ना ?

**दिलीप :** तू जा बघू. उगीच भुणभूण लावू नको माझ्या मागं.

**तारा :** खरंच दिलीप, आजवर तू मला असं कधीच बोलला नव्हतास.

**दिलीप :** हो. नव्हतो बोललो.

**तारा :** एऽझलूऽझुल्याऽ

**दिलीप :** त्या नावान हाक मारू नको मला. -

**तारा :** तुझे डोळे लालभडक दिसताहेत.

**दिलीप :** दिसू देत ग !

**तारा :** इथं अंधार आहे फार. वाचताना त्रास होईल तुला.

**दिलीप :** असू दे गं, तारा !

**तारा :** बाहेर चांगला उजेड आहे....

**दिलीप :** हे बघ तू उगीच....

**तारा :** आणि इथं अंधार आहे.

**दिलीप :** मसणात जाऊ दे उजेड !

**तारा :** तू घाबरलास त्याला.

**दिलीप :** मी घाबरलेलो नाहीये.

**तारा :** तो बिचारा निरुपद्रवी म्हातारा आहे.

**दिलीप :** आईगऽ माझे डोळे !

**तारा :** चल, मी धुऊन काढते.

**दिलीप :** बाजूला हो तू.

( विराम )

( संथ आवाजात ) मला बोलायचंय त्या माणसाशी. बोलायचंय

त्याच्याशी थोडं (विराम)

अजबच आहे सारं. माझ्या दाराशी ...हे असलं चमत्कारिक मी नाही सहन करणार. बिल्कुल सहन करणार नाही मी. सकाळपासून काहीही विकलेलं नाही त्यानं. कुणीही गेलं नाही या रस्त्यावरनं. हां. एक माणूस गेला सोवळं नेसून. तो काही विडी-सिगरेट ओढत नसणार. तो विडी-सिगरेट ओढत नसणार हे खरं असलं तरी ...बाकीच्या फेरीवाल्यांसारखा ओरडा तर नाहीच....पण यानं पाहिलंसुद्धा नाही त्याच्याकडं. सकाळभरात एवढी एकच संधी. आणि तीही दवडली त्यानं.

( विराम )

माझा वेळ वाया नाही घालवलेला मी. खरं तर. .. वास्तवाला येऊन भिडलोय. निखालसपणे तो विड्यासिगरेटी विकणारा माणूस नाहीये. तो साला फेरीवाला नाहीये. मला हे आधीच कसं जाणवलं नाही कोण जाणे. भोंदू आहे हा साला. फार जवळून पाहिलंय मी त्याला. तो सोवळ्यातला माणूस समोरून गेला तरी हा ढिम्म उभा होता. चकार शब्द नाही काढला तोंडातनं. हा फेरीवाला-हे नावसुद्धा किती घाणेरडं वाटतंय. काय फार्स आहे! वा!

छे! काहीतरी मोठी चूक होतीय त्याच्या बाबतीत. त्याचा थांगपत्ता लावल्याशिवाय राहणार नाही मी. इथनं हुसकून लावीन मी त्याला. माझ्या दाराशी असं बैलासारखं उभं राहण्याऐवजी दुसरीकडं कुठंतरी जावं त्यानं.

**तारा** : तो फेरीवाला नाही, तर मग आहे कोण?

**दिलीप** : लौकरच शोधून काढू आपण.

**तारा** : तू त्याच्याकडं निघालास?

**दिलीप** : मुळीच नाही. त्याच्याकडं मी जाऊ? अजिबात....नाही. त्यालाच मी इथं बोलावणार आहे. माझ्या स्टडीत. मग व्यवस्थित थांगपत्ता लावेन मी.

**तारा** : तू पोलिसांना बोलावून इथनं हाकलून का लावत नाहीस त्याला?
( तो हसतो. विराम. )

तू पोलिसांना का नाही बोलावत. दिलीप ? पब्लिक न्यूइझन्स आहे, असं सांगता येईल तुला. मला जरी.... वाटत नसला तरी.

**दिलीप :** आत बोलाव त्याला.

**तारा :** मी बोलावू ?

**दिलीप :** बाहेर जाऊन बोलाव त्याला.

**तारा :** दिलीप, हे सगळं तुझं सिरीयसली चाललंय ?
( विराम ) हवं तर मी पोलिसांना बोलावते.

**दिलीप :** जा आणि घेऊन ये त्याला.
( ती जाते. शांतता. दिलीप वाट पहातोय. )

**तारा :** ( बागेत ) नमस्कार. पूर्वी कधी भेटलो नाहीये आपण. मी इथं या घरात रहाते. मी आणि माझा नवरा.
( विराम )
मला खरंच तुमचं आश्चर्य वाटतं....तुम्ही चहा घ्याल का ?
( विराम )
सरबत वगैरे ? इथं असं उभं रहायचं म्हणजे फारच रुक्ष वाटत असणार. ( विराम )
तुम्ही थोडावेळ आत याल का ? आत बराच गारवा आहे इथल्यापेक्षा. आम्हाला तुमच्याशी.... थोडं बोलायचंय.... तुमच्याच भल्यासाठी. येता का जरा वेळ ? फार वेळ नाही घेणार आम्ही तुमचा.
( विराम )
तुमच्याकडनं मी काही विकत घ्यावं अशी इच्छा आहे तुमची ? दिलीप तसा कमीच ओढतो सिगरेट. महिना दोन महिने पुरतील एवढी पाकिटं एकदमच आणून ठेवायची सवय आहे त्याला. हे सगळं आपल्याला आत बसून बोलता येईलच की.
या या इकडून असं. या. या. असं....
हं. या असल्या शोभिवंत वस्तूंनी घर भरलंय आमचं.
दिलीपला नाद आहे बराच.
आज जेवायला बिर्याणी आहे आमच्याकडं. चालते ना तुम्हाला ?
( आता ती फाटकाशी ) आज आमच्याकडं जेवा तुम्ही. या इकडून.

हं तसंच. मी धरून नेऊ तुम्हाला ? इथं या फाटकाशी जरा काटेकुटे आहेत म्हणून म्हटलं. ( फेरीवाला दिसतो )

इकडून इकडून. या असं इकडून. आज हवा फार छान आहे नाही ? आज वर्षातला सर्वांत मोठा दिवस आहे.

( विराम )

तो वेल कृष्णकमळीचा. आणि तो डेलिया. तो तिकडं आहे तो निशिगंध. ती त्या टाकीजवळ दिसताहेत ना ती ॲस्टरची रोपं.

(शांतता. ती स्टडीत येते. )

आलाय तो.

**दिलीप :** माहितीय मला.

**तारा :** बाहेर हॉलमध्ये आहे तो.

**दिलीप :** मला माहितीय ते. मला वास येतोय त्याचा.

**तारा :** वास येतोय ?

**दिलीप :** तो माझ्या खिडकीजवळ आला तेव्हाच मला त्याचा वास आला. आता घरात वास येत नाहीये !

**तारा :** कशासाठी बोलावलंस तू दिलीप ? उगीच चिडल्यासारखा वागू नकोस त्याच्याशी. फार म्हातारा आहे तो. त्याचे कान डोळे तरी शाबूत आहेत की नाही कोण जाणे ! त्या अंगावर किती जुनाट--

**दिलीप :** त्याचा पेहराव काय आहे याच्याशी मला काहीही कर्तव्य नाहीये.

**तारा :** त्याचा राहू दे, पण त्याच्याशी बोलण्यापूर्वी स्वतःकडं तरी बघ तू.

**दिलीप :** बरं, बरं. मी. .

( किंचित विराम )

**तारा :** म्हातारा आहे तो. त्याच्यावर उखडणार नाहीस ना तू ?

**दिलीप :** म्हातारा आहे तर निवारा का नाही शोधत तो ? वावटळी उठत असतात.

**तारा :** आत्ता वावटळी नसतात. उन्हाळा आहे हा. वर्षातला सर्वांत मोठा.

**दिलीप :** वावटळ उठली होती. मागच्या आठवड्यात. उठतात कधी कधी. त्याच्या अंगावर आली तरी तो तसाच उभा होता.

**तारा :** केव्हाचं सांगतोयस हे ?

**दिलीप :** जागचा हलला नाही तो. अंगावर घोंघावत आली तरीसुद्धा.

**तारा :** या साऱ्याची फिकीर करत बसणं शहाणपणाचं वाटतंय तुला ?

**दिलीप :** आत यायला सांग त्याला.

**तारा :** मी....

**दिलीप :** ताबडतोब.

( ती फेरीवाल्याजवळ जाते. )

**तारा :** हं. इकडं आत या असं. फार वेळ घेणार नाही मी तुमचा. पायऱ्या चढून या असं.

( विराम )

जेवायच्या आधी तुम्हाला चहा चालेल ना ? की सरबत घेता ?

( विराम )

तुमचा ट्रे घेऊ का मी ? नको ? बरं राहू दे. हां, त्या पायऱ्या.... पुढं ते दार आहे तेच.

( तो जातो, ती पहात रहाते. )

त्या दारानं.

( विराम )

त्याच त्या वरच्या दारानं. मी आलेच एवढ्यात.

( ती बाहेर जाते. फेरीवाला स्टडीच्या दाराशी उभा )

**दिलीप :** ( उत्साहानं ) मी इथं आहे. या.

( विराम )

असे दारात उभं राहू नका म्हातारबुवा. आता या.

( तो उठता ) या आत या.

( फेरीवाला आत येतो )

हां, तसंच. बाहेर जायची वाट लक्षात ठेवा. आरामात बसा इथं. संकोच बिंकोच करू नका अजिबात. तुम्हाला खायला चालेल ना ? बसा, बसा म्हातारबुवा. खायच्या आधी काय घेणार ? चहा ? कॉफी ? की सरबत ? अं ?

( विराम )

दरवर्षी गावच्या लोकांना मी एक मेजवानी देतो. मी काही कोणी

जमीनदार नाहीये, पण हे लोक मला मानतात थोडेफार. या गावात जमीनदार राहिला नाही आता. कुठं गेला कोण जाणे तो ! चांगला होता म्हातारा. हुक्का ओढत तासन्तास बुद्धिबळं खेळत बसायचा. तीन मुली होत्या त्याला, लांबसडक केसांच्या. भूषण होत्या आमच्या गावचं. मोठी पद्मावती. बसा तुम्ही म्हातारबुवा, बसा. दुसरी राजकुँवर. आणि धाकटी त्या तिघींत अप्रतिम होती. राजश्री नाही.... एक मिनीट हं....अहं....राजश्री नव्हे....ती जयश्री. जयश्री तिचं नाव. कळी होती नुस्ती कळी. तुम्ही इथं नवखे दिसताय. तुम्ही पूर्वी या भागात होतात ? कुठं लांबच्या प्रवासाहून परतलाहात की काय ? हा परिसर माहितीचा आहे तुमच्या ?

( विराम )

तुम्ही आता असे उभे नका राहू. घ्या खुर्ची घ्या. बघा कुठली पसंत पडतेय तुम्हाला ? आमच्याकडं बऱ्याच प्रकारच्या खुर्च्या आहेत. मोढे आहेत. एकच एक ठोकळेबाज प्रकार आवडत नाहीत मला. नेहमी तऱ्हतऱ्हा आवडतात. मी जेव्हा कामात असतो ना.... तेव्हा एका खुर्चीवर बसून चारदोन ओळी लिहितो, ती सरकवतो आणि दुसऱ्या मोढ्यावर बसतो.

( अॅक्सेंटली - ) पुन्हा तो सरकवतो. दुसरी घेतो.

( विराम )

मी निबंध लिहीत असतो.... गूढविद्या आणि तत्वज्ञानावरचे.

( विराम )

पावसाळी प्रदेशांवरही मी टाचणं काढतो. वेगवेगळ्या दृष्टिकोणातनं अर्थात. हं, तर आसाम तुम्हाला माहितीय का ? आसामचं मला पूर्वीपासून फार आकर्षण आहे. जैंतिया टेकड्यात गेलाय का तुम्ही ? चेरापुंजीचा पाऊस पाहिलाय ? माझं स्मरण बरोबर असेल.... तर मला वाटतं तिथल्या ब्रह्मपुत्रेएवढी रुंद नदी कुठलीच नाही भारतात. गोबीच्या वाळवंटातून जाताना फार अद्‌भुत दृश्यं दिसतात. मी नाही गेलेलो कधी. नकाशांचा अभ्यास करताना कळलं मला हे. फारच झपाटून टाकतात.... नकाशे.

( विराम )

तुम्ही इथं गावात रहाता का ? मी फारसा जात नाही गावात. हे गाव तुमच्या वाटेवर येतं काय ? हां, तर आमच्या गावाएवढा देखणा गाव जवळपास दुसरा नाही मिळायचा तुम्हाला. नियमितपणे बक्षिस मिळवत आलोय आम्ही. बसा बसा. बसा तुम्ही.

( विराम )

तुम्हाला ऐकू येतंय ना ?

( विराम )

तुम्हाला ऐकू येतंय ना मी बोलतोय ते ?

( विराम )

म्हाताऱ्या माणसांविषयी अनादर उत्पन्न होईल असं काही तरी तुमच्यात आहे. खरंतर अनादर... हा काही योग्य शब्द नव्हे. तुम्हाला इथं फार गार वाटतंय का ? बाहेरच्यापेक्षा इथं नक्कीच गारवा आहे. मी अजून बाहेर पडलेलो नाहीये आज. बागेत काम करत, टेबलाशी लिहीत दुपार घालवावी म्हणतोय.

( विराम )

हां, आत्ता लक्षात आलं माझ्या. तुम्ही माझ्या बायकोला भटलाहात ना ? मोहक बाई आहे की नाही ? उरकसुद्धा दांडगा आहे तिचा. प्रत्येक गोष्ट व्यवस्थित ठेवते ती या घरातली. बांधा फार छान होता तिचा तरुण असताना. केस तर इतके सुरेख होते.... ( अचानक थांबतो )

( विराम )

हो, अशाच. आत्ता तुम्ही आहात अशाच परिस्थितीत सापडलोवतो मी. धडपडत होतो.... या जगात स्वतःचा मार्ग शोधायसाठी. हो, व्यापारातसुद्धा पडलोवतो. ( अर्धवट हसत ) अं हो, सगळं अनुभवलंय मी. वारे कसे उलटे वहातात, दिवस कसे अचानक पाठ फिरवतात, वावटळीतल्या पाचोळ्यासारखे कसे उडून जातो आपण.... घाण्याच्या बैलासारखं राबून कवडी मिळायची.... रात्रंदिवस खरडत बसायचो मी ..माझा प्रबंध . हो, हे सारं केलंय मी. मी एक

रल्ला देतो तुम्हाला. एक बाई मिळवा, तुम्हाला चिकटून राहील अशी. ह्यॅऽह्यॅऽ, लोक काय म्हणतील याची फिकीर करु नका अजिबात. एकदा का कळ गवसली तुम्हाला, की बस. भरभरून देईल ती.

( विराम )

( हसतं ) या वारेमाप बडबडीबद्दल माफ केलं पाहिजे मला तुम्ही. या दिवसांत फारच थोडी माणसं येतात माझ्याकडं. आमचे सगळे मित्र कुठं कुठं जातात या दिवसांत. मी तरा घरकोंबडाच आहे. एखादा राजस्थानचा दौरा करा वाटेल ? अंदमान ? किंवा नेपाळच्या तराईत ? आवडेलच. निर्विवाद आहे. अरे ! काय घेणार हे बोललाच नाही अजून तुम्ही ! लिंबू सरबत ? लिम्का ? लेमन ? की ऑरेंज एखादं ? हो, गोल्डस्पॉट, फँटा यातलं कुठलं ? की नुसताच सोडा ? बोलिये जनाब क्या लेंगे आप ? आप हॉर्लिक्स लेंगे ? शक्ती और फुर्ती के लिये अच्छा होता है .. या माल्ट और कोकोसे भरपूर बोर्नव्हीटा ? की बीअर ? काय तुम्हाला यांपैकी ?

( विराम )

तुम्हाला उकडतंयसं दिसतंय. तुम्ही ती कानटोपी का नाही काढत ? ती बघून मलाच कसंतरी होतंय. तंग गोष्टींचा कट्टर विरोधक आहे मी. अगदी भर हिवाळ्यातसुद्धा मी कमीतकमी कपडे घालतो.

( विराम )

मी तुम्हाला एक खाजगी प्रश्न विचारू का ? हां, मला काही उलट-तपासणी घ्यायची नाहीय तुमची... पण तुमचं उभं रहायचं ठिकाण चुकलंय, असं नाही वाटत तुम्हाला ? हा काही गर्दीचा रस्ता नव्हे नाही का ? अर्थात तुम्हाला गर्दी, वाहनं यांची पर्वा करायचं काही कारण नाही.... समजू शकतो मी ते. मी ते समजू शकतो.

( विराम )

जरा जवळून निरखून पहातोय म्हणून माफ करा मला.... पण तो तुमचा डोळा नकली आहे काय ! काचेचा ?

( विराम )

काढा ती कानटोपी, तो ट्रे ठेवा खाली आणि अगदी आरामात बसा. ( तो फेरीवाल्याकडे जातो ) तुमच्याकडचा माल चांगला दिसतोय म्हातारबुवा. काड्यापेट्याही विकता वाटतं तुम्ही ? मला असं सांगा. हे आपल्या आपल्यातच हं.... या ज्या काड्यापेट्या तुम्ही विकता त्या पूर्ण भरलेल्या विकता ? की काही काड्या काढून घेता ? कान कोरायला हो ! नाही, म्हणजे मीही व्यापारात हातपाय हलवलेत थोडे.

हं तर, आता वाईसाहेब तुतारी फुंकत येण्यापूर्वी तुम्ही मला जरा साथ द्या. काय घ्यायचं आपण ? कोकमचं सरवत पिऊ या. थांबा हं.... माझ्याकडं ते.... अरे, अरे ! ट्रे सांभाळा तुमचा !

( ट्रे खाली पडतो. ) च् च् पडला का ?

( विराम )

ट्रे खाली पाडलात तुम्ही.

( विराम. तो पाकिटे, काड्यापेट्या व विडीबंडले गोळा करतो. )

( सुस्कारा सोडत ) हूं ऽ या काड्यापेट्या ओल्या आहेत. ओल्या काड्यापेट्या विकणं काही बरं नाही. हा ऽ हा, यांच्यावर बुरशी चढायला लागलीय. तुम्ही आपल्या मालाची काळजी घेतली नाहीत तर या धंद्यात वाट लागेल तुमची. ( सुस्कारा टाकत उठू लागतो. )

हूं ऽ घ्या.

( विराम )

हा ट्रे तुमचा.

( त्याच्या हातात ट्रे देऊन बसतो. )

आता मी जरा स्पष्ट बोलू का तुमच्याशी ? तुम्ही का बसत नाही हे मला खरोखरच कळत नाहीय. चार खुर्च्या आहेत तुमच्यासमोर, आणि हे दोन मोढे. तुम्ही बसल्याशिवाय तुमच्याशी बोलणं शक्य नाही मला. तुम्ही बसला तरच मी तुमच्याशी बोलू शकेन. कळलं का ? तुमच्याकडनं काहीच प्रतिसाद मिळत नाहीये. ( किंचित विराम ) तुम्हाला घाम येतोय. घामाच्या धारा वहाताहेत तुमच्या अंगातन, कानटोपी काढून टाका ती.

( विराम )

त्या कोपऱ्यात जा. जा त्या कोपऱ्यात. जा, जा, कोपऱ्यातल्या त्य सावलीत उभे रहा. मागं, अजून मागं.

( विराम )

मागं जा.

( विराम )

माफ कर मला,.... पण मी हे कशासाठी सांगतोय हे ध्यानात घ्या. तुम्ही बैलासारखे दिसता असं मला वाटलं होतं. ते चुकलं माझं. मी काय म्हणतोय ते नीट ध्यानात घ्या. हां, अजून जरा, ज ऽ रा उजव्या बाजूला. हां ऽ स्सं, आता बरोबर आलात त्या सावलीखाली. छान, आता मला नीट बघता येईल.

( विराम )

मी इथं कशासाठी बोलावलं याचं आश्चर्य वाटत असेल तुम्हाला. तुम्हाला बघून मी सावध झालो असं वाटतंय तुम्हाला ? तसं वाटत असेल तर मात्र तुमची चूक होतेय. तुम्हाला बघून सावधबिवध नाही झालो मी. तुमच्यात तसं काहीच दिसलं नाही मला. छे, छे ! मी सावध वगैरे व्हावं तसं काहीच नाहोये या खोलीबाहेर. तुम्हाला हवंच असलं तर सांगतो, तुम्हाला बघून भयंकर किळस आली मला.

तुम्हाला बघून किळस का यावी मला ? प्रश्न समर्पक वाटतोय हा. ती जयश्री तुमच्याइतकीच घृणास्पद होती. बाह्य रूप फार वेगळं असलं....तरी अंतरंग सारखंच आहे तुम्हा दोघांचं. एक असं साम्य.

( विराम )

असा सारखेपणा.

( विराम )

( खालच्या आवाजात ) मला तुम्हाला एक प्रश्न विचारायचाय. माझ्या मागल्या फाटकाशी उजाडल्यापासून मावळेपर्यंत तुम्ही कशासाठी उभे असता ? विड्या-सिगारेटी विकायचा बहाणा कशासाठी करता तुम्ही ? कशासाठी ? काय प्रकार काय आहे हा ? तुम्ही

थरथरताय. नीट उभं रहाता येत नाहीये तुम्हाला. या. इकडं या. ट्रे सांभाळा तुमचा.

( दिलीप उठून खर्चीकडं जातो ) या, लौकर या. बसा, बसा इथं. बसा, बसा या खुर्चीवर. ( फेरीवाला अडखळत बसतो. विराम ) वा, वा! छान. अखेर बसलात तुम्ही! आता मोकळं वाटलं मला. दमला असाल तुम्ही ( किंचित विराम) खुर्ची टोचतविचत नाही ना? लिलावात घतलीय मी ती. या घरातलं सगळं फर्निचर मी लिलावात घेतलंय. त्या एकाच लिलावात. तरुण असताना. तुम्हीही तरुण असाल बहुतेक. तुम्ही असाल बहुतेक.

( विराम )

त्याचवेळी बहुतेक.

( विराम, पुटपुटत– )

मला मोकळ्या हवेत जायचंय. बाहेर गेलंच पाहिजे मला आता.

( तो दाराशी जातो )

तारा!

**तारा** : काय?

**दिलीप** : ( अत्यंत थरकल्यासारखा ) तारा, बागेत घेऊन चल मला.

( शांतता. ते दोघे स्टडीच्या दारापासून बागेत लावलेल्या छत्रीखालच्या खुर्चीपर्यंत जातात. )

**तारा** : या आडोशाला ये इकडं.

**दिलीप** : आऽह ( बसतो. )

( विराम )

किती शांत वाटतंय इथं.

**तारा** : झाडांकडं बघ.

**दिलीप** : हं,

**तारा** : आपली झाडं आहेत, दिलीप, आपण लावलेली. पक्ष्यांची किलबिल ऐकू येतेय तुला?

**दिलीप** : नाही, मला नाही काही ऐकू येत.

**तारा** : अरे ते गाताहेत बघ.... त्या तिथं. ते बघ नाचताहेत पंख फडफडत

शेजाऱ्याशी.

**दिलीप :** नाचू दे त्यांना खुशाल.

**तारा :** तुझं जेवण मी इथंच आणू का ? इथं निवांत जेवता येईल तुला.
( विराम )
त्या म्हाताऱ्याबरोबर कुठवर आलंय तुझं ?

**दिलीप :** वॉट् डू यू मीन, तारा ?

**तारा :** काय चाललंय तुमचं ?

**दिलीप :** चांगलं चाललंय. फारच छान चाललंय. तो भ्रमिष्ट आहे जरासा, पण समजून घ्यायला हवं ते. त्याच्याजागी मी असतो तर मी तसाच झालो असतो. अर्थात मी त्याच्या जागी आहे अशी कल्पनासुद्धा करवत नाही मला.

**तारा :** काय काय कळलं तुला त्याच्याबद्दल ?

**दिलीप :** थोडं फारच थोडं. त्याचे बरेच धंदे आहेत हे नक्की. त्याचं रहायचं निश्चित असं ठिकाण नाही. दारू पीत नसावा तो. अजून त्याचं इथं यायचं कारण मला शोधून काढता आलेलं नाही. हळूहळू काढेन मी... रात्रीपर्यंत.

**तारा :** काढलंच पाहिजे का ?

**दिलीप :** काय म्हणालीस ?

**तारा :** ( झटकन खुर्चीच्या उजव्या हातावर बसते )
त्याला हकलल्यामुळं माझं काहीच बिघडणार नाहीये, दिलीप. तू पाहिलंस त्याला....तो बिचारा...एक दुर्दैवी म्हातारा आहे....इतकंच, हे बघ दिलीप, तो काही इथं कसलं कारस्थान करायला आलेला नाहीये. आय मीन, कुठं तरी उभं रहायचं ते तो इथं उभा राहिलाय. जाईल तो इथनं. हे बघ, मी घालवेन त्याला. आय प्रॉमिस यू. उगीच एवढ्या तेवढ्यानं अपसेट व्हायचं कारण नाही. तो एक डोक्यानं जरा ढिला असलेला म्हातारा आहे बस, संपलं.
( विराम )

**दिलीप :** फार मोठी गफलत झालीय तुझी.

**तारा :** दिलीप

दिलीप : पार फसलीयेस तू. मला हाक मारू नको त्या नावानं.

तारा : तुला अजुनी भीती वाटतेय त्याची !

दिलीप : त्याची भीती ! मला ! तू पाहिलयस ना त्याला ?

(विराम)

कसा शेणासारखा लिबलिबीत आहे तो. लिबलिबीत दोडगा पो. नीट दिसतसुद्धा नाही त्याला. एक डोळा नकली असावा त्याचा. बहुधा तो बहिरा आहे. खात्री नाही; पण बहुतेक पायांत त्राण नाही त्याच्या. त्याची भीती वाटायचं कारण काय मला ! छे, बाई आहेस तू. तुला नाही समजायचं. (किंचित विराम) पण काही गोष्टी मात्र त्याच्यात आहेत खास. धूर्त आहे तो. नाटक्या आहे तो.... आणि मी ते ओळखलंय हे कळलंय त्याला.

तारा : हे बघ दिलीप, माझं ऐक तू, मी बोलते त्याच्याशी. बोलून बघते मी.

दिलीप : (भर्रकन) मी ते ताडलंय हे माहितीए त्याला.

तारा : मी काढते त्याचा ठावठिकाणा. आय प्रॉमिस यू.

दिलीप : मी ताडलंय हे माहितीय....

तारा : दिलीप तू खरंच ऐक माझं. सगळा छडा लावते मी. आत्ता जाते त्याच्याकडं. व्यवस्थित थांगपत्ता लावेन मी. खडान्खडा माहिती काढते बघ.

दिलीप : तू ! काहीतरी हास्यास्पद बोलू नको.

तारा : माझ्याशी छक्केपंजे करणार नाही तो. चाट पडेल तो, बघच तू. मी म्हणेन त्याला निमूटपणे मान डोलावेल तो.

दिलीप : (अस्फुट–) तुझं ऐकेल तो ?

तारा : तू पहात रहा नुसता.

दिलीप : काय डाव रचलायस तू ?

तारा : काय करायचं ते अचूक ठाऊकाय मला.

दिलीप : काय डाव रचलायस तू ? (तो तिचे दंड पकडतो)

तारा : दिलीऽऽप–

(विराम)

( जराशा प्रौढोने- ) माझं आटपल की खिडकीतनं मी तुला खूण करेन. मग तू ये. खरं काय आहे ते नक्की हुडकून काढेन मी. कुठल्याही गोष्टीत तू जरा रानगटपणानंच वागतोस. बायकोवर भरवसा ठेवायला हवास तू दिलीप. तिच्या शहाणपणाचं कौतुक करायला हवंस. जिथं पुरुष हरतात ना.... तिथं नेमकं बायकांना यश येतं, ठाऊकाय तुला ?

( शांतता. ती अभ्यासिकेत जाते. )

मी इथं आले तर चालेल ना तुम्हाला ?

( दार लावते )

बरं वाटतंय ना तुम्हाला इथं ?

( विराम ) अरे, उन्ह येतंय तुमच्या अंगावर. तुम्ही तिकडं सावलीत का नाही बसत ? ( ती बसते )

आज वर्षातला मोठा दिवस आहे. ठाऊकाय तुम्हाला ?

मागचं वर्ष वाहून गेलं सगळं. मागच्या पावसाळ्यातला धुवाधार पाऊस ! बापरे ! केवढा प्रचंड पूर आलावता ! तुम्ही नसणार तेव्हा इथं. आमच्या इथं नाही येत पुराचं पाणी, आम्ही तसे सुरक्षित असतो. पण खालच्या सखल भागात नुस्ता हाहाःकार उडाला होता. कुटुंबच्या कुटुंब वाहून गेली पाण्याबरोबर. या भागाचं अक्षरशः सरोवर झालवतं. सगळे व्यवहार चिडीचुप. सगळ्या वस्तू आम्ही आधीच आणून ठेवल्यावत्या हे आमचं नशीब. आम्ही आपले बसायचो गरम गरम चहा पीत.... संस्कृती बिस्कुतीवर गप्पा मारत.

( विराम )

तुम्हाला पूर्वी कुठंतरी पाहिलंय असं सारखं वाटतंय मला. बऱ्याच वर्षांपूर्वी. त्यावेळी तरुण असाल तुम्ही. हां, नक्कीच पाहिलंय मी तुम्हाला. तुम्ही कधी.... हे मी बोलणार नाही कुणाला.... पण तुम्ही चोऱ्यामाऱ्या करत होता का हो ? एका चोराशी माझी.... हिडीस बलात्कार केलान् त्यानं. डोंगराखालच्या पायवाटेनं मी निघाले होते ....रस्त्याच्या कडेला एक माणूस पडलावता...लोकांनी मारहाण करून टाकलं असावं त्या मवाल्याला.... मला कसं माहीत असणार

ते ? वरंच लागलेलं दिसलं म्हणून मी बघायला गेले आणि झडपच घातली त्यानं.... वर झाडातनं निळं आभाळ.... आणि कानांना गार चिखल.... भयानक हताश झुंज होती ती.

( विराम )

मी हरले त्यात.

( विराम )

तेव्हाचं आयुष्य फार धोक्याचं होतं असं वाटतंय आता. बाई-माणूस असले तरी कुठंही हिंडायफिरायला घाबरायची नाही मी. त्या माझ्या अहंकारावर पहिला घाला होता तो.

( विराम )

नंतर बऱ्याच वर्षांनी लोकांनी त्याला पकडला. आमच्याच भिंती-वरून चढून आत येत होता. तो चोरटा आहे तेव्हा कळलं मला. लोक मारायला उठलेवते, पण मी जाऊ दिलं त्याला. दाढी मेंदीनं रंगवलीवती त्यानं. मला चांगलं आठवतंय.

( विराम )

घाम यायला लागलाय तुम्हाला. तुमचं कपाळ पुसू का मी ? उका-ड्यानं घाम येतोय तुम्हाला ? की इथं कोंदटल्यासारखं होतंय ? की ? ( ती त्याच्याजवळ जाते ) खरं तर आज तसा गारवाच आहे. दिवस लवकर मावळेलसं दिसतंय. चालेल ना कपाळ पुसलं तर ?

( विराम. ती त्याचे कपाळ पुसते )

हं, आता बरं वाटलं असेल. तुम्हाला. तुमच्या नाकावरसुद्धा घाम साचलाय. बायकांचीच कामं आहेत ही. आणि आता तुमच्याजवळ मी एकटीच बाई आहे.

( विराम. ती बसलेल्या खुर्चीच्या दांड्याशी वाकते. जवळिकीनं. )

मला सांगा, तुम्हाला बायको आहे की नाही ? बाई एखादी ? बाई ही गोष्ट आवडते की नाही तुम्हाला ? तुम्ही कधी.... विचार करता बाईविषयी ?

( विराम )

तुमचा एखाद्या बाईशी कधी... ' संबंध ' आलाय ?

( विराम )

तुम्ही चांगले दिसत असणार पूर्वी, खात्री आहे मला ( ती बसते ) पूर्वी अर्थात, आता नाही. तुमच्याजवळ आलं की दर्प येतो एक-प्रकारचा. अगदी असह्य.

( विराम )

एकूण सेक्सला तुम्ही काहीच किंमत देत नाहीसं दिसतंय. सेक्स म्हणजे... तेच ते बाईबरोबर... समजलं असेल तुम्हाला. जगायला नव बळ देणारा अनुभव वाटतो तो, या जगातल्या माणसांना. तुम्हाला कधी जाणवलंय हे ? खरंच तुम्ही एवढे किळसवाणे दिसत नसतात ना, तर जास्त मजा आली असती. तसे आपल्या-परीनं मनोरंजक आहातच तुम्ही आता सुद्धा.

( चुचकारल्यासारख्या स्वरात ) बरं, आता प्रेमाविषयी काहीतरी बोला. सांग, सांगा मला.

( विराम )

काय म्हणताहात देव जाणे ! शी ऽ शिसारी येतेय. तरुण असताना प्रेमात पडलेवते मी...प्रेम केलं होतं...जीवाची कुरवडी करून.... बापरे काय घातलय काय तुम्ही हे ? स्वेटर ! किती कडकडीत झालाय पाहिलांत ? चिखलाबिखलात लोळून आलाहात की काय ? ( किंचित विराम ) नाही, चिखलात नसणार लोळले तुम्ही ( ती उठून त्याच्याकडे जाते ) आणि या स्वेटरच्या आत काय आहे ? बघू दे. ( किंचित विराम ) गुदगुल्या करत नाहीय ना मी तुम्हाला ? नाही ? छान हूं, बंडी घातलीय आत तुम्ही. कसलीतरी वेगळीच दिसतेय ही बंडी ? अं ? ( ती त्याच्या खुर्चीच्या हातावर बसते. ) हूं ऽऽ फारच म्हातारे आहात. शेणासारखे वाटत नाहीय तुम्ही. फक्त आंघोळीची आवश्यकता आहे तुम्हाला. स्वच्छ आंघोळ. अन ती ही मस्त चोळून अगदी गोपीचंदासारखी ( विराम ) आवडेल तुम्हाला. बर वाटेल बघा. ( त्याच्याभोवती हात टाकते. ) मी तुम्हाला ठेवून घेणारेय. तुम्हाला मी ठेवून घेणारेय म्हातारबुवा आणि चक्रपाणी ठेवणारेय तुमचं नाव. अंधारात बसल्यासारखं वाटत नाहीय

ना चक्रपाणी ? तुमचे डोळे म्हणजे....तुमचे डोळे हे....हे भोकर एवढे डोळे...

(विराम)

माझ्या नवऱ्याला मुळीच ओळखता येणार नाही तुमचं नाव. बिलकुल नाही. (त्याच्या समोर गुडघे टेकून बसते. अस्फुट) तुम्ही जीची वाट पहात होतात ती मीच आहे. तीच आहे मी. जिच्यासाठी तासन् तास उभे होतात तीच...जंगलात मी फुलं गोळा करत असताना तुम्ही मला पाहिलं....आणि इथं माझ्या दाराशी येऊन उभे राहिलात....तसेच रहाणार होतात मरेपर्यंत....बिचारे ! तुम्हाला बिछान्यावर निजवणार आहे मी चक्रपाणी. तुमची सेवा करेन मी. पण आधी तुम्ही एक भलीमोठी आंघोळ केली पाहिजे. तुमच्या आवडीच्या सगळ्या गोष्टी आणेन मी. छानदार खेळणी आणेन खेळायला. तुमच्या मृत्युशय्येपाशी ठेवेन मी. सुखात का मरू नये तुम्ही ?

(हॉलमधून दिलीप ओरडतो.)

**दिलीप :** संपलं का तुझं ?

(आत येत)

**दिलीप :** काय झालं ?

**तारा :** आता येऊ नकोस.

**दिलीप :** काय काय झालं ?

**तारा :** तो मरायला लागलाय.

**दिलीप :** मरायला ? मरत नाहीय तो.

**तारा :** हे बघ, तो अतिशय आजारी आहे.

**दिलीप :** मरतोय ? मरणार नाही तो. एवढ्यात नाही मरणार. तुझी तिरडी बघेल तो.

**तारा :** तो माणूस भयंकर आजारी आहे !

**दिलीप :** आजारी ? धडधडीत खोटं बोलतेयस. तू जा इथनं.

**तारा :** दिलीप–

**दिलीप :** (संतापून) तू ताबडतोब हाल इथनं.

( ती जाते. विराम )

काय म्हातारबुवा, काय चाललंय ? संध्याकाळ व्हायला आलीच की. म्हातारबुवा असे का बसलाय तिथं कोपऱ्यात ? अं तुम्ही कपडे काढायला लागलात. उकडतंय ? मग या खिडक्या उघडू या.

( तो खिडक्या उघडतो )

हे पडदे सरकवू या. ( तो पडदे ओढतो )

आणि....ते पुन्हा... ओढून घेऊ या. ( पडदे उघडतो )

उंहूऽ पडद्याचा फुगा करून बाजूनं येतोयच वारा. येऊ दे. गुदमरायचं नाहीय आपल्याला. नाही नं ? ( विराम ) आराम वाटतोय ना ? हं. अंधारात वेगळेच दिसता तुम्ही. हवं तर अंगातलं काढून टाका. आपल्याच घरात आहोत असं समजा. घरात वागता तसे वागा. ( विराम ) तुम्ही काही म्हणालात ? ( विराम ) काही बोललात तुम्ही ? ( विराम )

पुटपुटलात ! बरं मग, आता मला तुमच्या लहानपणाविषयी सांगा. अऽऽ ?

( विराम )

काय काय करत होता लहानपणी ? कुठले खेळ खेळत होता ? पळत होता ? पोहत ? फुटबॉल खेळायचा ? कुठल्या जागेवरनं ? लेफ्ट बॅक ? की सेंटर फॉरवर्ड ? की गोली होतात ? ( विराम )

मी चिक्कार खेळलो. शाळेचा विकेटकीपर होतो मी. सातव्या नंबरला बॅटिंग करत असे. ( विराम )

विकेटकीपर आणि बॅटिंग सातव्या नंबरला. एकजण होता अजमल नावाचा, साधारण तुमच्यासारखाच दिसायला. डावखुरं बोलिंग टाकायचा. ओवर द विकेट, कायम डोक्यावर टोपी. मनगट काय होत त्याचं ! कसंही फिरायचं खोबणीत घातलेल्या गोटीगत. एरवी-सुधा दिसेल ती वस्तू उडवून झेलत फिरायचा. ( विराम )

पावसाळ्यात मैदानं ओली असली की मग बाकीच्या वस्तू तावडीत सापडायच्या त्याच्या. ( विराम )

तुम्ही क्रिकेट खेळलेले दिसत नाही. ( विराम )

तुम्हाला कोणी अजमल भटलेला दिसत बाही बहुतेक. जितकं जितकं मी जास्त निरीक्षण करतोय तितकी तितकी तुम्ही क्रिकेट खेळला नसणार याची खात्री होतेय मला. लहानपण कुठं काढलंय तुम्ही ? बाकी, माझी पण कमाल आहे ! तुमचीच माहिती काढायला लागलोय मी ! माझ्या घरात माझा पाहुणचार घेत बसलाहात तुम्ही. या माझ्या खुर्चीत एखाद्या कुबड्यासारखे. मातीच्या ढिगाऱ्यासारखे बसलाहात. या माझ्या खोलीत. मला आठवतंय .... ( अचानक थांबतो. ) ( विराम )

विनोदी वाटतंय तुम्हाला ? दात विचकताय वाटतं तुम्ही ? (विराम) ( तिरस्कारानं– ) दात विचकताय साले, माझ्याकडं बघून ? हे सगळं एकतर्फी चाललंय. तुमची करमणूक होतेय का त्यामुळं ? हे घर, ही खोली, हे सारं माझं आहे याची जाणीव दिली म्हणून ? ( पुटपुटत– ) सगळं समजावून झालंय... ( विराम )

एक हिवाळा सोडला तर बाग कशी कायम नाजूक आणि लखलखीत दिसत असते ! ( विराम )

माझी ही खोलीसुद्धा लख्ख आहे. मला हवं तसं लावलंय सगळं. फार व्यवस्थित ठेवलीय मी.( विराम )

घरालाही नुकतीच रंगरंगोटी केलीय. कठडे, खिडक्यांची दारं, साऱ्यांना पॉलिश केलंय. ( विराम )

टेबलाला आणि कपाटालाही पॉलिश केलंय माझ्या. ( विराम )

मी स्वतःच केलंय सगळं ( हरवून जात– ) दुर्बिण डोळ्याला लावून समुद्राकडं पहात तासन्तास उभा राहू शकतो मी डोंगरावर. समुद्रातल्या पडावांचा माग घेत रहातो. हात दुर्बिणीशी असतात कायम. रग लागली तरी रेसभर हलत नाहीत. पायाना अवधाण येत नाही कधी. हो, मांडयाच्या फटीतनं गरम पाणी ओतू शकतो. हो, हो, अगदी सहज, पकड मजबूत आहे माझी. डोंगर पालथे घालायला केव्हाही तयार असतो मी. या मागच्या फाटकातनं बाहेर पडतो; गवतातनं चालायला लागतो, छे, काट्याविट्यांची पर्वा कोण करतंय ... आणि थेट कडा गाठतो, सत्राशेसाठ गोष्टींशी झगडा

चाललावता माझा ... तो संपला आणि मग भरभराटच होत आली माझी. माझ्या वाईटावर असलेल्या माणसांची यादी देऊ शकेन मी. हो, अक्षरशः यादी. माझी घडी आता अगदी झकास बसलीय. सकाळी मस्त अंडीबिंडी खायची आणि मग दुर्बिण डोळ्याला लावून हा परिसर न्याहाळत बसायचं. नंतर बागेतल्या रोपांची विचारपूस करून झाली की मागच्या गल्लीतनं सुटायचं, मठ ओलांडायचा की डोंगर. दुर्बिणीची भिंगं ( दोन पोकळ मुठी डोळ्याशी नेत ) जरा मागंपुढं करायची आणि समुद्रातले पडाव बघत बसायचं. तर हे असं सगळं सुरळीत चालूय. ( विराम, हात खाली आणतो )
बरोबर आहे तुमचं. हे सगळं विनोदी आहे. ( विराम )
( चिडून ) हसा, हसा. अवश्य हसा तुम्ही. हसा, हसा. माझी पत्रास नका ठेवू. नाही, नाही, शिष्टाचार वगैरे पाळायचं काही कारण नाही. ( विराम )
हं. बरोबर. तसंच. ( विराम )
बरोबर आहे तुमचं. फारच विनोदी आहे हे सगळं. मीही हसतो तुमच्याबरोबर. ( तो हसतो आणि थांबतो. )
( तल्लखपणे– ) मी तुम्हाला या खोलीत कशासाठी बोलावलं ? हा तुमचा पुढचा प्रश्न, नाही का ? असायलाच हवा. ( विराम )
हे माझ्या गतजन्मीच्या ऋणानुबंधी ! हे माझ्या प्राणप्रिया ! तू का नाही विचारत हा प्रश्न ?
आपल्यात पत्रव्यवहार चांगला होईल. फारच चांगला. आपण पत्र लिहू एकमेकांना. कशी काय आहे कल्पना ? आपले दृष्टिकोन स्पष्ट करू. समुद्र आणि जमीन, शहर आणि गाव, वसंत आणि ग्रीष्म, मशिदींचे घुमट,... ? वस्तुसंग्रहालयं .... देवळं ... पूल.... नद्या ... सगळ्या सगळ्यांविषयी बोलू पत्रातनं. ( विराम )
काय करताय ? टोपी काढून टाकताय... ? नाही काढत ? बरं. सारासार विचार करून.... मला आता असं सांगा .... तुम्ही ... कानटोपी काढून टाकावी व त्यामुळं तुमचं कुणाशी साम्य आहे हे मला कळावं. . म्हणून मी तुम्हाला या खोलीत बोलावलं असं

वाटतंय तुम्हाला? तर यांचं उत्तर नाही असं आहे. शंभर टक्के नाही. मी तुम्हाला पहिल्यांदा पाहिलं तेव्हा तुमच्या डोक्यावर कानटोपी नव्हती. काहीच नव्हतं. बिनडोक्याचे तुम्ही वेगळेच दिसत होता... अंह, बिनटोपीचे म्हणायचं होतं मला. बोडके असताना. प्रत्येकवेळी तुम्ही मला पूर्वीपेक्षा वेगळेच दिसत आहात.
( विराम )
आत्तासुद्धा तुम्ही वेगळेच दिसताय. ( विराम )
तुम्हाला पहात असायचो मी. कधी गॉगल लावून तर कधी दुर्बिणीतनं. पण बहुतेक वेळा नुसताच. काही वेळा किचनमधल्या खिडकीतून तर काहीवेळा गच्चीवरनं. हो दाट धुक्यात आणि भर पावसातही. तळपत्या उन्हातसुद्धा गच्चीवर उभा असायचो मी. एका जागेवरून बघायचा कंटाळा आला की जागा बदलायचो. आता यावर खदखदून हसता येईल, नाही का? पोट फुटेस्तोवर हसायला चांगलं आहे हे. हसा ना मग, हसा, हसा, हसा.
( चकित होऊन- ) रडताय... तुम्ही... ( विराम )
( हेलावल्यासारखा- ) तुम्ही हसत नव्हता....रडत होता. ( विराम )
रडताय तुम्ही. हुंदके देताय. माझ्यासाठी. नाही, नाही विश्वास बसत नाहीय माझा. माझी अवस्था बघवत नाहीय तुम्हाला. छे, चुकतच आलं माझं. घोडचूक झाली. ( विराम )
हे पहा, रडू नका. एकदम, एकदम बंद करा बघू. अरे, पुरुष आहात ना तुम्ही? रडताय कसले? कृपा करून ते नाक पुसा. चला, पुसा ते. ( तो शिंकतो. ) अः ऽऽ ( तो उठून शिंकतो. )
पडसं झालंय. ( नाक पुसतो. ) सर्दीपडशानं हैराण केलंय. डोळ्यात काहीतरी शिरलंय....सकाळी. त्यामुळंच हे असं. डोळ्यात.... सकाळी...गेलंय.
( जमिनीवर पडून- )
त्यामुळं मला नीट दिसलं नाही अशातला भाग नाही. नजर चांगलीय माझी. स्वच्छ आहे. थंडीच्या दिवसात नुस्त्या चड्डीवर पळायला जातो मी-मी आणि समोरच्या वस्तू यातलं वातावरण दूषित

आलं होतं. माझी नजर नाही–रडू नका तुम्ही–मी आणि समोरची वस्तू यांच्यामधल्या वातावरणातला बदल....या दोहोंतल्या अवकाशात निर्माण होणाऱ्या लहरी....त्या ज्या विविध छटा धारण करतात.... त्या ज्या विविध छटा निर्माण करतात त्या पोकळीतलं एक सनातन असं चलनवलन, या सगळयामुळं असं झालं असावं–कृपा करून रडणं थांबवा तुम्ही– हो, कधीकधी मी निवांत जाऊन बसतो बागेत एखाद्या झाडाखाली पडून रहातो.

( खालच्या आवाजात– ) आणि मग वाऱ्याची कुजबुज ऐकू येत नाही की उन्हाच्या नख्या बोचकारत नाहीत. कान बंद होतात आपोआप. एका कुशीवर मी पडून असतो, गवताची पाती बोटांशी पिंगा घालत रहातात. जमिनीतनं उगवून आलेली रानजाई वाकुल्या दाखवत असते. त्यांच्या पाकळयांवरचं दंव माझ्या तळहाताचं चुंबन घेत रहातं. मी स्तब्ध पडून असतो, अविचल. पालवी गडद होते तशी अल्गद माझ्या अंगावर पाकळयांची पखरण होत रहाते. दरवेळी हे असंच होत रहातं. ( विराम )

पण एकदा ती वेळ आली ...मी वारा पाहिला. सोसाटत जाताना पाहिला, माझ्या मागच्या फाटकाजवळची सगळी माती अस्मानात उडवत....पलीकडच्या उंच गवताला तलवारीसारखा कापत जाताना पाहिला. ( भयाण आवाजात मंदपणे– ) तुम्ही हसताय. हसताय तुम्ही. तुमचा चेहरा....तुमचं शरीर– ( उसळून येणारी किळस आणि तिरस्कार ) हलतंय....गदगदतंय....थरथरतंय....खदखदतंय.... मला हसताय तुम्ही ! हा ऽ हा ऽ हा ऽ हा ऽ

( फेरीवाला उठतो. शांतता )

तरुण दिसताय तुम्ही. असामान्य तारुण्य सळसळतंय तुमच्यात.

( विराम )

तुम्हाला बाग पहायचीय ? चंद्रप्रकाशात ती फार गूढ दिसते. ( केविलवाणा होत जातो ) मी येईन....तुमच्याबरोबर....बाग दाखवायला....रोपं दाखवायला. माझी पळायची वाट...युनिव्हर्सिटीचा पहिल्या नंबरचा होतो मी ...तरुण असताना....माझ्या दुप्पट ताक-

तीच्या माणसांना....मागं टाकायचो....तरुण असताना....तुमच्या सारखा. ( विराम )

डबकं चमकत असेल. चंद्रप्रकाशात. हिरवळसुद्धा. होय. कडा. समुद्र. ते पाडाव. ( विराम )

( जिवाच्या करारानं विचारल्यासारखा– ) कोण आहात तुम्ही ?

तारा : ( उंच आवाजात ) चक्रपाणी ऽ ?

हूं ऽऽ चक्रपाणी, चला आता.

( विराम )

मला माझी बाग दाखवायचीय तुम्हाला. माझा निशिगंध, माझी कृष्णकमळं, माझा डेलिया, माझा ॲस्टर. हे सगळं पहायलाच हवं हं तुम्ही. ( विराम )

उन्हाळा सुरू झालायच. तुमच्यासाठी मी छत्री लावून ठेवेन. बागेत त्या डबक्याच्या काठाशी बसून जेवता येईल तुम्हाला. मी सगळ्या घराला रंगरंगोटी केलीय तुमच्यासाठी. ( विराम )

हात धरा माझा. ( विराम. फेरीवाला तिच्याबरोबर जाऊ लागतो– )

एक मिनीट थांबा हं. ( विराम )

दिलीप, हा तुझा ट्रे.

( दिलीपकडं जाऊन त्याच्या हातात ट्रे देते. ती व फेरीवाला बाहेर जाऊ लागतात. पडदा. )

( हॅरॉल्ड पिंटर यांच्या 'अ स्लाइट अेक्' या नाटिकेचे स्वैर रूपांतर. )

□

# इव्हॅल्युएशन

*

प्रभाकर पिंगळे

पात्रे :

क्रांतिवादी – वय सुमारे ३०
पुढारी – वय सुमारे ४०
प्राचार्य ज्ञानभट्टी – वय सुमारे ५०
प्रा. आचार्य – वय सुमारे ४८
प्रा. नाडकर्णीबाई – वय सुमारे ४५
प्रा. देशपांडे – वय सुमारे ४८
प्रा. सुरेखा देसाई – वय सुमारे ३५
प्रा. जामहट्टी – वय सुमारे ५०
विद्यार्थी-विद्यार्थिनी – महाविद्यालयीन
रोहिणी पंडित – वय सुमारे १९।२०
वर्ग प्रतिनिधी (C. R.) – वय सुमारे १९।२०
भगवान पंडित – वय सुमारे ४६
आमदार – वय सुमारे ४५
पोलीस – वय सुमारे ४०
फौजदार – वय सुमारे ४५

वेळ – सुमारे ४० ते ४५ मिनिटे

( 'घेलाशेट उत्तमचंद महाविद्यालया 'च्या फाटकासमोरील रस्ता. विद्यार्थ्यांची गर्दी. गडबड चालू. त्यातच क्रांतिवादी आणि पुढारी यांची धावपळ. दोघेही गटागटाला मोर्चाचे आदेश देण्यात गुंतलेले. )

१ : कशासाठी गर्दी जमलीय ?

२ : दिसत नाही का– विद्यार्थ्यांचा मोर्चा आहे हा.

१ : कशासाठी मोर्चा ?

२ : कशासाठी मोर्चा ? मोर्चा कशासाठी असतो ? आम्ही सगळे जमलो आणि ठरवलं मोर्चा काढायचा.

१ : पण का ठरवलं ?

३ : हे पहा, आम्ही विद्यार्थी आहोत. आमच्या मागण्या आहेत आणि आम्ही त्या प्राचार्यांना सादर करणार आहोत. यासाठी अगोदर मोर्चा !

२ : का रे, पण मोर्चा न काढता आपल्या मागण्या नसत्या का सादर करता आल्या ?

( क्रांतिवादी दुसऱ्या गटाला आदेश देण्यात गुंतलेला आहे. पण हा प्रश्न ऐकून तो तात्काळ धावत येतो. )

क्रां. : कोण, कोण रे तो भलतंसलतं बडबडतो ?

१ : हा, हा.

२ : नाही मी नाही, तो म्हणतोय.

क्रां. : कोण तो ?

२ : तो पलीकडचा.

४ : नाही हाच.

क्रां. : ( चक्रावून ) हा काय आणि तो काय ! कोणी काही म्हणो पण तुम्ही विश्वास का ठेवता ?

१ : पण मोर्चा का ?

क्रां. : गप बसा हो तुम्ही ! मधे बडबड करू नका. आता मोर्चा काढायचा

ठरला ना ! आता गोंधळ नको, गडबड नको, शंका नको, काही नको.

२ : पण का ?

क्रां. : ( वैतागून ) पुन्हा का ? आज विद्यार्थ्यांची स्थिती काय आहे ? आजचा विद्यार्थी कुठं आहे ? काय, कुठं आहे ? माहितीय तुम्हाला ? कुठाय ?

२ : हे काय आपण जमलो आहोत.

क्रां. : कोण म्हणतो ते ? इथे आपण गर्दी करून जमलो म्हणजे आपण कुठे आहोत हे आपल्याला कळले काय ?

१ : ( धिटाईने ) पण मोर्चा का ?

क्रां. : ( भडकून ) का म्हणजे ? अरे या प्रश्नाला काही अर्थ आहे का ? ( उसळून–अंगावर जात ) तुम्ही मला सांगा की तुम्ही विद्यार्थी आहात का ?

१ : होतो.

क्रां. : होतो लाख. आता आहात का ?

१ : नाही.

क्रां. : मग नसते प्रश्न का उपस्थित करता ?

१ : ( घाबरतो ) पण पण........

( बाकीचे सगळे १ च्या अंगावर धावून जातात. )

२ : पहिलं सांगा की तुम्ही विद्यार्थी आहात का ?

१ : नाही पण होतो.

३ : होतो कसले ? आहात का ?

१ : नाही.

३ : मग तुम्ही आमच्यात बुद्धिभेद का निर्माण करता ?

४ : नसते प्रश्न निर्माण का करता ?

५ : मोर्चात अडथळा का आणता ?

१ : ( गयावया करत ) मी नाही नाही.

क्रां. : नाही काय ? चला फुटा.

३ : अरे हाकलून द्या याला,

४/५ : हाणा, मारा.

१ : अरे पण मी गुन्हा काय केला ?

क्रां. : बोलू नकोस भडव्या. ज्ञानाशी संबंध नाही काडीचा आणि भोरडीचा निघाला प्रश्न विचारायला !

( सगळेजण १ ला मारतात आणि हाकलून देतात. )

क्रां. : सावधान ! आत्ताच आपण पाहिले की माणसं आपल्या कार्यात आडवी येतात. हे लोक हरामखोर आहेत.

क्रां. : मी सांगतो की दुसऱ्या ( आवाज चढवून ) दुसऱ्या युनियनने त्यांचा गुप्तहेर आपल्यात सोडला होता. तो फूटपाडया होता. या फूटपाड्यांचा आपण निषेध केला पाहिजे.

( 'फूटपाडे मुर्दाबाद' च्या घोषणा, त्या पाठोपाठ क्रांतिवादी घोषणा देतो, बाकीच्यांची साथ. 'काली युनियन मुर्दाबाद', 'आमच्या मागण्या मान्य करा', 'विद्यार्थ्यांना न्याय द्या', 'प्राचार्य ज्ञानभट्टी–मुर्दाबाद', 'ज्ञानभट्टी ज्ञानभट्टी–चालू करा हातभट्टी' शेवटची घोषणा विद्यार्थ्यांची आवडती वाटावी. गलका चालू होतो तेवढ्यात एक पुढारी येतो, क्रांतिवाद्याला बाजूला घेतो. )

पु. : कॉमरेड, एकूण स्थिती ?

क्रां. : पोरांना पुरेसं पेटवलंय. आता मोर्चा अकराला निघायचाय. पोरं सातपासूनच आलीत. आता दुपारी सायन्स फॅकल्टी आली–

पु. : सगळी पोरं कॉलेजातून बाहेर काढली ?

क्रां. : तिकडं हेर बसवलेत. जामहट्टी तिकडेच तळ ठोकून आहे. आतापर्यंत मोजून ४८ जणांचा बंदोबस्त झालाय. संघवाल्यांचा विरोध.

पु. : संघवाले ?

क्रां. : विद्यार्थी ज्ञानसंघ युनियनवाले.

पु. : बरं बरं, ठीक ठीक. ( इतक्यात एकजण घाईने धावत येतो. )

ए. : कॉमरेड, तिकडं चला. पोरं थांबायला तयार नाहीत.

क्रां. : तयार नाहीत ? मग तुम्ही तिथं काय दाढीचे खुंट उपटीत बसलात काय ?

ए. : पण–

क्रां. : पण नाही न् बिण नाही. पक्षाचं कार्य नीट करायला नको तुम्हाला ?

मी इथं आठ दिवसापासून वणवण भटकतोय. चार डोअरमिटींग्ज घेतल्या. त्या जामहट्टीकडून पत्रक तयार केलं.

पु. : कॉमरेड !

का. : ( जीभ चावत ) चुका दुरूस्त करायच्या होत्या ना– आज सकाळी ७ पासून मी इथे रस्त्यावर आहे. मॉर्निंगवाला एकजण आतमध्ये गेला नाही. पोरींना गेटवरच झोपवून आलो. आता अकराला मोर्चा–

ए. : अकराला मोर्चा ? मग इतक्या लवकर आम्हाला कशाला बोलावलंत ? बाकीचे उद्योग नाहीत की काय आम्हाला ?

पु. : ( सावरून घेत ) अरे हो हो, सबुरीन घ्या सबुरीनं घ्या. काय? ( अजीजीनं ) अरे, तुम्हीच असं करायला लागला म्हणजे—

ए. : पोरं सकाळी सातपासून बसली आहेत. त्यांच्या पोटात—

पु. : हां हां, आलं लक्षात. अरे कॉमरेड, समोरच्या उडप्याकडून द्या ना यांना वडा-पाव !

ए. : पण पैसे ?

पु. : माझं नाव सांग ना – म्हणावं आमदारसाहेबांनी सांगितलंय आणि पक्षाच्या खात्यावर टाका म्हणावं बिल – जा ( एकजण जातो ) कॉमरेड, अरे वैतागून चालणार नाही. काय ? या अडचणी अगदी फालतू आहेत. पोरांना जमवलंयना – मग आता रेटलं पाहिजे.

ए. : ( परतून ) साहेब सगळ्यांना सांगू ना ?

पु. : अरे जा रे, आणि हे बघ कॉमरेडनंसुद्धा काही खाल्लं नाहीये. इकड पण पाठवून दे. तुझ्या हातात काय आहे ?

ए. : माझ्यासाठी मी घेतला होता ( वडा-पाव दाखवतो )

का. : चांगलं आहे. ते आता इकडे आणा न् फुटा. खा लेको भरपेट. पण लक्षात ठेव हं ! एक पोरगा इथून हलता कामा नये. उशीर झाला तर आमदारसाहेब पार्टी देतील.

पु. : पार्टी ?

का. : ( एकजणाला घालवत. ) तू जा रे.

पु. : बर बर देऊ. ते जाऊ दे पण मला सांगा, जामहट्टीनं सगळी व्यवस्था केलीय ना ?

क्रा. : येस बॉस. तो तर ॲण्टी–प्रिन्सिपॉल आहे, त्यानं सगळ्यांना पढवून ठेवलंय. पण हे बघा आज तो न्यूट्रल आहे असं दिसलं पाहिजे.

पु. : मागण्यांचा खलिता तयार केला ?

क्रा. : हा काय – २४ मागण्या लिहून दिल्यात.

पु. : वाचा.

क्रा. : कॉलिजला पुरेशा मुताऱ्या नाहीत, आहे ती एक गोल पार्लमेंट आहे. देशाला दोन सभा असतात. लोकसभा राज्यसभा. मग कॉलिजला दुसरी पार्लमेंट का नसावी ?

पु. : मग ?

क्रा. : तेव्हा मागणी नंबर एक. मुलांप्रमाणे मुलींनादेखील वेगळी पार्लमेंट बांधून द्या.

पु. : ठीक, पुढे.

क्रां. : मागणी नंबर दोन– हऱ्या नाऱ्या हटाव.

पु. : ही काय भानगड आहे ?

क्रां. : हऱ्या नाऱ्या हे कॉलिजचे शिपाई, आयला, भाव मात्र प्रिन्सिपलच्यावर मारतात. हे लोक म्हणजे C I A चे एजंट आहेत. परवा जामहट्टी आणि पोरं बोलत बसली होती तर हऱ्या चोरून ऐकत होता. पोरांना तो शर्टाची बटणं लावायला सांगतो हो ! वर्ग चालू असताना व्हरांड्यात जरासुद्धा फिरकू देत नाही, आणि संध्याकाळी ५ नंतर कोणीही दिसला–कोणीही हं–पोरगा किंवा पोरगी तर सरळ हाकलतो.

पु. : असं ?

क्रां. : मग ? परवा तो जगदाळे आणि ती कर्णिक–

पु. : ( खोचून ) कर्णिक ?

क्रां. : ती मंजू कर्णिक हो–

पु. : हा हा. ती निळ्या डोळ्यांची !

क्रां. : करेक्ट ! त्यांना सरळ म्हणाला की भानगड करायची तर नदीकाठी जा, आता हा आमचा अपमान नाही का–
( येवढ्यात सगळे ओरडा करत येतात )

१ : कॉम्रेड निघणार कधी हा मोर्चा ?

२ : मला बाई १२ च्या आत घरी जायचंय नाहीतर पपा ओरडतील.

१ : माझी बाई क्लासची वेळ झाली.

४ : C R नंच ४।४ वडापाव खाल्ले.

ऋां. : आयला साहेब, पोरं गेली तर वैताग ! काही तरी सांगा त्यांना.

पु. : ( थोपवीत ) अरे हो हो ! आपल्याला आता मोर्चा काढायचा ना ? यासाठी आता खलिता तयार करायला पाहिजे. चला तुमच्या मागण्या कोणत्या ? बोला पटापट मी उतरून घेतो.

१ : ( वैतागून ) त्या पत्रकात दिल्यात नं ?

पु. : पत्रक गेलं तेल लावीत. छापील पत्रकाला विचारतो कोण ? चला तुमच्या मागण्या मला डायरेक्ट सांगा.

१ : मी सांगतो. हा ज्ञानभट्टी फारच माजलाय. सारखा गुरकावतो.

२ : संस्कृत मास्तर आचार्य गलगली म्हातारा आहे, रडया आहे.

३ : नाडकर्णीबाई त्यांची लाइन आहे.

४ : देशपांडयांच्या तासाला फार गलका होतो.

५ : मानसशास्त्राची सुरेखा देसाईबाई परीक्षेच्या वेळी फार अखडूपणा करते.

२ : साला आचार्य पोरं कॉपी करत असली तरी पाद्र्यासारखा बसून राहतो.

३ : आमचा इंग्रजीचा पेपर फारच अवघड काढला होता. ( सगळे हे म्हणणे उचलून धरतात. ) गणिताच्या पेपरात तर सरांनी दिलेलं एकही IMP आलं नाही. सायन्सवाले म्हणत होते.

४ : आमची केवढी फसवणूक झाली. आम्ही नापास होणार.

ऋां. : ( ओरडून ) पेपर सोपे काढलेच पाहिजेत.

सगळे : 'आमच्या मागण्या मान्य करा' 'प्राचार्य ज्ञानभट्टी मुडदाबाद'
'ज्ञानभट्टी ज्ञानभट्टी– लावा आता हातभट्टी.'
'ज्ञानभट्टी तेवढा– हातभट्टी वेडा' ( या तालावर मुले झिंगतात. )

चड्डपी : ( धावत येत ) आमदारसाहेब, तुमच्या नावानं पोरं येतात. वडा-पाव खाऊन जातात. आख्खा माल खल्लास. तेल खलास. बेसनच नाही तर वडे कुठून तळणार ? आता पोरं ऐकतच नाहीत. माझं

म. ग्रं. सं. ठाणे. ग्रन्थालय शाखा.
ग्रा. क्र. २८८८८ नो. ता. २८।२।८९

हॉटेल ( रडत ) सगळी क्रोकरी पोरांनी फोडली...९. जागेवर नाही.

पु. : ( वैतागून ) स्साले, पायिलंत–जरा लक्ष दिलं नाही की ... ...चल रे.

उ. : पण माझं नुकसान....

पु. : देऊ रे, निराधार योजनेतून तुला काही–कॉमरेड, तू घोषणा चालू ठेव. पोरांना गुंतव. मी तिकडे बघतो.

## प्रवेश–बदल

( उजव्या बाजूला प्राचार्य ज्ञानभट्टीची केबिन. केबिनमधल्या खिडकीतून पाहिले की मोर्चाचे दृश्य दिसते. आतमध्ये मिटींग चाललीय. )

प्रा. : काय, एकूण परिस्थिती काय आहे ? ( कोणीच काही बोलत नाही. दुसऱ्यांचे अंदाज घेत रहातात. देशपांड्यांकडे नजर टाकीत प्राचार्य गलगलींना– ) काय आचार्य ?

आ. : कठिणम् ! अतिकठिणम् ! महत्कठिणम् !

नाड. : कठीण काय ?

आ. : कठीण स्थिती–

प्रा.देश. : आचार्य, स्थिती कठीण आहे खरी.

प्रा. : But what's exact difficult position ? I want the details.

आ. : ( गडबडून ) म्हणजे काय त्याचं की– समस्त प्राध्यापकांच्या दृष्टिकोनातून पाहू गेले असता त्यात कठीण काही नाही. परंतु विद्यार्थिवृंदाकडे प्रगतीच्या दृष्टिकोनातून पाहू गेले असता त्यांचे भवितव्य केवल कठिणतम वाटते.

प्रा. : What do you mean !

प्रा. सुरेखा : मी सांगू का सर ? मुलांना काहीतरी निमित्त पाहिजे होतं ते त्यांनी मिळवलं न् संप पुकारला.

प्रा. : Yes, Mr. Deshpande is it so ?

चाचरत ) न-नाहीतर काय ! काहीतरी निमित्त.....
निमित्त ?– कोणी काढून दिले ? ( शांतता ) मी विचारतो त्यांना
२ निमित्त काढून दिले कोणी ? त्यांना काय अक्कल आहे ? शुद्ध
उडाणटप्पूपणा कसा करावा याबाबत देखील ही पोरं अडाणी ! –
यांना... चिथावणी कोणी दिली ? भडकवलं कुणी ? - आणि मुख्य
म्हणजे या पाठीमागे आहे कोण ?

आ. : ( गुळमुळीतपणे ) तसे पाहू गेले असता–

प्रा. : फालतू बडबड नकोय आचार्य. I want the discussion to the point. बोला– पोरांना भडकवल्याशिवाय पोरं भडकली नाहीत.

कु. देसाई : पण सर त्यांच्या मागण्या आहेत असं ते म्हणतात.

प्रा. : ( भडकून ) Who says so ? कोण म्हणतं ? कोणाच्या मागण्या ? पोरांच्या ? त्यांना काय कमी आहे ?, आज सात बिल्डिंग्ज, तीन फॅकल्टीज, चार लॅबोरेटरीज, then, a library is there; there are so many facilities .... या सगळ्याचा फायदा घेतात ते ? नाही त्याच्याबद्दल ओरडा आणि आहे त्याच्याकडे दुर्लक्ष ! इतका धुमाकूळ चालतो कॉलेजमध्ये– आम्ही त्याबद्दल कोणाला जाब विचारत नाही की कोणाला शिक्षा करीत नाही. मग पाहिजे काय त्यांना ? काय नाडकर्णीबाई ! तुमचं म्हणणं काय आहे ?

नाड. : ( आचार्यांकडे तिरकस कटाक्ष टाकत ) आचार्यांसारखी सीनियर माणसंच याबाबतीत अधिकारवाणीने बोलू शकतील.

आ. : अधिकारवाणीने बोलण्याइतका मी सीनिअर आहे तर–

नाड. : इश्श, तसं म्हटलं का मी ?

आ. : सिनिऑरिटीचा विचार केला असता उत्तराचे उत्तरदायित्व प्राध्यापक देशपांडे यांजवर येते.

प्रा. : Yes Deshpande, I want you to start ! Come on !

देश. : ( चाचरत ) मागण्या पोरांच्या– बाबावत मी काय सांगणार ?

प्रा. : त्यांच्या कशाला– तुमच्या मागण्यांबाबत बोला–

देश. : म् मी नाही समजलो.

प्रा. : तुमची सिनिऑरिटी–

देश. : त्याचं काय ?

प्रा. : ( स्पष्टपणे ) स्पष्टच सांगू होय ? तुमची सिनिऑरिटी मॅनेजमेंटने डावलली त्याबाबत न्याय मिळावा ही पोरांची मागणी आहे.

देश. : ( थरथरत ) पण मी नाही....मी मॅनेजमेंटच्या विरुद्ध नाही. तुम्ही जेव्हा प्रिन्सिपॉल झालात तेव्हा मी क्लेम केला होता; पण तुमची नेमणूक झाली तेव्हाच प्रश्न संपला.........

प्रा. : संपला कसला ? पोरांच्या पत्रकातून हा प्रश्न तुम्हीच आता उपस्थित केला आहे.

देश. : नाही. मला काहीच माहीत नाही.

प्रा. : Please, stop that nonsense, genteleman. ते विद्यार्थ्यांचं पत्रक दाखवू काय तुम्हाला ?

कु. देसाई : अय्या बघू ? बघू मी म्हणते ते तेच का ते–

देश. : मी 'नाही' म्हटलेलंच आहे; पण दाखवाच हे पत्र. होऊन जाऊ द्या सोक्षमोक्ष !

प्रा. : ठीक आहे. मिस देसाई या पत्रकातली क्रमांक तीनची मागणी वाचा.

कु. देसाई : मागणी क्र. ३. प्राचार्य ज्ञानभट्टी यांनी प्रा. देशपांडे यांची सिनिऑरिटी डावलून चमचेगिरी करून प्राचार्यपदावर स्वतःला अभिषेक करून घेतला. यामुळे प्रा. देशपांडे यांच्यावर घोर अन्याय झाला. म्हणून प्राचार्य ज्ञानभट्टीना हाकला आणि प्रा. देशपांडे यांची प्राचार्य म्हणून नेमणूक करा. ( देसाईबाई थबकत थबकत शब्द बदलून वाचते पण प्राचार्य तिला जसेच्या तसे वाचायला सांगतात. ) मागणी क्र. ४.: विद्यार्थ्यांचे सर्वांत लाडके प्राध्यापक जामहट्टी...

प्रा. : ( चमकून ) बस बस ! त्याबद्दल नंतर.

नाड. : काय ग बाई तरी एकएक ! असं लिहवतं तरी कसं म्हणते मी !

आ. : ( खाजगी आवाजात एकीकडे ) विद्यार्थीजन कोणाच्या तरी भक्कम पाठिंब्यावर बोलत आहे.

प्रा. : काय म्हणालात आचार्य ?

आ. : कुठं काय ? ( देशपांडयांची नजर टाळतात. )

प्रा. : नाडकर्णीबाईंच्या कानाशी कुजबुजलात की !

नाड. : नाही ते म्हणाले की पोरांना कोणाचा तरी पाठिंबा दिसतोय–

प्रा. : करेक्ट ! भक्कम पाठिंबा ! Yes Mr. Dashpande, can you deny this ?– Printed matter–a solid proof.

देश. : ( गयावया करत ) खरंच सांगतो हो. माझी ही मागणी नाही. मी प्राचार्य व्हावं ही माझी इच्छा नाही आणि तुम्हाला काढावं ही तर बिलकूल नाही.

प्रा. : Thanks ! Then if such is the case, give me your statement in writing !

देश. : हो हो देतो ( लगेच लिहू लागतात )

प्रा. : ( रिलॅक्स होत सिगारेट पेटवतात ) Well मिसेस नीला नाडकर्णी, जरा खिडकीतून पडदा सारून बघा बरं बाहेर. [ ती तसं करते तोच घोषणा ' नाडकर्णीबाई बाहेर या ' नाडकर्णीबाई बाहेर या ' नाडकर्णी मॅडम मुर्दाबाद '. मग आचार्य सावधगिरीने बघू लागतात. बाहेर घोषणा–

' प्रा. जामहट्टी जिंदाबाद ' ' जामहट्टी बाहेर या ' ]

आ. : ( आश्चर्याने ) साहेब बाहेर बघा, बघा केवळ अघटित.

प्रा. : ( धूर सोडत ) घोषणा ऐकतोय. चालू दे.

आ. : अहो, केवलम् अनुचितम् ! प्रा. जामहट्टी विद्यार्थिवृंदासमोर ?

प्रा. : What nonsense ! ( उठतात आणि बाहेर बघतात. प्रा. देशपांडे यांचे लिहिणे संपले आहे. ते Statement Sir म्हणत कागद पुढे करतात. थँक्स म्हणून प्राचार्य स्टेटमेंट स्वीकारतात. नंतर सगळे बाहेर बघतात. )

## प्रवेश–बदल

( मोर्चा. जामहट्टी बाहेर घोषणांच्या गजरात जातो. मुलं त्याला गराडा घालतात. पुन्हा ' आमच्या मागण्या मान्य करा.' गजर )

आ. : अरे हो हो.सरांना आपण विश्रांती देऊ. आपलं म्हणणं त्यांच्यापुढं

मांडू. थोडं लांब व्हा रे जरा. आम्हाला बोलू द्या (जामहट्टीला एका बाजूला घेतो. बरोबर क्रांतिवादी) का थम्स अप – कोला मागवू ?

**जामहट्टी** : ते नंतर, पण हे बघा मी डरत नाही, भीत नाही. अगोदरच सांगतो. पण पूर्वी आपलं काय ठरलं होतं ! मी तयारी सगळी करून देईन, मोर्चा तुम्ही संभाळायचा. पण सकाळपासून पहावं तर तुमची चार बोलावणी !

**क्रां.** : पण सर गेल्या दोन तासांत तिकडं काय झालं त्याची जरादेखील बातमी नाही.

**आ.** : असं आहे सर, की राजकारणात पुढचा अंदाज आल्याखेरीज खेळी खेळायची नसते. शिक्षणक्षेत्राचं आपलं निराळं आहे. पण जाऊ दे. केबीनमध्ये काय खलबतं चाललीत ? बोला लवकर.

**जाम.** : देशपांडे फुटला.

**आ.** : काय ?

**जाम.** : त्यानं एव्हाना स्टेटमेंट देखील लिहून दिलं असेल.

**आ.** : हे काय हो ? आपल्या पक्षाचेच मोहरे असे फिरू लागले तर व्हायचं कसं ?

**जाम.** : (निश्चयी स्वरात) बरं ! म्हणून मी मुद्दाम त्यांना हादरा देण्या-साठीच इकडं आलोय. तुम्ही आता वेळ घालवू नका. कुठल्याही परिस्थितीत त्याला खाली खेचा.

**क्रां.** : कोणाला ?

**जाम.** : ज्ञानभट्टीला. 'मोर्चाला सामोरं या' असा आग्रह धरा. तो आला की हाणा. दाखवा हिसंका. बस ! मागण्या गेल्या तेल लावीत.

**क्रां.** : पण सर, तुम्ही इथं आलात हे ते बघून पहातायत.

**जाम.** : (घाईने) आता पोरांना बोलवा. मी काही जरी उलटंसुलटं बोललो तरी अगोदर सांगितलेलं करा. ज्ञानभट्टी उडाला की मॅनेजमेंट आप-ल्याच हातात ! तुम्हाला अध्यक्ष करतो.

**आ.** : ठीक, ठीक (हॅंड माइकवर) हॅलो हॅलो वन टू थ्री...हे पहा विद्यार्थी बंधू-भगिनींनो, आम्ही आत्ताच आपल्या मागण्यांबद्दल

सविस्तर चर्चा केलीय. अध्यापक जामहट्टींना मी अशी विनंती करतो की त्यांनी आपल्याला मार्गदर्शनपर चार शब्द सांगावेत.
( प्रचंड गिल्ला. घोषणा 'आमच्या मागण्या.......' )

## प्रवेश बदल

( केबिन )

प्रा. : ( सिगरेट टाचेखाली चुरडत ) इथपर्यंत मजल !

कु. देसाई : सर इतके दिवस मी बोलले नाही. पण सांगतेच आता. अहो हा संपाचा कट फार दिवसांपासून शिजतोय. मला संशय होताच.

प्रा. : ( सार्थ नजरेने पहात ) Yes ?

कु. दे. : त्यांना इथे समक्ष बोलवा. मीच त्यांना जाब विचारते.

प्रा. : Yes, Mr.Deshpande, what is your opinion ?

दे. : ( बावरून ) मी...मी लिहूनच दिलंय ना.

प्रा. : प्रश्न तो नाही. जामहट्टीला इथं समक्ष बोलावण्याबद्दल तुमचं काय मत आहे ?

नाड. : नाही बोलवाच. मेला भर वर्गात माझी अब्रू काढत असतो.

प्रा. : Yes Mr. Deshpande ?

देश. : आपण कराल त्याला माझी मान्यता आहे.

प्रा. : आचार्य.

आ. : आपण नेते. आम्ही पामर अनुयायी.

प्रा. : O. K. Thanks ! मग तुम्ही जरावेळ स्टाफरूममधे थांबता का ? मिस देसाई-( प्राचार्य रिंग फिरवू लागतात. फोनवरून बोलतात. मग देसाईलाच बसा म्हणून खुणावतात. त्यांच्या हातवाऱ्यावरून काही तरी बेत शिजतोय हा बोध व्हावा. त्याचवेळी बाहेर- )

## प्रवेश-बदल

मोर्चा. गलका

जाम. : ( हँडमाइकवर ) प्रिय मित्रमैत्रिणींनो ( गलका ) मोर्चाला सामोरं जाणारा मी वीरपुरुष आहे. ( जिंदाबाद जिंदाबाद जामहट्टी

जिंदाबाद ) एखाद्या भित्र्या भागुबाईप्रमाणे शेपूट आत घालून ( हशा ) घरात बसण्यात काय अर्थ आहे ? आमदारसाहेबांचा निरोप आला, म्हणजे मुलांसमोर या, मी लगेच आलो ( टाळ्या ) म्हटलं काय व्हायचं ते होऊ दे. आमदारसाहेबांनी मला तुमच्या मागण्या सांगितल्या. पण मी काय करणार ? ( खिशातून मुद्दाम हात काढत ) माझ्या हातात काही नाही. ( हशा ) खरेच सांगतो की तुमच्या मनात आहे ते माझ्या हातात नाही. ( प्रचंड हशा ) ते वरती बसले आहेत. त्यांच्या हातात सगळं आहे. तुम्ही जा. तुमच्या मागण्या त्यांच्यासमोर मांडा ( पॉझ घेऊन ) माझा अनुभव म्हणून मी तुम्हाला सांगतो की प्राचार्य ज्ञानभट्टी हे न्यायी आहेत. तुम्हाला न्याय देण्यासाठी ते जिवाचं रान करतील याची मी खात्री देतो. संप आणि मोर्चा मला मुळीच आवडत नाहीत. जी परिस्थिती निर्माण झालीय ती लवकरच मिटेल अशी आशा मी व्यक्त करतो. बाय बाय.

## प्रवेश-बदल

केबिन. प्राचार्य व कु. सुरेखा देसाई.

**प्रा.** : उलटा पवित्रा ! O. K. मी सगळ्यांना बोलावतोय. बोलण्याचा जरा अंदाज घ्या, ( प्राचार्य बाहेर जातात. एक एकजण भराभर आतमधे येतात. )

**नाड.** : काहो, कुठे गेले ?

**देसाई** : कोण जाणे बाई. बसून रहा म्हणाले.

**आ.** : ( मोकळेपणानं ) काय देशपांडे प्राध्यापकमहाशय, कसं काय वाटलं भाषणम् !

**देश.** : ( नक्कल करीत ) केवलम् अनुचितम् ( हशा )

**नाड.** : पण का हो आचार्य, खरोखरच त्यांचा संपाला विरोध आहे काय ?

**आ.** : शांतम् पापम्.

**देसाई** : आचार्य, अगदी वेड घेऊन पेडगावला जाऊ नका. तुम्हाला माहितीय काय आहे ते. ही माणसं म्हणजे शिक्षणक्षेत्रातली कीड आहे

कीड ( हे बोलणे चालू असतानाच जामदग्नी हसत हसत प्रवेश करतात. तेवढ्यात वरमून पण आपला आब जाऊ नये म्हणून– ) हो, माझं आपलं स्पष्ट मत आहे.

**जाम.** : ( हसतच, जॉली मूड ) फुकट ताप ! फुकट ताप !– काय आचार्य !

**आ.** : तापम् तापम् तापम् च……

**जाम.** : आपल्या डोक्याला नाही. दुसऱ्याच्या हो ! फुकट ! काय देशपांडे बोलत नाही तुम्ही !

**देश.** : ताप करून घेण्यावर आहे.

**जाम.** : अरे झालंय काय तुम्हा मंडळींना ! का आपलं प्रिन्सिपॉलच्या केबिनमध्ये असलं की गंभीर व्हायलाच पाहिजे ? अं ( हसतो ) आचार्य, ( नाडकर्णीबाईकडे पहात ) सुदृढ माणसं म्हणे गदगदून हसतात !

**नाड.** : ( लटक्या रोषानं ) हसायला काय झालं ?

**जाम.** : अरे, अरे रुसल्या वाटतं ! रुसणाऱ्या बायकांवर फिदा होऊन कितीतरी संस्कृत कवींनी काव्य केलंय नाही–काय कुमारी सुरेखा देसाई !

**देसाई** : ( तोंड फिरवत तीव्र स्वरात ) मला पांचटपणा आवडत नाही.

**जाम.** : पांचटपणा ! ( खेळकरपणं ) हा कर। अर ता बुवा !

**देसाई** : अजूनही माहीत झाला नाही ! तरी बरं एकदा धडा मिळालाय.

**जाम.** : कोणाला ? पांचटपणाला ? ( हसण्याचा प्रयत्न करतात. बाकी सारे चपापतात. )

**देसाई** : ( कीव करीत ) काय फालतू विनोद करून हसताय !– वर्गात पांचटपणा केल्याबद्दल धडा मिळाला तो विसरला वाटतं ! रोहिणीनं खरोखरीच तुमची लेक्चरबाजी टेप केली असती म्हणजे चांगलीच फजिती झाली असती.

**जाम.** : फजिती ? कसली फजिती ? सुरेखाबाई भलतंच बडबडू नका.

**देसाई** : रोहिणीनं मला सगळं सांगितलं. तुम्ही वर्गात काय गप्पा मारता, कॉलिजच्या मॅनेजमेंटविषयी कसं भलभलतं बडबडता….

**जाम.** : शट् अप ! ही माझी बदनामी आहे. तुम्ही बोलताय ते तुम्हाला सिद्ध करावं लागेल.

**देसाई** : अहो तिनं टेप केलं असेल–नसेल, तुमच्या वर्गाच्या गच्चीतून मी

तुमचे सगळे उद्योग पाहिलेत, ऐकलेत.

**जाम.** : काय ! काय पाहिलंत ! काय ऐकलंत ! जगाला कळू द्या की.

**देसाई** : जरूर ! प्राध्यापक जामहट्टी, तुमचा त्या दिवशी स्पेशल मराठीचा पहिलाच तास होता...

## प्रवेश बदल

वर्ग : ७।८ मुलंमुली : वेल होते.

**जाम.** : ( घाईघाईने उशीरा येत ) हं चला, घ्या पुस्तकावर खुणा करून. पाने १५ ते २० लक्ष्मणरावांची कॅरॅक्टर !

**१** : अय्या, सर, TY चा तास आहे, SY चा नाही.

**जाम.** : सॉरी हं ! ( पुस्तक मिटून टेबलावर ठेवीत ) हे असं होतं. इतकी कामं असतात... काल, आता रात्री चारपर्यंत तालीम होती. गार्गीला पोहोचवून आलो.

**२** : गार्गी ऽऽ? ई ग बाई काय नाव ?- पण सर गार्गी कोण ?

**जाम.** : आमच्या नाटकाची हिरॉईन. 'पुरुष लागले बायकांच्या मागे' हे नवीनच नाटक लिहिलंय ना मी !

**१** : अय्या, खरंच !

**CR** : सर हे तुमचं तिसरं नाटक ना ?

**जाम.** : सहावं ! पहिली ३ पडली. -खरं म्हणजे एकच पडलं पण बाकीची दोन पाडली हरामखोरांनी-( रोहिणी पंडित गंभीर. ती केव्हाच वही उघडून आणि पेन सरसावून बसलीय. तिला हे विषयांतर आवडत नाही. )

**रो.** : ( मध्येच ) माधव ज्युलियनांचं चरित्र आज सुरू करणार आहात ना ?

**जाम.** : ( तिच्या बोलण्याची मुद्दाम दखल घेत ) हे बघा. रोहिणी खरी विद्यार्थिनी. फालतू गप्पा तिला आवडत नाहीत. अभ्यास तर सुरू करायला पाहिजे. पण खरं सांगू का, ही अभ्यासाची बंधनं मला नाही आवडत ! अमेरिकेत कसं ?

**१** : अय्या सर, अमेरिकेला तुम्ही पुन्हा गेला होता ?

**CR** : सर, अमेरिकन लोकांना तुम्ही मराठी कोणत्या भाषेत शिकवलं ?

जाम. : ( खूष होत ) विषयांतर होईल मी अमेरिकेवर बोलली तर. आता मराठीचा प्रोफेसर असून देखील चार वेळा मला अमेरिकेतून बोलावणं आलं म्हणून सोसायटीचे क्षुद्र लोक माझ्यावर जळतात – पण अमेरिकेत खरा अभ्यास ! वर्गात अशी दहा-वीस मुलं मोकळेपणाने बसली आहेत....

२ : मोकळेपणानं ?

जाम. : तर ? – अगदी भेदभाव नाहीच ! विनोद झाला वर्गात की एखादा मुलगा मुलीच्या हातावर टाळी देईल.

२ : अय्याऽ

१ : इश्श ! काहीतरीच बाई.

जाम. : अय्या इश्य काय ? एखाद्या मुलीचं उत्तर प्राध्यापकाला आवडलं तर तो तिच्या गालावर टिचकी पण मारतो.

रो. : ( कठोरपणे त्रासिक मुद्रेने ) पुस्तक सुरू करताय ना ?

जाम. : हो ( घाईघाईने ) आता अभ्यास ( पुस्तक हातात घेत आणि आवाज बदलून ) माधव ज्यूलियन. एका कवीचं अत्यंत रोमँटिक चरित्र. वरदा नायडू ह्या पोरीवर प्रेम करता करता –

CR. : कोणावर प्रेम करता करता –

जाम. : मधे मधे प्रश्न विचारू नका हो: माझी तर लिंक तुटते... तर यांनी आध्यात्मिक उपाशी प्रेम सुरू केले. रविकिरण मंडळातले हे रवि– अत्रे म्हणत की, माधव ज्यूलियन हेच रवि– बाकी किरणं– तर ह्या रवीनच मराठी काव्य घुसळले.

रो. : ( उभी राहून मधेच ) त्या अर्थानेच ज्युलियनांना रवि म्हणतात ?

जाम. : हे पहा, मधेमधे बोलू नका. माझी लिंक तुटते. आता माधव ज्युलियनांच्या रवीचं एक झालं.

रो. ( पुन्हा ) रविकिरण मंडळातली बाकीची किरणं कोणती ?

जाम. : ( ‘ विचारू नका ’ या अर्थाने क्षणभर थांबतो. पुढे– ) पण माधव ज्युलियन हे कवी होते एवढंच त्यांचं वैशिष्ट्य नव्हतं. ते फार मोठे होते. पण सोसायटीमध्ये त्यांना कोणी मोठं मानेना. शिक्षणक्षेत्रात हे असंच असतं. मॅनेजिंग बोर्डाला वाटतं आपणच मोठे ! पण आप-

ल्यात कोणी मोठा आहे हे त्यांना सहनच होत नाही. त्यांच्यावर हे भिकारडे जळतात. मी केवळ आपल्याच सोसायटीचं सांगतो असं नाही. आपल्या मॅनेजिंग बॉडीविषयीं बोललं तर खूप बोलता येईल.

**रो.** : विषयांतर होतंय हे सर. मी रविकिरण मंडळातली बाकीची किरणं विचारली होती.

**जाम.** : ( एकदम भडकून ) मधेमधे प्रश्न विचारू नका म्हणून सांगितलं ना. मी ? अगोदर तास कमी. त्यात ५–५ पुस्तकं आणि तशात तुमचे प्रश्न !

**रो.** : तुम्हीच संदर्भ दिलात म्हणून स्पष्टीकरण विचारलं. प्रश्न विचारणे हा गुन्हा आहे काय ?

**जाम.** : ( ओरडून ) असल्या प्रश्नांची उत्तरं द्यायला वेळ नाही.

**रो.** : मग गप्पा मारायला वेळ आहे काय ?

**जाम.** : गप्पा कोण मारतो ?

**रो.** : गप्पा नाही तर काय ? इतक्यातल्या इतक्यात तुम्ही नाटकावर गप्पा मारल्यात, अमेरिकापुराण सुरू केलेत. कॉलेजच्या राजकारणावर तर घसरलातच नेहमीप्रमाणे.

**जाम.** : हे जगाचं ज्ञान आहे.

**रो.** : ते आम्ही घरी घेऊ. इथं तुम्ही पुस्तक शिकवा.

**जाम.** : मी काय शिकवावं हे मला तू कोण सांगणार ग ?

**रो.** : अगंतुगं करू नका.

**जाम.** : एवढीशी तर पोरगी...

**रो.** : शटप् सर ! तुमचं बोलणं मी टेप करून घेतेय, लक्षात ठेवा. यातला शब्दन् शब्द मी पेपरात जाहीर करीन.

**जाम.** : ( चमकून ) टेप ? कुठाय ?

**रो.** : हा काय बाकाखाली ठेवलाय ! टेपरेकॉर्डर !

**जाम.** : ( जागा सोडून तिच्या बाकापाशी येतात. टेपरेकॉर्डर पाहतात. त्यात टेप नसते. ) यातली टेप कुठाय ! ( रोहिणी छद्मीपणे हसते ) तावड-तोब टेप माझ्या हवाली कर.

**रो.** : शक्य नाही. ( जामहट्टी तिच्या पर्सला हात लावतात ) सर, तुम्ही

माझ्या पर्सला हात लावू शकत नाही. मी विनयभंगाची फिर्याद ठोकीन.

('कोण काय करतंय ते बघू' असं म्हणत जामहट्टी तिची पर्स बळेच तपासतात. मुलींना देखील 'बघा गं तिनं टेप कुठं लपवून ठेवलीय का ते' म्हणून झडती घ्यायला सांगतात. मग स्वतः ते पुढे येऊ लागतात.)

**रो.** : तुम्ही पुढं येऊ नका. नुसतं टेप करून घेतेय म्हटलं तर येवढं घाबरलात ना! (हसते)

## (प्रवेश बदल) केबिन

**देसाई** : तुम्हाला तिची झडती घ्यायचा काय अधिकार होता?

**जाम.** : कसली झडती? कोणी घेतली? सगळं खोटं.

**देसाई** : सगळं खोटं? मग खरं काय? तुम्ही म्हणता ते? कोण विश्वास ठेवील? रोहिणी पंडित म्हणते तेच खरं. वर्गात कॉलेजच्या भानगडी सांगून तुम्ही पोरांना भडकवलंत, तिची झडती घेतली.

**जाम.** : हे पहा, आरडाओरडा करून आपलं तेच खरं करण्यात अर्थ नाही. आणि तुम्ही म्हणताय याला पुरावा काय?

**दे.** : पुरावा कशाला हवा? मी म्हणते हाच पुरावा. (प्राचार्य ज्ञानभट्टी येतात.)

**प्रा.** : (प्रवेशून, खुर्चीवर बसत) So, you have come अं! Sit down please.

**जाम.** : साहेब, बसण्यापूर्वी माझ्यावर इथं अन्याय होतोय त्याची तड लागली पाहिजे.

**प्रा.** : कसला अन्याय?

**दे.** : (तिरसटपणाने) अन्याय कसला आलाय? करूनसवरून वर ब्रह्मचर्याचा आव आणतात!

**जाम.** : (दुर्लक्ष करीत) रोहिणी पंडित हिची मी झडती घेतली असा ह्या बाईंनी धडधडीत आरोप केलाय.

**प्रा.** : त्याबद्दल आपण नंतर बोलू. पहिल्याप्रथम मी ज्यासाठी इथं बोलावलं

त्या परिस्थितीचा आधी विचार करू. मुलांनी कसलाही विधिनिषेध न बाळगता संप केलाय. मोर्चाची हालचाल सुरू आहे. समोरचं हॉटेल त्यांनी लुटलंय.

जा. : मी सांगतो, परिस्थिती निवळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे मोर्चाला सामोरं जाणं ! मोर्चा, मग तो कोणताही असो, सामोरं जाणं हाच एक पुरुषार्थ आहे. मी नाही का... पोरांनी माझ्या नावानं घोषणा दिल्या. मी तात्काळ मोर्चाला सामोरं गेलो. यामुळे निम्मे प्रश्न सुटतात. काय नाडकर्णीबाई, मी म्हणतो ते .. ....

प्रा. : मि. जामहट्टी, आता तुम्ही कॉलेजच्या नोकरीत आहात.

जा. : निश्चितच ! यात काही शंका आहे काय ?

प्रा. : मग ड्यूटीच्या वेळात प्रिमायसेस सोडून मोर्चासमोर भाषण ठोकण्याचे उद्योग तुम्ही का केलेत ?

जा. : का केलेत याचा अर्थ काय ? कॉलेजचा मी एक घटक आहे. कॉलेज बंद पडलेलं आहे. ते सुरू करण्याचा प्रयत्न करणं हे माझे कर्तव्य आहे. परिस्थितीची तड लावलीच पाहिजे. मी तिथं जाऊन सांगितलं की, काय तुमच्या मागण्या असतील त्या प्रिन्सिपॉलपुढे जाऊन सादर करा. ते तुम्हाला न्याय देतील. आता तेही इकडे येत नाहीत, आणि तुम्हीही कोणी तिकडं जात नाही. मी सांगतो, तुम्ही तिकडं चला. एरवी कोंडी फुटायची कशी ?

प्रा. : ( उपरोधिकपणे ) कोंडी फुटायची कशी ? याच काळजीत आम्ही आहोत, पण ( खोचकपणे ) तुम्हाला हा प्रश्न पडण्याचं काहीच कारण नाही.

जा. : का ?

प्रा. : का ? छान् ! कॉलेज बंद पाडण्याचे उद्योग तुम्ही करायचे. चालू करण्याचे प्रयत्न करणे कर्तव्य मानायचे, तेही तुम्हीच ! छान आहे.

जा. : ( उसळून ) म्हणजे कॉलेज मी बंद पाडलं असं म्हणायचं काय तुम्हाला ?

प्रा. : ( पत्रक दाखवीत ) हे पत्रक.

जा. : कसलं पत्रक ? कोणतं पत्रक ! ( पहात ) हं, हे पत्रक होय ? उल्लू

पोरांनी तयार केलेलं दिसतंय. माझा त्यात काय संबंध ?

प्रा. : विद्यार्थ्यांचे लाडके नेते प्राध्यापक जामदग्नी ह्यांच्यावर झालेला अन्याय दूर करा ही पोरांची मागणी आहे. पोरं तुमच्यावरील अन्यायाबद्दल मागणी कशी करू शकतात ?

जा. : ते मी काय सांगणार ? माझा या संपात संबंध नाही. काहीचाही नाही.

देसाई : मी सांगते सर, आहे. यांचा संपाशी निकटचा संबंध आहे.

जा. : कशावरून ?

देसाई : कशावरून काय कशावरून ? मघा रोहिणी पंडितच्या प्रकरणावरून ते दिसून आलंच की ! सर, कॉलेजमध्ये हे शिकविण्याऐवजी मॅनेजिंग बॉडीबद्दल बडबडत असतात.

जा. : खोटं आहे.

प्रा. : खोटं आहे तुम्ही नेहमीच म्हणता; पण तीच तीच तक्रार लोकं सारखी कशी वरं करतात ? तुमच्याबद्दलची तक्रार येण्याची ही तिसरी वेळ.

देसाई : त्या दिवशी रोहिणी पंडित सांगत होती की, माधव ज्युलियनांच्या चरित्रावरून सोसायटीतले लोक किती भिकारडे आहेत हे सांगत होते.

जा. : मी भिकारडे म्हणालो नाही.

देसाई : भिकारडे हा शब्द तुमचा आहे. मी साक्षीपुरावे करीन.

जा. : ( संतापून ) साहेब, या बाईंना ताबडतोब तोंड बंद करायला सांगा.

प्रा. : मिस्टर देशपांडे, पत्रकातील तुमच्या उल्लेखाचं काय ?

देश. : अं हो हो जामदग्नी, तुम्ही जं पत्रक काढलंत त्यात माझ्या नावाचा उल्लेख करायला लेखी परवानगी घेतली होती ?

जा. : अरेच्या ! हे पत्रक मी तयार केलेलं नाही हे मी मघाचपासून सांगतोय तरी तुम्ही मला का विचारताय हे मला कळत नाही.

देसाई : पत्रक तुम्हीच तयार केलंत. तुम्ही नाही म्हणालात म्हणजे ते थोडंच खोटं ठरणार आहे ?

जा. : ( एकदम भडकून ) देसाईबाई, तुम्ही थोबाड सांभाळा. तुम्हाला मधे-

मधे बोलण्याचं काय कारण आहे ? हे प्रिन्सिपॉलचं केबिन आहे. ते आणि मी पाहून घेईन.

**प्रा.** : जामहट्टी, आवाज वाढवण्याचं कारण नाही.

**देसाई** : आणि मी तरी गप्प का राहू ? एका मुलीची चारचौघादेखत हे झडती घेतात आणि मी गप्प का राहू ?

**जा.** : ती एक चवचाल पोरगी आणि तुम्ही–

**प्रा.** : शटप् मि. जामहट्टी ! भलत्याच थराला जाऊ नका. त्यांनी कशाला म्हणायला हवं ? मीच म्हणतो : तुम्ही पोरीची झडती घेतलीत आणि त्या पोरीनं अर्ज मागे घेतला म्हणून तुम्ही वाचलात.

**जा.** : मी तर म्हणतो की त्या प्रकरणात माझी काहीच चूक नव्हती म्हणून तिनं अर्ज मागे घेतला.

**प्रा.** : ( चिडून ) What you talk nonsense ! Let me tell you what you did.

## प्रवेश–बदल

केबिन : प्रा. ज्ञानभट्टी कामात.

**प्रा.** : ( घंटी वाजवत ) अरे कोण आहे बाहेर–त्यांना पाठवून दे बरं !— ( रोहिणी व भगवानराव पंडित आतमधे येतात ) अरे या या या, welcome ! welcome ! तुम्ही आमचं फार मोठं काम केलंत. तो अर्ज दिलात आणि सारं कसं सुरळीत चालू झालं !

**भग.** : ( खिन्न होत ) प्रिन्सिपॉलसाहेब, भर वर्गात माझ्या पोरीची झडती घेतली, तिच्या अंगाला हात लावला याबद्दल दाद मागण्यासाठी मी आपल्याकडं अर्ज केला होता खरा–

**प्रा.** : मग ?

**भग.** : तो अर्ज परत घ्यायला आलोय.

**रोहिणी** : ( हुंदके देत ) सर, मी तुम्हाला उपयोगी पडू शकले असते तर बरं झालं असतं—पण–

**प्रा.** : ( धक्का बसतो ) असं काय झालं अर्ज परत घ्यायला ? त्यातली परिस्थिती तर सत्य आहे ना ?

**रोहिणी** : हो सर, सत्य आहे. त्रिवार सत्य !

**भग.** : साहेब, माझी मुलगी खोटं बोललेली नाही.

**रोहिणी :** सर, त्या दिवशी नेहमीप्रमाणे कॉलेजच्या मॅनेजिंग बॉडीबद्दल आणि चमच्यांबद्दल खूप बोलता येईल असं ते म्हणाले. मी अडवलं नसतं तर ते नक्की भरकटत गेले असते, म्हणून त्यांना मी म्हटलं की तुमचं बोलणं टेप करून घेतेय.

**प्रा.** : कॉलेजबद्दल आणखी काय काय सांगितलं ?

**रोहिणी :** नेहमीचंच ! त्यात नवीन काहीच नव्हतं. पोरासोरांनीच उद्या संप केला तर कॉलेजची वाट लागेल असंही ते पूर्वी म्हणाले होतेच !

**भग** : नाही, मी विचारतो की वर्षानुवर्ष हा माणूस शिकवण्याऐवजी हे धंदे करतोय. तुम्ही चालू कसं देता ?

**प्रा.** : त्याचं असं आहे भगवानराव, आम्हांला रिपोर्ट मिळतात ते असे तोंडातोंडी किंवा निनावी पत्राने. त्याचा काय उपयोग बरं ? त्यांच्या विरुद्ध लेखी अर्ज कोणी करीत नाही. तो तुम्ही दिलात. आता आम्ही दाद मागू, ॲक्शन घेऊ. विद्यापीठातदेखील याचं शिकवणं चेक करण्यासंबंधी नियम नाहीत. अहो, याचा आम्हाला इतका त्रास होतो...नको वाटतं हे राजकारण.

**भग.** : ( उसळून ) नाही पण साहेब, तुमचं राजकारण तुम्हीच मिटवा. मी तो अर्ज परत घेण्यासाठी आलोय. माझ्यासारख्या सामान्य भिक्षुकाला तुमच्या राजकारणात माझी पोरगी नाहक बळी द्यायची नाही.

**प्रा. :** बळी ?

**रोहिणी :** हो सर, बळीच नाही तर काय ? ( रडत ) सर, काल तो नराधम बाबांना नेऊन गेला.

**भग.** : स्वतः नाही आला पण त्यांचा माणूस आला होता. एका हॉटेलमध्ये त्यांनी मला नेलं आणि सरळ सांगितलं की, मी जर अर्ज मागे घेतला नाही तर तुमच्या पोरीचे आणि जामहट्टीचे संबंध आहेत हे आम्ही जाहीर करू.

**प्रा.** : काय ? ही तंबी ?

**भग.** : यात एक अक्षरही खोटं नाही.

रो. : आणि सर त्याला मी चार वर्षं ओळखतेय. तो तसं करीलही. मेली घाणेरडी नाटकं लिहितो, नट्यांशी संबंध ठेवतो... लाज कोळून प्यायलाय !

भग. : आणि साहेब, खरंच सांगायचं तर माझ्या पोरीचं एका चांगल्या स्थळी लग्न ठरलंय. आत्ताच्या घडीला कोणतीही अफवा पिकली तरी हे लग्न फिसकटेल. माझ्यासारख्या सामान्य—

प्रा. : नाही असं कसं होईल ! आम्ही हे होऊ देणार नाही. हे लग्न फिसकटलं तर मी जमवून देईन दुसरीकडे.

रो. : पण सर माझी अब्रू जाईल. मला सर, त्या नराधमाची भीती वाटते. बाबांना तो माणूस म्हणाला की तुम्ही ऐकलं नाही तर पोरीला बाहेर फिरणं मुश्किल करीन, गुंड सोडीन आणि पोरीला नासवीन. सोडणार नाही. ( हमसाहमशी रडू लागते. )

## प्रवेश बदल

केबिन. सगळे बसले आहेत.

जाम : काय वाटेल ते काय बोलताय ? मी तुमच्याविरुद्ध बदनामीची फिर्याद ठोकीन !

प्रा. : पोरीच्या बाबतीत तुम्ही या थराला गेलात ते गेलात आणि त्या ज्ञान-भट्टीला बघून घेईन, जीवनातून उठवीन असं सगळीकडं सांगत सुट-लात. माझ्याविरुद्ध पोरांना भडकवलंत. खोटी पत्रकं तयार केलीत. बदनामी केलीत आणि आज कॉलेज बंद पाडलंत.

जाम. : ( ठामपणे ) माझा याच्यात काडीमात्र संबंध नाही.

देसाई : ( उसळून ) तुम्हीच सगळं केलंत.

प्रा. : मिस्टर देशपांडे–

देश. : हो हो आणि माझं नाव त्या पत्रकात लिहून माझी नालस्ती केलीत.

प्रा. : घ्या ! आता ठीक आहे. तुम्ही तुमच्या मार्गानं जा. आम्ही आमच्या मार्गानं जातो. विद्यार्थ्यांच्या संपाला चिथावणी दिल्याच्या कारणावरून आम्ही तुम्हाला नोकरीवरून तात्काळ हाकलतो. घ्या ऑर्डर तयारच केलीय.

( बाहेर घोषणा, आमच्या मागण्या.... )

जाम. : हे तुमचं फायनल समजू ?

प्रा. : Yes It's final.

जाम. : OK. ( तात्काळ निघून जातो ) ( घोषणा वाढतात )
( फोन वाजतो. बाहेरच्या गलक्यात आवाज ऐकू येत नाही म्हणून–)

प्रा. : हॅलो, आं, थँक्यू ...काय....मोठ्यानं बोला....जस्ट अ मिनिट हं. आचार्य जरा खिडकी बंद करा वरं. (फोनवर) हं बोला, काय अॅक्शन ना...घेतली....अरे आपला कारभार झट मंगनी पट ब्याह...मग काय ! OK. म्हणून तडकून गेला नं....आं ? नाही इतक्यात नको ....किती ५० ? अरे ३० सुद्धा चिकार झाले.... हो हा नंतर मीच फोन करतो. काय ? O yes, no delay should be thereafter.
( प्राचार्य फोन खाली ठेवतात )

देश. : साहेब, सॉलिड अॅक्शन – काय आचार्य ?

आचार्य : अतीव उचितम् –

नाड. : अॅक्शनम् ( सगळे हसतात ) बाई ग, हा इतकं करील असं वाटलं नव्हतं. पण आता बारा वाजले. घरी जायचं तरी कसं आणि कधी ?

आचार्य : इथेच माझे पंढरपुर ! ( दरम्यान आचार्य खिडकी उघडून बाहेर बघतात. )

## प्रवेश बदल

मोर्चा. जामहट्टी घोळक्यात जातो. हातातली ऑर्डर फडकावीत पोरांशी तावातावाने बोलतो. आमदार त्याला सावरतो.

आमदार : ( हॅन्डमाईकवर ) हॅलो हॅलो, शांत रहा बंधूंनो आणि भगिनींनो, आत्ता पाच मिनिटांपूर्वीच आपले लाडके प्राध्यापक जामहट्टी यांना कॉलेजातून हाकलण्याची नोटीस देण्यात आलेली आहे. ( गलका व गोंधळ तुफान वाढतो. ' शेम शेम ' प्राचार्य ' ज्ञानभट्टी मुर्दाबाद ' च्या घोषणा ) ज्ञानभट्टी माजोरी आहे. एका गरीब प्राध्यापकाच्या पोटावर पाय देताना त्याला शरम कशी वाटली नाही ? हे बंगल्यात रहाणार आणि दारिद्र्याने गांजलेल्या प्राध्यापकाला त्याच्या एकुलत्या

एक झोपडीतून देखील हाकलणार ? हे केबिनमधे आणि प्राध्यापक रस्त्यावर ? ही विषमता आम्ही चालू देणार नाही. आम्ही समाजवादाचे कंकण बांधलेले आहोत. यांनाही आम्ही खाली खेचू. ( पुन्हा घोषणा ) विद्यार्थिमित्रहो, यांना आमच्यासमोर आम्ही उभे करू. केलेल्या पाशवी कृत्याचा जाब मागू. लक्षात ठेवा ते जोपर्यंत आमच्यासमोर येत नाहीत तोपर्यंत सगळे लोक इथेच धरणे धरतील. आम्ही उपोषण करू. धरणे धरू. घेराव घालू. यांची मोटार आमच्या छातीवरून जाईल. ( ' ज्ञानभट्टी बाहेर या ' च्या घोषणा. ज्ञानभट्टीला खाली खेचा, हाणा, अशा आरोळ्या. दगडफेक होते, काचा फुटतात )

## प्रवेश-बदल

केबिन. सगळे खिडकीशी उभे आहेत. त्याच खिडकीची काच फुटते. प्राचार्य मागे सरकतात. आणखी एक दगड येतो. आचार्यांना लागतो. कपाळ फुटते. नाडकर्णीबाई ' काय ग बाई ' म्हणत त्यांना धरतात. देशपांडे सावरतात. )

**प्रा.** : आचार्यांना खोक पडली ?

**देश.** : साहेब, हे भलतंच वाढत चाललंय्.

**देसाई** : सर, यांना कसंही करून धडा शिकवाच !

**प्रा.** : OK. I will teach them a lesson ! ( फोनची रिंग फिरवू लागतात ) देशपांडे, आचार्यांना स्टाफरूममधे न्या. फर्स्ट एड आहेच ते करा. मी येतोच. ( सगळे जातात. देसाईबाई रहाते ) हॅलो हॅलो, कोण ?.... मी प्राचार्य....चेअरमन कुठेत ? ....काय बाहेर गेलेत ? आत्ताच कसं सुचलं...आं मोठ्यानं बोला....तुम्ही कोण बोलताय ? आं-उस्ताद ? बहोत खूब ! ...क्या ? चेअरमन ? उसको मार दो गोली. मुझे तुमसेही काम था....हां हां वोच....हो गया ना ?...अच्छा. कितने आदमी है ? पचास ?....अरे चलेगा चलेगा... कितना ....? अरे काम होनेके बाद चेअरमन पाचसो देगा तो हम हजार देंगे ...हां हां जल्दी !...पांच मिनिटके अंदर... OK.

( प्राचार्य फोन खाली ठेवून देसाईबाईंशी काही बोलू लागतात. तोच-

चार पाच विद्यार्थी केबिनमध्ये घुसतात )

१ : सर, वेळ होतोय आणि पोरांची गडबडही वाढलीय.

२ : पोरं भडकतील.

३ : आपण तिकडं आलात तरच पोरं शांत रहातील; नाही तर पोरं तुम्हालाच घेराव घालतील.

प्रा. : हे पहा तुमच्या मागण्या असतील तर लेखी निवेदन द्या वरं. तुमच्या पुढाऱ्यांना इथं बोलवा.

१ : पण तुम्हीच तिकडे चला अशी आमची मागणी आहे.

२ : आमच्याबरोबर चला.

प्रा. : अरे, चर्चा रस्त्यावर कशी होईल वरं ? हे पहा विद्यार्थ्यांना तुम्ही अगोदर सांगा की प्राचार्यांना जेवढ्या तुमच्या मागण्या माहीत आहेत तेवढ्या मागण्या एकूण एक मान्य ! मग तर झालं ?

४ : पण जामहट्टी सरांना काढलं त्याचं काय ?

प्रा. : त्यांनाही घेऊ की कामावर. काढलंय म्हणजे काय कायमचं काढलंय का ? तात्पुरतं ! चर्चा झाली की घेऊ लगेच ! आहे काय त्यात ! ए तुमचे पुढारी कोणकोण आहेत रे.

१ : आमदार पांडुरंग काळेले.

२ : ( १ ला झापतो ) ते नाहीत. आमचे बी.ए.चेच विद्यार्थी आहेत.

प्रा. : ठीक ठीक. त्यांनाही घेऊन या अन् माजी आमदारांना पण– ( बाहेर एकाएकी गलका वाढतो. प्रतिघोषणा ' आमदार पांडुरंग काळेले मुर्दाबाद ' ' जामहट्टीला हाकलून लावा ' ' कॉलेज सुरू झालेच पाहिजे ' आता मारामारी घोषणांचे युद्ध– आतमधली पोरं बावरतात)

प्रा. : हेच मला तुमच्या पोरांचं कळत नाही. घोषणा काय देता, मोर्चे काय काढता ? आता काय निराळ्या घोषणा ?– ( बाहेर बघत ) हां ही दुसरी युनियन. आहेत किती युनियन्स तुमच्या ? ( बाहेर गलका वाढतो. मारामारी ) अरे मारामारी ! आता दगड येतील. पोलिसला बोलावल्याशिवाय आता गत्यंतरच नाही. ( पोरं पळून जातात. प्राचार्य रिंग फिरवतात ) हॅलो, पोलिस ? मी ज्ञानभट्टी बोलतोय. हा हां ! प्राचार्य घेलाशेट उत्तमचंद महाविद्यालय.... हो.... बाहेर दंगल

उसळलीय. मारामारी....दगडफेक...हो हो घेरावच. तावडतोब मदत पाठवा.

## प्रवेश बदल

मोर्चा, सायरन – पोलिस येतात. लाठीमार.... किंकाळया.... पांगापांग होते. पोलिस सापडतील त्या ३–४ विद्यार्थ्यांना गचांडी देत पोलिस स्टेशनवर आणतात.

## प्रवेश बदल

( पोलिस स्टेशन. पोलिस ३।४ विद्यार्थ्यांना आणतात. एकाचा शर्ट फाटलेला आहे तर दुसऱ्याच्या कपाळाला खोक पडलेली आहे. )

**पो.** : साहेब टाकायचं का कोठडीत ?

**फौज.** : काय रे भडव्यांनो माज आलाय का रे ?

१ : ( थरथरत ) नाही, नाही. मी नाही, नुसता मी कॉलेजवर आलो तर सगळ्यांनो मला धरून ठेवलं.

**फौज.** : अस्सं ? आणि तू रे हरामखोरा.

२ : मी मी.... मला खोक पडलीय. मी नाही.

**फौज.** : ( बाकीच्या दोघांना ) मागण्या करल्या तुमच्या ?

३।४ : नाही मागण्या नाहीत.

**फौज.** : (दोघांच्या कानफाडीत भडकावीत) आमच्या मागण्याही नाहीत. त्या भोसडीच्या पांड्याला धंदा नाही आणि तो ज्ञानभट्टीही पत्रका हरामखोर.... आमच्या डोक्याला फुकट ताप ! (पोलिसाला) जा रे ३५७, साल्यांची नोंद करून घे आणि लाथ मारून दे हाकलून.

**पो.** : चला रे भडव्यांनो, साले संप करताहेत.

( पोलीस गचांडी देत त्यांना पुढे नेतात. नोंद घेऊ लागतात. तेवढ्यात पडदा )

• • •

# संगीत नाट्यानुभवाचा कल्पनाविलास

*

महेश वेलणकर

**पात्रे :**

सूत्रधार – वय ३०

प्रेक्षक १ – वय २५

प्रेक्षक २ – वय २५

काही लोक –

सरवटे – वय ४०

दिग्दर्शक – वय ४०

राजा – वय ४५

प्रधान – वय ४०

वेटर – वय २५

म्हातारा – वय ६०

म्हातारी – वय ५२

म्होरक्या – वय ३५

तज्ज्ञ ( एकूण सहा ) – वय सुमारे ४० ते ६०

वेळ अंदाजे ४० ते ४५ मिनिटे.

## नांदी

नमन नटवरा विस्मयकारा
आत्मविरोधी कुतुहलधरा
विवाह करूनी मदन जाळिला
मग मदनमित्र इंदु सेविला
धनवैरागी द्यूत खेळला
गौरोचा तो अंकित झाला
परमेशाच्या ऐशा लीला
कवि कृष्ण गात विस्मयकारा

**सूत्रधार** : (प्रवेशतो) ही होती मानापमानातून चोरलेली नांदी. नांदी संपता संपता पडदा उघडतो तेव्हां प्रेक्षकांना रंगमंचावर डॉ. वसंत यांच्या बंगल्यातील दिवाणखाना दिसतो. सुंदर सजविलेला, बघताक्षणीच रसिकतेची जाणीव कुणालाही व्हावी. समोर उंची सोफासेट. त्यासमोर टी पॉय, डावीकडे एक टेबल, त्यावर टेलिफोन. त्यानंतर एक दार, जे स्वयंपाकघरात उघडतं, प्रेक्षकांच्या उजव्या बाजूस एक दार जे बागेत उघडतं. (तो बोलत असतानाच दोघे प्रेक्षक समोरून रंगमंचावर चढतात) अरे, अरे इथून कोठून चढताय ? त्या समोरच्या भिंतीला दार नाही.

**दोघे** : तुला झालंय काय आज ? तू नुसता बडबडतोयस्. रंगमंचावर यंव आहे अन् त्यंव आहे. पण प्रत्यक्षात तर काहीच दिसत नाही.

**सूत्रधार** : अर्थात. प्रत्यक्षात रंगमंचावर यातलं काहीच नाही. प्रेक्षकांनी हे फक्त लक्षात ठेवायचं आहे. तर नाटक प्रायोगिक आहे हे तुम्हाला एव्हाना समजलं असेलच.

**दोघे** : नाही, नाही, आम्हाला हे समजलं नाही.

सूत्रधार : कां ? आपण तज्ज्ञ नाही काय ?

दोघे : नाही.

सूत्रधार : मग अभ्यासू ?

दोघे : नाही.

सूत्रधार : मग निदान चिकित्सक तरी ?

दोघे : नाही.

सूत्रधार : म्हणजे अगदीच रसिक दिसताय. आमची किती नाटकं पाहिलीत ?

दोघे : पाच सहा.

सूत्रधार : आमची पाच-सहा नाटकं पाहूनही तुमची रसिकता कायम आहे ? च्यायला, कमाल आहे.

दोघे : त्यात कमाल काय ?

सूत्रधार : म्हणजे एरव्ही कितीही रसिक माणूस असला तरी आमचे एखादे नाटक पहाताच त्याची रसिकता लोप पावते अन क्षणार्धात तो तज्ज्ञ बनतो.

दोघे : म्हणजे ?

सूत्रधार : सारखं म्हणजे म्हणजे विचारत राहू नका. आपले डोळे अन् कान उघडे ठेवा आणि प्रसंग अनुभवा. समजला नाही तर त्याविषयी न बोलण्याचे प्रसंगावधान ठेवा. ठीक आहे. तुम्ही गप्प उभे राहून पाहा आता काय होत्येय ते. मी माझ्या प्रेमळ धर्मपत्नीला आता हाक मारणार आहे.

पहिला : ( दुसऱ्याला ) आयला, नाटकात पोरी दिसतायत्.

दुसरा : यडा बिडा आहेस काय ? बुद्धिवादी माणसं नाटकात काम करीत नाहीत. ( सूत्रधार त्यांना गप्प करतो )

सूत्रधार : ( आता हाक मारतो ) प्रिये, तुझी केशभूषा झाली असेल तर बाहेर ये. हे सारे प्रेक्षक वग्र तुझ्या आगमनाची वाट आतुरतेने पहात आहेत, कारण त्यांना माहीत आहे की सूत्रधाराचा प्रवेश झाल्याशिवाय नाटक पुढे चालू होणार नाही. त्यांच्या करमणुकीसाठी आपण ' नाट्यानुभवाचा कल्पनाविलास ' नावाचा खेळ लावलाय.

पहिला : खेळ की खेळखंडोबा ?

**सूत्रधार :** गप रे, बारीकसारीक विनोद करीत बसू नकोस. हे बघ नाटकात करमणूक भरपूर आहे, त्यात आणखी तुझ्या विनोदाची भर नको.

**दुसरा :** काहो, तुमच्या प्रियेला केशभूषेला फार वेळ लागतो का हो ?

**सूत्रधार :** छे छे, आमच्या प्रियेचा सुरेखसा बॉबकट आहे. पण नाटकात तसे संवाद असल्याने इलाज नाही. बाकी आमची प्रिया बाहेर न येईल तर बरे होईल. कारण आमची प्रिया तशी दर्शनीय नाही. काय करणार ? आमच्यासारख्या रिकामटेकड्या नाटक्यांना चांगल्या मुली कोण देणार ? अशाच एका नाटकाच्या तालमीच्या वेळी तिची गाठ पडली अन् तंबोऱ्याला सूर गवसला. इतकं झालं अन् आम्ही एकमेकांकडे एका अननुभूत भावनेनं ओढले गेलो, अन् केव्हाच एकमेकांचे होऊन बसलो. तरीही लोक म्हणतात....( एव्हाना बरेच लोक आकर्षकरीत्या फ्रीज झालेले आहेत )

**लोक :** सटवाईला नव्हता नवरा अन् म्हसोबाला नव्हती बायको.

**सूत्रधार :** अरे, इतक्यात सर्वजण आलेसुद्धा ? चला. चला, यांची इथं मिटींग आहे. नाटकाबद्दल.

**दुसरा :** पण हे असे वाकडेतिकडे काय उभे राहिले आहेत ?

**सूत्रधार :** ते ना ? ते....ते...( विचार करतो ) काय की बुवा. कदाचित नाटकाच्या वेधकतेचा तो भाग असावा. जाऊ दे. एखादी गोष्ट समजली नाही तरी हे नाटक समजताना अडचण येणार नाही. तेव्हा कृपया नाटक चालू असताना आपसांत शंका-निरसन करत बसू नका, चला, चला. ( जातात )

**सरवटे :** विश्वनाट्य स्पर्धा. दरवर्षीप्रमाणे यदाही विश्वनाट्यस्पर्धेत आपल्या संस्थेचे नाटक पाठवावयाचे ठरले आहे. आपल्या संस्थेला कधीही बक्षीस मिळत नाही, हे खरे आहे. खरं तर आपला तो गौरवच आहे. कारण आपण कधी बक्षिसासाठी नाटक करीतच नाही. आपण नाटक करतो ते आपल्या प्रतिभेसाठी, आपल्या हौशीसाठी. आपले केवळ मनोरंजक विचार दुसऱ्याच्या गळी उतरवण्यासाठी. चावून चिवट झालेल्या एकाच प्रश्नाच्या अनेकानेक बाजू प्रेक्षकाना पटविण्यासाठी. थोडक्यात काय, तर आपण नाटक करतो ते

नाटक करण्याचा फार दिवसांचा आपला कंड जिरवण्यासाठी. तेव्हा बक्षीस आपल्याला कोण देणार आहे? नव्हे, आपणासारख्या विचारवंतांना मामुली बक्षिसाचे काय?

**तिसरा :** जाऊ द्या राव. बोअर करू नका. काय सांगायचं ते थोडक्यात सांगा.

**सरवटे :** सांगतो, सांगतो. असे उतावीळ होऊ नका. मंडळी, या विश्वनाट्य स्पर्धेत आपण नाटक करायचं.

**चार :** आपण?

**सरवटे :** हो.

**पाच :** नाटक?

**सरवटे :** हो, हो.

**सहा :** करायचं?

**सरवटे :** हो, हो, हो... आपण नाटक करायचं. ठरलंच तर मग. मी आत्ताच्या आता नाटक लिहायला घेतो. तू दिग्दर्शन कर, तू लाईट्सचं बघ अन् म्यूझिक कोण? हा आपला तू आहेसच नेहमीचा. मी प्रॉडक्शन घेईन. तू मेकअप कर. आपण सारेच जण काही ना काही काम करू या. आज काम सुरू. पुढल्या शनिवारी नाटक. दनादन् नाटक पाडायचं. आहे काय त्यात? ठीक आहे. तर आपण नाटक करायचं.

**१ ते ६ :** मी नाटक करतो, आम्ही नाटक करतो.
तू नाटक करतो, तुम्ही नाटक करता.
तो ती ते, ते त्या ती नाटक करतात.
आपण सारे नाटक करतो ( सारेजण एक फेरी मारून पुटपुटत खाली बसतात. )
( सूत्रधार अन् दोघे बाहेर येतात. सूत्रधार चित्रपटाच्या दिग्दर्शकाच्या आवेशात )

**सूत्रधार :** ओ. के. शॉट ओके. रिलॅक्स. आजचा दुसरा शॉट असा आहे, सारेजण जमले आहेत. नाट्यविभागाच्या एका मिटिंगसाठी. मिटिंगचा विषय आहे नाटकाची निवड अन पात्रयोजना वगैरे. सारे हिरवळीवर

कोंडाळे करून बसले आहेत. हिरवळीवर कुणाकुणाला डास चावताहेत वगैरे तेव्हा हा येतो, म्हणजे नाटकाचा दिग्दर्शक अन् एकेकाला प्रश्न विचारतो.

**दुसरा** : ( क्लॅप घेऊन ) शॉट नंबर टू. टेक नंबर वन्. ॲक्शन, कॅमेरा, लाईटस्, म्युझिक ( त्याप्रमाणे सारे सुरू होते ) रेडी ? ओके, स्टार्ट ( क्लॅप देतो अन् तिघे पुन्हा विंगेत जातात )

( संगीत सुरू. पाश्चात्य सुरावटीवर गाणी )

**दि.** : तुम्ही कधी नाटक लिहिलंय का ?

**सारे** : नाही, नाही.

**दिग्द.** : मग नाटकाशिवाय काही लिहिलंय का ?

**सारे** : अहं; अहं.

**दिग्द.** : नाटकात कधी काम केलंय का ?

**सारे** : छे छे.

**दिग्द.** : मग बॅकस्टेजला काही केलंय का ?

**सारे** : मुळीच नाही.

**दि.** : नाटकं कधी वाचलीत का ?

**सारे** : नो, नो.

**दि.** : ( चढत्या सुरात ) अरे मग निदान तुम्ही एखादे नाटक कधी । पाहिलं असेल, पाहिलं असेल, पाहिलं असेल.... ।।

**सारे** : नाही, नाही, नॉट ॲट ऑल. ( गाणे समाप्त )

**दि.** : बस्, बस्, बस्, सुटलो एकदाचा. माझ्या मनावरचं टेन्शन केव्हढं कमी झालं. तुमचा नाटकाशी आत्तापर्यंत काडीचाही संबंध आला नाही हे फार बरे झाले. माझ्या नाटकाला अगदी योग्य असे लोक तुम्ही मिळालात. म्हणजे आता मला पाहिजे तसं नाटक आपल्याला करता येईल. मी दिग्दर्शन करीन. आपण आत्तापर्यंत कधी झालं नसेल असं नाटक करायचं. आपलं नाटक शब्दबंबाळ असणार नाही. तेच ते पलायनवादी विचार आपण लोकांसमोर मांडणार नाही. लोकांच्या चमच्यानं भरवणार नाही. केवळ नाईलाज म्हणून आपल्या नाटकात संवाद असतील. बाकी आपण लोकांना काहीच सांगणार नाही.

आपण फक्त एक नयनरम्य कवायत सादर करायची आणि लोकांनी त्यावर विचार करायचा.

**एकजण :** म्हणजे आपण एक प्रायोगिक नाटक करायचं.

**दि.** : हे कोण बोलले, बोला ? तू का ? छान छान, अगदी योग्य बोललास. म्हणजे मी ते सांगणारच होतो, पण ओघाओघाने, जाऊदे. तुला प्रायोगिक नाटकांबद्दल काय माहिती आहे ?

**तो** : काहीही नाही. फक्त प्रेक्षकांच्या मनात गोंधळ निर्माण झाला की त्याला प्रायोगिक नाटक म्हणतात असा मला अनुभव आहे.

**दिग्द.** : नाही, नाही. म्हणजे तूही अजून अजाण आहेस तर. वत्सा, प्रायोगिक नाटकाचा प्रेक्षकांशी काहीही संबंध नाही. नाटक दिग्दर्शित करताना दिग्दर्शकाच्या मनात गोंधळ असला की त्याला प्रायोगिक नाटक म्हणतात बरे.

**दुसरा** : पण कुणाला काही येत नसताना नाटक करायचं काही नडलंय का ?

**दि.** : नडलंय का म्हणजे ? तुम्हाला तुमच्या आगळ्या कर्तृत्वाची, वेगळ्या कल्पकतेची अन निराळ्या बुद्धिमत्तेची चमक जर सर्वांना दाखवायची असेल तर नाटक हे एकच क्षेत्र योग्य आहे, समजलं ?

**तिसरा :** हां समजलं. मग केव्हा तालमी सुरू करायच्या ?

**दि.** : ते मी सांगीन लवकरच. आज रात्री बंड्यानं स्कॉच आणली की आम्ही सारे नाट्यसृष्टीचे मुकुटमणी एकत्र जमून चर्चा करणार आहोत. आपल्याच नाटकावर.

**चौथा** : का ? स्कॉच कशासाठी ?

**दि.** : हां मग ? स्कॉच नको ? आम्ही नेहमीच स्कॉचचे घुटके घेत चर्चा करतो. म्हणजे त्यात काय आहे की कुठल्याही विचारमंथनाला – विशेषतः नाटकाच्या – स्कॉच ही एक महत्त्वाची प्रेरक गोष्ट आहे. म्हणजे एकतर इतक्या रात्री ज्यांना नाटकाशिवाय इतर धंदे आहेत असे कोणीही येत नाहीत.

**पाचवा :** म्हणजे नाटक हेच ज्यांचे ध्येय, नाटक हा ज्यांचा ध्यास, नाटक हीच ज्यांची मनःस्थिती अशांचीच त्या वेळेला उपस्थिती.

**दि.** : अरे, अरे, विनोद काय करीत बसलास ? नाटक कर, विनोदाने

शब्दांचं गांभीर्य कमी होतं. 'टवाळा आवडे विनोद' माहीत नाही का तुला ?

**पाचवा :** हो, हो. रामदासस्वामींनीच सांगितलंय.

**दिग्द. :** आधीच कुणी सांगितलंय होय ? मग आपल्याला काही तरी दुसरंच वचन शोधून काढावं लागेल. तीच ती जुनी बुरसटलेली वाक्ये आपण उच्चारायची नाहीत !

**पहिला :** आम्ही विनोद करायचा नाही. आम्ही जुनी वाक्ये उच्चारायची नाहीत. मग आम्ही करावयाचं तरी काय ?

**दिग्द. :** सांगतो, सांगतो, मी आपल्यासाठी एक आचारसंहिताच बनवली आहे. आपण अष्टौप्रहर ध्यानी, मनी, स्वप्नी, लोचनी सतत नाटकावरच विचार करायचा. नाटकाला वाहून घेतल्याचं ते लक्षण आहे. तेव्हा आजपासून...

**सारे :** सदा येता जाता, उठत बसता, ग्रास गिळता, घरी दारी शय्येवरी....

**दिग्द. :** सदा नाटक करी.

**दुसरा :** म्हणजे प्रायोगिक.

**दिग्द. :** शाबास, प्रायोगिक नाटक करायचं.

**सारे :** प्रायोगिक नाटक करायचं, प्रायोगिक प्रायोगिक नाटक नाटक करायचं करायचं. ( असे वाढत वाढत जाते )

**राजा :** ( प्रवेशतो ) प्रधानजी, अवं प्रधानजी ( बऱ्याच हाका मारतो )

**प्रधान :** ( येतो ) अवं आलो आलो. एवढं वरडाया काय झालं ऑ ? राज्याची परिस्थिती कशी काय हाय हेच पायजे आसतं ना तुमास्नी ?

**राजा :** बरुबर. तुम्ही कसं काय एक्झॅक्ट वळखलं ?

**प्रधान :** त्यात काय ! गेल्या पन्नास वर्षांत राजा–परधामाच्या इंट्रीला दुसरा डायलाग झालाय का कधी ?

**राजा :** जाऊ दे. राज्याची परिस्थिती कशी हाय ?

**प्रधान :** काय सांगणार महाराज. समधी नाटकं झाल्यात.

**राजा :** ऑ ? म्हंजी ?

**प्रधान :** यावर्षी परायोगिक नाटक करायचं ठरलंय.

**राजा** : प्रायोगिक ? म्हणजे एकच प्रयोग करतात का काय ? लोकाग्रहास्तव ?

**प्रधान** : महाराज, विनोद काय करताय ? प्रायोगिक नाटक म्हणजी काय विनोद वाटला का काय तुमास्नी ? आवं, लै डेंजर प्रकार असतोय !

**राजा** : एवढं असतं काय त्या नाटकात ?

**प्रधान** : अवं प्रायोगिक नाटकाचं फार्म्युलं इम्पोर्ट करावं लागत्यात.

**राजा** : इंपोर्ट ? म्हंजी ?

**प्रधान** : तुमास्नी काय बी ठावं नाय बघा. अवं, निरनिराळ्या प्रकारचं इम्पोर्ट असतं. वाचलं वाक्य की कर भाषांतर, वाचलं वाक्य की कर भाषांतर. याला म्हणायचं स्वैर अनुवाद. सबंध भाषण वाचून मंग भाषांतर करायचं याला म्हणायचं अनुवाद, सबंध नाटक वाचून मंग भाषांतर केलं की म्हणायचं भावानुवाद, पात्रं अन् वातावरन बदललं तर म्हणायचं रूपांतर अन् दोन तीन विंग्रजी नाटकं वाचून नाटक बनवलं की म्हणायचं संपूर्ण स्वतंत्र नाट्यकृती.

**राजा** : बरं ये समदं कशासाठी ?

**प्रधान** : अवं फारिनचं देश फुढारलेलं हैती. तिकडं फुटावर पाच तत्वज्ञ असत्यात. आपला देश पडला मागासलेला, आपलं विकसनशील, आपल्याला खायची प्यायची भरांत. मग कुठलं सुचायला आपल्याला असं जंक्शान तत्त्वज्ञान ?

**राजा** : जंक्शान ? म्हंजी ?

**प्रधान** : आवं, कंचा बी मूलभूत प्रश्न असू द्या, त्यावर प्रायोगिक नाटक झालंच म्हणून समजा.

**राजा** : मुलभूत प्रश्न ? म्हंजी माणसाच्या पार मुळालाच हात घालतात का काय !

**प्रधान** : च्. च्. म्हाराज तुम्ही स्टेजवर आहा. समोर शिकल्या सवरल्यालं एजुकेट लोक बसल्यालं हायत्. पांचट विनोद करू नका. अन् केलाच तर सॉरी बिरी म्हणा की राव. आयला एवढं म्हाराज झालं तरी म्यॅनर्स काय न्हाइतच तुमास्नी.

**राजा** : तुमाला तरी कुठायत म्यनर्स. आयला मगापास्नं सारखी तमाखु मारताय ते.

**प्रधान** : आवं आता नाटकात ग्रामीन मानसाचं काम म्हटलं की सारखं तमाखुचा बार भरावा लागतोय.

**राजा** : प्रधानजी, तुमी लई चिवचिव कराया लागलाय. कुठं शिकला व्हं ये समदं ?

**प्रधान** : त्यात काय ? गेला महयनाभर नाटकाचं बघतोय ना.

**राजा** : कशाला ते ?

**प्रधान** : म्हंजी नवीन नाटकं बसवायला बरं पडतं, चार दोन नाटकं हाताशी असली की.

**राजा** : आयला आमाला तरी दावा की असलं नाटक.

**प्रधान** : मंग य काय हाय ? दोन चार प्रवेश सुद्धा झालं. चला चला विंगेत जा. म्हंजी पुडचा प्रवेश तुमाला विंगेतून बघता येईल.

**राजा** : तुमी पन चला की राव.

**प्रधान** : आलो असतो. पन काय आहे मला पुढच्या प्रवेशात काम हाय. तवा मी थांबतो. तुमी माजं काम बगा, जावा, ( राजा जातो ) ओ.... म्हाराज.... शिव्हासण घिऊण.

( तिघे प्रवेशतात )

**सूत्र.** : ( प्रेक्षकांना ) प्रसंग तिसरा. स्थळ नदीकाठचे एक कॅफे. वेळ सायंकाळी साडे आठ. " काळ "– नाटक करण्याचे नक्की झाले आहे पण नाटक मिळालेलं नाही असा आणीबाणीचा भूतकाळ. प्रसंगात दोनच पात्रं आहेत. दोघेही या टेबलापाशी येऊन बसतील. ( येतात. बसतात ) तर ही तीन पात्रे, अर्थात पाठीमागनं हे नदीचं पात्र आहे ते तिसरे. कॅफेतले वेटर्स वगैरे अगदीच पात्रं असल्याने नाटकात घेण्यास अपात्र आहेत. बाकी हॉटेलातल्या ग्लास, डिशेस इत्यादी पात्रांचा किणकिणाट कानावर येतो आहे. खरं म्हणजे सारं आम्ही हुबेहूब करणार होतो. म्हणजे कॅफेचा सीन वगैरे. पण नाटक लो बजेट असल्याने ते परवडेना. तेव्हा कॅफेच्या आभासासाठी फक्त हा दिवा आम्ही वर लावून ठेवला आहे. ( दिवा लागतो ) आपल्याला कल्पना असेलच की आमच्या प्रत्येक नाट्यकृतीत वास्तववाद आणण्यासाठी आम्ही किती झटत असतो ते. तेव्हा म्हटलं आपल्या कलाकारांचा

तरी रंगभूमीवर उजेड पडेल अन् जाता जाता वास्तववादाचंही भान ठेवल्यासारखं झालं.

पहिला : पुरे पुरे, फार दिवे पाजळलेस. कंटाळा आला. लवकर प्रसंग सुरू कर.

सूत्र. : हो, हो आता प्रसंग सुरूच होईल. ( जातो )

( वेटर येतो )

वेटर : काय आणू साहेब ? काही गरम घेणार ?

पहिला : नको. हिट् ॲण्ड हॉट् नको. नवीन आहे का काही ?

वेटर : हो आहेत ना, काही चालत्या बसमध्ये करण्याची नाटकं आहेत. काही लोकल मध्ये करण्यासाठी आहेत. काही घरात जेवताना करता येतात. काही सिगारेट ओढता ओढता करता येतात. प्रत्येक नाटक मानवी जीवनाची दिशा चटकन् बदलतं-

दुसरा : अच्छा. म्हणजे जेवता जेवता दिशा बदलली तर नंतर सिगारेट ओढून पुन्हा गाडी मूळ दिशेला आणायची.

पहिला : आम्हांला थेटरात स्पर्धेसाठी नाटक करायचंय् !

वेटर : मग ' कम नॉर्थ पोल ' नावाचं एक हाय लेव्हल फिलॉसॉफिकल नाटक आहे. वेश्यांचं चित्रण करणारं. ' माय व्याली पाहिजे ' आहे. किंवा मग वेडी आई, अर्धवट बाप आणि त्यांची पिसाळलेली मुलगी यांच्यावरचं एक सायको–ॲनॅलिटीकल आहे.

दुसरा : असं तर नेहमीच पहायला मिळतं.

वेटर : काय ? नेहमी ?

दुसरा : हां. म्हणजे नाटकात. बरं आणखी काही ?

वेटर : हे बघा. हे छान काहे. नुसती पात्रयोजना बघूनच आवडेल तुम्हाला नाटक.

पहिला : वाचा पाहू.

वेटर : ( वाचतो ) पात्रे– प्रवेशानुक्रमे– तिसरा माणूस, पाचवा माणूस, दुसरा माणूस, सहावा माणूस, आठवा माणूस, पहिला माणूस, चौथा माणूस, दहावा माणूस, म्हण्या आणि नववा माणूस.

दुसरा : सातवा माणूस राहिला.

वेटर : तो नाटकात नाही. छान आहे की नाही ? देऊ ?

पहिला : नको. काही विदेशी दाखवा.

वेटर : आहे ना. नवेच आले आहे एक. सॉलिड क्रांतिकारक नाटक आहे. शिवाय त्या सोबत आम्ही चांगले टिकाऊ प्रेक्षकदेखील सवलतीच्या दरात देतो.

दुसरा : बघू वरं नाटक.

( नाटक पाहू लागतो. अंधार. अंधारात प्रेक्षकांना नाटक दिसते. निरनिराळे प्रसंग. मधेच पहिला व दुसरा बोलतात वगैरे )

दुसरा : स्टेजवर तार सप्तकातला अंधार. पार्श्वभूमीवर पावसाचा निळा जांभळा आवाज.

पहिला : काय एल एस. डी. घेतलं काय ?

दुसरा : नाही रे. नवं नाटक पाहिलं काय किंवा एल. एस. डी. घेतलं काय, परिणाम एकच होतो. अनुभूतींच्या संवेदनाची आलटापालट. कुठून तरी प्रकाशाचा एक थेंब पडतो. प्रकाशात म्हातारा म्हातारी दिसतात.

म्हाता. : सुनंदा कधी येणार ?

म्हातारी : ( थोड्या वेळाने ) दूध वर जाईल.

दुसरा : दोन मिनिटे शांतता.

म्हाता. : ( सुस्कारा )

दुसरा : एक मिनिट शांतता.

म्हाता. : सुनंदा जमीनदारानं पळवून नेली.

म्हातारी : ( थोड्या वेळाने ) पाऊस थांबणार नाही.

दुसरा : दीड मिनिट शांतता.

म्हाता. : ( सुस्कारा ) ( पहिला झोपलेला. दुसरा त्याला उठवतो )

दुसरा : उठ, उठ प्रकाशाच्या थेंबाची वाफ होत्येय.

पहिला : हे काय ? मध सात आठ पानं कोरी का सोडलीयत ?

दुसरा : मग ? नाटक लेखकापेक्षा दिग्दर्शकाचं असतं, त्यामुळे लेखकानं मधला काही भाग लिहिला नाही तरी दिग्दर्शक आपल्या प्रतिभेनं तो निर्माण करू शकतो. हं, तर प्रकाशाचा दुसरा थेंब .... सुनंदा !!

( सुनंदा ओकताना दिसते )

कोरस : हे आकाशवाणीचं.... वडगाव.... केंद्र आहे, आता.... हवामानाचा अंदाज.... ऐका. (दोनदा)

( तिघे कवायत करत पळत पळत पुढे येतात. एक पुढे. दोघे मागे थांबतात )

एक : भ्रष्टाचार.

म्होरक्या : क्रांती.

दोन : अत्याचार

म्होरक्या : क्रांती

म्हाता. : शोषण

म्होर. : क्रांती

पहिला : आपलं ते...हे

म्होर. : क्रांती

दुसरा : वाजले किती ?

म्होर. : क्रांती

( क्रांती होते. मग आनंदाचे समूहगीत. फेर धरून नाचतात )

गीत– वीक कडक्या किडुक मिडूक
दौड दोडक्या दुडुक दुडुक

(प्रकाशाचा ढग होतो. वेटर येतो )

पहिला : हे कोण ?

वेटर : ते होय. ती एक चळवळ आहे. मग बांधून देऊ नाटक की इथेच करणार ?

दुसरा : नको. मूळ इंग्रजीच नाटक द्या. आम्ही भाषांतर करून घेऊ.

वेटर : वरं. पण मग टिकाऊ प्रेक्षकांचा चार्ज वेगळा पडेल.

पहिला : नको. आम्ही गठ्ठ्यांनी सीझन तिकिटे घेऊन थेटर भरून टाकणार आहोत.

( वेटर बील देतो. दोघे बडीशेप खाऊ लागतात. )

दुसरा : जबरी नाटक आहे ना ‘ एक वांती–एक क्रांती ’

पहिला : हे नाटक आपण केलं तर प्रतिस्पर्ध्यांची फॅ फॅ उडेल.

सारे : (एक एक जण ) फॅ फॅ फॅ फॅ

( सारे येतात )

**सारे** : ( एक एक जण ) हसन नोटीस वाच. मगन नोटीस वाच. ( सारे वाचतात. ) आज रात्री मीटिंग आहे.

**एक एक जण :** अहमद मगनला धर. हसन गणपतला हाक मार. एकनाथ कमलला फोन मार (एकनाथ – कशाला ? मी घेऊनच येतोना तिला !) राम मीटिंगला चल. अहमद मीटिंगला चल. कमल विमल मीटिंगला चला. हा आमचा हैबती. दिग्दर्शक हैबती. रिकामटेकडा हैबती. हैबती दिवसभर गंभीर चेहऱ्याने वावरतो. हैबती नेहमी आपल्या जवळ कसली तरी कागदपत्रे वाळगतो. हैबती रात्री आमची प्रॅक्टीस घेतो. हैबती त्यानंतर झोपी जातो. हैबती तासावर पैसे घेतो. हा आमचा कट्टा. हे पाहिलेत आमचे लॉन ? हिरवे हिरवे लॉन. फार फार डास. कठीण कठीण नाटक. आम्ही लॉनवर एकत्र जमतो. आमच्या नाटकावर चर्चा करतो. एकनाथ, मीटिंग, लॉन, डास, नाटक. चर्चा ( बसतात )

**सरवटे :** तर ही आजची चर्चा आपल्या नाटकासंबंधानं.

**पहिला :** पण नाटक झाल्यावर चर्चा करण्याची प्रथा आहे ना !

**दिग्द.** : ती चर्चा वेगळी. ती लोकांशी करावयाची असते. बक्षिस मिळालं नाही, की तेच योग्य कसे होते ते त्या चर्चेत लोकांना पटवून द्यायचं असतं. ही चर्चा निराळी. ही आपली आपसात चर्चा. कुणाला आपलं नाटक कितपत समजतं यावर, नाटक कशासाठी आहे यावर, नाटकात काय सांगायचंय यावर. हे आपलं नाटक प्रसिद्ध नॉर्वेजियन लेखिका कु. साल्या मस्कालावलास्की यांच्या नाटकावरून आपल्या सरवट्यांनी मराठीत भाषांतर केलंय. "एक वांती-एक क्रांती."

**सरवटे :** हो हो मी भाषांतर केलंय. नाटक मी वाचलं, शब्दकोष मी खरेदी केला, भाषांतर मी केलं, आता त्यावर सांगोपांग चर्चा झाली की मग मलाही समजेल नाटकात लेखकाला काय म्हणायचंय ते. नाही का ?

**दिग्द.** : हो हो बरोबर.

**पहिला :** मला वाटतं आपलं नाटक मिलमालक आणि मजूर यांच्या संघर्षावर

तिसरी : हॅ काहीतरीच काय ? मला वाटतं हे नाटक म्हणजे जगात एक मोठे महायुद्ध होऊन साऱ्या जगाचा नाश झालाय अन जे काही मूठभर लोक वाचले, त्यांच्या जगावेगळ्या तत्त्वज्ञानावर आधारित असे आहे.

चौथी : तसं मुळीच नाही. आपलं नाटक निव्वळ विनोदी आहे.

पाचवी : मला आपलं हे नाटक कौटुंबिक जिव्हाळ्याचं वाटतं.

दि. : थांबा थांबा. असे एकदम सारे बोलू नका. माझं म्हणणं ऐका. ' एक क्रांती एक क्रांती " मध्ये एका अस्पष्टतेपासून सुरुवात होते. त्या अस्पष्ट विश्वात एक नगण्य अशी एक अव्यक्तता असते. अशा अंधुक अव्यवस्थेतून एक पॉइंट ऑफ इन्फ्लेक्शन उगवतो. अन् मग सारंच चैतन्य त्या बिंदूकडे, अस्पष्टतेकडून स्पष्टतेकडे, अनंतातून सान्ताकडे, जडत्वाकडून बोजडत्वाकडे... क्रमणा करू लागतं.

पहिला : म्हणजे काय ?

दुसरा : म्हणजे त्यानं नोकरी सोडलीय.

दि. : म्हणजे आपलं नाटक हे अशा अनेक अव्यक्त भूमिकांनी संपृक्त असं आहे. त्यामुळं जो एक गोंधळ निर्माण होतो त्यानं संपूर्ण नाट्यवस्तूलाच एक प्रकारचं ' फोर्थ ' डायमेन्शन प्राप्त होतं.

दुसरा : म्हणजे काय ?

तिसरा : म्हणजे नाटक अन त्यावरची चर्चा यात टाईम मस्त जातो.

पहिला : हां हां. म्हणजे आपलं नाटक हे एखाद्या शोभादर्शकासारखं आहे. त्यातल्या कॅरॅक्टर्स या काचेच्या तुकड्यासारख्या आहेत. जसा फिरवावा तशा निरनिराळ्या सौंदर्याकृती.

दि. : शाबास शाबास ! वाक्य जरा मेलोड्रॅमेटीक आहे, पण.... चालेल. आपल्या नाटकांचा रिपोर्ट तू लिही बरं. थोडक्यात काय, आपलं नाटक हे एखाद्या मादक पदार्थासारखं आहे. ज्या मनःस्थितीत आपण असू तिची किक नाटक पाहून येणार. आहे की नाही

गंमत ?

**सरवटे :** अच्छा–अच्छा, म्हणून ‘एक शांती एक क्रांती’ हे नाव होय ? आता मला समजलं.

**तिसरा :** अरे पण नाटकाला नाव तूच दिलंयस ना ?

**सरवटे :** हो. पण त्यावेळी माझ्या मनात हे असलं नव्हतं. मी आपलं जनरल मध्ये नाव दिलं होतं. त्याचा अर्थ मात्र मला आता कळला.

**पाचवा :** माझी.... एक शंका. तुम्ही म्हणताय की, नाटक अस्पष्ट झाले आहे वगैरे. पण नाटकात एका ठिकाणी स्पष्ट उल्लेख आहे की ‘या गुंतागुंतीच्या परिस्थितीत राज्यातले समाजकंटक वेचून वेऊन समूळ नष्ट केले पाहिजेत’ असा. त्यावरून नाटकाचा उद्देश स्पष्टच कळतो की.

**दि. :** स्पष्ट कळतो ? मग आपल्याला ते वाक्य बदलायला हवं आणि त्या ऐवजी, त्या ऐवजी.... काय टाकावं सरवटे ?

**सरवटे :** माझ्या मते असं टाकावं – तो म्हणतो या कॉम्प्लेक्स फंक्शन फील्ड-मधल्या साऱ्या सिंग्युलॅरिटीज् काढून टाकल्याशिवाय फंक्शन सगळी-कडे अॅनॅलिटिक होणार नाही.

**दि. :** छान छान !

**दुसरा :** माझी एक शंका. नाटकात संवाद फार कमी आहेत. ते वाढवायला नकोत का ?

**दि. :** काय ? संवाद वाढवायचे ? शहाणाच आहेस. मग नाटक बाळबोध नाही का होणार ? माझं तर म्हणणं होतं की नाटकात संवाद पाहि-जेतच कशाला ? पण मग सरवट्याचं नाव नाटकावर आलं नसतं. तेव्हा त्याच्या समजुतीसाठी काही संवाद घालावे लागले.

**तिसरा :** दुसरं असं की आपल्या नाटकात पात्रसंख्या प्रचंड आहे. स्टेजवर एकावेळी पंचवीसपंचवीस पात्रे आहेत. हे आपल्याला कसं जमणार? आपलं स्टेज असं लहान. त्यावर गर्दी होईल की.

**दि. :** च् च् कुठल्या जमान्यात वावरताय तुम्ही सारे ? स्टेजवर गर्दी व्हायला आपण स्टेजवर नाटक करणार थोडंच ! आपण प्रेक्षकांमध्ये नाटक करायचं.

तिसरा : अन् मग प्रेक्षक !

दि. : प्रेक्षक? आपल्या नाटकाला ! हुं. आले असलेच एकदोन तर त्यांना स्टेजवर खुर्च्या टाकून देऊ. काय ?

सरवटे : हो, ना.

दि. : ठीक आहे तर. आजची मीटिंग संपली. आता आपण सारे चहा मारायला जाऊया.

सारे : कुठं जायचं ?

दि. : पूर्वेकडे.

सारे : पण पूर्व दिशा या बाजूला आहे.

दि. : पूर्वी असेल, आता नाही. उत्तरोत्तर दिशा बदलातायत. बाकी तुम्हाला काय ठाऊक असणार म्हणा ! मी दिग्दर्शक आहे ना, मग मी म्हणेन ती पूर्व, लक्षात ठेवा. या माझ्या मागून.

एक : ( टी.व्ही. स्टाईल ) तर ही होती आमच्या पूर्वीच्या नाटकाच्या मीटिंगची ध्वनिदर्शन फीत. आता पाहू या सदरहू नाटकाचा ऊर्वरित भाग ( जातो. सूत्रधार अन् दुसरा प्रवेश करतात. )

सूत्र. : आता कळले ना, प्रत्यक्षात नाटकाला सुरुवात तीन घंटा झाल्यावर होत असली तरी त्यापूर्वीच चार महिने आम्ही कशी नाटकं करत होते ते ? दिग्दर्शक महाशयांनी सांगितल्याप्रमाणे बारा महिने बत्तीस काळ, जळी स्थळी, काष्ठी पाषाणी आम्हाला नाटकं दिसत होती. एखाद्या खुन्याला जसा खून चढतो किंवा 'पुलं'च्या नारायणला जसं लग्न चढतं तसं आम्हाला नाटक चढलं होतं. फुलपाखरं होण्याच्या आशेनं, आम्ही सुरवंटांनी आमच्याभोवती एका वेगळी तत्वज्ञानाचा कोष विणून घेतला होता. कोषातून बाहेर आल्यावर आमची फुलपाखरे होणारच हे आम्ही आम्हाला तर्कशुद्धरीत्या पटवून दिले होते. हां आम्हा बुद्धिवाद्यांची एक मजा असते. कोणी आम्हाला एखादी गोष्ट बऱ्यावाईट तर्कशुद्धीने पटवून दिली की मग आम्ही तिच्याशी भावुकतेने, इमानेइतबारे, वगैरे एकनिष्ठ असतो. मग बुद्धिवाद अन् भावुकता यातल्या परस्पर विरोधाकडे काणाडोळा

करण्यास आम्ही मागपुढे पहात नाही.

**पहिला :** डोळा काणा केल्यावर पुढं मागे पाहता कसे येणार ?

**दुसरा :** गप रे. तुला प्रसंगाचं गांभीर्य आहे की नाही ? तो एवढा गंभीरपण सांगतोय अन् तुला विनोद सुचताहेत.

**सूत्र. :** तसं नाही रे, त्याचं बरोबर आहे. अशा नाटकात लेखकाला पुढचा डायलॉग सुचला नाही की असे संवाद विनोदी या सदरात घालावे लागतात. एनी वे, यात एवीतेवी विनोद केलाच आहे तेव्हा विषय बदलण्याचा चान्स आपण का सोडा ? तर जसंजसं नाटक बसत गेलं तसतसे आम्ही जास्त जास्त खंबीर होत गेलो. जागोजाग पोस्टर्स लावली. गावोगावी नाटकाचे प्रयोग लावले. अहो, विविधभारतीवर जाहिरातसुद्धा दिली. टिंग टाँग.......

**एक. :** आपके शहरमे धूम मचाने के लिए आ रहा है. हमारे ग्रुपका नवा आकर्षण...एक वांती–एक क्रांती ! क्रांती–क्रांती क्रांती क्रांती... ट्रिकसीनस्, स्पेशल एफेक्टस्, परेड, स्लोमोशन्स, फ्रीझेस और सनस्नीखेज, तत्त्वज्ञान से भरपूर, एक्सपरीमेंटल स्टेज के इलाखेमे जबरदस्त धमाका. हमारा हसीन रंगीन सजीला धजीला, शाह-कार....एक वांती–एक क्रांती ! एक प्रायोगिक नाटक, नाटक, नाटक....टींग टाँग ( जातो. )

**पहिला :** नाटक तयार होण्याआधीच जाहिरात दिली ?

**सूत्र. :** हो. आमचं सगळं कसं प्लॅन्ड असतं. त्यात आमचा आत्मविश्वास दुर्दम्य. मग काय विचारता.

**दुसरा :** आधीच मर्कट तशातही मद्य प्याला.

**पहिला :** गप रे, काहीच्या काही बडबडू नकोस.

**दुसरा :** का ? आता का ? तू विनोद केलेला चालतो अन् मी नव्हे काय ?

**पहिला :** काय करणार ? बुद्धिवादही व्यक्तिसापेक्ष असतो.

**सू. :** जाऊ दे शांत व्हा. म्हणजे भांडायचं असेल तर भांडा पण इतक्या लोकांच्या समोर नको. आत नेपथ्यात जाऊन भांडा.

**दोघे :** ठीक आहे, ठीक आहे. तुझा डायलॉग पुढे चालू कर.

**सू. :** तर काय सांगत होतो ? हां, गावोगाव प्रयोग लावले. गर्दी होणारच

हे ही आम्ही स्वत:ला पटवून दिले होते. लक्षात ठवा, आम्ही लोक गोष्टी गृहीत धरीत नाही तर त्या स्वत:ला पटवून देतो. पण हायरे दैवा ! आमच्या असल्या प्रायोगिक नाटकाला लोकांनी तितक्याच प्रायोगिकतेने प्रतिसाद दिला.

**पहिला :** म्हणजे ?

**सू.** : म्हणजे लोकांचं म्हणणं असं की, तुम्ही एवीतेवी नाट्यक्षेत्रात नवनवे प्रयोग करत आहातच. मग विनातिकीट नाटक दाखवण्याचा नवा प्रयोग का करीत नाही ? आम्ही म्हणालो असं कसं चालेल ? लोक म्हणाले, बघा बुवा, विनातिकीट नाटक दाखवा नाही तर आम्ही नाटकाला केवळ मानसिक हजेरी लावण्याचा अभिनव प्रयोग करू. आणि लोकांनी तो तसा केलाही.

**दुसरा :** मग ?

**सू.** : मग काय ? सारे प्रयोग अपरिहार्य कारणास्तव रद्द करावे लागले, पण आम्ही अजिबात डगमगलो नाही. आम्ही तावडतोब स्वत:ला पटवून दिलं की, रसिक प्रेक्षकांनी नाटकाकडे पाठ फिरवली याचाच अर्थ असा की नाटक कलात्मक आहे. ते तज्ज्ञांना खचितच आवडणार. त्यामुळे आम्ही खास तज्ज्ञांसाठीच एक प्रयोग ठेवला.

**पहिला :** विनातिकीट ?

**सू.** : नाही, विनातिकीट नव्हे पण सर्व तज्ज्ञांना सप्रेम निमंत्रण पाठवली होती.

**दुसरा :** का ?

**सू.** : अहो तज्ज्ञ लोक जर तिकीट काढून नाटकं बघू लागले तर ते अन् रसिक यांच्यात फरक तो काय राहणार ? तज्ज्ञांना सप्रेम निमंत्रणे पाठवायची असतात. अन् त्यांनी आपल्या कार्यबाहुल्यातून वेळात वेळ काढून आपल्या नाटकाला उपस्थित राहण्याचा अनुग्रह आपल्यावर करावयाचा असतो, अशी प्रथाच आहे. त्याप्रमाणे सर्व झाले.

**पहिला :** मग ? आवडलं नाटक तज्ज्ञांना ?

**सू.** : ते मी कसं सांगणार ? आम्ही लोकांना सांगत काहीच नाही. आम्ही फक्त प्रसंग सादर करतो अन् लोकांना विचारप्रवृत्त करतो.

**पहिला :** म्हणजे ?

**दुसरा :** म्हणजे मला वाटतं नाटक पाहून झाल्यावर लोक विचार करतात. आपण नाटक का पाहिलं ? आपण तिकीट का काढलं ? मध्यंतरात आपण ॲनॉसिन वगैरे का खाल्लं नाही ? वगैरे. होना ?

**सू. :** ह्या ह्या ह्या, छान आहे हं विनोद. तर आता मी तुम्हाला तज्ञांनी केलेल्या मतप्रदर्शनाचा फ्लॅश बॅक दाखवतो. त्यावरून काय ते ठरवा. ( टाळ्या वाजवतो ) फ्लॅश बॅक...शुरू . कर.

**तज्ञ :** मला काय म्हणायचं आहे की, म्हणजे आय थिंक की थर्ड सीनमध्ये व्हेन हो सेज की बुवा, मला गरगरतंय तेव्हा डोंट यू थिंक म्हणजे असे होत नाही का की सबंध ड्रामा एका वेगळ्याच कॅरेक्टरभोवती फिरतो ? द होल सिच्युएशन रिव्हॉल्वस् अराऊंड ए सिंगल कॅरेक्टर. नाही का ? म्हणजे आय आपलं थिंक हं. त्यामुळे काय होतं की म्हणजे मला काय म्हणायचयं की जनरली प्ले बिगीन्स एका उंच पातळीवर अन तिथून ॲज् इट अॅडव्हान्सेस्, इट गोज डीपर ॲण्ड डीपर. किंवा सबंध प्रयोगभर पातळी कॉन्स्टंट असते. किंवा समटाईम्स इट बिगिन्स, असा खाली कुठेतरी आणि व्हेन इट एन्डस् साधारण या इथं कुठं तरी तो असतो, नाही का ? तसं मला कुठं फीलच झालं नाही.

**दुसरा :** मला वाटतं नाटक मराठीत होतं ही याची अडचण असावी.

**तज्ञ २ :** तसंच दुसऱ्या प्रवेशात जेव्हा नायक नायिकेला म्हणतो की मी बाहेर जातो, त्यावेळेला तो डावा हात बाहेर करतो – हा असा – हे एक्झॅक्टली कशाचं प्रतिक असावं ? म्हणजे ते प्रॉपर्ली कन्व्हे होत नाही. एकदा वाटतं की तो बाहेर जाऊन वाममार्गाला लागणार असं दाखवायचंय की काय ? एकदा वाटतं तो डाव्या विचारसरणीचा आहे हे दाखवायचंय की काय ? एकदा वाटतं की बाहेर जाणे – म्हणजेच त्याग करणं हा त्याचा डाव्या हाताचा खेळ असावा. एकदा तर वाटतं की क्रिकेट मध्ये पंच आऊट म्हणताना, उजवा हात वर करतो. तसा हा डावा करतोय म्हणजे खोटं आऊट. म्हणजे त्याचे बाहेर जाणे हे वेगळी आहे. म्हणजे मला म्हणायचयं काय की

माझ्या सारख्या तज्ञांचा अशा प्रसंगी गोंधळ होतो.

**दुसरा** : मला वाटतं डाव्या हातापेक्षा डाव्या हाताची करंगळी दाखविली असती तर बाहेर जाण्याचा हेतू जास्त स्पष्ट झाला असता.

**तज्ञ ३** : माझं म्हणणं जरा वेगळं आहे. म्हणजे काय की मी चार वर्षांपूर्वी अमेरिकेत होतो. तेथे मी नाटकं पाहिली. नंतर मी इंग्लंडला होतो. तेथे मी नाटकं पाहिली. फ्रान्सला होतो, जर्मनीला होतो. झालं तर....

**दुसरा** : रशियाला असाल.

**तज्ञ ३** : रशियाला पुढल्या वर्षी जाणार आहे. तर काय सांगत होतो, जर्मनीला होतो. तेथून काही वर्ष आफ्रिकेत होतो. तिथलं एक्स्परीमेंटल् स्टेज पाहिलं. मग थायलंड, मलेशिया, चायना सगळीकडे हिंडलो. भरपूर नाटक पाहिली, वाचली, नाटकांची रसग्रहणं वाचली.

**दुसरा** : मग भारतात येऊन आमचं नाटक पाहिलं.

**तज्ञ ३** : हो ना. तेव्हा मला असं जाणवलं की आपण कुठेच नाही आहोत. नाट्यक्षेत्रात बाहेरचं जग फार पुढे आहे. आपण त्याच त्या पूर्व-कालीन नाटकात, नाट्यवस्तूत घोटाळत आहोत. आपण हे सोडून द्यायला हवं. नाही का ?

**तज्ञ ४** : त्यापेक्षा तुम्ही एखादं चांगल नाटक का नाही करत ?

**दुसरा** : आता पुढच्या वेळेला गणपती उत्सवात करू. हं.

**तज्ञ ५** : ( स्त्री आहे ) अय्या, त्याच्यापेक्षा तुम्ही तुमच्या नाटकात मार्क्सवाद का नाही वापरत ? मला तर बाई नेसकॅफे, चीज सँडविच् अन मार्क्सवाद भारीच आवडतो बाई.

**तज्ञ ६** : तुमचं नं ७ हे पात्र तुम्ही इंपीरिॲलीस्ट दाखवलंय. म्हणजे एक्झि-स्टंशिॲलिस्ट इंपिरिॲलीस्ट. डू यु नो व्हॉट इज इंपीरिईलीजम् ? व्हेन वी से ए गाय इज ॲन इम्पोरीॲलीस्ट दी व्हेरी फॅक्ट दॅट ही इज, इम्पलॉइज दॅट ही इज ॲन इम्पीरिॲलीस्ट, यू नो.

**तज्ञ १** : नो नो, आय कॉन्ट्रडिक्ट धिस व्हेरी फॅक्ट हं.

**तज्ञ २** : इट इज नॉट मॉरल.

**तज्ञ ६** : आय नो, इटस् नॉट मॉरल. बट व्हॉट डू यू मीन बाय मॉरॅलिटी ? इट इज ए युटीलिटेरियन कन्सेप्ट. यू सी, व्हेन यू वॉन्ट टु कन्व्हे

दॅट ए गाय इज मॉरल, देन यू जनरली ॲश्यूम की वावा ही इज ए मॉरल गाय. देअरफर ही वॉंटस टु मेक हिज ॲबिलिटीज् एक्झिस्ट की नाही ?

**तज्ज्ञ ३ :** नो नो नॉट ॲट ऑल. व्हाय डू यू ॲश्युम दॅट...........

( कचाकचा भांडू लागतात )

**सूत्रधार :** ( जोरात ) कटट् कट्. ( सारे शांत होतात. एका रांगेत उभे राहतात)

**सूत्रधार :** तर सांगायचं काय, सारे तज्ज्ञ हे विदूषक असतात. ' विशेषेण दूषयति इति विदूषकः ' अशी संस्कृतात विदूषकाची डेफिनिशनच आहे. साऱ्या तज्ज्ञांना असा ज्ञान पाजळायचा चान्स मिळाल्यामुळे नाटक आवडलं असं दिसतं. पण नाटक चालेना. आम्हाला जो शिकला-सवरलेला बुद्धिवादी प्रेक्षक अपेक्षित होता तो नाटकाकडे खेचला जाईना. शेवटी एक फॅन्टॅस्टिक उपाय म्हणून नाटकाचा एक प्रयोग अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात लावला. त्याचे रिपोर्टस्, स्नॅप्स, क्रोनोस नियतकालिकांत आले मात्र, आमचे सारे पुढारलेले मित्र एक साथ उद्गारले—

**सारे :** ( एकेक जण ) ग्रेट, सरस, फॅन्टॅस्टिक, ये ऽऽ फॅब्, टू मच, सुपरसेक्स यार........

**सूत्रधार :** तर असं हे सुपरसेक्स नाट्य आम्ही आपल्या सेवेसी आणलेलं आहे. नाट्यानुभवाचा कल्पनाविलास, म्हणजे थोडासा नाट्यानुभव, थोडासा कल्पनाविलास. ज्यांना नाट्यानुभव आहे त्यांच्यासाठी हा एक कल्पनाविलास आहे. ज्यांना नाट्यानुभव नाही त्यांना एका सुरेख कल्पनाविलासाचा नाट्यानुभव येईल.

**सारे :** येते कीक् हो ती मस्तानी घेता दोन गलास्
ग नी कोमल होता होता होई भीमपलास
खपवा तिकिटे लवकर लवकर होतो खेळ खलास

**दुसरा :** अरे, नाटकातले कलाकार सांग नं.

**सूत्रधार :** कलाकार ? कलाकार नेहमीचेच !

**दुसरा :** नेहमीचेच ' यशस्वी ' का ?

**सूत्रधार :** जाऊ द्या ना राव, नसतं एखाद्याच्या नशिबात.

**पहिला :** नको, नको पण सांग लवकर.

**सूत्रधार :** वारं, वारं सांगतो.

( श्रेयनामावली वाचतो )

तर सादर करीत आहोत,

**सारे :** होतो खेळ खलास, होतो खेळ खलास

नाट्यानुभवाचा कल्पनाविलास

........प ड दा ........

• • •

# साहित्याचं घर

*

विलास सारंग

. . ठाणे, वाचनालय शाखा.
२०५८७ नों. दि. २८।२।८५

पात्रे

पाठक – वय ४०–४५
अभ्यंकर – वय ४०–४५
डॉ. हुपरीकर – वय ५५
नितीन साळवी – वय ३५
सौ. पाठक – वय ३५–४०
बंदूकवाला – वय सुमारे २५–३०
स्टेनगनवाला – वय सुमारे २५–३०
सतीश – वय सुमारे ३५

वेळ सुमारे ४५ मिनिटे

[ या नाटकातील पात्रे आणि प्रसंग पूर्णपणे काल्पनिक आहेत.

टीप : प्रवेशाचे नेपथ्य माफक असावे आणि ते चटकन बदलले जावे. त्याच फर्निचरची मांडणी बदलून, सोफ्यावरची कव्हरे वगैरे बदलून वेगवेगळी स्थळे सुचविता येतील. ]

## प्रवेश १

[ पाठकांचा दवाखाना. उजवीकडे बाहेरचं दार. डावीकडे आतल्या खोलीचं दार. बाहेरच्या दारावरची घंटी वाजते. काही वेळानं पुन्हा. डाव्या बाजूनं आवाज येतो, ' आलो, आलो. ' थोड्या वेळान डाव्या दरवाज्यातून पाठक येतात. चुरगळलेला पायजमा नि बनियन. नुकतेच झोपेतून उठलेले. उजवीकडे जाऊन दरवाजा उघडतात. पाठक आणि आता प्रवेश करणारे अभ्यंकर यांचं वय चाळीस-पंचेचाळीस. ]

पाठक : अरे वा, अभ्यंकर, या, या ! आज इतक्या सकाळीच कुठे ?

अभ्यंकर : वा, पाठकसाहेब, नऊ वाजून गेले आणि तुम्ही अजून झोपलेलेच ? काय, काल रात्री कुठं पार्टीबिर्टी झाली की काय ?

पाठक : छे हो, काल रात्री तीन वाजेपर्यंत लिहीत बसलो होतो, म्हणून अजून झोपलेला !

अभ्यंकर : म्हणजे एव्हानाच जोर लावलेला दिसतोय ! अहो, दिवाळी दूर आहे अजून. की यंदा रेकॉर्ड-ब्रेक वगैरे करायचा आहे काय ?

पाठक : दूर कसची हो. हां हां म्हणता दिवाळी येऊन ठेपते—आणि मग दरवर्षी धावपळ ! तेव्हा यंदा थोडी लौकरच सुरुवात केली. तरी फार कथा टाकणार नाहीये यंदा. बारा-पंधराच...कालच्या रात्रीत एक पुरी करून टाकली. लांबत गेली म्हणून तीन वाजले पहाटेचे. जवळजवळ दीर्घकथाच झालीये. बरं झालं एका अर्थी. अलीकडे दीर्घकथा टाकणं म्हणजे काहीतरी वेगळं, वजनदार करणं अशी हवा निर्माण झालीच आहे....बसा हं जरा, तोंड धुऊन आलोच.

[ दारापाशी येऊन पडलेला 'महाराष्ट्र टाइम्स' उचलून पाठक मेजावर ठेवतात आणि आत जातात. अभ्यंकर पेपर उचलून पहिल्या पानावर नजर टाकतात. ]

**पाठक** : ( टॉवेलने तोंड पुसत बाहेर येऊन ) हं बोला, अभ्यंकर, सकाळीच काय काम काढलंत ?

**अभ्यंकर** : ( पेपरातून वर पाहत ) अलीकडे रोजच या दादा चौधरीचं नाव पेपरात झळकतंय ! अगदी फ्रंट-पेज हेडलायनी ! जणू सरकारपेक्षा हा महत्त्वाचा बनलाय !

**पाठक** : हो नं, बघता बघता हा भयंकर पॉवरफुल नेता होऊन बसला ! जवळजवळ सगळा देशच त्याच्या मागं जातोय की काय, असं वाटायला लागतं—

**अभ्यंकर** : म्हणजे सगळे मागासलेले, अशिक्षित लोक. शिकल्यासवरल्या, सुसंस्कृत वर्गात त्याला काही पाठिंबा नाही. शहरांमध्ये पाठिंबा नाही.

**पाठक** : हा देशच मागासल्या, अशिक्षित लोकांचा आहे अभ्यंकर ! टक्केवारीनं पाहिलं तर उच्चशिक्षित, उच्चवर्गीय लोक आहेत किती ?

**अभ्यंकर** : म्हणून तर दादा चौधरीला एवढा पाठिंबा मिळतोय. सगळ्या सुसंस्कृत, उच्चशिक्षित वर्गाला हा चौधरी शत्रूसमान मानतो. त्यांच्याविरुद्ध सगळ्या अशिक्षित, अर्धशिक्षित झुंडींना भडकवणं त्याला जड गेलं नाही....पण असा हा माणूस आपल्या देशात मोठा नेता बनावा म्हणजे पाहा ! ज्या देशात महात्मा गांधी, नेहरू, जयप्रकाश, इंदिरा गांधींसारखे एज्युकेटेड, कल्चर्ड नेते होऊन गेले, त्या देशात असा सांस्कृतिक मूल्यांची कदर न करणारा, रानवट माणूस इतक्या महत्त्वाला यावा ! खरं तर या माणसाला वेळीच पायबंद घातला पाहिजे. पण सरकार क्रियाशून्यच झालेलं दिसतंय....

**पाठक** : बरं, ते जाऊ द्या, अभ्यंकर. काय काम काढलंत, बोला.

**अभ्यंकर** : ( पेपर मिटून मेजावर ठेवीत ) : काम कसलं....त्या नितीन साळवीचं प्रकरण ! त्याविषयी सांगायला आलो...बेटा उद्यापासून उपोषणाला बसणारच म्हणतो !

**पाठक** : बसणारच का ? मला वाटलं होतं, एकदा पोस्टपोन केलंन तसंच

पुन्हा एकदा पुढं ढकलील...

**अभ्यंकर :** नाही हो, हट्टाला पेटलाय ! आम्ही पुन्हा प्रयत्न केला मन वळवायचा. अजिबात दाद देत नाही.

**पाठक :** खरोखरीच उपोषण करणार म्हणजे कठीण आहे....

**अभ्यंकर :** हो ना. आणि बसणार तो कसा – साऱ्या संसारासह ! देसाइच्या फ्लॅटमध्ये इतके दिवस राहत होता, तो फ्लॅट उद्या त्याला रिकामा करावा लागणार आहे. मग सारा संसार घेऊन तो खाली येणार आणि बिल्डिंगसमोर बसणार सतरंजी अंथरून ! बरोबर बायको आणि मुलगा ! – मोठाच तमाशा !

**पाठक :** आणि पेपरात वगैरे येणारच !

**अ. :** ते आहेच ! शिवाय हा गृहस्थ उपोषणाला बसला की त्याची विचारपूस करायला, सहानुभूती दाखवायला वगैरे बाहेरची मंडळी येत राहणार. काही प्रसिद्ध माणसं ओळखीची आहेत त्याच्या, ती येणार, गाजावाजा होणार...

**पाठक :** छे छे, काय हे सारं ! ' साहित्य-सदन 'चं नाव खराब होतंय. म्हणजे एकूण साहित्यिकांचीच अप्रतिष्ठा. आणि पर्यायाने साहित्याचीही. ' साहित्य-सदन ' हे केवळ साहित्यिकांचं घर नाही, तर एका परीनं साहित्याचं घर आहे. एरवी साहित्यिकांविषयी लोकांना थोडाफार आदर असायचा, एक प्रकारचा दबदबा असायचा. काही झालं तरी संस्कृती–संस्कृती म्हणतात तिची जोपासना करण्यात आपला मोठा वाटा आहे. आता या असल्या घाणेरड्या प्रकरणामुळे त्यावर बोळा फिरवला जातोय. काय पाहा, एक साहित्यिक जागेच्या प्रश्नासाठी इतर साहित्यिकांसमोर उपोषण करणार – प्राणांतिक उपोषण ! असं काही होईल, असं कधी वाटलं होतं का ?

**अ. :** ते जुने दिवस गेले आता, पाठकसाहेब ! आता संस्कृती, सभ्यता असल्या गोष्टींविषयी बोलण्यात विशेष अर्थ उरला नाही. आजची संस्कृती रस्त्यावरची ! सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या सगळ्या समाजघटकांची आज विटंबना होतेय. प्राध्यापकांचं पाहा ना. एके काळी प्राध्यापकांना केवढा मान होता ! आता प्राध्यापकांना मोर्चे काढावे

लागताहेत पगारवाढीसाठी ! कामगारांप्रमाणे, झोपडपट्टीवाल्यांप्रमाण प्राध्यापकही फिरताहेत रस्त्यांत मागण्यांचे फलक मिरवीत !

पाठक : बरं अभ्यंकर, चहा ठेवू का आत जाऊन? माझाही व्हायचाय.

अ. : तुम्ही ठेवणार ? का, मिसेसना बरं वगैरे नाही की काय ?

पाठक : छे छे. तिला आपल्या भावाकडे जायचं होतं बरेच दिवसांपासून. परवाच पाठवून दिलं. मी रजा घेतलीय आता एक आठवडा. म्हटलं, आठवडाभर बैठक मारून सहासात कथा लिहून टाकू. म्हणजे मागाहून प्रेशर नको.

अ. : अस्सं ! बरं चहाचं राहू दे. मला निघायला हवं लौकरच. सोसायटीच्या कमिटीची अर्जंट मीटिंग बोलावली आहे, ती आहे अर्ध्या एक तासातच.

पाठक : हो, तुम्ही आता सोसायटीचे सेक्रेटरी झाला म्हणजे तुमच्यावर मोठी जबाबदारी पडली म्हणायची !

अ. : सेक्रेटरी झालो अन प्रारंभीच ही डोकेदुखी ! हा साळवी किती दिवस उपोषण रेटणार, पुढं काय होणार – आणि एकदा हा माणूस उपोषणाला बसला की मग परिस्थिती अधिकच दुस्तर होऊन बसणार !

पाठक : हे प्रकरण उपोषणाच्या, पब्लिक तमाशाच्या थराला गेलं नसतं तर बरं झालं असतं....

अ. : तेच तर मला टाळायचं आहे –

पाठक : आता वेळ कुठाय ?

अ. : अर्धा एक दिवस तरी आहे....त्याचसाठी मी तुमच्याकडे आलोय, पाठकसाहेब. मला तुमची थोडी मदत हवीय....

पाठक : बोला. शक्य असेल ते मी करीन. पण तुम्हा साऱ्यांना इतके दिवस प्रयत्न करून जे जमलं नाही, ते मला एका दिवसात कसं काय साधणार, अभ्यंकर ?

अ. : तिथेच गोम आहे, पाठकसाहेब ! साळवीशी बोलणी करायला मी किंवा कमिटीवरचं कुणी आता लायकीचं नाही. आम्हाला पाहून तो बिथरतो. आता अखेरचा प्रयत्न म्हणून डॉक्टर हुपरीकरांना

सांगून पाहायचं म्हणतो. हुपरीकरांची न् साळवीची चांगली दिल-जमाई आहे. त्यांना तो मानतो. अर्थात यापूर्वीही ते त्यांच्याशी बोललेले आहेत. पण मला अजून वाटतं की, त्यांनी अटीतटीनं प्रयत्न केला तर साळवीला ते थांबवू शकतील – निदान काही दिवस तरी.

पाठक : बरं, मग यात माझा काय संबंध ?

अ. : तर मीच हुपरीकरांकडे जाऊन त्यांना गळ घालायला हवी होती. परंतु पंचाईत अशी. झालीय—हुपरीकरांचा माझ्यावर मोठा रोष आहे ! तुम्हांला आठवत असेल, दोन वर्षांपूर्वी त्यांच्या पुस्तकाला अकादमीचं बक्षीस मिळालं, तेव्हा मी त्यावर सडकून टीका केली होती—चांगली–चांगली पुस्तकं सोडून या भोंगळ विचारांनी भर-लेल्या पुस्तकाची निवड केली, म्हणून. मी आपली वस्तुनिष्ठ, तात्त्विक दृष्टिकोणातून टीका केली, तर हुपरीकरांनी ती फारच पर्सनल स्वरूपात घेतली ! इथं माझा काय दोष ?....तर सांगायचा मुद्दा हा की, मी त्यांच्याकडे जाण्यानं पणारिम उलटा व्हायचा ! माझ्या मनात आलं की, तुमची अन हुपरीकरांची बरीच जवळीक ... तुम्ही त्यांच्या नात्यातलेच, नाही का ?

पाठक : आहे दूरचं नातं.

अ. : तर पाठकसाहेब, तुम्ही तातडीनं हुपरीकरांच्या घरी जाऊन बोलता का ? त्यांना म्हणावं, साळवीला काही करून उपोषण थांबवायला गळ घाला—निदान पोस्टपोन करायला तरी. बघा पाठकसाहेब, तुम्ही एवढं करायलाच पाहिजे. हे आपलं सर्वांचं काम आहे. ‘ साहित्य–सदन ’ची, साहित्यिकांची झाली एवढी नाचक्की पुरे झाली. आणखी हा उपोषणाचा तमाशा नको !

पाठक : ठीक आहे. मी जातो हुपरीकरांकडे....अगदी आत्ता, चहा न घेताच जातो. पण अभ्यंकर, तुम्ही नक्की नाही चहा घेत ? की टाकू थोडा ?

अ. : नको, नको. ( हातावरल्या घड्याळाकडे पहात ) झालीच आमच्या मीटिंगची वेळ. मला घरी गेलं पाहिजे. माझ्या घरीच मीटिंग

आहे...बरं, तुम्ही अगदी मनापासून प्रयत्न करा वरं हुपरीकरां-कडे. आमची मीटिंग उरकली की मी पुन्हा येतोच इकडे. तुम्ही जाणार नाही ना कुठं बाहेर ?

**पाठक** : छे, दिवसभर घरीच असणाराहे मी. बैठक मारून बसायचं ठरवलंय. आज आणखी एक कथा लिहून झाली पाहिजे. (थोडं थांबून) पण आता या साळवी प्रकरणात तुम्ही मला गुंतवल्यावर लिखाण कितपत जमेल, याची शंका वाटू लागली आहे ! मूड जमून यायचा नाही अशी भीती वाटते.

**अ.** : ( हसून ) मग साळवी प्रकरणावरच लिहा की कथा !

**पाठक** : छे, हा माझा टाइपचा विषय नव्हे. माझे अस्तित्ववादी विषयच मला बरे वाटतात. त्यात यंदा मी ' मृत्यू ' या विषयावरच सगळ्या कथा लिहितो आहे. मृत्यू हा केवढा जबरदस्त चॅलेंजिंग विषय आहे, अभ्यंकर ! एकेका कथेत या विषयाच्या वेगवेगळ्या पैलूंचा शोध घ्यायचा मी प्रयत्न करणार आहे. अशा दहाबारा कथा लिहून ' मृत्युकथा ' नावाचा संग्रहच बनवायचा विचार आहे.

**अ.** : छान कल्पना आहे. तर मी निघतो, पाठकसाहेब—

**पाठक** : बरं, पण तुमच्या लेखनाचं कसं काय हो, अभ्यंकर ? अजून सुरुवात झाली नाही का ? अहो, दिवाळी आलीच म्हणायची आता !

**अ.** : येत्या आठवड्यातच सुरुवात करायचं ठरवलं होतं मी. पण आता हे साळवी प्रकरण कुठवर चालतंय कोण जाणे हे निस्तरेतोवर नीट मन लावून लिहिणं मला जमणार नाही....नेमका दिवाळीचा मोका साधून साळवीनं हे कसं काढलंय पाहा ! जसं परीक्षा आल्यावर विद्यापीठाचे कर्मचारी संपावर जायची भाषा काढतात ! या माणसापायी आमचं दिवाळीचं लेखन बोंबलणार की काय ? अहो, माझंच काय—कमेटीवरच्या सर्वांचंच डोकं खाल्लं आहे या प्रकरणानं. सतत मीटिंगा, भेटीगाठी, वर्तमानपत्रांत आमच्या बाजूनं मजकूर यावा म्हणून खटपट—सगळ्यांचीच धावपळ ! अशा परिस्थितीत लेखनावर माणूस कसं कॉन्सेन्ट्रेट करणार ?–ऐन ' धंद्याच्या टायमा 'ला हे लेकरं !

पाठक : मराठी साहित्याची आपण किती हानी करतोय, याची कल्पना नसावी या साळवीला. स्वतः कुणाला न समजणाऱ्या कविता लिहितो, तेवढं जणू पुरे नाही झालं !

अ. : तर काय ! बरं, यतो. पण अगदी कळकळीनं सांगा वरं हुपरीकरांना !

पाठक : हो हो, तुम्ही काळजी करू नका.

[ पडदा पडतो. ]

## प्रवेश २

[ डॉ० हुपरीकरांचा दिवाणखाना. कोचावर पाठक बसले आहेत. फोन वाजतो. उजवीकडल्या दरवाज्यातून हुपरीकर लगबगीने येतात. वय पंचावन्न. फोन उचलतात. ]

हुपरी. : हॅलो...हां, मी हुपरीकर बोलतोय. आपण कोण ? (ऐकून) हं, बोला, (ऐकून) बी० एस० राव आज मुंबईला येत नाहीत ? मग केव्हा येणार ? (ऐकून) उद्या ? म्हणजे उद्या संध्याकाळी ? (ऐकून) अस्सं, तरी पण तुमच्याकडे आले की लागलीच घेऊन या त्यांना इकडे 'साहित्यसदना'त. (ऐकून) ठीक. (ऐकून) ठीक ठीक. (ऐकून) बरं....बरं, बरं. अच्छा. (फोन ठेवतात. वळून बैठकीकडे येत पाठकांना) हे एक वाईट झालं....बी० एस० राव यायचे होते आज पुण्याहून—'न्यू व्हिजन' मासिकाचे संपादक. ते आले असते तर उत्तम झालं असतं. नितीन साळवीवर त्यांचं वजन आहे. त्यांच्या हाताखाली 'न्यू व्हिजन'चा उपसंपादक म्हणून त्यानं वर्ष-दीड वर्ष काम केलेलं आहे. त्यांचं ऐकलं असतं नितीननं ...पण आता डॉक्टर मुतालीक म्हणाले की राव उद्या संध्याकाळी इकडं पोहोचतील. तोवर नितीन उपोषणाला बसलेला असणार. मग त्यांच्याही सांगण्याचा उपयोग होणं कठीण. तो बसण्याआधी, आज संध्याकाळपर्यंत ते आले असते तर ते उपयोगी ठरलं असतं. छे—

पाठक : पण डॉक्टर, तुम्हीच—

हुपरी. : मी करतोच प्रयत्न माझ्या परीनं. पण राव जोडीला असते तर बरं झालं असतं....पण वामनराव, तुम्ही कसे या प्रकरणात लक्ष घालता-

हात ? एवढे मुद्दाम माझ्याकडे आलात ते ? माझी कल्पना होती की, तुमचं असल्या गोष्टीमध्ये विशेष लक्ष नसतं....कुणाच्या सांगण्या-वरून आलात की काय ?–अभ्यंकरांच्या ? त्यांनी पाठवलं का का तुम्हांला ?

पाठक : ( अडखळत ) 'पाठवलं' असं नव्हे....पण माझं बोलणं झालं होतं त्यांच्याशी...

हुपरी. : कधी अलीकडेच ?

पाठक : अलीकडेच म्हणायला हवं...म्हणजे–म्हणजे आज सकाळीच....

हुपरी. : ( हसून ) अस्सं ! म्हणजे आज सकाळीच उठून अभ्यंकर धावत तुमच्याकडे आले !....माझ्याकडे यायला घाबरतो तो माणूस ! मागं माझ्यावर अशी बेजबाबदार, बेताल टीका केली होतीन्–माझ्या पुस्तकाला बक्षीस मिळालं म्हणून ! त्याच्या ग्रूपमधल्या आवटींना बक्षीस मिळेल अशी त्यांना आशा होती. ते मला मिळालं म्हणून कोण जळफळाट ! आता माझी गरज लागली तर मला दाखवायला तोंड नाही—

पाठक : ते जाऊ द्या, डॉक्टरसाहेब—

हुपरी. : बरं वामनराव, मी काय म्हणतो की तुम्ही आला नसता तर मी आपणहून प्रयत्न केलाच असता–करीतच होतो. अहो, नितीनची काळजी मला ! तुमच्या अभ्यंकरांना काय काळजी आहे नितीनची ? त्यांनी तुम्हांला माझ्याकडे पाठवलं ते स्वार्थासाठी. त्यांना स्वतःमागची कटकट संपवायची आहे, एवढंच; नितीनचं त्यांना सोयरसुतक नाही.

पाठक : कोणत्याही कारणानं का होईना, पण आपण सर्वांनी–

हुपरी. : इकडे मला तर मोठी चिंता लागून राहिली आहे. अहो, निश्चितच हे प्राणांतिक उपोषण म्हणजे सीरियस बाब आहे. तुम्हांला ठाऊक नसेल, त्याची प्रकृती अलीकडे फार खराब असते. ब्लडप्रेशर खूप वाढलेलं आहे. डॉक्टरनी सांगितलंय की त्यानं दोन दिवस उपोषण केलं तर पुढची काही खात्री देता येत नाही. त्याच्या जिवाचाच प्रश्न आहे.

पाठक : एवढं आहे का ! तर मग–

हुपरी. : पाहा वामनराव, इथं एका दर्जेदार लेखकाच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे आणि तिकडे तुमची अभ्यंकर वगैरे मंडळी आपल्या प्रतिष्ठेचा, लौकिकाचा विचार करीत बसली आहेत !

पाठक : त्यांचं जाऊ द्या हो. आपण आपले—

हुपरी. : अहो, जाऊ द्या काय ? या मंडळींनी प्रथम पासूनच ‘ साहित्य-सदन ’ चा कारभार बेशिस्तपणे चालवलाहे. वाट्टेल त्याला फ्लॅट दिले, फ्लॅटच्या वापरावर लक्ष ठेवलं नाही. मी मध्यंतरी कमिटीवर होतो तेव्हा पाहिलं ना ! मी थांबवलेही काही बेजबाबदार प्रकार....उदाहरणार्थ, ते रसिक पटेल—त्या मोठ्या खपाच्या गुजराती मासिकाचे संपादक आहेत ते—त्यांना दोन फ्लॅट हवे होते ! काय तर म्हणे, ‘ आपल्याकडे एवढी पुस्तकं आहेत की पुस्तकांसाठी आपल्याला एक स्वतंत्र फ्लॅट पाहिजे ! ’ मी मीटिंगमध्ये म्हटलं, ‘ हा काय प्रकार आहे ? इथं कित्येक साहित्यिकांना राहायला जागा मिळत नाहीये आणि या गृहस्थांना पुस्तकासाठी एक अख्खा फ्लॅट पाहिजे—केवळ आपल्या पुस्तकांसाठी ! हे आपण चालू देणार काय ? ’ मी असं सुनावलं, तेव्हा ते बारगळलं.

पाठक : हे मागचं जाऊ द्या डॉक्टर, आता या साळवीचं आपल्याला पहायचं आहे.

हुपरी. : हे प्रकरणही फार चिघळू दिलं तुमच्या अभ्यंकर वगैरे मंडळींनं. हे हे सारं टाळता आलं असतं. देऊन टाकायचा एक फ्लॅट नितीनला–

पाठक : असा तडकाफडकी कुठून देणार फ्लॅट, डॉक्टर ? एखादा व्हेकंट व्हायला नको का ? अभ्यंकरांनी साळवीला सांगितलं, ‘ एखादा फ्लॅट रिकामा झाला की लगलीच तुम्हाला देऊ.’ तर हा गृहस्थ थांबायला तयार नाही.

हुपरी. : पण त्या तक्रारीचं काय ? त्याच्या तक्रारी काही बिनबुडाच्या नाहीयेत. ‘ साहित्य-सदनात ’त राहणारे कित्येक जण साहित्यिक नाहीतच, उपरे लोक इथं घुसलेत ’ असं तो म्हणतो; ते खोटं आहे का ?

पाठक : मान्य, खरं आहे. पण तुम्ही वस्तुस्थिती नीट लक्षात घ्या, डॉक्टर-साहेब. दहा वर्षांपूर्वी सरकारनं साहित्यिकांसाठी ही जागा दिली. आपली को-ऑपरेटिव्ह सोसायटी स्थापन झाली, त्यावेळी काय परिस्थिती होती ? अहो सोसायटीला पुरेसे मेंबरही मिळत नव्हते ! साहित्यिक इथं यायला तयार नव्हते. त्या वेळी लोकांना ही जागा फार दूर वाटायची. भोवती ओसाड जागा असल्यानं डास फार होते. पुरेसे मेंबर मिळेनात, म्हणून मग प्रत्यक्ष साहित्यिक नसलेले, परंतु साहित्याशी येनकेन प्रकारेण संबंध असलेले लोक घ्यावे लागले. त्या वेळी कुठं होता तुमचा नितीन साळवी ?

हुपरी. : पण नितीन म्हणेल, ' ते मागचं आम्हाला कशाला सांगता ?'

पाठक : अहो, मागचं काय ? गंमत अशी की या साळवीला सोसायटीनं मागं जागा देऊ केली होती ! सोसायटीच्या दप्तरात साळवीला फ्लॅट देऊ केल्याचं पत्र आहे, असं खुद्द अभ्यंकरांनी मला सांगितलं. त्या वेळी घेतलं नाही आणि आता पठ्ठ्या उपोषण करायला निघालाय ! ...डॉक्टरसाहेब, तुम्हांला साळवीविषयी सहानुभूती आहे हे ठीक; पण या माणसाचं एकंदर काही खरं नाही ! तुम्हाला ठाऊक आहे, साळवीचं बूड ठिकाणावर नाही. कुठं नायजेरियात शाळेत शिकवायला गेला, तिकडून आला नाही तो वर्षा-दोन वर्षांत अमेरिकेला गेला– अन् आता आला तो आपल्या बोकांडी बसलाय !

हुपरी. : मागं जागा देऊ केली असता त्यानं घेतली नाही हे जर खरं असेल तर साळवीची बाजू थोडी कमकुवत होते खरी. आता मी काही सोसायटीचं दफ्तर तपासलेलं नाही. पण वास्तविक तो गौण मुद्दा आहे. प्रश्न आहे सध्याच्या परिस्थितीचा ! इथले फ्लॅट मोकळे टाकून, किंवा चक्क भाड्यानं देऊन, काही साहित्यिक दुसरीकडे राहायला गेले आहेत, ही वस्तुस्थिती आहे. नितीननं यावर बोट ठेवलं. अभ्यंकर वगैरे मंडळीने या बाबतीत काय केलं आहे ?

पाठक : मुद्दा रास्त आहे. पण अशा बाबतीत अभ्यंकर—किंवा कमिटी— तडकाफडकी काय करणार ? कायदेशीर पावलं उचलायला वेळ लागतो. साळवीनं एवढं समजावून घ्यायला हवं.

हुपरी. : मला वाटतं, वामनराव, अभ्यंकरांनी तुम्हाला चांगलं पढवून ठेवलेलं आहे आणि ते तुम्ही माझ्या गळी उतरवण्याचा प्रयत्न करता आहात ....पण ते जाऊद्या. वाद घालण्यात अर्थ नाही, महत्त्वाचं काम आहे ते नितीनला उपोषणापासून परावृत्त करण्याचं. आणि ते आपणा साऱ्यांनाच हवं आहे.

पाठक : बरोबर बोललात, डॉक्टरसाहेब. तर तुम्ही काही करून साळवीचं मन वळवाच. थोड्याच वेळात साळवी इथं तुमच्याकडे येणार आहे म्हणालात ना तुम्ही ?

हुपरी. : ( हातावरल्या घड्याळाकडे पाहात ) हो, सांगितलं ना–सकाळीच मी नितीनला बोलावणं पाठवलं आहे. 'लौकरच येतो' म्हणाला. पण आता नक्की कधी येईल, काही सांगता येत नाही. आत्ता पाच मिनिटांत येईल, नाहीतर दोन तासांनी येईल. लहरी प्राणी आहे तो—

पाठक : तर मी चलतो.

हुपरी. : का ? बसा की थोडा वेळ. एवढ्यात तो आला तर ठीकच. तुमच्या-समक्ष होईल.

[ पाठक हातावरल्या घड्याळाकडे पाहत विचार करतात. दारावरची घंटी वाजते. ]

हुपरी. : आलाच की काय ! मी बोलावं आणि तो हजर व्हावा, म्हणजे गंमतच आहे. ( लगबगीनं उठून दार उघडतात. ) वा:, नितीन ! ये, ये !...मी आताच म्हणत होतो, तू केव्हा येतो आहेस—तर तू हजर ! शंभर वर्षं आयुष्य आहे !—पण त्यासाठी तुला उपोषणाचा वेत सोडून द्यावा लागेल, बरं ! उगीच उपोषण करून तू आपलं शंभर वर्षांचं आयुष्य धोक्यात आणू नको बाबा ! [ नितीन साळवी माफक हसत आत येतो. वय पस्तीसेक. जाड भिंगांचा चष्मा, मिशा, हातात सिगरेट. 'बंडखोर बुद्धिवाद्या'चा आविर्भाव. आत येऊन पाठकांकडे पाहतो—प्रथम काहीशा संशयी नजरेने, मग मारक्या नजरेने. ]

हुपरी. : यांची ओळख आहे की नाही ? हे वामनराव पाठक—

साळवी : आहे जुजबी ओळख—

[ पाठक हसून नमस्कार करतात. साळवी न हसता अर्धवट नमस्कार करतो. ]

हुपरी. : बैस, बैस. [ साळवी बसतो. ] मग काय, नितीन, तू उपोषणाला बसण्याचा निर्धारच केला आहेस ?

साळवी : हो.

हुपरी. : वेत सोडून द्यायला अजिबात तयारी नाही तुझी ?

साळवी : ( शांत, निश्चयी सुरात ) : नाही.

हुपरी. : अरे, तू काय एवढं पराकोटीला नेतोस ?....एवढी बिकट परिस्थिती असली, तर तू माझ्याकडे येऊन राहा पंधरा दिवस ! सुभाषचं लग्न झाल्यापासून आम्ही दोघंच असतो घरात. आम्हांला काही अडचण नाही.

साळवी : ( हसून ) : थँक्स, डॉक्टर. तुमचा चांगुलपणा मी ॲप्रीशिएट करतो. पण वैयक्तिक चांगुलपणा मला नको आहे. त्याचा काही उपयोग नाही. इथं प्रश्न मोठा आहे. वैयक्तिक चांगुलपणानं प्रश्न सुटण्याऐवजी तो केवळ डावलला जाईल.

हुपरी. : म्हणजे हा प्रश्न तू तत्त्वाचा वगैरे बनवतो आहेस ?

साळवी : तत्त्वाचा आहेच हा प्रश्न !....एरवी खटपटी-लटपटी करून फ्लॅट मिळवणं कठीण का आहे ? अहो, अगदी चीफ मिनिस्टरनी मला फ्लॅट देऊ केला होता. तुम्हांला ठाऊक आहे, सध्या बहुतेक सर्व नावाजलेले साहित्यिक सरकारशी सहकार्य करायला तयार नाहीत. चीफ मिनिस्टरांच्या ' सरस्वती प्रतिष्ठान 'साठी काम करायला कोणी मोठे साहित्यिक मिळत नाहीयेत. चीफ मिनिस्टरांनी कळवलं की ' सरस्वती प्रतिष्ठानवर काम करीत असशील तर तुला अक्कपैकी फ्लॅट देतो. ' मी ' नाही ' म्हटलं. मला त्या मार्गानं फ्लॅट नको आहे.

हुपरी. : ते सारं ठीक आहे रे. पण हे उपोषणाचं—उपोषणाचं म्हणजे फारच होत नाही का ? हा आततायीपणा नाही तर काय ?

साळवी : हे बघा हुपरीकर, मी तुम्हांला, मागल्या वेळीच सांगितलं आहे,

तुम्हीं यात पडू नका, माझा बुद्धिभेद करायचा प्रयत्न करू नका. मला तुमच्याविषयी खूप आदर आहे. आणि दुसऱ्या कोणत्याही बाबतीत मी तुमच्या शब्दाला योग्य तो मान देईन; परंतु इथं माझा झगडा त्या लोकांशी आहे ! ( इथं पाठकांकडे साभिप्राय पाहतो. ) ते लोक तुमच्यापेक्षा फार वेगळे आहेत. खरं तर तुम्ही त्यांच्या आहारी जाऊ नये. ( पुन्हा पाठकांकडे पाहतो. )

हुपरी. : उगीच गैरसमज करून घेऊ नकोस, नितीन. मी कुणाच्या सांगण्यावरून तुला आग्रह करीत नाहीये; इथं मलाच केवढी काळजी लागून राहिली आहे. तू नीट विचार केला आहेस का ? तुझी प्रकृती काय—आणि त्यात तू उपोषण करणार ? हा अविचारीपणा नव्हे तर काय ?

साळवी : तो विचार मी बाजूला ठेवला आहे, हुपरीकर. काय व्हायचं असेल ते होऊ दे. मला दुसरा मार्ग दिसत नाही.

पाठक : ( पुढे झुकून ) एक्स्क्यूज मी, मिस्टर साळवी, पण असं तडफाफडकी उपोषण वगैरे करणं अन्यायाचं नाही का ? संबंधित लोकांना तुम्ही थोडा अवधी द्यायला नको का, काही तजवीज करायला ? मॅनेजिंग कमिटीला तुम्ही थोडा वेळ दिला तर करतील ते काहीतरी.

साळवी : ( हसून ) मिस्टर पाठक, हे मी कितव्यांदा ऐकतोय तेही मला आठवत नाही ! आतापर्यंत खूप अवधी दिलाय मी तुमच्या अभ्यंकर आणि कंपनीला. म्हणूनच आता हा निर्वाणीचा उपाय काढला. आता मी पाय मागे घेतला, तर पुन्हा त्यांची टोलवाटोलवी सुरू होईल. मला कंटाळा आलाय आता !

पाठक : असेल झालेला त्यांच्या हातून थोडा गलथानपणा. त्यावर तुम्ही काढलेला उपाय कोणता ? इतरांना यापायी केवढा मनस्ताप होईल याचा तुम्ही विचार केला आहे का ?...तुम्हांला ठाऊक आहे, अभ्यंकरांआधी सेक्रेटरी असलेल्या सुधाकर वैसासांनी राजीनामा दिला, तो केवळ तुमच्या या उपोषणाच्या बेतामुळे ! तुम्ही उपोषणाला बसला की कदाचित पोलिसांना बोलावण्याची पाळी येणार;

घैसासांना ते फार जड वाटलं. एका साहित्यिकानं दुसऱ्या साहित्यिकासाठी पोलिसांना बोलावणं धाडावं, ही कल्पनाच त्यांना मानवेना. राजीनामा देणं त्यांनी पत्करलं. वास्तविक सेक्रेटरी म्हणून त्यांनी फार काम केलं होतं आजवर...

**साळवी :** या साऱ्याला माझा काय इलाज ? या गोष्टींची जबाबदारी माझ्यावर नाही !

**पाठक :** बरं, एकवेळ तुमचं उपोषण परवडलं; पण दलितांचा प्रश्न यात गुंतवण्याची काही जरुरी होती का ? 'दलित लेखकांना साहित्य-सदन मध्ये पंचवीस टक्के जागा द्याव्या' असं म्हणणाऱ्या शंकर पवारला तुम्ही जोडीला घेतलं आहे ते कशाला ? तुम्ही काही दलित नाही; तुमच्या प्रश्नाचा त्यांच्या मागणीशी अर्थाअर्थी काहीच संबंध नाही. (हुपरीकरांकडे वळून) पहा डॉक्टरसाहेब, साळवी आपल्या प्रश्नाला मुद्दाम भडक राजकारणी वळण देताहेत, असंच यातून दिसत नाही का ?

**हुपरीकर :** छे बुवा, नितीन तुझं हे शंकर पवारला जोडीला घेणं मलाही काही पसंत पडलं नाही. म्हणजे तू तुझ्या प्रश्नाची चळवळ वगैरे बनवून त्याला राजकीय स्वरूप देतोहेस असंच कुणालाही वाटेल.

**पाठक :** तर काय, डॉक्टरसाहेब ! अहो, 'या साळवींचं उपोषण परवडलं, पण तो शंकर पवार नको' असं बिचारे अभ्यंकर म्हणतात ! हा पवार राजकारणाचा अनुभव घेतलेला. त्याच्या टॅक्टिक्स अधिक जोरदार. इथं 'साहित्य-सदन' समोरच काय पण अगदी रेल्वेस्टेशनावरही कापडी फलक लावून ठेवले असते वेट्यानं ! आणि उद्या साळवी उपोषणाला बसले की, पवार इथं मोर्चाही घेऊन येणार ! —पवारसारख्या माणसाला झुंड जमवून आणायला काय कठीण ?

**साळवी :** हे पहा, शंकर पवारला मी यात ओढलेलं नाही. तोच माझ्याकडे आला. मला त्याच्या पाठिंब्याची गरज नव्हती. परंतु मी त्याला 'नाही' तरी का म्हणावं ? तो म्हणाला, 'आपण एकत्र यायला पाहिजे. एकेकट्यानं भांडण्यात काही अर्थ नाही.' —खोटं आहे का त्याचं ?

हुपरीकर : हे उगीच गुंतागुंतीचं होतंय नितीन—

साळवी : आजचं आयुष्य गुंतागुंतीचंच आहे, डॉक्टर हुपरीकर ! तुम्ही इनकी वर्षं साहित्यशास्त्रातल्या गहन प्रश्नावर चिंतन करण्यात घालवलीत. या बाहेरच्या जगातल्या गुंतागुंतीकडे तुमचं फारसं लक्ष गेलेलं दिसत नाही. आता हेच पहा ना— शंकर पवारनं यांत अंग घातलं, तर तिकडे अभ्यंकर आणि मंडळींच्या डोळ्यात ते खुपू लागलं. त्यांनी पवारला यातून काढण्याचा प्रयत्न सुरू केला. अभ्यंकरांचा एक माणूस पवारकडे गेला अन् म्हणाला, 'अरे, हा साळवी मराठा जातीचा, त्याला सपोर्ट करण्याच्या भानगडीत तू कशाला पडतोस ?' — बघा, अशी जातीय फूट पाडायला पहातात हे लोक ?

पाठक : मला नाही वाटत, अभ्यंकरांनी असं काही केलं असेल. उगीच विपर्यास करताहात तुम्ही, साळवी. खरं तर शंकर पवार तुमचा फायदा उठवतोय, तुम्हाला एक्स्प्लॉइट करतोय. तुम्हाला याची जाणीव दिसत नाही.

साळवी : वा पाठक, फूट पाडण्यात तुम्ही अधिक धूर्त आणि सोफिस्टिकेटेड प्रयत्न करताना दिसताहात !... अरे तुम्ही हे लक्षात घेत नाही की अखेर आपण सारे एकाच वर्गातले, एकाच बोटीतले आहोत. साहित्यिक असल्यानं आपण सारे एकाच क्लासमध्ये मोडतो. तरी मला, एका माणसाला हा जागेचा प्रश्न धसाला लावायला किती यातायात करावी लागते आहे ! अर्थात मीदेखील पांढरपेशी, सुसंस्कृत वगैरे असल्याने करूनकरून काय करणार ? जास्तीतजास्त म्हणजे उपोषणबिपोषण—पण तिकडे तो दादा चौधरीसारखा माणूस उभा राहिलाय—ज्याचा कशावरच, कोणत्याच तत्वज्ञानावर विश्वास दिसत नाही—ज्याचा आपल्यासारख्या तथाकथित सुसंस्कृत, सुशिक्षित वर्गावर जास्त दात आहे—ज्याला आपलं हे सुसंस्कृत प्रतिष्ठित माणसांचं जग अर्थशून्य, अनावश्यक वाटतं. आणि गांधीवाद, समाजवाद, कम्युनिझम वगैरे सारी तत्त्वज्ञानं निरुपयोगी ठरल्यानं निराश, उद्विग्न झालेल्या देशातल्या सान्या अशिक्षित, दरिद्री माणसांच्या झुंडीच्या झुंडी त्या माणसामागं गोळा होताना पाहतो आहोत. या दादा

चौधरीसारख्या माणसाविषयी तुम्ही—आणि 'तुम्ही' म्हणजे तुम्हीआम्ही सर्वांनी— अधिक विचार करायला नको का? दादा चौधरी तुमच्यापुढं सात्त्विक उपोषण वगैरे करील, असं तुम्हाला वाटत नाही की काय!

**पाठक :** उगीच काहीतरी भीतिदायक चित्र रंगवताहात तुम्ही, साळवी. दादा चौधरीचा बागुलबोवा उभा करून स्वतःचं घोडं पुढं दामटायचा धूर्त प्रयत्न आहे हा!

**हुपरी. :** बरं, ते जाऊ दे. व्यापक पार्श्वभूमी वगैरे सोडून आपण मूळ प्रश्नावर येऊ. आपला प्रश्न आहे उद्याच्या उपोषणाचा! पुन्हा सांगतो, नितीन, तुझं हे उद्याचं उपोषण काही करून रद्द व्हावं असं मला फार वाटतं. अरे, निदान चार दिवस पुढे तरी ढकल. तेवढ्यात काहीतरी करता येईल. नाहीच काही जमलं तर—

**साळवी :** पोस्टपोन वगैरे करण्यात आता अर्थ नाही. काही फरक पडणार नाही. आणि एकदा पोस्टपोन केलं तर लोकांचा विश्वास उडेल. आता मला पाऊल मागं घेता येत नाही हे निश्चित!

**हुपरी. :** फारच दुराग्रही आहेस बुवा तू! अर्थात तुझा स्वभाव मला माहीत नव्हता असं नाही, तरी पण—

**साळवी :** (हसून) हुपरीकर, तुम्ही बोलावलंत म्हणून मी आलो; दुसऱ्या कुणाचीही पर्वा केली नसती! पण मला वाटतं, आपण या विषयावर अधिक बोलण्यात अर्थ नाही. त्यातून काही निष्पन्न होणार नाही. मी इथून उठलेलंच बरं. (उठत) घरी बांधाबांधही करायचीय. उद्या सगळा संसार रस्त्यावर येणार आहेना! तर निघतो मी—

**हुपरी. :** (उठून) बऽरं. पण नितीन, काही गरज लागली तर सांग हं मला—

**साळवी :** जरूर. अच्छा!

[ पाठकांकडे न बघता साळवी दाराकडे जातो. हुपरीकर आणि पाठक बंद होणाऱ्या दरवाज्याकडे पाहत असतानाच पडदा पडतो. ]

## प्रवेश ३

[ पाठकांचा दिवाणखाना. उजव्या कोपऱ्यात लिहिण्याचं टेबल.

त्यावर टेबल-लॅम्प, कागद वगैरे. पाठक सुपारी कातरीत आहेत. डाव्या बाजूने आतल्या खोलीतून सौ. पाठक येतात ]

**सौ. पाठक :** चला बाई, आटोपलं एकदाचं काम. दिवसभर प्रवासाचा शीण. अंग कसं जड झालंय, त्यात तुम्ही घरात करून ठेवलेला हा पसारा ! मी आठवडाभर परगावी गेले तर काय सगळं अस्ताव्यस्त करून ठेवलंत हो ! व्यवस्थित लावता लावता नाकी नऊ आले.

**पाठक :** ( थंडपणे सुपारी चघळीत ) सुपारी हवी का ?

**सौ. पाठक :** द्या थोडी.

**पाठक :** ( सुपारी हातावर ठेवून ) पण काय ग, तू गौरीला एकटीला रघू-मामाकडे ठेवलीस–पण ती नीट राहील्की तर बरं; नाहीतर लागायची रडायला, घरी जायचं म्हणून !

**सौ. पाठक :** अहो, मला तर पंचाईत पडल्येय, तिला घरची आठवण तरी येईल का म्हणून ! इतकी रमली ती तिकडे ! हुंदडायला जागा खूप बरोबरीची पोरं-पोरी खूप. दिवसभरात तिला माझी आठवणही होत नसे—आणि रात्री झोपायलाही बरोबरीच्या पोरींमध्ये !

**पाठक :** अग, मुलांचं काही सांगता येत नाही. पाहू आता कसं काय होतं ते. आणि रघूमामा आणून पोचवणार म्हणतो, तर ठीक आहे.

**सौ. पाठक :** (मेजावरचा पेपर उचलून ) आजचा पेपरच वाचायला मिळाला नाहीय. ( पहिल्या पानावर नजर फिरवतात. ) राहू द्या, बाई. इतकी झोप आलीय ! झोपू या आज लौकर...चला, तुम्ही झोपताय की बसताय ?

**पाठक :** मी बसतो तास-दीड तास काम करीत.

**सौ. पाठक :** बसा. पण एवढे आठवडाभर इथं एकटे राहिलात, तर झालं का चांगलं लेखन ? की आम्ही नव्हतो, तर इथं पार्ट्या चालल्या होत्या रात्रीच्या ?

**पाठक :** छे ग, पार्ट्या करल्या ! पण लिहूनही झालं नाही व्हावं तसं. हे साळवी प्रकरण चाललं होतं ना. अभ्यंकरांनी मलाही गुंतवलं त्यात थोडंफार. नाही म्हटलं तरी त्याचा व्यत्यय आला.

**सौ. पाठक :** अय्या, त्या साळवीविषयी विचारायचं विसरलेच मी घरच्या

गोष्टी करायच्या नादात ! सांगा तरी त्याचं पुढं काय झालं. मी तिकडं पेपरात वाचलं तो उपोषणाला बसल्याचं. पण पुढं काही कळलं नाही.

**पाठक :** कसलं उपोषण नि काय ! दोन दिवस चाललं उपोषण. मग मंत्रालयाहून कुणीतरी आलं, त्यांनी काही आश्वासनं दिली अन या गृहस्थानं उपोषण मागं घेतलंन. सध्या बाहेरच राहतोहे कुठंतरी. पण 'शक्य तितक्या लौकर साहित्य सदनात जागा देतो' म्हणून त्यांनी आश्वासन दिलं आहे त्याला. आता 'शक्य तितक्या लौकर' म्हणजे काय ? काही अर्थ नाही त्यात !

**सौ. पाठक :** बस्स, एवढंच ?

**पाठक :** तरी दोन दिवस उपोषण चाललं होतं, तेव्हा धमाल चालली होती बरीच. मंडळी येऊन गेली पूसतपास करायला.

**सौ. पाठक :** दोन दिवस तरी निभावलंन म्हणजे बरंच आहे !

**पाठक :** अग, त्याबद्दलही शंका-कुशंका आहेत—

**सौ. पाठक :** म्हणजे ?

**पाठक :** अग, अशी वदंता आहे की यानं रात्री काही खाल्लं !

**सौ. पाठक :** अय्या, खरंच !

**पाठक :** हो बुवा—तर एका गृहस्थांनी मला सांगितलं की हा प्याला होता गुपचूप ! हे गृहस्थ रात्री सांळवीच्या भेटीला गेले, तर त्याच्या तोंडाला वास येत होता म्हणे !

**सौ. पाठक :** कमाल आहे, बाहे !

**पाठक :** प्याला असला तर नवल नाही. तो उपोषणाला बसला तेव्हाच मला वाटलं होतं, या पठ्ठ्याचं अन्नावाचून चालेल, पण ( तोंडाकडे अंगठा नेऊन ) याच्यावाचून कसं चालणार ? सांळवीला मी का ओळखत नाही ? संध्याकाळची याला हवीच !

**सौ. पाठक :** प्याला म्हणतात, तर मग काही खाल्लंही असेल त्यानं ...निदान शेंगदाणे, वेफर....

**पाठक :** शेंगदाणे-बटाटे उपासाला चालतातच की !

**सौ. पाठक :** ( मोठ्यानं हसून ) : काय तरी बाई !—उपोषणं करावीत ती

महात्मा गांधींसारख्यांनीच हो ! आपल्या माणसांनी कशाला उपोषणं वगैरे करायला निघावं... चला, जाऊन पडते मी. जास्त जागरण करू नका हं ! [ सौ. पाठक आत जातात. पाठक एकदोन येरझारा घालतात. मग टेबल-लॅम्प लावून वरचा दिवा मालवतात. टेबलाशी बसतात. काही कागद निवडतात, वाचतात, विचार करतात. मधूनच काही लिहितात. काही वेळाने दारावरची घंटा वाजते, पाठक आश्चर्य वाटल्याप्रमाणे वर पाहतात. 'कोण आहे या वेळी' अशा मुद्रेनं उठतात, दार उघडतात. दारात दोन माणसं. एकाच्या हातात बंदूक, दुसऱ्याच्या हातात स्टेनगन. पोलिस किंवा सैनिकाचा वेष नाही, परंतु गणवेषासारखा. पाठकांना लोटून दोघे आत शिरतात. ]

**पाठक :** ( चिडलेले, घाबरलेले ) : कोण ?.कोण तुम्ही ? कोण पाहिजे ?

**बंदूकवाला** · चला, आमच्यासंगं चला ! घरात कोन हाय आनखी ?

**पाठक :** अहो, पण—हे आहे काय ?—तुम्ही दरवडेखोर की—

**बंदूकवाला :** चला, चला. लौकर चला ! आत कोन हाय ?

**पाठक :** पण—पण—

[ आतून सौ. पाठकांचा आवाज : 'कोण आहे हो ?' पाठक आतल्या दिशेनं पाहतात, बंदूकवाल्याकडे पाहतात. 'ततपप' करीत हातवारे करतात. सौ. पाठक झोपाळू मुद्रेने दरवाज्यात येतात. काही क्षण दृश्याकडे पाहत राहतात. ]

**सौ. पाठक :** ( भयचकित मुद्रेने पाठकांकडे धावून जात ) : आई–ग अहो—

**बंदूकवाला :** ( पाठकांना ) : तुमी चला आमच्यासंगं (सौ. पाठकांकडे पाहून) आणि बाई आमी गेलो म्हंजी तुमी गुपचूप आत जा. कुठं भायेर जायला बघू नका, आरडाओरडा करू नका !

**सौ. पाठक :** ( खांदे धरून पाठकांना मागे ओढीत ) : अहो—अहो—

**बंदूकवाला :** ( पुढे सरसावीत ) : चला लौकर.

**पाठक :** पण—पण—अहो पण असं पायजम्यातच ? मला कपडे तरी बदलू द्या.

**बंदूकवाला :** काय जरूर नाय खरं म्हंजी कपडे बदलन्याची...पण बदलायचं म्हनता तर जावा, चट्‌दिशी बदलून या. [ 'ततपप' करीत पाठक

आत जातात. त्यांच्यामागून सौ. पाठक जातात. आतून सौ. पाठक प्रार्थना म्हणत असल्याचा आवाज येतो. ]

**बंदूकवाला :** ह्या बिल्डिंगीत समदं लिवनारंच हाईत जनू ?

**स्टेनगनवाला :** व्हय, एकून एक लिवनारं ! सरकारनं लिवनाऱ्यांसाठीच दिली व्हती ही जागा.

**बंदूकवाला :** मायला, मस्त हाय लिवनाऱ्यांचं !

**स्टेनगनवाला :** हाय कसचं—हुतं म्हन, आता संपली मस्ती !

**बंदूकवाला :** खरं हाय तुजं. पण काय काय रं, ह्ये लिवनारे येवढं काय लिवत्यात—साळेची बुकं लिवत्यात का ?

**स्टेनगनवाला :** छ्या, आसलं फालतू नाय लिवत ही मानसं !

**बंदूकवाला :** मंग काय, पेप्रातविप्रात लिवत्यात ?

**स्टेनगनवाला :** छ्या, पेप्रात बी न्हाई लिवत ही लोकं. एकदम मोटं मोटं—कविता–कादंब्री आसलं कठीन कठीन लिवत्यात ही भोसडीची.

**बंदूकवाला :** आन ते वाचतंया कोन ?

**स्टेनगनवाला :** आस्तात यांच्यावानीच वाचनारी मानसं.

**बंदूकवाला :** पण त्ये वाचून फायदा काय ?

**स्टेनगनवाला :** टाइमपास हुतोय.

**बंदूकवाला :** टाइमपास करायचा तऽ पिक्चर बगायचा !

**स्टेनगनवाला :** पिक्चरबिक्चर न्हाई पुरत ह्येस्नी, ह्यंना आनखी काय काय आइनिडं लागतंया, ह्यंची डोस्की लई विलेक्ट्रिकवाली आसत्यात ना ?

**बंदूकवाला :** ह्या लिवनाऱ्यांस्नी काय म्हणत्यात रं—काय तरी एक सब्द हाय—

**स्टेनगनवाला :** ल्येखक म्हणत्यात—ल्ये–ख–क.

**बंदूकवाला :** ल्येकाक ?

**स्टेनगनवाला :** ल्येकक न्हवं—ल्ये–ख–क.

**बंदूकवाला :** ल्ये-खा–क—ल्येखाक. ल्येखाक थूत् तिच्यायला ल्येखाकाच्या !

**स्टेनगनवाला :** ( टेबलाच्या दिशेने अंगठा उडवून ) : बग, लिवतच वसला हुता ह्यो ल्येखक.

**बंदूकवाला** ( टेवलाकडे पाहून ) : मायला, हयें लिवनारे काय चोवीस घंटे लिवतच असत्यात का काय ? तिकडं आतमंदी बायकू तळमळतीय गादीवर आन हयो वसलाय हिकडं प्येन हातामंदी कवळून !

[ स्टेनगनवाला टेवलाकडे जातो, कागदांवर ठेवलेलं पेन उचलतो. ]

**स्टेनगनवाला** : प्येन फस्क्लास दिसतंया !

[ स्टेनगनवाला वंदूकवाल्याला पेन दाखवतो, हसतो आणि टोपण लावून पेन खिशाला लावतो. मग वरचा कागद उचलतो, न्याहाळतो. ]

**बंदूकवाला** : काय लिवलंय ?—समजतं का नाय ? तू चार यत्ता शिकल्याला हाईस ना ?

**स्टेनगनवाला** : झ्याट समजत नाय भैंचोद ! ह्या लोकांची भासा आपली नाय—आर्धे शब्द विंग्रजी आन अर्धे सौंस्कृत !

[ स्टेनगनवाला कागद खाली ठेवतो आणि पुन्हा दाराकडे येतो. ]

**बंदूकवाला** : ओऽ लिवनारे, चला हो लौकर ! काय प्यांट घालताय का लुगडं नेसताय ?

[ पाठक आतून 'आलो, आलो' ओरडतात. ]

**स्टेनगनवाला** : कशापायी पाठिवलं आपल्यास्नी ह्या ल्येखकांच्या बिलडिंगीत ? लई वैताग मानसं हाईत !

**बंदूकवाला** : तरी हयो बरा दिसतोय. आपसूक येनारसं दिसतंया. त्या अदुगरच्यानं लई तरास दिला. वडून न्येताना दमछाक झाली बाबा आपली !

**स्टेनगनवाला** : आता हयो माळा संपवून आपल्यास्नी वरल्या माळ्यावरबी जायचं हाय, राव ! लई वेळ हुनार रुमदं संपेस्तोवर !

**बंदुकवाला** ( आतल्या खोलीत डोकावून ) : वा:, महाराज ? प्यांट घालून झाली न् नुसते बसून -हायलाय ! फुकाचा वेळ काढताय आं ?

**पाठक** ( बाहेर येतो ) : नव्हे, नव्हे—आलो—पण—

[ पाठक प्रत्येक पाऊल टाकीत बाहेरच्या दरवाज्याकडे जातात. बंदूकवाला त्यांच्या मागोमाग येतो. सौ. पाठक आतल्या खोलीच्या दरवाज्यात येऊन उभ्या रहातात. चालता चालता पाठक उजवीकडल्या आपल्या टेबलाकडे पाहतात. टेबलाकडे जातात. टेबलावरचे

कागद उचलतात. ]

**पाठक** : (बंदूकवाल्याकडे वळून) अहो, पण कथा—ही कथा अपुरीच राहिली आहे!—अगदी सुंदर जमत आली होती—पुरी होत आली होती खरं तर—पुरी झालीच असती एवढ्यात—म्हणजे—म्हणजे मी काय म्हणतो—की लौकर परत यायला मिळेल नं?—म्हणजे—म्हणजे— अहो, अकारणच कथा होणाराहे ही! (खुशामती मुद्रेने हसतात.) अशी कथा खूप काळ जमली नव्हती मला—फर्स्ट क्लासच—म्हणजे 'सर्वोत्कृष्ट दिवाळी कथां'मध्ये नक्कीच समाविष्ट होईल ही—खात्री आहे माझी!—म्हणजे— म्हणजे मी काय म्हणतो— तुम्ही हे कन्सिडर केलं पाहिजे—लक्षात घेतलं पाहिजे—म्हणजे—मी—

**बंदूकवाला** : (पाठकांना बंदुकीने ठोसून) चला, चला झटादशी!

**पाठक** : (कागद टेबलावर ठेऊन) हो—हो— (बाहेरच्या दरवाज्याकडे पावलं टाकतात, मधेच थांबतात, पँटच्या पाठीमागे हात लावतात. बंदूकवाल्याकडे वळून)—अहो—अहो, माझी—माझी पँट खराब झालीये हो! खरोखर!— बदलून येऊ का? प्लीज—

**बंदूकवाला** : (मोठ्यानं पण ओटक हसून) काय भेंचोद कटकट हाय!... जावा, झटादिशी बदलून या. दोन मिन्टांत आला तर ठीक, न्हायतर हितनंच आतमंदी गोळी झाडीन!

[ पाठक घाईघाईनं, अवघडल्या चालीनं आत जातात. ]

**बंदूकवाला** : (स्टेनगनवाल्याकडे वळून) बग तुजा लिवनारा— भोसडीच्यानं प्यांटीतच लिवून टिवलं की!

[ पँट बदलून बटणं लावीतच पाठक बाहेर येतात. बाहेरच्या दरवाज्याकडे पावलं टाकतात. ]

**पाठक** : (सौ. पाठकांकडे वळून) अग — अग, तू — (बंदूकवाल्याकडे वळून) पण—पण—

[ बंदूकवाला पुन्हा पाठकांना ढोसतो. पाठक अडखळत पाऊल बाहेर टाकतात. पडदा पडतो. ]

## प्रवेश ४

[ मोठी खोली. ‘साहित्य-सदन’मधील प्रवेशाच्या नेपथ्यापासून वेगळेपणा जाणवावा. अगदी उजवीकडे लोखंडी खाट. त्याजवळ एक सूटकेस. अर्धवट उघड्या झाकणाखाली उस्कटलेले कपडे दिसताहेत. डावीकडे टेबल-खुर्ची. खोलीत सिगारेट ओढीत नितीन साळवी येरझारा घालतो आहे. मधेच टेबलापाशी बसतो, समोरचा कागद उचलून त्याकडे पाहतो, त्यावर एक ओळ लिहितो, उठतो, पुन्हा येरझारा घालतो, पुन्हा टेबलावरचा कागद उचलून उभ्या-उभ्याच न्याहाळतो. दारावर घंटी वाजते. ‘कोण आहे?—साळवी मान वर न करता म्हणतो. ‘मी आहे’, बाहेरून आवाज येतो. साळवी उठून दरवाजा उघडतो. सतीश आत येतो. भांबावलेला आविर्भाव. साळवी परत येऊन खुर्चीवर बसतो. व्यग्र मुद्रेने पेन हातात घेतो. सतीश हळूहळू आत येतो. साळवीच्या मागे उभा राहून त्याच्याकडे पाहत राहतो. ]

**सतीश :** ( थोडं अडखळून, पण न राहवून ) कमाल आहे तुमची, साळवी! बाहेर शहरात, देशात एवढी उलथापालथ होतेय अन इथं तुम्ही एकचित्त होऊन कविता लिहिताय! खरोखर हाडाचे कवी आहात तुम्ही, साळवी!

**साळवी :** ( पेन खाली ठेवून मागे रेटता आणि हसता ) अरे सतीश, अस्सल कविता लिहून होते ती अशाच वेळी!—जेव्हा बाहेरच्या जगाचे ताण, दबाव पराकोटीला जातात, निकरावर येतात, तेव्हा खरी, जिवंत कविता घडते!...बरं, काही हालहवाल कळली का?

**सतीश :** एकंदर परिस्थितीचा अजून तसा काही अंदाज लागत नाही. पण मोठी बातमी कळला—

**साळवी :** कोणती?

**सतीश :** साहित्य-सदनची!

**साळवी :** साहित्य-सदनची?

**सतीश :** मी ऐकलं की काल रात्री दादा चौधरीची माणसं साहित्य-सदनात घुसली. तिथल्या सर्व साहित्यिकांना त्यांनी ताब्यात घेतलं, ट्रकात

घातलं—अन आज पहाटे साऱ्यांना गोळ्या घालून ठार मारलं!

**साळवी :** (खुर्चीवरून उठून) काय म्हणतोस काय?

**सतीश :** होय. विश्वसनीय माणसाकडून मिळालेली बातमी आहे.

**साळवी :** सगळ्या साहित्यिकांना पकडलं—आणि गोळ्या घातल्या? छे रे, पकडलं असेल—आणि तुरुंगात टाकलं असेल. गोळ्या घातल्या हे कशावरून?

**सतीश :** नाही, गोळ्या घातल्या. मला बातमीविषयी खात्री आहे.

**साळवी :** सगळ्याच्या सगळ्या साहित्यिकांना? गुड गॉड!

**सतीश :** दोघेतिघे घरी नव्हते म्हणे. बाहेरगावी गेले आहेत. पण त्यांनाही धरतील आल्यावर. ते तरी कुठं जाणार? येतील परत—किंवा सापडतील कुठंतरी. फॅमिली आहे ना प्रत्येकाची.

**साळवी :** साहित्य-सदन खतम—वाइप्ड आउट! माय गॉड!....(मोठ्यानं, हिस्टेरिकली हसत) सतीश, तुझ्या लक्षात आली का गंमत?—अरे, मी वाचलो! मी वाचलो! कल्पना कर, साहित्य सदनमध्ये जर त्यांनी मला जागा देऊ केली असती, जर मी तिथं राहत असतो—तर आज माझा मुडदा पडला असता, सतीश! हाः हाः—(आपल्याशीच हसत) काय गंमत आहे पाहा—तिथं जागा मिळवायला मी कोण आटापिटा करीत होतो—पण मला बाहेर पडावं लागलं—मी हरलो—अन म्हणूनच मी आज वाचलो! मी हरलो, म्हणून मी जिंकलो! हाः हाः—(एकदम खाली बसतो. त्याचा मूड बदलतो. हळव्या आवाजात) पण सतीश, खरंच का रे हे? खरंच साऱ्यांना मारून टाकलं? छेः. भयंकर, भयंकर! एवढे सगळे साहित्यिक—ते काही वैरी नव्हते रे माझे—आणि हुपरीकरांसारखी भली माणसं—(भावनावेगाने) छे, पोटात ढवळून येतं—

**सतीश :** (साळवीच्या खांद्यावर हात ठेवून) : साळवी—साळवी—

**साळवी :** (काही क्षणांनी) : ठीक आहे रे मी—शॉक बसल्यानं तोल गेल्यासारखं झालं माझं काही मिनिटं—

**सतीश :** तरी आणखी सांगायचं राहिलं आहे—

**साळवी :** म्हणजे?

**सतीश :** केवळ साहित्य-सदनवरच नाही त्यांनी धाड घातली, बाजूच्या पत्रकार सदनवरही ते गेले. तिथं त्यांनी सगळ्यांना नाही लिक्विडेट केलं. दादा चौधरीला पाठिंबा देणारे काही पत्रकार आहेत, त्यांना सोडलं. बाकीच्यांना उडवलं.

**साळवी :** असं आणखी कुठे कुठे, कुणाकुणाला त्यांनी उडवलं असेल कोण जाणे.

**सतीश :** पण साळवी, मला हे नीट उमजत नाही—या दादा चौधरीचं साहित्यिक वगैरेंविरुद्ध काय आहे ? अशा लोकांवर याचा एवढा राग का ?

**साळवी :** अरे, प्रथमपासूनची त्याची वक्तव्यं पाहिली, त्याची एकंदर चळवळ, त्याचं 'फॉलोइंग' पाहिलं, तर त्यात एक मुख्य सूत्र दिसून येतं—सर्व प्रकारच्या बुद्धिजीवी वर्गाविषयी तिरस्कार, चीड. आपण ज्याला कल्चर वगैरे म्हणतो ते सर्व त्याला, त्याच्या अनुयायांना अर्थशून्य, जाळून टाकण्याच्या लायकीचं वाटतं. बुद्धिजीवी वर्ग त्याला धोक्याचा वाटतो— आणि ते रास्तही आहे. वरवर निरुपद्रवी, दुबळा वाटला तरी हा वर्ग समाजव्यवस्थेवर एक अदृश्य पकड राखून असतो. ते सारं दादा चौधरीला उद्ध्वस्त करायचं आहे. हेही त्याचं एक खास 'अपील' होतं, आवाहन होतं. खेड्यापाड्यांतील अशिक्षित, कंगाल आणि म्हणून संस्कृतीशी नावाचाच संबंध असलेली माणसं त्याच्या मागं उभी राहिली; त्याच खेड्यांमधून शहरात येऊन झोपडपट्ट्यांमध्ये राहणारी माणसंही त्याच्या 'प्रोग्रॅम'कडे आकर्षित झाली. आता पाहिलंस ना— केवढ्या झटदिशी त्याच्या सैन्यानं शहराचा ताबा घेतला. आपणही अशी बेसुमार माणसं इथं झोपडपट्ट्यांमध्ये येऊन राहू दिली; त्यावेळी आपल्या तथाकथित उच्चवर्गीय, 'रूलिंग क्लास'च्या लक्षात आलं नाही एके दिवशी आपल्याविरुद्ध उठणारं एक प्रचंड सैन्य आपण इथं येऊ देत आहोत !

**सतीश :** पण हे इतक्या थराला जाईल असं वाटलं नव्हतं. असलं काहीच पूर्वी घडलेलं नव्हतं.

**साळवी :** ( हसून ) देअर इज ऑलवेज अ फर्स्ट टाईम ! आणि असं पहा,

सतीश, आपण मध्यमवर्गीय लोक अशा एका सुरक्षित, घरगुती जगात वाढतो की असल्या एक्स्ट्रीम उलथापालथी आपल्याला खऱ्याच वाटत नाहीत. आपल्या देशात हे विशेषकरून असं आहे परंतु कधी तरी आपल्यावरही बाँब पडतोच. बाँब पडावेत ते नेहमी दुसऱ्या, दूरच्या किंवा आजूबाजूंच्या देशांवरच, असं काही आहे की काय?... मला आठवतंय, मी आफ्रिकेत शिकवीत होतो ना नायजेरियामध्ये, तेव्हा कांगोमध्ये एक उठाव झाला होता. त्या बंडखोरांनी सर्व सुशिक्षित माणसांना ठार करायला सुरुवात केली ! बूट-टाय वापरणाऱ्या, इंग्रजी बोलता येणाऱ्या सर्वांची कत्तल ! सारा सुशिक्षित वर्ग त्यांना नामशेष करायचा होता... इथं निदान तेवढं एक्स्ट्रीम नाहीये. फक्त साहित्यिक, विचारवंत वगैरे टळक लोकांना ते नामशेष करू पहात आहेत.

**सतीश :** भयंकर आहे हे सारं...

**साळवी :** ( विचारात गुंतल्याप्रमाणे ) हं... भयंकर....

[ साळवी स्वतःशीच विचार करीत बसतो. सतीश अस्वस्थपणे फेऱ्या मारतो ]

**सतीश :** साळवी—साळवी—तुमच्या एक लक्षात आलं का ?

**साळवी :** काय ?

**सतीश :** त्यांनी साहित्य-सदनामधल्या साऱ्या साहित्यिकांची कत्तल केली ..

**साळवी :** तर मग ?

**सतीश :** म्हणजे हे उघड आहे की ते तेवढ्यावरच थांबणार नाहीत इतरही साहित्यिकांना ते निकालात काढणार.... तुम्ही साहित्य सदनात नव्हता म्हणून वाचलात... परंतु आता ते तुमच्या मागावर कशावरून येणार नाहीत ?

**साळवी :** ( शांतपणे, विचारी मुद्रेने ) त्या विषयीच मी विचार करीत होतो, सतीश ! ती गोष्ट केव्हाच माझ्या लक्षात आली. काय करावं, याचा मी विचार करतो आहे...मी इथ तुझ्याकडे राहतो, हे खूप लोकांना ठाऊक आहे. इथं मी सुरक्षित नाही.

**सतीश :** तुम्ही भूमिगत व्हा.

**साळवी :** ते तरी किती काळ करणार? आणि आपल्याला ते कठीणच जाणार. आपण काही राजकारणी किंवा मुरलेले क्रांतिकारक नाही.

**सतीश :** काही दिवस तरी ते जमायला हरकत नाही. आणि आत्ता, या घडीला त्याची निकड आहे, नाही का?

**साळवी :** हं...तरी बरं, मी रंजनाला आणि छोटूला मावशीकडे पाठवून दिलं आहे. मला झटपट हालचाली करता येतील... ( विचारात गढतो. )

**सतीश :** मला वाटतं, तुम्हाला वेळ न दवडता हालचाल करावी लागेल.

**साळवी :** खरं आहे, सतीश. पण मी पुढचाही विचार करतोहे. पुढं काय?.... माझ्या मनात येतंय की आता देश सोडूनच जावं. अमेरिकेला जावं. देशातून निसटणंही आता सोपं नाही म्हणा. खोटा पासपोर्ट वगैरे वापरावा लागेल...

**सतीश :** ते जमलं तर ठीकच.

**साळवी :** ( स्वतःशीच हसून ) यू नो, सतीश, मी हे पूर्वीपासून म्हणत असे— की कुठल्याही देशात राहणाऱ्या माणसानं त्या देशातून केव्हाही आपल्याला बाहेर पडता येईल याची व्यवस्था पाहून ठेवावी. म्हणजे अमेरिका, इंग्लंड फ्रान्स या सारखे दोन चार देश सोड; पण बाकीच्या देशांमध्ये राहणाऱ्या माणसानं हे एक पहावं—की गरज उद्भवताच तातडीनं आपल्याला देश सोडून जाता येईल. आजकाल कुणालाही स्वतःच्या देशाची गॅरंटी देता येणार नाही.

**सतीश :** पण असं गरज भासताच उठून परदेशी जाणं सगळ्यांना कसं शक्य व्हावं?

**साळवी :** नाही ना. सगळ्यांनाच ते शक्य नाही. इन फॅक्ट फारच थोड्या लोकांना ते शक्य आहे. पण आपल्यासारख्या सुशिक्षित, उच्चभ्रू, प्रिव्हिलेज्ड क्लासमधल्या लोकांना ती एक ॲडव्हँटेज आहे. देशात जगणं अगदीच मुष्किल झालं, तर काही करून परदेशचं विमान पकडता येतं. आता माझ्यापाशी थोडाफार पैसा आहे, अमेरिकेत कॉन्टॅक्ट्स आहेत, म्हणून मला हे शक्य होऊ शकतं.

**सतीश :** काय विचित्र आहे हे! तुम्ही एक प्रसिद्ध नावाजलेले लेखक—

आणि म्हणूनच तुमच्यावर आज ही पाळी आलीये ! उलट माझ्या-सारख्या सामान्य, अप्रसिद्ध माणसाला तसा विशेष धोका नाही. म्हणजे प्रसिद्ध असणं, काहीतरी अचीव्हमेंट असणं, हेच तुमचा जीव धोक्यात आणतंय !

**साळवी :** होय, सतीश, हीही आज अनेक देशांमधली वस्तुस्थिती आहे. आपण वर यायला, नाव मिळवायला धडपडतो. परंतु त्यापायीच आपण धोका वाढवीत असतो. प्रसिद्ध राजकारणी, भांडवलदार वगैरे असणं तर सोडाच; पण प्रसिद्ध प्राध्यापक, विचारवंत, लेखक, कलावंत वगैरे असणंही धोक्याचं आहे. जेवढे तुम्ही अधिक प्रकाशझोतात येता तेवढा तुम्ही टार्गेट बनण्याचा—लक्ष्य बनण्याचा धोका अधिक. तुमची राजकीय मतं वगैरे काय, याला विशेष महत्त्व नसतं. तुम्ही कोणत्याही मताचे असला किंवा कोणत्याच मताचे नसला, तरीही तुम्ही टाचेखाली सापडू शकता...तुला एक सांगतो, सतीश, तू कोणत्याही अचीव्हमेंटचा, नावलौकिकाचा हव्यास धरू नको. सध्या जसा बँकेतला एक सामान्य कारकून आहेस, तसाच राहा. वर येणे, नावलौकिक मिळवणे म्हणजे स्वतःला अधिक धोक्यात टाकणं.

**सतीश :** छे:, काय हे आपलं जग !...साळवी, माझी केवढी आकांक्षा होती तुमच्यासारखा मोठा कवी होण्याची ! ( शेल्फवरची एक वही उच-लतो. )—या माझ्या कविता—तुम्ही आस्थेनं वाचल्यात, फेरफार सुचवलेत, काही फार चांगल्या आहेत म्हणालात—मी या रिव्हा-ईज करणार होतो, संग्रह नावाजला जाईल अशी माझी उमेद होती—मला आणखी खूप लिहायचं होतं—साहित्याच्या जगात स्थान मिळवायचं होतं—नाव मिळवायचं होतं—आता—आता—आता—

**साळवी -** सतीश, हे सगळं विसर आता. अरे, त्यांनी साहित्य-सदनातले साहित्यिकच केवळ खतम नाही केले; साहित्याचं घरच कोसळून पडतंय. साहित्याचं, विचारांचं, तथाकथित संस्कृतीचं घर वाळूवरच बांधलेलं असतं म्हणा. कधीही पत्त्यांच्या बंगल्यासारखं ते ढासळून पडू शकतं.

**सतीश :** ( हातातल्या वहीकडे पाहत ) आता काय करायचं याचं—काय अर्थ आहे या सगळ्याला आता—

**साळवी :** तर सतीश मी निघण्याच्या तयारीला लागतो. उगीच वेळ दवडण्यात अर्थ नाही. माझं सामान काही विशेष नाहीच आहे. ही बॅग भरली की झालं. आजची रात्र एका दूरच्या नातेवाईकाकडे काढतो. आता असंच इकडेतिकडे....

[ साळवी सूटकेस उघडतो. खोलीतले, आतच्या खोलीतले कपडे आणून भरतो. कागदपत्र भरतो. उभा राहून सतीशकडे पाहतो. ]

**सतीश :** घेतलं सगळं ?

**साळवी :** ( टेबलाकडे बोट दाखवून ) ती पुस्तकं आहेत, ती राहू दे तुझ्याकडे. ती घेऊन जाणं कठीण जाईल. आता काय पुस्तकांना अर्थ म्हणा...

**सतीश :** ( भावनावेगाने ) तर तुम्ही जाणार आता, साळवी ! तुम्ही माझ्या इथं राहायला आलात याचा मला मोठा आनंद आणि अभिमान वाटतो. तुमचा सहवास लाभला हे माझं भाग्य ! आणखी काही काळ राहिला असता तर छान झालं असतं, पण....

**साळवी :** निघतो मी, सतीश.

**सतीश :** गुडबाय, कॉन्टॅक्ट ठेवा !

**साळवी :** ठेवीन ना...बाय.

[ साळवी जातो. सतीश एकदोन येरझारा घालतो. स्वतःच्या कवितांची वही उचलतो. तिच्याकडे पाहतो. पानं उलटतो. काही वेळानं वही फेकून देतो. पुन्हा येरझारा घालतो. मग खाटेवर पडतो, डोक्यामागे हात ठेवून, डोळे आढ्याकडे लावून. स्टेजवरचा प्रकाश हळूहळू अंधूक होतो. मग दारावरची घंटी वाजते. सतीश पलंगावर उठून बसतो, दाराकडे पाहत राहतो. दारावर जोराने थाप वाजते आणि मग जड वस्तूने ठोकल्याचा आवाज. पडदा पडतो. ]

• • •

# लकवा

*

मनोहर शहाणे

•

पात्रे

तो – वय ३०

प्रभाकर – वय ३०

महाविद्यालयीन विद्यार्थी – एकूण ५–६.

वेळ सुमारे ४५ मिनिटे.

[ चित्रपटगृहाच्या पिछाडीचा भाग. तिथूनच पुढं थिएटराच्या मुत्री- कडे रस्ता जातो. चित्रपटाची मध्यंतराची घंटा वाजते व लगेच गृहात जाण्याची तबकडी लागते. आजूबाजूचे आवाज व हालचाली यांनी तो भाग गजबजून उठतो. 'खारे दाणे', 'शेंग', 'काकडी' वगैरे आरोळ्या सुरू होतात. प्रेक्षकांचा लोंढा मुतारीकडे जाऊ लागतो. त्यातच एक प्रभाकर. त्याच्या चेहऱ्यावर चित्रपटाच्या एंजॉयमेंटचे भाव.

समोर साधारण मध्यभागी थेटराचा मागचा, वापरात नसलेला एक जिना. त्या जिन्याच्या जमिनीवरील तबकडीत लकवा झालेला तिशीचा एक माणूस. तो असहाय्य, दुबळा, लाचार व दरिद्री. मळकट–कळकट अंथरुण-पांघरुणात अर्धवट बसलेला, अर्धवट झोपलेला. मध्यंतरानंतरची घंटा होईतो मुतारीकडे जाणारे–येणारे जातात–येतात. ]

**तो** : प्रभाकर, प्रभाकर—

[ प्रभाकर आपल्याच नादात. ]

ए प्रभाकर—

[ तरी प्रभाकरचं लक्ष नाही, चढत्या सुरात– ]

प्रभे ऽऽ

[ मग मात्र चालता प्रभाकर त्या संबोधनानं दचकतो. हाक ऐकली की भास, या संभ्रमात तो एके जागी उभा राहतो. त्याच्याकडे न पाहता— ]

प्रभे ऽऽ

[ प्रभाकर आजूबाजूला पाहतो. 'तो' कष्टानं आपला हात उचलून प्रभाकरला हाकेची जागा दाखवतो. ]

मी–मी–हाक मारलीय.

[ प्रभाकर गोंधळून त्याच्याकडं क्षण–दोन क्षण बघतो. त्याच्याकडं जावं की न जावं याचा विचार करतो. नाही जायचं ठरवून पुढं

चालू लागताच— ]

प्रभेऽ, माझी शपथ आहे तुला.

[ प्रभाकर थबकतो. ]

इकडे ये.

[ दुर्लक्ष करून प्रभाकर आपल्या वाटेनं जाऊ लागतो. ]

प्लीज.

[ प्रभाकर नाइलाजानं व थोड्या रागानं त्याच्याकडं जातो. ]

**प्रभाकर :** ( रागावून ) काय रे, माझं नाव....तुला कसं ठाऊक ?

**तो :** समजेल तुला हळूहळू, कसं ते.

**प्रभाकर :** कशाला हाक मारलीस ?

**तो :** तसं काही नाही. सहज.

**प्रभाकर :** सहज ?

**तो :** हो, अगदी सहज.

**प्रभाकर :** सहज असेल तर मी निघतो.

**तो :** सहज आणि मुद्दामही.

**प्रभाकर :** मुद्दाम का ?

**तो :** थोडं काम होतं.

**प्रभाकर :** तुझं आणि माझ्याकडं ?

**तो :** हो. माझं आणि तुझ्याकडं.

**प्रभाकर :** ( थोडा विचार करून ) हं आलं लक्षात. ( खिशात हात घालून दहा पैशाचं नाणं काढतो व त्याच्या अंगावर फेकतो. ) सॉरी, मी एवढंच देऊ शकेन.

**तो :** ( ते नाणं परत फेकून देत ) : तुला मी भिकारी वाटतो ? माझा अपमान करतोयस तू !

**प्रभाकर :** भिकारी नाहीयेस ? मग तू कोण आहेस ? छ्या ( त्याचं काही क्षण निरीक्षण करून ) ही–ही सगळी भिकाऱ्याची लक्षणं दिसताहेत. एखादा आंधळा माणूसही डोळे मिटून सांगू शकेल. दाढी वाढलेला खपाटी गेलेला तुझा चेहरा, हे डोक्यावरचे, तेल नसलेले, अस्ताव्यस्त केस, अंगावरचे मळके फाटके कपडे, ही घाणेरडी अंथरुणं-पांघरुणं–

तो : ( रागावून ) बस—बस आलं तुझं वर्णन !

प्रभाकर : का ? मी बोलणारच.... झालंच तर, ही अंथरुणंपांघरुणं व तुझे अंगावरले कपडे किती दिवसांत धुतले नाहीस रे ? आणि आंघोळ ? गेल्या वर्षी तरी केली होती का ? जगामध्ये सावण नावाची एक वस्तू आहे व ती स्वच्छता राखण्याच्या कामी फारफार उपयोगी पडते, हे तुला ठाऊक तरी आहे का ?—निश्चित नसणार ! आणि मग, त्या त्या राष्ट्राची संस्कृती, त्या राष्ट्रात साबणाचा किती वापर होतो यावरनं ठरवली जाते; त्या—त्या दृष्टीनं तू म्हणजे आपल्या हिंदुस्थानावरील मोठा कलंक आहेस. आता या तुझ्या सर्व घाणेरड्या कपड्यांत उवा किती आहेत याची मोजदाद करायला खंदा आकडेशास्त्रज्ञ आणावा लागेल !

तो : बस म्हणतोय ना ! किती तोंड चालवतो आहेस रे !

प्रभाकर : च्यायला ! कमाल आहे ! तू कोण, कुठला—भिक्कारडा—खुशाल मला दरडावतो आहेस ? हा कुठला न्याय ? अं ? ( थोडं हसतो. ) भारतातले सगळे भिकारी माजोर झालेहेत ! बरोबर आहे, ते होणारच ! कारण त्यांच्याकडं गमवायला काय असतं ? त्यांचं काय चोरीला जाणार ? चिरगुटं ? चिंध्या ? काय उपयोग ! ढुंगण पुसायच्याही लायकीच्या नाहीत त्या ?

तो : ( थोड्या अभिमानानं ) मी भिकारी नाहीये ! ( चिडून ) खरंच ! मी भिकारी नाहीये !

प्रभाकर : भिकारी नाहीयेस तर मग तू आहेस तरी कोण ? ( थांबून, स्वतःशी मान हलवत ) छे ! छे ! दुसरा तू कुणी असणं शक्यच नाहीस. दुसरा तू कुणी असतास तर इथं येऊन कशाला कडमडला असतास ? या—या—थेटरच्या पिछाडीला ?... आणि—आणि... या मुतारीजवळ ? ( छद्मी ) पाहिलंस ? ( मुतारी निरखून वर्णन ) मुतारीची ती पांढरीशुभ्र भिंत ! त्या भिंतीपलीकडं उभे चौकोन आहेत. खाली पांढऱ्या पादुका—(हसून) रामानं भरताला दिलेल्या नव्हेत बरं का ! आणि चौकोनाच्या तीनही भिंती जॉन्सन टाइल्सच्या—पांढऱ्या पांढऱ्या—चकचकीत ! (खाली वाकून आरशात पाहिल्याप्रमाणं )

चक्क आपला चेहरा आरशात पाहिल्याप्रमाणं दिसतो. (पाहून, खिशातील कंगवा काढून भांग पाडतो.)

[ त्याचे हे चालू असता, अंथरुणानला 'तो' अगोदर हळूहळू व नंतर चढत्या भाजणीनं हसत सुटतो. त्याचं वाढलेलं हसणं ऐकून बोलणारा प्रभाकर आपलं भांग काढणं थांबवून त्याच्याकडं पाहायला लागतो. ]

काय झालं हसायला ?

[ हसण्याच्या आवाजात तो काही शब्द उच्चारतो. ते प्रभाकरला नीट ऐकू येत नाहीत. ]

नीट बोल तरी—

[ पुन्हा त्याचा पहिल्याप्रमाणेच प्रयत्न. ]

( चिडून ) तू एक तर हसून तरी घे, नाहीतर बोल तरी. दोन्हीची भेसळ करू नकोस.

[ मग त्याचं हसणं कमी कमी होत बंद होतं. काही क्षण शांतता. ]

आता मला सांग, मघा तू काय म्हणत होतास ?

**तो** : तू बदललायस—

**प्रभाकर** : बदललो ?

**तो** : तू फार—फार सुधारलायस—

**प्रभाकर** : म्हणजे ?

**तो** : तू पूर्वी फार—फार शामळू होतास. म्हणजे—काय म्हणावं बरं ! ( विचार करतो. सोडून देतो. ) नेहमी चाचरत फिरायचास-तुझं बोलणं लहान पोरासारखं बावरलेलं, घाबरट. ( त्याप्रमाण थोडे बोलून दाखवतो. ) हे असं ! बोलताना-चालताना तुला बिलकूल आत्मविश्वास नाही. असं वाटायचं की, तू कुणाच्या तरी पंखाच्या सावलीच्या शोधात आहेस- आणि—आणि—

**प्रभाकर** : ( औत्सुक्यानं, थोडया भीतीनं ) : बोल-पुढं बोल—

**तो** : आणि तू कोवळा पोरीसारखा दिसायचास. ओठांवर फक्त पातळ लव—

**प्रभाकर** : ( ते पटूनही, धुडकावण्यासाठी ओरडून ) नाही— तू— ( त्याला पुढं काही ठाम बोलायचं असलं ) तू खोटं बोलतोयस— ( पण

त्याचा आत्मविश्वास उतरणीला लागलाय. अस्वस्थपणे फेऱ्या घालतो. मध्येच 'त्या'च्यावर धावून गेल्यासारखा. मधेच क्रूर, मधेच हतबल. मधेच दुबळा. पुन्हा उसन्या अवसानानं एकेक पाऊल त्याच्या दिशेनं उचलतो. )

**तो** : ( हादरून ) तू— तू...

[ त्याला पुढं काही बोलणं सुचत नाही. पण 'पैसा' प्राण्याप्रमाणं तो स्वतःशी स्वतःचं अंग गुंडाळू पाहतो. अगदी लाचार. त्याच्या सर्व हालचाली हास्यास्पद. त्या पाहून प्रभाकर जागीच थबकतो. आधी प्रभाकरला त्याचा राग. नंतर कीव. नंतर हसू. तो मनसोक्त हसतो. मांड्यात हात घालून हसतो. त्यावेळी अंथरुणातला 'तो' प्रभाकरकडं डोळे वासून पहात राहतो.

हे सगळं चालू असता, गेलेली, जाणारी माणसं या दोघांकडे लक्ष न देता जात-येत असतात. थिएटरमधील तबकडीही मंदपणे ऐकू येत असते. प्रभाकर सगळं झटकून जाऊ पाहतो, त्याचवेळी पुन्हा त्याची हाक ] प्रभेऽ–

**प्रभा.** : ( ओरडून ) चूऽऽप्!

**तो** : का चूप राहू ? मी तुला अशाच हाका मारीत राहिलो तर ?

**प्रभा.** : कारण माझं नाव प्रभाकर आहे. प्र–भा–क–र 'प्रभा' नाही. ( थोड्या कावऱ्याबावरीनं ) मी पुरुष आहे. मघापासून तू मला 'प्रभे', 'प्रभे' म्हणून का हाका मारतोहेस ?

**तो** : कारण, तुझं खरं नाव तेच आहे ! प्र–भा–, मिस प्रभा—

**प्रभा.** : ( ताडकन तोडून ) आता पुन्हा ते नाव उच्चारशील तर—

**तो** : आठव—

**प्रभा.** : काय आठवायचं ?

**तो** : कॉलेजातले दिवस. आपले कॉलेजातले दिवस. मी एम० ए०ला होतो, तूही होतास.

**प्रभा.** ( क्षणभर त्याच्याकडं पाहत राहतो. मग आश्चर्यानं, त्याला लागेल अशा टोकदार शब्दांत ) : तू–तू कॉलेजात होतास ?

[ थांबतो. 'तो' जराशानं होकारार्थी मान हलवतो. ]

तू एम्० ए० केलंयस ?

[ 'तो' ठामपणे मान उभी हलवतो. प्रभाकर त्याच्याकडं अधिक बारकाईनं पाहत ]

विश्वास बसत नाही ! तू हा असा. तू मला बनवतोहेस.

**तो** : नाही रे. प्लीज. मी खोटं बोलत नाही. ( मनात एक कल्पना चमकून ) ते जाऊ दे. मी कॉलेजात शिक्षण घेतलंय व तेही तुझ्याबरोबर. आपल्या दोघांचा विषय एकच होता.

**प्रभा.** : कोणता ?

**तो** : सायकॉलॉजी. मानसशास्त्र.

[ प्रभाकर चमकतो. त्याच्याकडं पाहतो. प्रभाकरला आता त्याची थोडी थोडी ओळख पटू लागलीहे. पण इथंच काय, पण अगदी अखेरचे क्षण सोडता, ही गोष्ट मान्य करायला तो तयार नाहीये. याउलट अंथरुणातल्या 'त्या'ला कळलंय की, प्रभाकर आपल्याला ओळखू लागलाय. हा खुंटा अधिक बळकट करण्याच्या दृष्टीनं 'तो' पुढं भराभरा बोलू लागतो. ]

एक....एक साधं लक्षण आहे ओळखायचं ! कुणी थातुर-मातुर माणूसही ओळखेल. तू म्हणतोयसना, मी एक भिकारी आहे म्हणून ? पण आतापर्यंत मी तुझ्याशी खूप बोललो. माझ्या बोलण्यात वेगवेगळे खूप शब्द आलेहेत. हे सारे शब्द, ही वाक्यं, त्यांची रचना, शब्दांचे उच्चार, बोलण्याची माझी पद्धत—( थांबतो ) तुला एखाद्या भिकाऱ्याची वाटते ? ( पुन्हा थांबतो. ) थिंक ओव्हर इट, मॅन ! आणखी म्हणायचं झालं तर—

[ मुद्दाम थांबतो, प्रभाकरला विचार करण्यासाठी वेळ द्यावा म्हणून. प्रभाकर त्याच्याकडं पाहत नुसता उभा राहिलेला आहे. ]

**प्रभा.** : ठीकाय ! ठीकाय ! तू म्हणतोस ते एक वेळ खरं मानलं, तरी त्यामुळं कुठली गोष्ट सिद्ध होणार रे ? मुळात तुला काय सिद्ध करायचं आहे ?

**तो** : ( आनंदून ) आता कसा वठणीवर आलाहेस ! ( थांबून ) आता बोलायला काही हरकत नाही. जरा आपण स्वस्थपणे बोलूया—

प्रभा. ( आपल्या घड्याळात पाहून ) : मला वेळ नाहीये. बिलकुल वेळ नाही. इंटरव्हल संपण्याची वेळ आता होईलच. आणि मला सिनेमाचा पुढचा अर्धा भाग बघायचाय. ( सहजपणाचा कृत्रिम प्रयत्न करीत ) चित्रपट अगदी झक्क आहे. झालंच तर—

तो : (तोडून) मस्त आहे खरा. मी तर दररोज पाहतो. रात्रीचा शो. चक्क आत जाऊन बसतो. ( थोडं हसून ) मला वर चढून खुर्चीवर बसता येतं हं. रात्री या थेटरला अजिबात गर्दी नसते. शिवाय मला तिकीट पडत नाही. [ कंटाळून प्रभाकर जायला निघतो. 'तो' अधिकार-वाणीनं— ] थांब— !

प्रभा. : ( रागानं बघत ) अगदी एखाद्या हुकूमशहासारखा—

तो : तुझ्या लक्षात आलं नाही ? माझा आवाजच तेवढा धड उरलाय. ( थोडं केविलवाणे ) माझ्या शरीराची काय वासलात लागलीहे ! दैवाने खैर केलीय. माझ्या आवाजाला फक्त त्यानं धक्का पोचवला नाही. डॉक्टर म्हणाले, हा मोठा चमत्कार म्हणावा लागेल. माझा पूर्वीचा रुबाब, पूर्वीचा दरारा फक्त आवाजातच उरलाय. शरीरही पूर्वीसारखं असतं ना, मी कुठच्या कुठं निघून गेलो असतो. या थेटराच्या आवारात असा पोरक्यासारखा खितपत पडला नसतो !

प्रभा. : सगळं खरं, सगळं खरं, पण माझा इथं काय संबंध ? तू मला इथं का थांबवतोयस ? ( थोडं स्वतःशी ) आणि मी तरी का थांबतोय ?

तो : मला पूर्वीच्या दिवसांत शिरायचंय. कॉलेजच्या दिवसांत. माझं हे पांगळं शरीर आणि थेटरवाल्यानं मला दिलेला आश्रय आणि माझं अनाथपण—या तीनही गोष्टी मला दिवसरात्र हैराण करतात. त्या खूपखूप वेदना देतात, त्यातून मला पळून जायचंय—

प्रभाकर : ( थोड्या सहानुतीनं व काहीतरी बोलायचं म्हणून ) थेटरवाला तुझा जवळचा नातलग दिसतोय.

तो : ( विचारात हरवलेला ) अं ?

प्रभाकर : हा थेटरवाला तुआ नातेवाईक असावा म्हणून त्यानं तुला आश्रय दिला, तरी पण हा तुझा नातेवाईक तुझा जवळचा दिसत नाही. असता तर त्यानं तुला त्याच्या घरात ठेवलं असतं, असं वाऱ्यावर

नाही.

**तो** : (उडवून लावत) असेल. असेल. (थोडं थांवून) तुला त्या प्रोफेसरांचं नाव आठवतं? आपल्याला तो सायकॉलॉजी शिकवायचा?

**प्रभाकर** : (झटकन) नाही बुवा! खरं सांगू?—मला कॉलेजातलं आता काहीही आठवत नाही.

**तो** : मला मात्र सर्व-सर्व आठवतं. थांब—तुला आठवण करून देतो.
[इतक्यात मध्यंतर संपल्याची घंटा. त्या अनुषंगाने प्रेक्षकांची धावपळ. प्रभाकरही घाईचा होतो. तो निघून जाऊ लागतो]

**प्रभाकर** : (सुटकेच्या निःश्वासात) एऽ, बेल झाली. चलतो मी, अच्छा!

**तो** : तुला जाता येणार नाही!

**प्रभाकर** : का? मी काही तुझ्यासारखा लुळापांगळा थोडाच आहे? शिवाय मी काही तुझ्या बापाचा नोकर नाही.

**तो** : मी सांगतो म्हणून तुला जाता येणार नाही. मी सांगेन तेव्हाच तू हलू शकशील.

**प्रभाकर** : अरे वा! तू कोण मला ताब्यात ठेवणारा? ना ओळख, ना देख.

**तो** : मला तू पूर्ण ओळखलं आहेस. उगाच नखरे करू नकोस. (हसतो. थांवून, रोखून पाहत) प्रभे ऽ
[प्रभाकर अस्वस्थ.)
प्रभे ऽ
[प्रभाकरची तळमळ, तडफड.]
प्रभे ऽ
[प्रभाकरच्या जिवाची काहिली.]
प्रभे—मुलांचं होस्टेल—खोली क्रमांक तेवीस....
[प्रभाकरच्या उलघालीचा उत्कलनबिंदू. 'तो' इकडं हसायला लागतो. त्याचं एंजॉयमेंट. भावनिक प्रक्षोभ सहन न होऊन प्रभाकर वेगानं खाली बसतो. डोकं धरतो. मागच्या—कॉलेजच्या आठवणी त्याचा कब्जा घेतात. रडायच्या बेतात. आणि त्याची ही अवस्था पाहून अंधरुणातल्या त्याला हसू फुटत राहतं.]
आता बरोबर तुला पाहिजे ती नस सापडली म्हणायची! माणसानं

कसं, आपण प्रत्यक्ष असतो त्याप्रमाणं असायला हवं. ( थांवून ) आता मुकाट्यानं सांग पाहू—

**प्रभाकर :** ( पडल्या आवाजात ) काय सांगू ?

**तो :** त्या प्रोफेसराचं नाव. आपल्याला एम्० एला सायकॉलॉजी शिकवायचा. आणि माझ्यावर नेहमी खार खायचा तो.

**प्रभाकर :** ( विनवणीनं ) मी अगदी खरं बोलतोय. खरंच आठवत नाही मला.

**तो :** आठवत नाही तर प्रयत्न कर. प्रयत्न तर तुझ्या हाती आहेत ना ? ( थोडा विचार करून ) असं कर, आपल्या सगळ्या प्रोफेसरांची—तुला आठवतील ती—आडनावं घे. नाहीतर कुठलीही नावं घे—जी तोंडाला येतील ती. त्या प्रोफेसराचं नाव आलं की, माझ्या डोक्यात एकदम बत्ती पेटेल व मी एकदम म्हणेन, ‘ हेच. ’ हं, कर सुरुवात.

**प्रभाकर :** ( नाइलाजानं, खचल्या आवाजात ) देशपांडे ?

**तो :** ( मान नकारार्थी हलवून ) नाही....

[ दृश्य हळूहळू बदलत जातं. कॉलेजातला सायकॉलॉजीचा वर्ग दिसू लागतो. पाचसहा विद्यार्थी. त्यांत प्रभाकर. दोघेही अगोदरच्या प्रवेशातले असले तरी त्यांच्या वागणुकीत एकदम फरक. प्रभाकर बुजणारा, चाचरणारा, थोडा ‘ बायकी ’; तर तो आक्रमक व ‘ बॉस ’सारखा. दृश्य बदलत असलं तरी संवाद मात्र अगोदरच्या प्रवेशातले चालूच. संवाद आधीचे, तर हालचाल पुढची. ]

**प्रभाकर :** कर्डिले ?

**तो :** छट्.

**प्रभाकर :** कुलकर्णी ?

**तो :** नाही.

**प्रभाकर :** ( थोडं थबकून ) अकूत ?

**तो :** ना—( तोही स्तब्ध होतो. चुटकी वाजवून ) येस, येस, अकूत—अकूतच त्या दंताडथाचं नाव.

[ प्रभाकर सुटकेचा निःश्वास सोडतो. ]

**प्रभाकर :** बरं झालं.

**तो :** काय बरं झालं ?

**प्रभाकर :** नाव सापडलं ते ! ( दबकत ) जाऊ मी आता ?

**तो :** त्याचे दात पुढं आलेले होते. ( तसं दाखवतो. ) त्याला आपल्या पुढं आलेल्या दातांचं खूप वैषम्य वाटायचं. काही पोरकट बोलून तो हसायचा. आणि त्याला एकदम जाणीव व्हायची—पुढं आलेल्या दातांची. आणि मग तो पटकन आपले दात ओठांनी झाकून घ्यायचा. ( दाखवतो. )

[ आता तो पूर्ण बदलून दुसऱ्या प्रवेशात आलेला आहे. प्रभाकरचंही तेच. कपडे पूर्वीचे असले तरी. प्रभाकर त्याच्याशेजारी शामळूपणानं बसलेला आहे. तो प्रा० अकूतांच्या नकलेत. ]

**एक मुलगा :** ( त्याला ) ...तर बॉस, तुम्ही काय म्हणत होता ? तो ( सर्व वेळ प्रा. अकुतांची नक्कल करीत ) : तर बॉईज, सायकॉलॉजीची दोन मूलभूत तत्वं आहेत— [ दुसरा मुलगा बोट वर करतो ] येस ?

**दुसरा मुलगा :** सर, एक शंका—

**तो :** बोला.

**दुसरा मुलगा :** मूलभूत म्हणजे मुलांची भुतं की भुतांची मुलं ?

( इतर पोरं खिदळतात. )

**तो :** ( रागानं दात दाखवत, नंतर ओठ त्यावर ओढून घेत ]

यू देअर ! स्टँड अप !

[ दुसरा मुलगा उभा राहतो. ]

नाव काय तुमचं ?

**दुसरा मुलगा :** सुनील गावसकर !

**तो :** अच्छा ! तुम्ही स्वतःला कोण समजता ? आघाडीचे फलंदाज ?

**दुसरा मुलगा :** नाही.

**तो :** तुम्ही माझी चेष्टा करताय काय ?

**दुसरा :** नाही सर. तुमची चेष्टा ? कसं शक्य आहे सर ? तुम्ही एवढे मानसशास्त्रामध्ये भोपळा लावून पोहलेले.

( पुन्हा हशा )

तो : ऑल राइट ! ऑल राइट ! तर मी काय सांगत होतो— माणसाच्या व्यक्तिमत्त्वाच्या बांधणीसाठी दोन मुख्य तत्त्वं कारणीभूत होत असतात.

तिसरा : सर पुन्हा भूत.

[ मुलं हसतात. ]

तो : तुम्ही लोक या वर्गात असल्यावर दुसरं कोण येणार ?

[ हशा. तिसऱ्याला मुलं खिजवतात. तिसरा ओशाळा ]

....तर ही दोन तत्त्वं. पहिलं तत्व म्हणजे सेक्स. म्हणजे लैंगिकता–

[ पोरं खिदळतात. मांजराचे आवाज काढतात ]

व दुसरं अॅग्रेशन. आक्रमकता.

[ एक मुलगा यावरही हशा पिकणार अशा अपेक्षेने हसतो व तो हसला म्हणून त्याला इतर हसतात ]

या दोन्ही तत्त्वांमुळं माणूस घडत असतो.

पहिला मुलगा : सर, पहिलं तत्त्व कोणतं म्हणालात ?

तो : सेक्स.

[ मुलं हसतात. ]

आता काय झालं हसायला ?

दुसरा : सर, तुमच्याशेजारी जी बाई ( प्रभाकरला उद्देशून ) बसलेली आहे. ती तुम्ही सेक्स शब्द उच्चारला की किरमिजते !

तिसरा : ( दुसऱ्याला ) किरमिजते म्हणजे काय रे ? मला नाही समजलं.

दुसरा : नाही समजलं ? बाळ, तुझं वय किती ?

[इतर हसतात.]

तिसरा : (रागावून ) तुला काय करायचं त्याच्याशी ? आपल्याला समजत नाहीत ते शब्द कशाला वापरतो, एखाद्या प्रोफेसरासारखे ?

[ हशा. ]

दुसरा : अगदी सोप्पा आहे शब्द. ब्लश. आपण इंग्रजीत ब्लश म्हणतो. टु ब्लश म्हणजे किरमिजणं !

तिसरा : मग सरळसरळ ' लाजते ' म्हण की.

इतर : म्हण रे म्हण—म्हण रे म्हण.

[ खिदळतात. या प्रत्येक प्रसंगी प्रभाकर कावराबावरा होतो व ' तो ' हे सगळं मनमुराद उपभोगतोय. ]

तो : स्टॉप इट, स्टॉप इट ! बॉईज, हे सिनेमाथेटर नाही की इथं काही नाटक चालू नाहीये !

पहिला : आणि एम० ए० चा क्लास चालू आहे.

दुसरा : सायकोलॉजीचा तास.

तिसरा : आणि प्रोफेसर दंताडे—आय मीन अकूत शिकवत आहेत.

पहिला : आणि आम्ही सगळे शिकत आहोत.

[ खिदळणं. ]

तो : बरोब्बर. अगदी बरोब्बर. बॉईज, तुम्ही फार हुशार आहात. पण तुमचं एक फार चुकतं !

सगळे : काय सर ?

तो : तुम्ही माझ्या खाजगी आयुष्यात फार दखल देताहात.

सगळे : म्हंजे ?

तो : तुम्ही गुरुपत्नीविषयी अनुदार उद्गार काढता—

सगळे : गुरुपत्नी ? म्हणजे सर ?

[ तो फक्त प्रभाकरकडं नजर फिरवतो. सगळ्यांच्या लक्षात ते येतं. ते एकमेकांना टाळ्या देतात. ]

तो : आत्ताच कुणी म्हणालं की, मी सेक्स हा शब्द उच्चारताच ही लाजते.

पहिला : ( उगाचच आरडाओरडा करून ) कोण हा नतद्रष्ट ?

इतर : ( दुसऱ्याकडं बोट दाखवून ) हा—हाच म्हणाला.

तिसरा : गुरुपत्नी सांगतील त्याप्रमाणं आम्ही या खाष्ट माणसाला शिक्षा करायला तयार आहोत.

[ त्याची मानगूट पकडतो. तो–दुसरा–' मेलो ' ' मेलो ' ' वाचवा ' ' वाचवा ', ' हेल्प ', ' हेल्प ', वगैरे खोटंखोटं ओरडतो. ]

तो : ( प्रभाकरला प्रेमळपणे जवळ घेऊन ) : काय ग ? तूच सांग–काय शिक्षा करायची त्या त्याला ?

[ प्रभाकर अवघडलेला. कधी त्याला सुख होतंय, तर कधी तो बावरलेला. चेहऱ्यावर गोंधळलेले भाव. ]

बोल—बोल—

[ तिकडं विद्यार्थी तिसऱ्याला नाटकीपणानं बुकलायला सुरुवात करतात. इकडं तो प्रभाकरला जवळ घेऊन कुणाचं लक्ष नाहीये पाहून त्याच्या गालावर ओठ टेकतो.

दृश्य बदलतं. थेटरचा पुन्हा पिछाडीचा भाग. 'तो' लकवा होऊन अंथरुणात पडलेला. प्रभाकर त्याच्यासमोर खिळून उभा. 'तो' थोडं स्वतःशी मोठ्याने हसत असलेला. ]

**प्रभाकर :** ( थोडया खुनशीपणानं ) फार हसतोस ?

**तो :** तू भेटलास आणि मागच्या सर्व आठवणी टंच तरुणींच्या तांडया-प्रमाणं माझ्याकडं धावून आल्यागत मला खूप सुख होतंय. असं काही झालं ना, तर मग मला जगायला एक नवीन उमेद मिळते. तुझं नाही असं होत ?

**प्रभाकर :** ( विषादपूर्ण ) माझं विचारतोयस ? माझं—माझं काय होतं बरं ? ( उसन्या आनंदात ) होय—होय— मलाही खूप आनंद होतो— खूप मजा येते.

**तो :** ( आनंदून ) खरं ?

**प्रभाकर :** ( कृत्रिमपणे ) अगदी खर्रर.

**तो :** ( वाहून जात ) प्रभेऽ—आपली—माझी होस्टेलमधली खोली.... तू आणि मी कुणी नाही—अं ? आठवतं ?

**प्रभाकर :** होय. ( एखाद दुसरं पाऊल पुढं होत ) होय— होय— सगळं.... तू ....मी....खूप बरं वाटायचं ! कुठला तो ब्रह्मानंद—तो मिळायचा. अजून—

**तो :** अजून ? तुला—तुला माझा राग येत नाही ? माझ्या वागणुकीचा ? पण....पण ते विसरून जा. प्लीज. कारण ती वयं वेडी असतात.... सेक्स अगदी पहिल्यांदा जागृत होतो ना ? त्याला आपलं ठिकाण माहीत नसतं. मग तो वेड्यासारखा शोधतो....आपलं घर !.... माणसाच्या हातातनं चुका घडतात...आता मला खूप पश्चात्ताप होतोय—वाटलं होतं—तू आता, असा भेटेपर्यंत—की एक आयुष्य मी माझ्या वासनेपायी बरबाद केलं....पण तसं नाही घडलं....थँक

गॉड ! आत्ता माझं मन स्वच्छ झालंय ...माझ्याविषयी मनात राग ठेवू नकोस. मी....मी....तसा आता घाबरलोय म्हणून—म्हणून हे म्हणत नाहीये—पण आता तुला पाहताच विचार येतोय सारखा —तू मनात आणलंस तर—मला सहज चिरडून टाकू शकशील....

**प्रभाकर** : (थंडपणे) छे ! छे ! मी तसं कशाला करीन ? कशाला करीन ? मी तुला कशाला चिरडून टाकीन ? उलट मला माझा अभिमान वाटतो.

**तो** : (न समजून) : अभिमान ? कसला अभिमान ?

**प्रभाकर** : (कडवटपणे) मी तुझी आवडती...जाऊ दे...जाऊ दे....तेव्हा तू कॉलिजातला 'ही-मॅन' होतास—सगळी पोरं तुझ्या शरीरयष्टीचा हेवा करायची, हेवा... (थांबतो. त्याचं बारीक निरीक्षण करतो.) पण काय रे, तू असा कसा झालास ? हे काय झालं तुला ?

**तो** : (दुखावलेला) एकदम अचानक घडलं. मला कळलंदेखील नाही रे ! (थोडा वेळ गप्प. विषादतो.) एम० ए० झाल्यावर मला मुंबईला एक नोकरी लागली. मी मुंबईला दाखल झालो. नोकरीचे दोनचार महिने होतात न होतात तोच गावाकडनं तार आली की, रिटायर झालेला बाप हृदयविकारानं मरण पावलेला आहे. त्याला पोचवून चार-पाच दिवस होतात न होताच तोच आईही. गच्छंती. मग या जगात माझं जवळचं कुणी उरलं नाही. तोपर्यंत मला काही वाटलं नव्हतं. पण मग तीव्रतेनं वाटू लागलं. मग मीही सपाटून आजारी पडलो. ( फिकट हसून ) वाटलं, चला, आता आपली पाळी. इतका आजारी झालो की, हॉस्पिटलात दाखल व्हावं लागलं. कुणी बघायला नाही की विचारायला नाही. ताप सारखा चढत राहायचा. भाजी-मार्केटात फेरी टाकावी तशी डॉक्टरांची राउंड. काय होतंय त्यांना समजलं नाही. त्यांना तशी गरजच वाटली नाही. ताप उतरला मात्र माझं शरीर हे वेडवाकडं होऊन पडलं. डॉक्टरांनी माझं अभिनंदन केलं : माझा मेंदू व आवाज अर्धांगात सापडला नाही. काँग्रॅट्स ! अभिनंदन ! ( रडायला लागतो. )

**प्रभाकर** : ( तितक्याच थंडपणे ) असं आहे तर ! अरेरे ! काय हे नशीब !

**तो** : ( खालच्या सुरात ) लग्न केलंस तू ?

प्रभाकर : (दचकून) लग्न म्हणतोयस ? हं... हो, केलं. पण...पण....

तो : (थोड्या काळजीनं, उत्सुकतेनं) ....काय ?

प्रभाकर : कंटाळली ती....माझ्या बायकोला....मला...

तो : कंटाळली ? म्हणजे ?

प्रभाकर : तू माझ्यावर उपकार करून ठेवले होतेस ना ! (अडखळत) कारण ...रात्री...काय व्हायचं ? तुझा कदाचित विश्वास बसणार नाही... तिच्याकडं जाण्यापूर्वी...माझ्या भावना चेतावण्यासाठी....मला.... एखाद्या पुरुषाकडं.... काय सांगू ? अगदी आवश्यक असायचं.... त्याशिवाय....त्याशिवाय....

तो : (शॉक बसून) : काय म्हणतोयस ?

प्रभाकर : (हतबल) अगदी खरं. एक शब्दही खोटा नाही. मग रात्रीबेरात्री भटकत राहायचो...पुरुष पाहत...धुंडाळत....कधी मिळायचा.... तर बायकोकडं धावत यायचो... कधी नाही मिळायचा—नाही मिळाला की, बायकोला तोंड दाखवायची लाज वाटायची. (हसून) जायचोच नाही बघ घरी. (थांबून) कंटाळली....कंटाळली. (हसून) तिला—तिला वेगळाच संशय आला. तिला खात्रीनं वाटलं, मला बाहेरचा नाद आहे—कुणी दुसरी स्त्री आहे म्हणून ! (पिळवटून) मला तिला सांगताच आला नाही खरा प्रकार. तिचा विश्वासच बसला नसता. बायकांची जात. त्यांना पुरुष म्हंजे नुसता पुरुषच वाटतो....

[ क्षण-दोन क्षण शांतता. ]

माझं लग्न झाल्याचं ऐकून तुला वाईट वाटलं ?

तो : छे ! छे !

प्रभाकर : खोटं बोलू नकोस ! ( पुढं होतो. )

तो : तू-तू-असा का पुढं सरकतोहेस ?

प्रभाकर : ( हसून ) घाबरलास ?

तो : तू मला मारणार तर नाहीस ? माझ्यावर हल्ला तर करणार नाहीस ? तसा विचार तुझ्या मनात असेल तर तू तो मनातून काढून टाक ...

प्रभाकर : मी तुला का मारू ?

तो : मागच्या गोष्टींचा सूड म्हणून...

[ प्रभाकर हसतो. ]

तो तुझा बेत तडीस जाणार नाही. सांगून ठेवतो...

प्रभाकर : एखादं पाच वर्षांचं पोरदेखील तुला सहज सॉलिड लाथ हाणू शकेल आणि मग तू पाणी-पाणी करीत कण्हत मरून जाशील. तू केव्हा व कसा मेलास हे तुला कळून देखील येणार नाही !

तो : ( काळजीच्या सुरात ) विचार काय आहे तुझा ?

प्रभाकर : लाथ मारली तर—

तो : पण का ? तुला ते शोभून दिसणार नाही. मी हा असा—आणि तू —मी काही तुझं नुकसान केलेलं नाहीये—

प्रभाकर : तू माझ्या आयुष्याचं फार प्रचंड नुकसान केलंयस. माझ्या आयुष्याची घनघोर मोडतोड केलीहेस. ( थांबतो. बदलतो. ) मघा तू काही —मागचे दिवस—टंच तरुणींचा तांडा—आयुष्याला नवी उमेद... माझंही असं होऊ बघतंय बघ—मला तुला भेटून प्रचंड आनंद झालाय, हे तुला माझ्या चेहऱ्यावरनं दिसून येत नाही ?

[ प्रभाकर त्याच्याकडं सरकू लागतो. त्यासरशी 'तो' घाबरू लागतो. तो स्वतःला सावरण्याचा, स्वसंरक्षणाच्या प्रयत्नाला लागतो. प्रभाकर हसतो. बायकी होत जातो. त्याच्याकडं प्रेमळ नजरेनं पाहू लागतो. प्रभाकरचा हेतू लक्षात येऊन तो भयानक हादरतो. ]

तो : ( किंचाळून ) नाही-नाही-आता शक्य नाही—मला लकवा-मी—मरेन-मरेन मी प्रभाकर—प्रभें ऽऽ

प्रभाकर : ( प्रेमळ हसत ) मनकवडा ! माझ्या मनातले विचार कसे ओळखलेस? अं ? ही-मॅन. असा—असा—तू बदलू नकोस !—मला आवडणार नाही—( जवळ येऊ लागतो. )

तो : ( ओरडून ) नाही !

प्रभाकर : हो—हो ! हाक मार—पूर्वीसारखी हाक मार मला-म्हण-म्हण-प्रभे ऽऽ प्रभे ऽ—( त्याला गच्च मिठी मारतो. )

तो : ( घुसमट ) वाचवा ! वाचवा !

[ त्याचे हुंदके ऐकू येत असतानाच रंगभूमी अदृश्य होते. ]

• • •

बुवा, ऑगस्ट
दिवाळी

# १९८१ मध्ये प्रकाशित झालेल्या एकांकिकांची शीर्षक–सूची

| | | |
|---|---|---|
| १) 'अगा जे घडलेच नाही' | फोंडके बाळ, | बुवा, जानेवारी |
| २) 'अजुन चालतोच वाट' | दडकर जया, | अबकडई, दिवाळी अंक |
| ३) 'अंधेर नगरी आंधळाच राजा' | काकडे वामन, | बुवा, जून |
| ४) 'अर्ध पाऊल' | ताम्हणकर मा. कृ. | पैंजण, जानेवारी |
| ५) 'ॲनिव्हर्सरी' | मुर्वे श्रीरंग, | लोकवाङ्मय, जाने. फेब्रुवारी |
| ६) 'अलकाराणीचा कोंबडा' | खरात ह. शि. | लोकमत, दिवाळी |
| ७) 'अलौकिक मातृप्रेम' | देसाई संजय, | गीतादर्श, आक्टो. |
| ८) 'अशी आणखी लक्षावधी' | मतकरी रत्नाकर, | निषाद, दिवाळी |
| ९) 'असाही एक खुनी' | राणे रमेश, | साहित्यरेश्मा, दिवाळी |
| १०) 'असून अडचण' | बापट शास्त्री, | स्त्री, फेब्रुवारी |
| ११) 'अक्षरांचा अंत' | बनहट्टी अनिरुद्ध, | अनुष्टुभ, जुलै |
| १२) 'ऑर्फियस' | मुळम श्रीधर, | अबकडई, दिवाळी |
| १३) 'आमच्या खास वातमीदाराकडून' | लेले अशोक, | बुवा, डिसेंबर |
| १४) 'आम्ही कुणासाठी ?' | हर्डीकर कल्याणी, | एकता, फेब्रुवारी |
| १५) 'आयडेंटिटी कार्ड' | बेळगावकर पद्माकर, | ज्वलंत, दिवाळी |
| १६) 'उजळू या लाख ज्योती' | कस्तुरे मो. प्र. | पैंजण, फेब्रुवारी |
| १७) 'उःशाप' | डॉ. परांजपे प्रकाश, | वटवट, दिवाळी |
| १८) 'इव्हॅल्युएशन' | पिंगळे प्रभाकर, | धूमधमाल, दिवाळी |

| | | |
|---|---|---|
| १९) 'कलकी' | ताम्हाणे शेखर, | लोकप्रभा |
| २०) 'कल्पद्रुमाची डहाळी' | माळी गजमल, | कपोत, दिवाळी |
| २१) 'कशासाठी सुखासाठी' | शेजवलकर र. म. | |
| २२) 'काममंजिरी' | निनावे वसंत, | पथिक, दिवाळी |
| २३) 'करिअर' | कुंभोजकर वसंत, | स्वप्ना, दिवाळी |
| २४) 'कपी इंद्र इंद्राणी संवाद' | नाईक राजीव, | भरतशास्त्र, ऑक्टो. नो. डि. |
| २५) 'क्राइम ऑफ ए डेड मॅन' | तापस विजय, | भरतशास्त्र, जानेवारी |
| २६) 'क्रिकेट इश्श स्टाईल' | फडके सदाशिव, | श्यामसुंदर, दिवाळी |
| २७) 'कुणीकडे' | श्रीवास्तव लीला, | लोकसत्ता, दिवाळी |
| २८) 'कृपा करा हात आवरा' | घैसास श्रीधर, | पुष्कळा, दिवाळी |
| २९) 'केला तुका झाला माका' | म्हापणकर अरविंद, | जनयुग, दिवाळी |
| ३०) 'कैफियत' | श्रोत्री निशिकांत, | मधुकंस, दिवाळी |
| ३१) 'कोंडी' | नरवणे कविता, | पैंजण, डिसेंबर |
| ३२) 'खिडकी' | सोनावणे सुभाष, | अनघा, दिवाळी |
| ३३) 'खो खो' | फोंडके बाळ, | |
| ३४) 'गजरा एक हलका फुलका' | खरे सुरेश, | विनोदी फसवणूक दिवाळी |
| ३५) 'गणगौळण' | शेटये चंद्रकांत, | राजहंस, दिवाळी |
| ३६) 'गणगौळण' | जोशी प्रकाश, | श्यामसुंदर, सप्टेंबर |
| ३७) 'गुलब्याला गुलबी मिळाली' | काकडे वामन, | बुवा, डिसेंबर |
| ३८) 'गोल्डमेडल' | पुराणिक निलिमा, | बया, दिवाळी |
| ३९) 'चार बोटांचे अंतर' | हवालदार कृ. व्यं. | अभिव्यक्ती, दिवाळी |
| ४०) 'चिमणराव टी. व्ही. वर' | काणे ग. वि. | बुवा, एप्रिल |

| | | |
|---|---|---|
| ४१) ‘चित्रगुप्ताच्या महालात’ | जोग सुरेश, | बुवा, ऑगस्ट |
| ४२) ‘जनरेशन गॅप’ | खरात ह. शि. | अक्षय, दिवाळी |
| ४३) ‘जी सरकार व्हय सरकार’ | गाडगीळ सुरेश, | बुवा, जुलै |
| ४४) ‘तगई’ | जावडेकर म. शं. | वसंत, जुलै |
| ४५) ‘तोतरे एक फसलेले नाटक’ | कुलकर्णी मेघनाद, | भरतशास्त्र, ऑक्टो. नोव्हें. डिसेंबर |
| ४६) ‘दरबार’ | भावे राम, | लोणावळा टाइम्स दिवाळी |
| ४७) ‘दळिता कांडिता’ | शिंत्रे विष्णू लक्ष्मण, | सन्मार्ग मित्र, दिवाळी |
| ४८) ‘दिवान इ. आम’ | जनता दरबार, | आवाज, दिवाळी |
| ४९) ‘दुखरी’ | द्रवीड अनिल, | गर्जना, दिवाळी |
| ५०) ‘दुष्मन’ | पाटील विलास, | गजशक्ती, दिवाळी |
| ५१) ‘धनी मी न्हायी यायची शिणुमाला’ | जांभळे बाळकृष्ण, | दीपांजली, दिवाळी |
| ५२) ‘निवडणुकीची बाधा’ | पटवर्धन प्रतिभा, | वहिनी, जून |
| ५३) ‘निसर्ग’ | पाटील विलास, | गजशक्ती, दिवाळी |
| ५४) ‘नोकरी नाहीतर छोकरी’ | लोहकरे प्रमोद, | दीपांजली, दिवाळी |
| ५५) ‘नो मॅन्स लँड’ | पेडणेकर आ. ना. | शिल्प, दिवाळी |
| ५६) ‘पसंत आहे मुलगी’ | वैद्य अशोक, | बुवा, ऑगस्ट |
| ५७) ‘पहाट फुटली दिशांतरी’ | रानडे गो. वि. | वाङ्मयशोभा, मार्च |
| ५८) ‘प्राक्तन’ | आचवल माधव, | सत्यकथा, जून |
| ५९) ‘पुढारी एकम् पुढारो’ | संत जान्हवी, | स्वरमाला, दिवाळी |

| | | |
|---|---|---|
| ६०) 'पुतळा' | जोशी प्रकाश, | पजण, डिसेंबर |
| ६१) 'पुन्हा नको जन्म इथे' | हरिसंगम शशिकांत, | बुवा, जून |
| ६२) 'प्रपंचात पदार्पण राणीचं राजकारण' | पटवर्धन प्रतिभा, | वहिनी, जाने. |
| ६३) 'फ्रॅन्टसी' | सोनार ज्ञानेश, | रूपा, ऑक्टोबर |
| ६४) 'बसस्टॉप' | आळेकर सतीश, | हंस, दिवाळी |
| ६५) 'बंद दरवाजा' | कुलकर्णी नरहर, | दीपांजली, दिवाळी |
| ६६) 'बुवाबाजीचा येळकोट' | मुरकर सदानंद, | रंभा, जानेवारी |
| ६७) 'बेरीज वजाबाकी' | गज्वी प्रेमानंद, | लोकप्रभा एकांकिका विशेषांक |
| ६८) 'भिकाऱ्याचा खेळ' | शहाणे अशोक, | सत्यकथा, ऑक्टोबर |
| ६९) 'भिंत' | आळेकर सतीश, | भरतशास्त्र, मार्च |
| ७०) 'मालकाचा बकरा नि नोकर नवरा' | काकडे वामन, | बुवा, मे |
| ७१) 'मिठू मिठू पोपट' | चित्रे दिलीप, | अभिरूची दिवाळी |
| ७२) 'मिनी आणि बिनी' | वझे अच्युत, | भरतशास्त्र, मे, जून |
| ७३) 'मी लेक पाटलाची' | पाटील भास्कर, | विराट महाराष्ट्र, दिवाळी |
| ७४) 'मुकाबला' | मतकरी रत्नाकर, | श्री दीपलक्ष्मी, दिवाळी |
| ७५) 'मुलांचे संगोपन' | भावसार क. मं. | रंभा, फेब्रुवारी |
| ७६) 'मृदुलक्षणा' | निनावे वसंत, | कोकिळा, दिवाळी |
| ७७) 'येथे रेडिमेड कविता मिळतात' | वाळिंबे अरविंद, | रंजन, मे |
| ७८) 'रक्त हवे आम्हाला' | जोशी प्रकाश, | बुवा, एप्रिल |
| ७९) 'रवी आणि शालू' | वझे अच्युत, | भरतशास्त्र, फेब्रुवारी |

| | | |
|---|---|---|
| ८०) 'लकवा' | शहाणे मनोहर, | सत्यकथा, जान. |
| ८१) 'लाल छत्रीतला जादूगार' | नाईक सतीश, | लोकप्रभा |
| ८२) 'लेट अस सेलिब्रेट' | भामरे विजय, | श्यामसुंदर, ऑक्टोबर |
| ८३) 'विद्रोही' | कै. गोडसे वसंत, | भरतशास्त्र, एप्रिल |
| ८४) 'विद्यापीठ हाय हाय' | सोनटक्के कमलाकर, | युवाजल्लोष, दिवाळी |
| ८५) 'शिकस्त गरूर बादशहा' | संत जान्हवी, | स्मिता, मे |
| ८६) 'शिवशाहीचा उषःकाल' | पुरंदरे व. मो. | स्वप्ना, दिवाळी |
| ८७) 'सत्तेचे गुलाम' | काकडे वामन, | युवा, फेब्रुवारी |
| ८८) 'संभाजीचे भूत' | गोडसे द. ग. | रसिक, दिवाळी |
| ८९) 'संसार हा सुखाचा' | टिळक सुमन, | वहिनी, मार्च |
| ९०) 'संवाद' | पाठक किशोर, | लोकप्रभा |
| ९१) 'संगीत रूपक माझ्या मऱ्हाटीचा रंग' | कुलकर्णी श्रीधर, | पूर्वा, जुलै |
| ९२) 'संगीत नाट्यानुभवाचा कल्पनाविलास' | वेलणकर महेश, | भरतशास्त्र, ऑक्टो. नोव्हें. डिसेंबर |
| ९३) 'सापळा' | जोशी प्रकाश, | युवा, सप्टेंबर |
| ९४) 'साहित्याचे घर' | सारंग विलास, | सत्यकथा, नोव्हेंबर |
| ९५) 'साडी सलामत' | फडणीस केशव, | श्यामसुंदर, जानेवारी |
| ९६) 'समस्यापंचक' | नाडकर्णी कमलाकर, | लोकप्रभा |
| ९७) 'स्वर्गयात्रा' | आठवले सदाशिव, | सोबत, दिवाळी |
| ९८) 'सॅंडमिशन' | पाटोळे अशोक, | विनोदी करमणूक, दिवाळी |
| ९९) 'स्पेअर पार्टस' | पाटील शांताराम, | हौस, दिवाळी |
| १००) 'हाय रे प्रेमा' | फडके श्याम, | मेघना, दिवाळी |
| १०१) 'हातोहात अडके' | सोनार वा. रा. | आकंद, दिवाळी |

## १९८१ मध्ये प्रकाशित झालेल्या एकांकिकांच्या लेखकांची सूची

| | |
|---|---|
| १) आचवल माधव | १) 'प्राक्तन' — सत्यकथा, जून |
| २) आळेकर सतीश | १) 'भिंत' — भरतशास्त्र, मार्च |
| | २) 'बसस्टॉप' — हंस, दिवाळी |
| ३) आठवले सदाशिव | १) 'स्वर्गयात्रा' — सोबत, दिवाळी |
| ४) कस्तुरे मो. प्र. | १) 'उजळूया लाख ज्योती' — पैंजण, फेब्रुवारी |
| ५) काकडे वामन | १) 'अंधेर नगरी आंधळाच राजा' — बुवा, जून |
| | २) 'मालकाचा बकरा नि नोकर नवरा' — बुवा, मे |
| | ३) 'गुलव्याला गुलवी मिळाली' — डिसेंबर |
| | ४) 'सत्तेचे गुलाम' — फेब्रुवारी |
| ६) काणे ग. वि. | १) 'चिमणराव टी. व्ही. वर' |
| ७) कुंभोजकर वसंत | १) 'करिअर' — स्वप्ना, दिवाळी |
| ८) कुलकर्णी नरहर | १) 'बंद दरवाजा' — दीपांजली |
| ९) कुलकर्णी मेघनाद | १) 'तोतरे एक फसलेले नाटक' — भरतशास्त्र, ऑक्टोबर |
| १०) कुलकर्णी श्रीधर | १) 'संगीत रूपक माझ्या मऱ्हाटीचा रंग' — पूर्वा, जुलै |
| ११) खरात ह. शि. | १) 'जनरेशन गॅप' — अक्षय, दिवाळी |
| | २) 'अलकाराणीचा कोंबडा' — लोकमत, दिवाळी |
| १२) खरे सुरेश | १) 'गजरा एक हलका फुलका' — विनोदी फसवणूक, दिवाळी |
| १३) गव्ही प्रेमानंद | १) 'बेरीज वजाबाकी' — लोकप्रभा |
| १४) गाडगीळ सुरेश | १) 'जी सरकार व्हय सरकार' — बुवा, जुलै |
| १५) गोडसे द. ग. | १) 'संभाजीचे भूत' — रसिक, दिवाळी |

| | |
|---|---|
| १६) कै. गोडसे वसंत | १) ‘ विद्रोही ’ — भरतशास्त्र, एप्रिल |
| १७) घैसास श्रीधर | १) ‘ कृपा करा हात आवरा ’ —पुष्कळा, दिवाळी |
| १८) चित्रे दिलीप | १) ‘ मिठू मिठू पोपट ’ — अभिरुची, दिवाळी |
| १९) जनता दरबार | १) ‘ दिवान इ आम ’ — आवाज, दिवाळी |
| २०) जावडेकर म. शं. | १) ‘ तगई ’ — वसंत, जुलै |
| २१) जांभळे बाळकृष्ण | १) ‘ धनी मी नाही याची शिणुमाला ’—दीपांजली |
| २२) जोग सुरेश | १) ‘ चित्रगुप्ताच्या महालात ’ — बुवा, ऑगस्ट |
| २३) जोशी प्रकाश | १) ‘ गळगोळण ’ — श्यामसुंदर, सप्टेंबर |
| | २) ‘ पुतळा ’ — पैंजण, डिसेंबर |
| | ३) ‘ रक्त हवे आम्हाला ’ — बुवा, एप्रिल |
| | ४) ‘ सापळा ’ — बुवा, सप्टेंबर |
| २४) टिळक सुमन | १) ‘ संसार हा सुखाचा ’ — वहिनी, मार्च |
| २५) तापस विजय | १) ‘ क्राइम ऑफ ए डेड मॅन ’ — भरतशास्त्र, जानेवारी |
| २६) ताम्हणकर मा. कृ. | १) ‘ अर्धपाऊल ’ — पैंजण, जानेवारी |
| २७) ताम्हाणे शेखर | १) ‘ कलकी ’ — लोकप्रभा |
| २८) दडकर जया | १) ‘ अजून चालतोच वाट ’ —अबकडई, दिवाळी |
| २९) देसाई संजय | १) ‘ अलौकिक मातृप्रेम ’— गीतादर्श, ऑक्टोबर |
| ३०) द्रवीड अनिल | १) ‘ दुखरी ’ — गर्जना, दिवाळी |
| ३१) नरवणे कविता | १) ‘ कोंडी ’ — पैंजण, डिसेंबर |
| ३२) नाईक सतीश | १) ‘ लाल छत्रीतला जादूगार ’ — लोकप्रभा |
| ३३) नाईक राजीव | १) ‘ कपी इंद्र इंद्राणी संवाद ’ — भरतशास्त्र, ऑक्टोबर |
| ३४) नाडकर्णी कमलाकर | १) ‘ समस्यापंचक ’ — लोकप्रभा |
| ३५) निनावे वसंत | १) ‘ मृदुलक्षणा ’ — कोकिळ, दिवाळी |
| | २) ‘ काममंजिरी ’ — पथिक, दिवाळी |
| ३६) परांजपे प्रकाश | १) ‘ उःशाप ’ — वटवट, दिवाळी |
| ३७) पटवर्धन प्रतिभा | १) ‘ प्रपंचात पदार्पण राणीचे राजकारण ’ वहिनी, जानेवारी |

| | |
|---|---|
| | २) 'निवडणुकीची बाधा' — वहिनी, जून |
| ३८) पाठक किशोर | १) 'संवाद' — लोकप्रभा विशेषांक |
| ३९) पाटोळे अशोक | १) 'सॅडमिशन' — विनोदी फसवणूक |
| ४०) पाटील विलास | १) 'निसर्ग' — गजशक्ती, दिवाळी |
| | २) 'दुष्मन' — गजशक्ती, दिवाळी |
| ४१) पाटील भास्कर | १) 'मी लेक पाटलाची' — विराट महाराष्ट्र, दिवाळी |
| ४२) पाटील शांताराम | १) 'स्पेअर पार्टस्' — हौस, दिवाळी |
| ४३) पिंगळे प्रभाकर | १) 'इन्व्हल्युएशन' — धूमधमाल, दिवाळी |
| ४४) पुराणिक निलिमा | १) 'गोल्डमेडल' — वया, दिवाळी |
| ४५) पुरंदरे व. मो. | १) 'शिवशाहीचा उषःकाल' — स्वप्ना, दिवाळी |
| ४६) पेडणेकर आ. ना. | १) 'नो मॅन्स लँड' — शिल्प, दिवाळी |
| ४७) फडके सदाशिव | १) 'क्रिकेट इंग्लिश स्टाईल' — श्यामसुंदर, दिवाळी |
| ४८) फडके श्याम | १) 'हाय रे प्रेमा' — मेघना, दिवाळी |
| ४९) फडणीस केशव | १) 'साडी सलामत' — श्यामसुंदर, जानेवारी |
| ५०) फोंडके बाळ | १) 'अगा जे घडलेच नाही' — बुवा, जानेवारी |
| ५१) बनहट्टी अनिरुद्ध | १) 'अक्षराचा अंत' — अनुष्टुभ, जुलै |
| ५२) बापट शशी | १) 'असून अडचण' — स्त्री, फेब्रुवारी |
| ५३) बेळगावकर पद्माकर | १) 'आयडेंटिटी कार्ड' — ज्वलंत, दिवाळी |
| ५४) भावसार कं. म. | १) 'मुलांचे संगोपन' — रंभा, फेब्रुवारी |
| ५५) भावे राम | १) 'दरबार' — लोणावळा टाइम्स |
| ५६) भामरे विजय | १) 'लेट अस सेलिब्रेट' — श्यामसुंदर, |
| ५७) मतकरी रत्नाकर | १) 'मुकाबला' — श्री दीपलक्ष्मी |
| | २) 'अशी आणखी लक्षावधी' — निषाद, दिवाळी |
| ५८) माळी गजमल | १) 'कल्पद्रुमाची उन्हाळी' — कपोत, दिवाळी |
| ५९) मुरकर सदानंद | १) 'बुवाबाजीचा येळकोट' — रंभा, जानेवारी |
| ६०) मुळम श्रीधर | १) 'ऑर्फियस' — अबकडई, दिवाळी |
| ६१) म्हापणकर अरविंद | १) 'केला तुका आला माका' — नवयुग, दिवाळी |
| ६२) रानडे गो. वि. | १) 'पहाट फुटली दिशांतरी' — वाङ्मयशोभा, |

| | |
|---|---|
| ६३) राणे रमेश | १) 'असाही एक खुनी' — साहित्य रेश्मा, दिवाळी |
| ६४) लेले अशोक | १) 'आमच्या खास बातमीदाराकडून' — वुवा, डिसेंबर |
| ६५) लोहकरे प्रमोद | १) 'नोकरी नाहीतर छोकरी' — दिपांजली, दिवाळी |
| ६६) वझे अच्युत | १) 'रवी आणि शालू' — भरतशास्त्र, फेब्रुवारी |
| | २) 'मिनी आणि बिनी' — भरतशास्त्र, मे, जून |
| ६७) वैद्य अशोक | १) 'पसंत आहे मुलगी' — वुवा, ऑगस्ट |
| ६८) वाळिंबे अरविंद | १) 'येथे रेडिमेड कविता मिळतात' — रंजन, मे |
| ६९) वेलणकर महेश | १) 'संगीत नाट्यानुभवाचा कल्पनाविलास' — भरतशास्त्र, ऑक्टो. नोव्हे. डिसेंबर |
| ७०) शहाणे अशोक | १) 'भिकाऱ्याचा खेळ' — सत्यकथा, ऑक्टोबर |
| ७१) शहाणे मनोहर | १) 'लकवा' — सत्यकथा, जानेवारी |
| ७२) शिंत्रे विष्णु लक्ष्मण | १) 'दळिता कांडिता' — सन्मार्गमित्र, दिवाळी |
| ७३) शेटये चंद्रकांत | १) 'गळगौळण' — राजहंस, दिवाळी |
| ७४) शेजवलकर र. म. | १) 'कशासाठी सुखासाठी' |
| ७५) संत जान्हवी | १) 'पुढारी एकम् पुढारी' —स्वरमाला, दिवाळी |
| | २) 'शिकस्त गरूर बादशहा' — स्मिता, मे |
| ७६) सारंग विलास | १) 'साहित्याचे घर' — सत्यकथा, नोव्हेंबर |
| ७७) सुर्वे श्रीरंग | १) 'ॲनिव्हर्सरी' — लोकवाङ्मय, जानेवारी |
| ७८) सोनटक्के कमलाकर | १) 'विद्यापीठ हाय हाय'— युवाजल्लोष, दिवाळी |
| ७९) सोनार ज्ञानेश | १) 'फॅन्टसी' — रूपा, ऑक्टोबर |
| ८०) सोनार वा. रा. | १) 'हातोहात अडके' — आनंद, दिवाळी |
| ८१) सोनावणे सुभाष | १) 'खिडकी' — अनघा, दिवाळी |
| ८२) हरिसंगम शशिकांत | १) 'पुन्हा नको जन्म इथे' — वुवा, जून |
| ८३) हर्डीकर कल्याणी | १) 'आम्ही कुणासाठी' — एकता, फेब्रु. |
| ८४) श्रीवास्तव लिला | १) 'कुणीकडे' — लोकसत्ता, दिवाळी |
| ८५) श्रोत्री निशिकांत | १) 'कैफियत' — मधुकंस, दिवाळी |

# लेखक परिचय

## सतीश आळेकर

जन्म पुणे येथे दि. ३० जानेवारी ४९ रोजी.

शिक्षण : एम्. एस्सी. नोकरी

झुलता पूल हा एकांकिका संग्रह. अन्य एकांकिका स्वतंत्रपणे प्रकाशित. मिकी आणि मेमसाहेब, महानिर्वाण, महापूर, बेगम बर्वे, शनिवार रविवार ही नाटके.

( थिएटर ॲकॅडेमी, पुणे या नाट्यसंस्थेचे संस्थापक व कार्यकर्ते )

राज्यनाट्यस्पर्धेत नाट्यलेखनाची पारितोषिके.

नाट्यलेखनाची शासकीय पारितोषिके.

प्रयोगासाठी अपेक्षित मानधन : रु. ७५

पत्ता : ४३८ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.

## विजय तापस

मुंबई येथे जन्म.

शिक्षण : एम्. ए. एम्. फिल्. – मुंबई विद्यापीठ. नोकरी.

डॉ. लक्ष्मीनारायण लाल यांच्या ' कॉफी हाऊसमें इंतजार ' या एकांकिके व शंकर शेष यांच्या ' फन्दी ' या नाटकाचे भाषांतर.

भरतशास्त्र, महाराष्ट्र टाइम्स, आलोचना यामध्ये समीक्षात्मक लेखन प्रसिद्ध.

प्रयोगासाठी अपेक्षित मानधन : रु. ५०.

पत्ता : एफ्/६७, पाम एकर्स कॉलनी, महात्मा फुले मार्ग, मुलुंड ( पूर्व ), मुंबई ४०००८१.

## शेखर ताम्हाणे

मुंबई येथे १७ जानेवारी १९५३ रोजी जन्म.

केमिकल इंजिनियअर. व्यवसाय.

IRBK-0120787
IRBK-0120787